# अनुक्रमणिका

**संचालक**
हेमन्त टकले
---
**संपादक**
डॉ. सुधीर भोंगळे
---
या अंकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी प्रबंध संपादक, संपादक व संचालक सहमत असतीलच असे नाही.
---
**संपादकीय पत्रव्यवहार**
ठाकरसी हाऊस,
जे.एन.हेरेडिया मार्ग,
बॅलार्ड इस्टेट,
मुंबई-४०० ०३८
०२२-३५३४७४००/०१
**कला निर्देशन**
धनंजय सस्तकर
**मांडणी**
दिलीप रोडे
**फोटो**
प्रशांत चव्हाण
---
**वर्गणीचे दर–**
**वार्षिक रु. ५००/–**
**वर्गणीचा धनादेश**
**'हेमन्त मल्टिमीडिया ओपीसी प्रा.लि.'**
या नावाने काढावा.
**www.ncp.org.in**
यावर मासिक उपलब्ध
---
**मुद्रक, प्रकाशक**
हेमन्त प्रभाकर टकले यांनी 'हेमन्त मल्टीमीडिया ओपीसी प्रा.लि.' च्या वतीने मीडिया आर ॲण्ड डी., १३, अमृत मधुरा, प्लॉट नं. ३, सेक्टर-३, आरएससी-२८, चारकोप, कांदिवली (पश्चिम), मुंबई-४०००६७ येथे छापून ७८, रेशमभवन, ६ वा मजला, वीर नरिमन रोड, चर्चगेट, मुंबई-४०००२० येथून अंक प्रकाशित केले.

**4** अध्यक्षीय– जयंत पाटील– पक्ष चोरणाऱ्यांची टोळी

**5** संपादकीय– डॉ. सुधीर भोंगळे– ही चिन्हे कशाची? घबराटीची??

**10** शरद पवार यांची मुंबईतील पत्रकार परिषद
१) महिला आरक्षणासंबंधीचं पंतप्रधानांचं वक्तव्य खोटे व क्लेशदायी– शरद पवार
२) निवडणूक प्रक्रियेद्वारेच शरद पवार पक्षाचे अध्यक्ष– जितेंद्र आव्हाड

**18** कृतज्ञता सोहळा, किल्लारी, भाषणे–
१) शरद पवार–१८; २) सुप्रिया सुळे–२५; ३) दिलीप देशमुख–२८

**30** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्वाभिमान सभा,जळगाव, भाषणे–
१) शरद पवार–३०, २) जयंत पाटील–३३, ३) एकनाथ खडसे–३५
४) जितेंद्र आव्हाड–३८, ५) अनिल देशमुख–४०, ६) अरुण गुजराथी–४२
७) रोहित पवार–४३, ८) ॲड. रोहिणीताई खडसे–४५

**46** महिला आरक्षण सत्य की आभास– अनंत बागाईतकर

**54** क्रियाशीलता आणि सुसंवाद हा जीवनातील यशाचा मार्ग– शरद पवार

**58** वाढत्या गटबाजीने मोदी हैराण– व्यंकटेश केसरी

**64** खलिस्तानचा बागूलबोवा– निस्सिम दास

**70** सुप्रिया सुळे पत्रकार परिषद,पुणे
राष्ट्रवादीची स्थापना कोणी केली हे सगळ्यांना माहिती आहे

**76** अझरबैजान व आर्मेनियातील एक दिवसीय युद्ध– जतिन देसाई

**80** 'समाजस्वास्थ्य'कार रघुनाथ धोंडो कर्वे– प्रा.डॉ. गणेश राऊत

**84** काँग्रेसमधील निर्णायक दुवा : बद्रुद्दिन तय्यबजी– प्रा.डॉ. गणेश राऊत

**86** लोकशाहीचे वैभव इतिहासजमा– फिरस्ता

**94** नोकर भरती प्रक्रियेसाठी कायदा करून पारदर्शकता आणावी– रोहित पवार

**96** कानोकानी– घंटाकर्ण (हलके–फुलके राजकीय किस्से)

**102** शेवटचे पान– हेमन्त टकले– महात्मा गांधी २० व्या शतकातील कबीर


## अध्यक्षीय

# पक्ष चोरणाऱ्यांची टोळी



राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि ‘जय जवान-जय किसान’ नारा देणारे माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांची २ ऑक्टोबरला आपण देशभर जयंती साजरी केली. याच दिवशी महाराष्ट्राचे एक थोर सुपूत्र रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर आणि देशाचे माजी अर्थमंत्री ‘सर’ चिंतामणराव देशमुख (सी.डी.) यांची पुण्यतिथी होती. ही पुण्यतिथी साजरी करून त्यांच्या कार्यकर्तृत्त्वाला सलाम करण्याचे भान आपल्या कुणालाही फारसे राहिलेले नाही याची सल आणि खंत प्रमाणिक व स्वाभिमानी माणसांच्या मनात निश्चित राहिल. सी.डी. देशमुखांची आठवण होणे हे ही कृतज्ञतेचे एक लक्षण आहे. अर्थात हल्ली कृतज्ञता, स्वाभिमान, निर्भिडपणा, करारी बाणा फार अपवादात्मक स्थितीतच पाहायला मिळतो. राजकारणात तर आता कृतघ्न माणसांचीच संख्या प्रचंड वाढून त्यांचे मोठे पीक आले आहे. किंबहुना पक्ष चोरणाऱ्यांचीच टोळी उभी राहताना दिसते आहे. या टोळ्या नुसत्या चोर आहेत अशातला भाग नाही. या टोळ्यांचे म्होरके अत्यंत लबाड, धूर्त, अप्रामाणिक, भ्रष्ट आणि डरपोक असून सत्याला सामोरे जाऊन धाडसाने त्याचा स्वीकार करण्याची त्यांची हिंमत नाही. त्यामुळे ईडीच्या धमकीने व तुरूंगात जाण्याच्या भीतीने व अनीतीने मिळविलेल्या मालमत्तेवर येणारी जप्तीची टाच रोखण्याच्या उद्देशाने बरेच नेते, आमदार व लोकप्रतिनिधी एका रात्रीत पक्ष बदलतात, निष्ठा विकतात, स्वाभिमान गहाण टाकतात, उपकार विसरतात. एवढं करूनही थांबत नाहीत. ज्यांनी आपल्याला राजकारणात आणले, मान, प्रतिष्ठा, मंत्रीपदे व नेतृत्व करण्याची संधी देऊन जनमानसात काही एक स्थान निर्माण करुन दिले त्यांचेच स्थान व खुर्ची खेचून घेण्याचा प्रयत्न करतात हे आपण सध्या रोज उघड्या डोळ्यांनी पाहतो आहोत. हा कृतघ्नपणाचा केवढा कळस आहे. मी येथे जाणीवपूर्वक कुणाचेही नाव घेत नाही. पण फोडाफोडीचे, दमदाटीचे, प्रलोभनाचे, माणसे खोक्यांनी विकत घेण्याचे स्वार्थी व लबाड राजकारण करणारे नेते जेव्हा महात्मा गांधींच्या जयंतीनिमित्त झाडू हातात घेऊन स्वच्छता मोहीम राबविण्याचे नाटक करतात तेव्हा महात्मा गांधींच्या अंतःकरणात किती वेदना होत असतील याची आपण कल्पनासुद्धा करू शकत नाही. अटकेच्या भितीने भाजपत गेलेले हे पळपुटे शूर व मर्द राजकारणी आहेत या भावनेने जनता त्यांच्याकडे आता पाहात नाही. त्यामुळे या सर्वांचा उल्लेख ‘गद्दार’ असाच होतो. ज्या महात्मा गांधींचे स्मरण म्हणून हाती झाडू घेण्याचे नाटक वठविले जाते त्या नाटक्यांनी महात्माजींचे ‘‘शूराची हिंसा परवडली पण नामर्दाची अहिंसा नको,’’ हे विचार व वाक्य एकदा आठवून ते स्वकृतीत आणण्याचा प्रयत्न करावा म्हणजे आपण जे वागलो व वागतो आहोत तो मार्ग योग्य आहे की अयोग्य आहे याच्या चिंतनाला निदान सुरूवात तरी होईल.

मला एका गोष्टीचे फार नवल वाटले. पक्ष चोरणारे लोक किती धादांत खोटे बोलू शकतात याचा खासदार प्रफुल पटेल यांच्या पत्रकार परिषदेमुळे मला साक्षात्कार झाला. २०२२ मध्ये नवी दिल्लीच्या तालकटोरा स्टोडीयमवर आपल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अधिवेशन संपन्न झाले. या अधिवेशनात पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून एकमताने श्री. शरद पवार यांची निवड करण्यात आली. ही निवड करताना श्री. पितांबरन् मास्टर यांनी निवडणूक अधिकारी म्हणून काम पाहिले. सर्व प्रक्रिया नियम व कायद्यानुसार पार पाडली गेली. ही निवडणुकीची सर्व प्रक्रिया पूर्ण होत असताना श्री. प्रफुल पटेल हे पवार साहेबांच्या शेजारच्या खुर्चीवरच बसून होते. इतकेच नव्हे तर अध्यक्षपदी साहेबांची बिनविरोध निवड झाल्यानंतर त्यांना सत्कार व स्वागताचे प्रतिक म्हणून जो पुष्पगुच्छ देण्यात आला त्यावेळी श्री. पटेल हे पवार साहेबांच्या शेजारीच उभे होते. त्यावेळचा तो सत्काराचा फोटो या महिन्याच्या राष्ट्रवादीच्या अंकात आम्ही आवर्जून छापला आहे. खोटं बोलण्याची देखील काही परिसीमा असते. या फोटोत महाराष्ट्राच्या राष्ट्रवादीचे खोटे व नकली अध्यक्ष म्हणून आज जे मिरवताहेत ते ही साहेबांच्या शेजारी उभे असलेले आपल्याला दिसतील. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा पवार साहेबांनी जन्माला घातला आहे, स्वकर्तृत्त्वाने व स्वविचाराने उभा केला आहे. त्यासाठी अहोरात्र मेहनत घेतली आहे. यामागे ६० वर्षांची तपश्चर्या व अविरत कष्ट आहेत. आज पक्षावर दावा करणारे आयत्या बिळात नागोबा म्हणून येवून बसले आहेत. पण जनता सत्य जाणते, खरं-खोटं अचूक ओळखते. ती योग्य वेळ येताच या नागोबांना बरोबर ठेचून काढेल याविषयी माझ्या मनात शंका नाही.



## संपादकीय



# ही चिन्हे कशाची? घबराटीची??

एखादी गोष्ट हातून निसटायला लागली की ती अधिक घट्ट पकडून ठेवण्याची आगतिक धडपड सुरु केली जाते. ही नैसर्गिक भावना आहे आणि त्यात गैर काही नाही. या धडपडीत माणसे विनोदी वागू लागतात. त्यांनी ज्या गोष्टी कधी केलेल्या नसतात, त्या ते करु लागतात आणि त्यामुळे ती अधिकच हास्यास्पद होऊ लागतात. ज्याप्रमाणे एखादा मद्यधुंद माणूस आपल्याला नशा स्वार झालेली नाही हे दाखविण्यासाठी अधिकाधिक काटेकोरपणे पावले टाकू लागतो व त्या कृत्रिमपणामुळे त्याची धुंद अवस्था अधिकच ठळकपणे लोकांना दिसू लागते आणि त्याच्या त्या हालचाली पाहणारे हसू लागतात. याचप्रकारे एखादा राजकारणी त्याची नेहमीची भाषा बदलून वेगळीच भाषा बोलू लागतात तेव्हाही अशीच हास्यस्पद स्थिती निर्माण होते. अलीकडच्या काळात पंतप्रधानसाहेबांची बदलती भाषा पाहिल्यानंतर असेच हसू आल्याखेरीज रहात नाही. लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण देण्याची कल्पना काँग्रेस पक्षाने मांडायला सुरुवात केलेली आहे. त्याला प्रत्युत्तर म्हणून पंतप्रधानसाहेबांनी असे वक्तव्य केले की लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण राबवायचे झाल्यास मुस्लिमांचे काय होणार, मुस्लिमांना नोकऱ्यांपासून, शिक्षणापासून वंचित ठेवण्याचा काँग्रेसचा हा डाव आहे वगैरे वगैरे. या त्यांच्या वक्तव्याने तुम्हाला आले ना हसू ? आम्हाला पण आले. आम्ही अगदी खोखो हसलो. गुजरातमधील दंगलीत निरपराध मुस्लिमांचे बळी गेल्याबद्दल दुःख वाटत नाही का आणि त्याबद्दल खेद व्यक्त करणार काय असा प्रश्न एका पत्रकाराने विचारला असता ज्या व्यक्तीने मोटारीच्या चाकाखाली एखादे कुत्र्याचे पिल्लू चिरडले तरी दुःख होते असे उत्तर दिले होते, गुजरात दंग्यांबद्दल ज्या व्यक्तीने साधा खेद देखील व्यक्त केलेला नाही, मुस्लिम नागरिकांनी भेट केलेली टोपी घालण्यास ज्या व्यक्तीने नकार दिला त्या व्यक्तीला आज अचानक मुस्लिमांचा एवढा कळवळा यावा यासारखा दुसरा विनोद नसेल. म्हणूनच आम्ही वर जे म्हटले की आपल्या हातून गोष्टी निसटायला लागल्या की त्या घट्ट पकडून ठेवण्यासाठी माणसे आगतिक धडपड करु लागतात आणि आपल्या नेहमीच्या स्वभावाशी विपरीत, विसंगत वागू-बोलू लागतात. तसाच हा प्रकार आहे. म्हणूनच आता या प्रकाराबद्दल हसू येऊ लागले आहे. असे अनेक प्रकार पंतप्रधानसाहेबांकडून घडू लागले असल्यानेच ही शंका वाढीस लागली आहे की खरोखर सत्तापक्षाला आगामी निवडणुकीत पराभवाच्या धास्तीने ग्रासले आहे काय ? आणि त्यामुळेच सत्तापक्षातर्फे ही अशी विसंगत विधाने केली जाऊ लागली असावीत ?

सत्ता हातून निसटू नये आणि यावच्चंद्रदिवाकरौ म्हणजे चंद्रसूर्य अस्तित्वात असेपर्यंत आपलीच सत्ता कायम टिकावी अशी इच्छा प्रत्येक सत्ताधाऱ्याला असते. ती एक नैसर्गिक भावना असते. त्याचप्रमाणे सत्ता टिकविण्यासाठी ज्या सर्वसाधारण गोष्टी केल्या जातात त्या कुणी केल्या तर त्या देखील स्वाभाविकच मानल्या जातात. परंतु असाधारण गोष्टी केल्या जाऊ लागल्यानंतर मात्र शंका निर्माण होऊ लागतात. आता अगदी ताजे उदाहरण घेऊ. ईडी (एन्फोर्समेंट डायरेक्टोरेट) आणि दिल्ली पोलिसांच्या विशेष विभागाने (स्पेशल सेल) पाच-सहा नामवंत पत्रकारांच्या घरांवर सकाळीसकाळी छापे टाकले. त्यांना चौकशीसाठी ताब्यात घेतले. काहींना सायंकाळी चौकशीनंतर सोडून दिले असले तरी दोन तीन पत्रकारांना मात्र अटक करुन स्वतःच्या ताब्यात ठेवले आहे. त्यांना युएपीए(अनलॉफुल ॲक्टिव्हिटिज प्रिव्हेन्शन ॲक्ट) या प्रामुख्याने दहशतवाद्यांविरुध्द वापरल्या जाणाऱ्या कायद्याखाली अटक करण्यात आली असल्याचे सांगण्यात आले. न्यूजक्लिक नावाच्या ऑनलाईन न्यूज पोर्टलचे प्रमुख प्रबीर पुरकायस्थ, संपादक अमित चक्रवर्ति, त्याचबरोबर सल्लागार संपादक प्रन्जय गुहा ठाकुर्ता, तसेच अन्य पत्रकारांमध्ये उर्मिलेश, अभिसार शर्मा, भाषासिंग आणि सामाजिक कार्यकर्ते व इतिहासकार सुहेल हाशमी यांनाही चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले. याखेरीज न्यूजक्लिकचे प्रशासक डी. रघुनंदन यांनाही ताब्यात घेण्यात आले. या अचानक कारवाईमागील कारण होते की न्यूजक्लिकला अमेरिकास्थित उद्योगपति नेव्हिल रॉय सिंघम यांच्यातर्फे आर्थिक साह्य केले जाते. चीनच्या बाजुने भारतात प्रचार करण्यासाठी न्यूजक्लिकचा वापर केला जातो असा आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे. नेव्हिल सिंघम हे अमेरिकन नागरिक आहेत. थॉटवर्क्स नावाची त्यांची आयटी क्षेत्रात सल्लागार म्हणून काम करणारी कंपनी आहे.

ते कस्टम सॉफ्टवेयर, सॉफ्टवेयर टूल्स देखील तयार करतात. चिनी मोबाईल कंपनी हुवै हिचे ते तांत्रिक सल्लागार होते. त्यांचे शांघायमध्ये देखील उद्योग आहेत. भारतात बंगलोर येथेही त्यांनी आयटी क्षेत्रात गुंतवणूक केलेली आहे. असे असले तरी ते डाव्या विचारांचे, मार्क्सवादी व माओच्या तत्वाज्ञानाचा प्रभाव असलेले आहेत. खुल्या बाजारपेठेवरही त्यांचा विश्वास आहे. त्याचप्रमाणे जगात माहितीचे वहन हे मुक्तपणे झाले पाहिजे अशा विचारांचे आहेत. विकिलीक्सचे ज्युलियन असांजे यांचे ते समर्थक आहेत. अमेरिका, भारत, ब्राझील, काही आफ्रिकन देशात त्यांचे उद्योग आहेत. ही त्यांची पार्श्वभूमी लक्षात घेऊनच न्यूयॉर्क टाइम्सने ऑगस्ट महिन्यात त्यांच्या विरोधात बातमी देऊन ते चीनच्या बाजुने प्रचार करण्यासाठी आणि चिनी दृष्टिकोनाचा प्रसार करण्यासाठी जगभरातल्या माध्यमांना मदत करीत असतात असे प्रसिध्द केले होते. यामध्ये त्यांनी विविध देशातील माध्यमांच्या यादीत न्यूजक्लिकचाही समावेश केला होता. तोच धागा पकडून भारत सरकारने न्यूजक्लिकला आपल्या कारवाईचा निशाणा केलेले असावे. न्यूजक्लिक न्यूजपोर्टलचा कल सरकारची तळी उचलून धरण्याचा नाही. त्याचप्रमाणे सत्तापक्षाच्या भक्तांकडून सोशल मीडियाद्वारे जो अपप्रचार केला जातो त्यातील असत्याचा पर्दाफाश करण्याचे काम न्यूजक्लिकने सातत्याने केलेले असल्याने त्यांच्यावर डूख धरला जाणे अत्यंत स्वाभाविक होते. अमेरिकेत आणि न्यूयॉर्क टाइम्ससारख्या वृत्तपत्राने ही बातमी दिल्यानंतर सिंघम यांनी त्याचा इन्कार करताना ते कुणाच्याही आदेशावरुन काम करीत नसल्याचे स्पष्ट केले. आपण काही विशिष्ट तत्वांवर विश्वास ठेवतो व त्याचे अनुसरण करतो अशा आशयाची प्रतिक्रिया त्यांनी दिली होती. एवढे होऊनही सिंघम यांच्याविरुध्द कोणतीही कारवाई झालेली नव्हती किंवा अमेरिकन सरकारने देखील त्यांच्याविरुध्द कारवाई केलेली नव्हती. अमेरिकेतील एक सिनेटर मार्को रुबिओ यांनी फक्त सिंघम यांची चौकशी केली जावी अशी मागणी केल्याची माहिती मिळते. सिंघम हे अमेरिकेत काम करीत असतात आणि स्वयंसेवी संघटनांनाही भरीव मदत करीत असतात. अमेरिकेत सध्या चीनविरोधी वातावरण असल्याने कदाचित तेथील मंडळींना सिंघम यांची चीनबरोबर असलेली जवळीक खुपायला लागली असावी आणि त्यांनी ते चीनधार्जिणे असल्याची मोहिम त्यांच्या विरोधात सुरु केली असावी. अन्यथा इतके वर्ष ते त्यांचा आयटी उद्योगाचा पसारा सांभाळत असताना कुणाला त्याची चीनबरोबरची जवळीक खुपलेली नसावी. पण चीनने अमेरिकेलाही आव्हान देण्यास सुरुवात केल्याने महासत्तेचा अहंकार दुखावला गेला असावा आणि त्यामुळेच त्यांच्याविरोधात हाकाटी सुरु झाली असावी. आता महासत्तेच्या पंखाखली असलेल्या पिल्लांनीही त्यांच्या विरोधात चिवचिवाट करायला सुरुवात करणेही ओघाने आलेच. २०२१ मध्ये सिंघम यांच्याविरुध्द ईडीने मनी लाँडरिंगचे प्रकरण नोंदविले होते. भारतातील न्यूजसाईट पीपल्स डिस्पॅचला त्यांनी ५० लाख डॉलर्सचे साह्य दिल्याचा त्यांच्यावर आरोप ठेवण्यात आला. आता न्यूजक्लिकलाही त्यांच्याकडूनच अर्थसाह्य होत असल्याचा आरोप ठेवण्यात आला आहे. या सर्व माहितीमुळे केंद्र सरकारने त्यांच्या विरोधात भूमिका घेणाऱ्या आणि अंधभक्तांचा खोटानाटा प्रचार उघडकीस आणणाऱ्या न्यूजसाईटला धडा शिकविण्याचा निर्धार केला असावा आणि त्यानुसार ही कारवाई झालेली असावी. न्यूजक्लिकने त्यांना मिळणाऱ्या परकी अर्थसाह्याची बाब नाकारलेली नाही. परंतु ती सर्व बाब पारदर्शक आणि भारत सरकारच्या संबंधित कायद्यानुसार झालेली आहे आणि त्याबाबतचे सर्व हिशोब सरकारकडे जमा आहेत असे सांगितलेले आहे. न्यूजक्लिकची स्थापना २००९ मध्ये झाली. निःपक्ष माध्यम म्हणून त्यांनी लौकिक मिळविला. सटीक व विश्लेषणात्मक तसेत सखोल संशोधनात्मक वार्तांकन करण्याबाबत त्यांनी प्रसिध्दी मिळविली. प्रागतिक विचारांचा पाठपुरावा करणारी माध्यमसंस्था म्हणूनही न्यूजक्लिकचा परिचय आहे. कदाचित त्यामुळेच बुरसटलेल्या आणि प्रतिगामी व जुनाट विचारसरणीच्या आधारे जनतेला भ्रमित करणाऱ्या पुच्छगामी शक्तींना न्यूजक्लिक हा मोठा अडसर वाटू लागला असावा आणि त्यातूनच ही कारवाई करण्यात आली. याठिकाणी हे लक्षात ठेवले पाहिजे की अमेरिकेत सिंघम यांच्याविरुध्द ही माहिती छापून प्रसिध्द होऊनही त्यांच्याविरुध्द कोणतीही कारवाई झालेली नाही. परंतु अमेरिकेच्या छत्रछायेतील राज्यकर्ते मात्र सिंघम यांच्या अर्थसाह्याने चालणाऱ्या संस्थेवर कारवाईचा बडगा उगारत आहेत.




न्यूजक्लिकच्या ताज्या प्रकरणाचा तपशीलवार उल्लेख करण्याचे कारण हेच आहे की जगातला सर्वात मोठा लोकशाही देश म्हणून आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर फुशारक्या मारणारे प्रत्यक्षात किती नेभळट, भ्याड आणि असुरक्षिततेच्या गंडाने पछाडलेले आहेत की

त्यांना एका न्यूजपोर्टलची धास्ती वाटू लागली असावी ! हे देखील घबराटीचे आणखी एक लक्षण आहे. आपल्या विरोधात एवढासा विरोधी स्वर किंवा शब्द ऐकायला आला किंवा पाहण्यात आला तरी त्याविरोधात तत्काळ आघाती कारवाई करुन विरोधाचा स्वरच नष्ट करायचा व चिरडून टाकायचा ही ती भ्याडवृत्ती आहे. एकीकडे चीनच्या बाजूने बातम्या देण्यासाठी चीनशी निकट असलेल्या उद्योगपतींकडून अर्थसाह्य घेत असल्याबद्दल न्यूजक्लिकसारख्या माध्यमावर कारवाई करायची. परंतु दुसरीकडे पूर्व लडाखमध्ये घुसखोरी केलेल्या आणि माघारीस नकार देणाऱ्या चीनची दादागिरी सहन करुन घुसखोरी झालीच नसल्याची नेभळट भूमिका घेणाऱ्यांचे ५६ इंची पौरुषत्व तपासण्याची वेळ आली आहे. एखाद्या निःशस्त्र माणसावर सशस्त्र माणसाने हल्ला करावा तसा हा प्रकार आहे. माध्यमांना सतत धाकाखाली ठेवणे आणि आपल्याला अंकित करुन घेणे हे भ्याडपणाचे लक्षण असते. उलट टीकेला मार्गदर्शन मानून त्यानुसार सुधारित मार्ग अवलंबिणे याला खरी लोकशाही मानतात. केवळ आपल्या विचारसरणीच्या विरोधात कुणीतरी भूमिका घेते किंवा आपल्या विचारसरणीपेक्षा भिन्न विचारसरणी किंवा भूमिका घेणारे हे देशविरोधी असल्याचे मानणे आणि त्यांना छळणे, त्यांना येनकेन प्रकाराने तुरुंगात बंदिवान करुन ठेवणे ही सर्व एकतंत्री, एकाधिकारवादी राजवटीची लक्षणे आहेत जी आता ठळकपणे समोर येऊ लागली आहेत. संभाव्य पराभवाच्या कल्पनेने घबराट झालेले राज्यकर्तेच अशी आगतिक पावले उचलू लागतात. भारतातही तसेच घडताना दिसत आहे. प्रबीर पुरकायस्थ हे ७४ वर्षांचे आहेत. ते स्वतः माहिती तंत्रज्ञान तसेच उर्जा क्षेत्रातील तज्ञ आहेत. असे असले तरी पत्रकारिता व लिखाण ही त्यांची पहिली पसंती आहे. लोकांना मुक्त स्वरुपात माहिती मिळाली पाहिजे आणि तो त्यांचा मूलभूत अधिकार आहे तसेच त्यासाठी सर्वसामान्य जनतेच्या हातात माहिती मिळण्याची सर्व साधने व मार्गही मुक्तपणे उपलब्ध असले पाहिजेत या मूलभूत तत्वाचा ते पुरस्कार करतात. आणीबाणीच्या (१९७५) विरोधात त्यांनी संघर्ष केला आणि ते तुरुंगात गेले. दिल्लीच्या तिहार जेलमध्ये ते भाजप व संघनेते नानाजी देशमुख आणि अरुण जेटली यांच्याच बराकीत बंदिवान होते. प्रागतिक विचार व प्रगतीशील चळवळींचे पाठीराखे म्हणून ते ओळखले जातात. सध्याच्या प्रागतिकताविरोधी विचारसरणीच्या प्रभावकाळात त्यांचा अडसर वाटणे स्वाभाविक आहे आणि त्यामुळेच त्यांच्याविरुध्द कारवाई झालेली असावी. एकीकडे संरक्षणक्षेत्रापासून माध्यम क्षेत्रापर्यंत परकी गुंतवणुकीला मुक्त प्रवेश देण्याची भाषा करणारे एका न्यूजपोर्टलला चीनशी निकटता असलेल्या एका उद्योगपतीकडून अर्थासाह्य केले जात असल्याने एवढे कासावीस होत असतील तर ते भयगंडाने पछाडलेले असावेत असे म्हणावे लागेल. पत्रकारांवरील या कारवाईचे समर्थन सत्तापक्षातर्फे केले जाणारच होते. सत्तापक्षाच्या प्रवक्त्यांना ते काय बोलतात आणि त्याचा अर्थ काय होतो हे तरी समजते काय याबद्दल आता कीव करावीशी वाटते. पाकिस्तान व चीन हे दोन भारतविरोधी देश असताना त्यांच्या समर्थकांकडून मदत घेणे किंवा त्यांना अनुकूल भूमिका घेणे हे भारतविरोधी आहे असे महान वक्तव्य सत्तापक्षाच्या प्रवक्त्याने केले. या प्रवक्त्याला ही किमान बुध्दी नसावी की पाकिस्तानचे एकवेळ ठीक आहे परंतु त्यांच्याच पक्षाच्या सरकारने चीनला अद्याप भारतविरोधी म्हणून घोषित केले आहे काय ? चीनला भारतविरोधी देशाच्या श्रेणीत ठेवायचे असेल तर बाजारपेठेतील असंख्य व अगणित वस्तुंवर बहिष्कार टाकावा लागेल. भारतातील चीनची गुंतवणूक सर्वप्रथम रद्द करावी लागेल. संगणक, मोबाईल फोन आणि अनेक इलेक्ट्रॉनिक वस्तु, चिप्स, औषधांसाठीचा कच्चा माल अशा अनेक गोष्टींवर आजही भारत चीनवर अवलंबुन असताना चीनला भारतविरोधी कसे ठरविले जात आहे हा प्रश्न पडतो. अमेरिका व युरोपीय राष्ट्रांच्या बाजुने लिहिले तर ते देशप्रेम आणि चीनबद्दल काही लिहिले तर तो देशद्रोह हा विरोधाभास सत्तापक्षाच्या प्रवक्त्यांनी एकदा स्पष्ट करणे अगत्याचे झाले आहे. भारत हा लोकशाही देश आहे. चीनच्या एखाद्या गोष्टीबद्दल एखाद्या लेखकाने काही लिहिले याचा अर्थ देशद्रोह होत नाही. मग चीनने घुसखोरी करुनही आणि अद्याप त्यांनी ज्या भागांवर कब्जा कायम ठेवलेला असूनही त्यांनी घुसखोरी केलीच नसल्याचे प्रमाणपत्र देणाऱ्या नेत्यांना काय म्हणायचे याचे उत्तरही सत्तापक्षाच्या प्रवक्त्यांनी देणे अपेक्षित आहे. चीनने घुसखोरी केली नसल्याचा दावा करताना दुसरीकडे सैन्यमाघारीसाठी वाटाघाटी करायच्या या प्रकाराला काय म्हणायचे याचेही उत्तर या पत्रकारांवर कारवाई करणाऱ्यांना द्यावे लागेल. त्यामुळेच एकंदरीत या कारवाईचा विचार करता वर्तमान सत्ताधाऱ्यांना प्रतिविचार सहन होईनासा झाला आहे. सत्ताधाऱ्यांपेक्षा भिन्न विचार व भूमिका ठेवणाऱ्यांना टाका तुरुंगात आणि करा त्यांचा आवाज बंद असा एकाधिकारवादी खाक्या सुरु झाला आहे. १९७५ मध्ये देशावर लादली गेलेली आणीबाणी ही उघड आणि जाहीर होती. सध्या एकीकडे लोकशाहीच्या नावाने गळे काढताकाढता दुसरीकडे मुक्त पत्रकारितेचा गळा आवळायचा, निःपक्ष पत्रकारांना जरब दाखवून गप्प करण्याचा प्रयत्न करायचा किंवा त्यांना सरळ एखाद्या प्रकरणाचे निमित्त करुन तुरुंगात टाकून द्यायचे असले प्रकार सुरु झाले आहेत. हे घबराटीचेचे लक्षण आहे.

राज्यकर्त्यांमध्ये आगामी निवडणुकीतील संभाव्य अपयशाच्या शक्यतेने असे काही पछाडलेले दिसते की त्यांची अस्वस्थता आता स्पष्टपणे दिसून येऊ लागली आहे. महिला

आरक्षण विधेयकाचा नुसता एक बुडबुडा सोडण्यात आला आहे. ते प्रत्यक्षात कधी येईल याची कल्पनाच केलेली बरी. हे आरक्षण आहे त्या स्थितीत आणि आगामी लोकसभा निवडणुकीपासून लागू करावे अशी मागणी विरोधी पक्षांनी करुनही ती हिंमत दाखविण्याची सरकारची तयारी नाही म्हणजेच त्यांनी हे विधेयक किती मनापासून आणि सच्चेपणाने आणले असेल याची कल्पना यावी. केवळ नावासाठी आणि त्याचे श्रेय मिळावे आणि निवडणुकीत महिलांची मते मिळावी यासाठी केलेला हा निव्वळ नावापुरता आटापिटा आहे. प्रत्यक्षातील आरक्षण ही फार दूरची बाब आहे हे आता महिलांनाही कळून चुकलेले आहे. त्यामुळेच एवढा खटाटोप करुनही या महिला आरक्षणाबद्दल समाजात कोणतीही प्रतिक्रिया आढळून येईनाशी झाली आहे. महिलांचे आरक्षण करण्याचा ऐतिहासिक निर्णय प्रत्यक्षात आणण्यासाठी देवानेच आपली निवड केली अशी फुशारकी मारण्यात आलेली असली ती फुशारकी फुसकीच ठरताना दिसत असल्याने अस्वस्थतेत वाढ झाली आहे. त्याचबरोबर महिला आरक्षणाची बढाई मारताना महिला पहिलवानांचे लैंगिक शोषण करणाऱ्या सत्तापक्षाच्या एका खासदाराला शासन करण्याचे पौरुषत्व दाखवू न शकणारे नेतृत्व असताना अशी मंडळी महिलांना कोणता न्याय देणार हा प्रश्न अनुत्तरित राहतोच. अशी अनेक उदाहरणे देता येतील. महिलांबद्दल अत्यंत अनुदार उद्गार काढणाऱ्यांना केंद्रीय मंत्रिमंडळात स्थान दिले जाते ही या सरकारची महिलांबद्दलची भूमिका असताना महिला आरक्षणाचे विधेयक संमत करणे हा निव्वळ फार्स व नाटक आहे. हे देखील घबराटीचेच लक्षण आहे. याठिकाणी इतिहास लक्षात घ्यावा लागेल. दोन ठळक उदाहरणे आहेत. राजीव गांधी यांनी मतदानाची वयोमर्यादा २१ वरुन १८ वर्षांवर आणली होती. हा नवा तरुण युवा मतदार आता आपल्यालाच मते देईल अशा भ्रमात राजीव गांधी होते आणि त्यांना निवडणुकीत पराभव स्वीकारावा लागला होता. विश्वनाथ प्रतापसिंग यांनी मंडल आयोगाच्या शिफारशी लागू करुन ओबीसी समाजाला न्याय देण्याची भूमिका घेतली होती. आता तर ओबीसी मतदार आम्हाला रांगा लावून धोधो मते देतील अशी प्रतिक्रिया एका केंद्रीय मंत्र्याने त्यावेळी दिली होती. प्रत्यक्षात त्या सर्वांना पराभूत व्हावे लागले होते. त्यामुळे एखाद्या सामाजिक निर्णयाने राजकीय लाभ होतोच असे नव्हे. परंतु संभाव्य पराभवाच्या धास्तीने ग्रस्त राज्यकर्त्यांनी आता महिला आरक्षणाचा एक पत्ताही खेळून टाकलेला आहे. महिला आरक्षण, एक देश एक निवडणूक, समान नागरी कायदा हे सर्व फुगे उडविण्यात आले आहेत. परंतु ही हवाबाजी कितपत राजकीय लाभदायक होणार आहे हे समजायला मार्ग नाही. काहीतरी पोतडीतून रोज नवनवीन कल्पना काढायच्या चलाखी करीत बसायची असले प्रकार सुरु आहेत.

सध्या राजस्थान, मध्य प्रदेश, छत्तीसगढ, तेलंगणा व मिझोरम या पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांचे वारे वहात आहेत. त्या निवडणुकांच्या प्रचारासाठी पंतप्रधानसाहेब, त्यांचे गृहमंत्री उर्फ चाणक्य हे या राज्यांचे एकामागून एक दौरे




करीत सुटले आहेत. एखादा लहानसा कार्यक्रम देखील ते चुकवताना दिसत नाहीत. लोकसभा निवडणुकीपूर्वी होणाऱ्या या निवडणुकांमध्ये विजय मिळाल्यास त्यामुळे लोकसभा निवडणुकीसाठी एक अनुकूल राजकीय वातावरण तयार होईल या अपेक्षेने या तिन्ही राज्यांवर भाजपच्या सर्वोच्च जोडगोळीने आपले सर्व लक्ष आणि शक्ति केंद्रीत केली आहे. त्यांच्या दुर्दैवाने ज्या जनमत चाचण्या या राज्यात झाल्या आहेत त्यांचे निष्कर्ष भाजपला फारसे अनुकूल नसल्याचे निष्पन्न झाले आहे. घबराटीचे ते एक कारण आहे. राजस्थानात खुद्द भाजपमध्येच कमालीची सुंदोपसुंदी आहे. ज्याप्रमाणे कर्नाटकात भाजपच्या जोडगोळीने येड्युरप्पा यांना दुखावले आणि परिणामी त्यांना तेथे निर्णायक पराभव सहन करावा लागला तसाच प्रकार राजस्थानात होताना दिसत आहे. या जोडगोळीला वसुंधरा राजे यांना राजस्थानातील राजकारणातून हद्दपार करायचे आहे.

वसुंधरा राजे त्यांची जी काही पकड आहे ती राजस्थानच्या राजकारणावर टिकवून आहेत. त्यांचा गट पहिल्याइतका सबळ नसला तरी तो भाजपचे नुकसान करण्याइतका प्रभावी निश्चितपणे आहे. त्यामुळेच अक्षरशः दहादहा तास बैठका होऊनही राजस्थानातले भाजप उमेदवार निश्चित करणे पक्षाला अशक्य झाले आहे. पहिल्याच बैठकीत फटकळ वसुंधरा राजे यांनी त्यांच्या समर्थकांना उमेदवारी मिळणार आहे की नाही असा थेट प्रश्न सर्वोच्च जोडगोळीला करुन धक्का दिला होता. त्यामुळे वसुंधरा राजे यांना चुचकारायचे कसे हे जोडगोळीला समजेनासे झाले आहे. त्यांना दुखावण्याचा जुगार अंगाशी येणार याची पक्की खूणगाठ त्यांना आहे. त्यामुळेच वसुंधरा राजे यांना हाताळण्याचे दिव्य या नेत्यांना करावे लागत आहे. ही बाबही लपून राहिलेली नाही. लोकांनाही भाजपमधील गटबाजी व असंतोष याची माहिती झाली आहे. त्यामुळे राजस्थानातही पक्षाला यशाची आशा असली तरी ती प्रश्नचिन्हांकित आहे.

मध्य प्रदेशात कर्नाटकाची पुनरावृत्ती होते की काय अशी स्थिती आहे. रा.स्व.संघाने केलेल्या एका पाहणी अहवालात भाजप पराभूत होणार असल्याचे निष्पन्न झाल्याचे तेथील काही वृत्तपत्रात छापून आलेले होते. त्यानंतरच या दोन सर्वोच्च नेत्यांनी मध्य प्रदेशातील आपल्या फेऱ्या वाढविण्यास सुरुवात केली. वंदे भारत रेल्वेला हिरवे निशाण दाखविणे, रेल्वे स्थानके, मेट्रो रेल्वे यांची उद्घाटने यासारख्या कार्यक्रमांनाही विश्वगुरु ब्रह्मांडनायकांनी हजेरी लावण्यास सुरुवात केली. ही घबराटीचीच लक्षणे आहेत. मध्य प्रदेशात काँग्रेसमधून आलेले व महाराज ज्योतिरादित्य शिंदे यांचे समर्थक आणि भाजपचे वर्षानुवर्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते यांच्यात संघर्ष आहे. तसेच जोडगोळीला मुख्यमंत्री शिवराजसिंग चौहान यांना बदलायचे आहे. शिवराजसिंग चौहान यांना ते कळून चुकलेले आहे. त्यामुळेच त्यांनी अलीकडेच एका जाहीर सभेत अत्यंत भावुक शब्दात 'असेन मी नसेन मी'च्या तालावर ते मुख्यमंत्रीपदावर नसले तरी तुमच्या मनात आपले स्थान निश्चित राहील असे म्हणाले होते. शिवराजसिंग यांचे मध्य प्रदेशातून उच्चाटन निश्चित असल्याने त्यांचे समर्थक नाराज आहेतच. परंतु इच्छुकांमध्ये तीव्र चुरस व स्पर्धा आहे. त्यातून एकमेकाची कापकापी करण्याच्या हालचाली विलक्षण गतिमान झाल्या आहेत. अशा विविध वादांनी ग्रस्त अशा मध्य प्रदेशात पराभव झाल्यास फारसे आश्चर्यकारक काही नसेल. छत्तीसगढमध्येही भाजपकडे मुख्यमंत्रीपदाचा चेहरा नाही. काँग्रेसचे मुख्यमंत्री भूपेश बाघेल यांनी गेल्या पाचवर्षात पक्षावर आपली पकड कायम राखतानाच लोकप्रिय राज्यकारभार करुन दाखविला आहे. पाच वर्षात त्यांनी कोणतीही वादग्रस्त कृति केली नाही. त्यामुळेच त्यांच्या विरोधात भाजपला प्रचारासाठी ठोस असा कोणताही मुद्दा नाही. हीच स्थिती राजस्थानातील अशोक गेहलोत सरकारबाबतही आहे. त्यामुळेच या दोन राज्यात भाजपला प्रचारासाठी प्रभावी मुद्दा मिळत नसल्याचे चित्र आहे. बलात्कारासारख्या घटना भाजपशासित राज्यांमध्ये देखील घडलेल्या असल्याने त्यांचे भांडवल करणेही भाजपला अशक्य झाले आहे. त्यामुळे भ्रष्टाचाराचे आरोप यासारख्या गुळगुळीत आणि चोथा झालेल्या मुद्यांच्या आधारेच प्रचार केला जात आहे आणि तो फारसा प्रभावी ठरतानाही आढळेनासा झाला आहे. यातूनच भाजपमध्ये अस्वस्थता, नैराश्याची भावना वेगाने बळावताना आढळत आहे. त्यातूनच आगतिकपणे काहीतरी मुद्दे उपस्थित केले जात आहेत.

वर सुरुवातीला उल्लेख केल्याप्रमाणे पंतप्रधानसाहेबांना अचानक मुस्लिमांचा कळवळा आलेला दिसतो. ज्या उत्तर प्रदेशात त्यांचे सरकार फक्त मुस्लिमांच्या घरांवर बुलडोझर फिरवून ती उद्ध्वस्त करीत सुटले आहे आणि बुलडोझरचे राजकारण म्हणून भाजप व संघ परिवार त्याबद्दल फुशारक्या मारत फिरत असतात त्यांना मुस्लिमांचा अचानक कळवळा हा संभाव्य पराभवाच्या धास्तीने येऊ लागला आहे हे कळायला फार बुध्दीची गरज नाही. भाजपचे मुस्लिमप्रेम हे कोणत्या प्रकारचे आहे हे मुस्लिमांनाही चांगलेच माहिती आहे. त्यामुळेच आगतिक झालेल्या भाजपनेतृत्वाने आता मुस्लिमांनाही गोंजारण्याचे नाटक करु नये. ते फारसे यशस्वी होणार नाही.

लोकसभेची निवडणूक अलीकडे घेतली जाणार काय, ज्या पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुका आता होणार आहेत त्यांच्याबरोबरच लोकसभेची निवडणूक घेतली जाणार काय आणि मग महाराष्ट्र व हरयाणाच्या विधानसभा निवडणुकाही यांच्या बरोबरीनेच घेण्याची शक्यता आहे काय हे सर्व प्रश्न गेल्या काही काळापासून चर्चेत आहेत. केंद्रातील सत्ताधाऱ्यांच्या विरोधातील असंतोष व नाराजी वाढताना दिसते आहे. महाराष्ट्र, हरयाणा, मध्य प्रदेश या राज्यांमध्येही भाजपचीच सरकारे आहेत. त्यांच्याबद्दलही फारशी अनुकूल राजकीय स्थिती नाही. ती परिस्थिती, तो असंतोष अधिक चिघळू द्यायचा की एक धक्कातंत्र म्हणून या सर्वच निवडणुका एकत्र घेऊन मतदारांना, विरोधी पक्षांना सावरण्याची संधीही न देता जनमताचा कौल घ्यायचा अशी योजना सत्ताधाऱ्यांच्या मनात घोळत असावी काय अशीही चर्चा आहे. या सर्वाचा अर्थ एकच आहे. ही आगतिकता, अस्वस्थता, धास्ती व घबराट पराभवाच्या संभाव्य शक्यतेमुळे आहे. मतदार कदाचित संधीची वाट पहात असावेत. त्यांनाही बदलाची संधी मिळाली पाहिजे.

डॉ. सुधीर भोंगळे

### महिलांच्या आरक्षणाचा निर्णय काँग्रेसच्याच काळात

# महिला आरक्षणासंबंधीचं पंतप्रधानांचं वक्तव्य खोटे व क्लेशदायी

**शरद पवार**

**मुंबई येथील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे २६ सप्टेंबर रोजी 'महिला विधेयक' व चालू घडामोडींवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांनी पत्रकारांशी साधलेला संवाद....**

देशाच्या प्रधानमंत्र्यांनी काल एके ठिकाणी भाषण करत असताना संसदेमध्ये महिलांच्या आरक्षणासंबंधीचा जो निर्णय एकमतानं घेतला, या निर्णयाच्यासंबंधी खरं म्हटलं तर दोन सदस्य सोडले तर या बिलाला कुणीही विरोध केलेला नव्हता. फक्त एक सूचना काहीजणांची होती, की हा घटनात्मक दुरूस्तीचा निर्णय आपण घेतोय, या निर्णयामध्ये एससी, एसटी या महिलांना संधी आहे, त्याच्याबरोबर ओबीसींनासुद्धा संधी द्यावी आणि ती तरतूद करावी अशी मागणी त्याठिकाणी होती. शेवटी एकमतानं निर्णय व्हावा, घटनादुरूस्ती आहे आणि त्यासाठी तो निर्णय तसा झाला.

आता ही पार्श्वभूमी असताना प्रधानमंत्र्यांनी असं स्टेटमेंट करणं, की काँग्रेस आणि इतर काही लोकांनी नाईलाजानं विधेयक संमत केलं, जी वस्तुस्थिती नाही आणि त्यांनी सांगितलं, की इतक्या वर्षात त्यांना याबाबतीत काही करता आलं नाही. हा विचारसुद्धा त्यांनी केला नाही. त्यांचं हे वक्तव्य क्लेशदायी आहे. १९९३ साली माझ्याकडं महाराष्ट्राची सूत्रं होती.



देशामध्ये १९९३ साली महाराष्ट्रामध्ये राज्य महिला आयोग स्थापन करणारं महाराष्ट्र राज्य हे पहिलं राज्य होतं. मी मुख्यमंत्री असताना जून १९९३मध्ये महाराष्ट्रामध्ये महिला बालविकास हा स्वतंत्र विभाग सुरू केला. जो त्यावेळी कुठंही नव्हता. २४ एप्रिल १९९३ रोजी ७३वी घटनादुरूस्ती झाली, त्या दुरूस्तीची अंमलबजावणी सुरू झाली आणि त्यामध्ये देशभरात त्रिस्तरीय पंचायत व्यवस्था लागू झाली. घटनेतलं कलम '२४३ ड' हे समाविष्ट केलं आणि महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये एक तृतीयांश आरक्षण द्यावी, अशी तरतूद केली. नगरपालिका, महानगरपालिका, नगरपरिषदा यासाठी घटना दुरुस्तीचा कायदा पास झाला आणि शहरी भागामध्ये महिलांच्यासाठी आरक्षण लागू झालं.

मला आठवतंय, की के. आर. नारायणन हे देशाचे उपराष्ट्रपती होते, त्यांच्या उपस्थितीत नेहरू सेंटरला या धोरणाच्यासंबंधीचा विषय महिला संघटनांना सांगण्यासाठी एक मोठं संमेलन आम्ही आयोजित केलेलं होतं. २२ जून १९९४ साली महाराष्ट्रानं देशात पहिलं 'महिला धोरण' जाहीर केलं. या धोरणामधूनच महाराष्ट्रात सरकारी, निमसरकारी विभागातील महिलांच्यासाठी ३० टक्के आरक्षण हे रिक्त ठेवण्यात आलं आणि नंतर ते नंतर स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ३३ टक्क्याचा निर्णय घेतला आणि असं करणारं महाराष्ट्र हे देशातलं पहिलं राज्य. म्हणजे मी महाराष्ट्राचा मुख्यमंत्री असताना महिलांच्यासंबंधीचे हे निर्णय घेतले. जे माननीय प्रधानमंत्री असं सांगतात, की या देशात असा कुणी विचारही केला नाही. ते वास्तव नाही.

माझ्याकडं देशाचं संरक्षण खातं ज्यावेळी होतं, त्यावेळी पहिल्यांदा आर्मी, नेव्ही, एअर फोर्स या तिन्ही ठिकाणी ११ टक्के जागा महिलांना ठेवल्या आणि तुम्ही बघत असाल, की हल्ली प्रजासत्ताक दिनाची परेड दिल्लीच्या महत्त्वाच्या रस्त्यावर जेव्हा होते, त्या परेडचं नेतृत्व एक भगिनी करते हे आपण दर २६ जानेवारीला पाहतो. आणि या देशामध्ये एअर फोर्समध्ये महिलांना सहभागी करून घेतलेलं आहे. दुसरी एक माहिती अशी, त्याबद्दल ऑथेंटिक माझ्याकडं नाहीये, पण एका एअर फोर्समधल्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याशी भेट झाल्यावर ज्यावेळी महिलांना सहभागी करून घेण्याचा प्रस्ताव मी मांडला, त्यावेळी कुणाचंही त्याला सहकार्य नव्हतं. आपल्याकडं एक पद्धत आहे, दर सोमवारी सकाळी ९ वाजता डिफेन्स मिनिस्टरच्या ऑफिसमध्ये डिफेन्स मिनिस्टरच्या अध्यक्षतेखाली एक बैठक होते. त्याला आर्मी, नेव्ही, एअर फोर्स असे तिन्ही चीफ हजर असतात आणि ते एकत्र डिफेन्सच्या स्थितीचा आढावा घेत असतात. मी डिफेन्स मिनिस्टर असताना या बैठकीमध्ये महिलांना आपण आर्मी, नेव्ही, एअर फोर्समध्ये सहभागी करून घ्यावं हा विषय मांडला. पण या तिन्ही दलाच्या लोकांनी हे शक्य नाही म्हणून भूमिका घेतली. अशा तीन मिटिंगा झाल्या






**संसदेत महिलांना आरक्षण मिळावे यासाठी सर्वपक्षीय खासदार महिलांनी म. गांधींच्या पुतळ्यासमोर बसून पूर्वी आंदोलन केले होते.**


आणि तिन्ही भेटींमध्ये मी या तिन्ही दलांच्या प्रमुखांना कव्हेन्स करू शकलो नाही. चौथ्या मिटिंगमध्ये मी सांगितलं, की संरक्षण खात्याची जबाबदारी माझ्यावर आहे, निर्णय घ्यायचा अधिकार माझा आहे, तर हा माझा निर्णय म्हणून मी याठिकाणी सांगतो, की ११ टक्के याठिकाणी प्रतिनिधीत्व आर्मी, नेव्ही, एअर फोर्समध्ये महिलांना दिलं जाईल. नो डिस्कशन. त्यानंतर हा निर्णय लागू झाला.

त्यामुळं लष्करामध्ये, नेव्ही, एअर फोर्समध्ये मुलींचा सहभाग असो किंवा मघाशी मी आधी सांगितल्याप्रमाणं त्यांना आरक्षणासंबंधीचा विचार असो या सगळ्या गोष्टी काँग्रेस सत्तेवर असताना हे निर्णय घेतले गेले. प्रधानमंत्र्यांनी यासंबंधीचं ब्रिफिंग कुणी केलं नसावं त्यामुळंच त्यांनी अशा प्रकारचं उद्गार बाहेर काढले एवढाच खुलासा मला याठिकाणी घ्यायचांय.

नाशिक येथून आलेले कांदा खरेदी-विक्री करणाऱ्यांचं शिष्यमंडळ यांनी माझी आज भेट घेतली. आज जी कांद्याची परिस्थिती झालेली आहे, त्याचं




**नौदल, वायुसेना आणि लष्करात आता मुली काम करताना दिसताना. हा शरद पवार यांच्या निर्णयाचा परिणाम आहे.**









बारामतीच्या शेतकऱ्याने अहमदाबादेत काढलेल्या एका उद्योगाचे शरद पवार उद्घाटन करताना शेजारी गौतम अदानी



मुख्य कारण केंद्र सरकारनी कांदा निर्यातीला ४० टक्के एक्साईज डयुटी लावली, त्याचा परिणाम कांदा उत्पादक शेतकरी, कांदा व्यावसायिक यांच्यावर विपरित परिणाम झालेला आहे. आज माझी माहिती अशी आहे, की कॉमर्स मिनिस्टर यांनी संध्याकाळी ७ वाजता या प्रश्नाच्यासाठी बैठक घेणार आहेत. आमचा आग्रह राहील, की ४० टक्के ड्युटी ही फार मोठी ड्युटी आहे, आणि त्यासंबंधीचा निर्णय त्यांनी घ्यावा. ४० टक्के ड्युटी कांद्यावर बसवायचं काही कारण नाही. त्यामुळं कांद्याचे भरमसाठ भाव वाढतील, त्यामुळं ती ड्युटी सरकारनं परत घ्यावी, हा माझाही आग्रह राहील. केंद्र सरकारने कांद्यावर निर्यात शुल्क वाढविल्यामुळे आज कांद्यावर अशी परिस्थिती ओढावली आहे. शेतकरी अडचणीत सापडला असून त्यातच कांदा व्यापाऱ्यांनी संप पुकारल्याने शेतकरी आर्थिक कोंडीत सापडला आहे. एकूणच कांदा प्रश्न महत्वाचा असून आजच्या बैठकीतून हा निर्णय सोडवावा अशी विनंती मी सरकारला करत आहे.

कांद्यावर ४० टक्के जी निर्यातीवर ड्युटी लावण्यात आली आहे, हा शेतकऱ्यांवर एक प्रकारचा अन्याय आहे. अशा धोरणांची प्रतिक्रिया अन्य देशांमध्येही उमटते. यासंदर्भातलं एक उदाहरण सांगतो. एके दिवशी मी श्रीलंकेला गेलो होतो. त्यावेळी मी सरकारमध्ये होतो आणि श्रीलंकेमध्ये माझी मिटिंग राजपक्षेंबरोबर होती. त्यावेळचे तेथील राष्ट्रपती. त्यावेळी देशात तांदूळ, धान्याचा स्टॉक अधिक होता. त्याचबरोबर कांद्याचाही स्टॉक जास्त होता. तर श्रीलंका ते घेत नव्हते. भारत सोडून अन्य देशांतून आयात करत होते.

माझी त्यांच्याशी चर्चा झाल्यानंतर त्यांना मी हे प्रपोजल दिलं. त्यावेळी राजपक्षेजींनी मला सांगितलं, की तुम्ही म्हणजे भारत सप्लाय पक्का करेल यावर आम्हाला विश्वास नाही. समजा आम्ही तुमच्याकडून धान्य स्वीकारलं आणि परत शॉर्टेज आलं तर तुम्ही निर्यात बंदी करता, निर्यातीवर ड्युटी लावता आणि त्यामुळं सप्लाय बंद होते. त्याची जबरदस्त किंमत आमच्या देशातील लोकांना द्यावी लागते. कारण, तुमच्या धोरणाबद्दल खात्री नसते. असं त्यांचं म्हणणं होतं. आता या ४० टक्के ड्युटीमुळे बांगलादेशमधील निर्यात पूर्णपणे बंद झाली आहे आणि मला पूर्ण खात्री आहे, की तेथील सरकार नाराज असेल. ज्यावेळी तुम्हाला आंतरराष्ट्रीय मार्केटमध्ये उतरायचं असेल त्यावेळी तुम्ही रिलायबल रेग्युलर सप्लायर ही प्रतिमा सांभाळली पाहिजे.

मी अहमदाबादला गेलो होतो, ही बातमी खरी आहे. अहमदाबाद जवळ एक इंडस्ट्रीयल इस्टेट आहे. तिथे बारामतीच्या एका शेतकऱ्याने उद्योग उभा केला आहे. मी त्या उद्योगाचं उद्घाटन केलं. खरंतर तो एक छोटा कारखाना आहे. गाय जेव्हा वासराला जन्म देते तेव्हा पहिल्या दोन दिवसात जे दूध असतं, त्याला आपण चीक म्हणतो. त्या दुधापासून शेतकरी कुटुंबाच्या व्यक्तीने दहा वर्ष अभ्यास करुन एक प्रोडक्ट निर्माण केलं. ते प्रोडक्ट दोन-तीन महिने दररोज सकाळी चहात टाकून घेतलं तर तुमची रोगप्रतिकार शक्ती वाढते. या प्रोडक्टचा कारखाना त्यांनी तयार केला. मला त्यांनी या कारखान्याच्या उद्घाटनाला येण्याची विनंती केली होती. बारामतीसारख्या एका खेड्यातल्या शेतकऱ्यानं अशाप्रकारचं देशात कुठंही मिळत नाही असं प्रोडक्ट तयार केलं, मला असं वाटलं की त्या व्यक्तीला प्रोत्साहित केलं पाहिजे. त्या कार्यक्रमाला गौतम अदानी यांना त्यांनी अध्यक्ष म्हणून बोलावलं होतं. तर मला उद्घाटक म्हणून बोलावलं होतं. त्यामुळे मी आनंदाने गेलो. कारखान्याचं उद्घाटन केलं आणि त्या शेतकऱ्याला शाबासकी दिली. असं कुणाकडूनही होत असेल तर मी आनंदानं उद्घाटनाला जाईन.

## राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी बारामती येथे २९ सप्टेंबर रोजी आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत विविध विषयांवरील आपली भूमिका स्पष्ट केली...

'इंडिया'त जागा वाटपावरून मतभेद होणार नाहीत याची काळजी घेऊ : निवडणुका आल्यानंतर इंडियात काही जागांसंबंधी मतभेद होण्याची शक्यता नाकारता येत नाही; परंतु असे प्रश्न ज्या वेळी येतात, तेव्हा त्या राज्यात ज्यांचा इंटरेस्ट नाही, अशांना चर्चेला पाठवू आणि त्यातून मार्ग काढू. चार राज्यात सध्या निवडणुका आहेत. तिथे शक्यतो एकवाक्यता कशी करता येईल याबाबत प्रयत्न होईल. अजून ती प्रक्रिया आम्ही सुरू केलेली नाही. मी मुंबईला गेल्यानंतर काँग्रेस व अन्य पक्षांशी चर्चा करून वाद होऊ नयेत यासंबंधी आम्ही काळजी घेऊ. ही प्रक्रिया येत्या आठ-दहा दिवसात होईल.

**आरक्षणाबाबत सरकारने शब्द पाळावा :**

आरक्षणाच्या मागणीसाठी काही लोक उपोषण, धरणे आंदोलन करत आहेत. राज्य सरकारने त्यांना काही मुदत दिली आहे. तसेच इतक्या दिवसात हा प्रश्न सोडवू, असे आश्वासन दिले आहे. आमचा वाटा कमी करू नये, अशी ओबीसींची







नाशिक जिल्ह्यातील कांदा उत्पादक व व्यापाऱ्यांनी शरद पवार यांची मुंबईतील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमध्ये भेट घेऊन कांद्यावरील ४० टक्के कर रद्द करण्याची मागणी केली.

अपेक्षा आहे. त्याची नोंद सरकारला घ्यावी लागेल. त्याबाबत योग्य ती काळजी घेऊ, असा विश्वास शिंदे सरकारने दिलेला आहे, असे माझ्या वाचनात आले. आता यातून मार्ग काढत राज्य सरकार नेमका काय निर्णय घेते हे येथून पुढील ३०-३५ दिवसात कळेल. त्यात मार्ग निघाला तर आनंदाची गोष्ट आहे. नाही तर काय होईल, हे आज सांगता येत नाही.

**कांद्यावरील कर अन्यायकारक**

कांद्यावर केंद्राने ४० टक्के एक्साईज ड्युटी लावली आहे. बांग्लादेशात भारतातून फार मोठ्या प्रमाणात कांदा जातो. राज्यातील नाशिक, धुळे, पुणे, नगर, सातारा या भागातील कांदा हा देशात व आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत जातो. त्याला बंधने केंद्राने घातली. हे जिरायत शेतकऱ्यांचे पीक आहे. त्यावर बंधने घालणे, कर लावणे हे अन्यायकारक आहे. एक्साईज ड्युटी काढावी असा आमचा आग्रह आहे. पीयुष गोयल यांच्यासोबत मुंबईत याबाबत बैठक झाली, असे मला समजले. त्यांनी दिल्लीत बैठक बोलावली आहे. त्या बैठकीत काही घडले तर आनंदाची गोष्ट आहे. अन्यथा, शेतकऱ्यांमधील अस्वस्थता थांबवता येणार नाही.

**त्यांना महत्त्व देण्याचे कारण नाही :**

पत्रकारांसंबंधी केलेल्या वक्तव्याबाबत भाजपमधील नेत्यांना महत्त्व देण्याचे कारण नाही. महाराष्ट्रातील पत्रकार कधी अशा अपेक्षा करत नाहीत. चहासाठी, ढाब्यावर जाण्यासाठी भुकेले असल्याचे चित्र महाराष्ट्रातील पत्रकारांमध्ये नाही. अशा प्रकारचे वक्तव्य करणे म्हणजे संबंध पत्रकार वर्गाची बेईज्जत करणे आहे. ते करण्याची भूमिका जे घेतात त्यांच्याबद्दल काय बोलावे. माझ्या मते अशा लोकांकडे दुर्लक्ष करावे.

**साखर कारखानदारीसाठी केंद्राने पावले उचलावीत :**

पावसाअभावी यंदा उसाचे उत्पादन घटले आहे. त्याचा परिणाम पुढील हंगामावर होईल. कारखाने चालवायचे कसे, हा प्रश्न निर्माण होईल. याबाबत आज तरी लगेच मार्ग दिसत नाही. एकीकडे साखरेची किंमत वाढते आहे, त्यामुळे उत्पादकाला दोन पैसे अधिकचे मिळण्याची परिस्थिती निर्माण होईल. दुसरीकडे ऊस उत्पादन नसल्याने संकट आहे. त्यासाठी एकत्रित मार्ग काढावा लागेल. मी केंद्रात कृषिमंत्री असताना परदेशातून कच्ची साखर आयात करत त्यावर प्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला होता. त्यातून कारखानदारी टिकवली होती. केंद्राला या पद्धतीचे काही निर्णय घ्यावे लागतील. केंद्र याबाबत बैठक घेणार असेल तर आमच्यासारखे लोक तिथे राजकीय विचार न करता शेतकरी व ग्राहकांच्या हितासाठी जातील.

**...तर दुष्काळी स्थिती :**

राज्यातील काही भागात चांगला पाऊस झाला; परंतु अद्याप काही भागात पावसाने पाठ फिरवलेली आहे. हवामान खात्याने घेतलेल्या आढाव्यानुसार आता आशादायक चित्र आहे. मराठवाड्यातील सगळी धरणे भरलेली नाहीत. सध्याचा बदल टिकला तर यातून आपण बाहेर पडू; अन्यथा दुष्काळसदृश्य स्थिती निर्माण होण्याची चिन्हे दिसत आहेत.

# निवडणूक प्रक्रियेद्वारेच शरद पवार पक्षाचे अध्यक्ष

**मुंबईतील पत्रकार परिषदेत शरद पवार यांच्यासमवेत सहभागी झालेले राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी पक्षावर दावा सांगणाऱ्यांवर हल्लाबोल केला आणि खासदार प्रफुल पटेल हे पत्रकार परिषदेत किती खोटे बोलले हे पत्रकारांना कागदपत्रे दाखवून सिद्ध केले. यावेळी जितेंद्र आव्हाड यांनी दिलेली ही माहिती.**



नागालँडच्या संदर्भात माझ्याकडे कागदपत्रे आहेत. नागालँडच्या आमच्या आमदारांनी सांगितलं, की आम्ही एनडीए जॉईन केली. तसे आम्ही पत्र दिलं वगैरे वगैरे. ते पत्र त्यांना कुठे मिळालं हे काही त्यांनी सांगितलं नाही. माझ्या हातात पत्र आहे. या पत्रामध्ये त्या सदस्यांनी तिथे असलेले मुख्यमंत्री रियो हे एका वेगळ्या पार्टीचे आहेत. नॅशनलिस्ट डेमोक्रॅटिक प्रोग्रेसिव्ह पार्टी आणि या पार्टीला समर्थन, या पार्टीच्या सरकारमध्ये सामील होण्यासाठी पत्र मागितलं होतं. त्यामध्ये कुठेही एनडीए, बीजेपी असा शब्द वापरलेला नाही. त्यामुळं बीजेपी किंवा एनडीएला समर्थन देणं हे कोठेही वास्तवात लिखित स्वरूपात कुठेही नाही. त्यामुळं जे काही सांगण्यात आलं ते केवळ लोकांना भ्रमित करण्यासाठी सांगण्यात आलं. आणि स्वत:च्या ज्या मनातल्या गोष्टी आहेत त्या तिथे त्यांनी मांडल्या आहेत. हा त्याचा पुरावा. नागालँडचे आमदार म्हणाले की, आम्ही ३० जूनला पाठिंबा दिला. मग त्याच्या दुसऱ्या दिवशी प्रतिज्ञापत्र सादर का केलं नाही? त्यांनी प्रतिज्ञापत्र २१ ऑगस्ट २०२३ ला सादर केले आहे. याचे आमच्याकडे पुरावे आहेत. आम्ही त्यांना नागालँडच्या रियो यांच्या सरकारला पाठिंबा द्या असं पत्र दिलं होतं. त्यांना भाजप सोबत किंवा एनडीए सोबत जा असं कुठंही म्हटलं नव्हतं. आता त्याच्यानंतर त्यांनी वेगवेगळ्या गोष्टी सांगितल्या. त्याच्यातलं एक प्रमुख कारण जे आम्हाला दिसतंय ते म्हणजे त्यांच्या आमदारांमध्ये प्रचंड अस्वस्थता आहे. हे आमदार याच्यासाठी अस्वस्थ आहेत, की आमदारही वकिलांचा सल्ला घेत असतात आणि वकील हे स्पष्टपणानं सांगतायंत, की शिवसेनेचे जे जज्‌मेंट आलेलं आहे, त्याच्यानं एनसीपीच्या अनेक गोष्टी क्लिअर झालेल्या आहेत. विधीमंडळ पक्षालाच तुम्ही प्रधान मानून तुम्ही जर निर्णय घेणार असाल तर इलेक्शन कमिशनचा जो दृष्टिकोन आहे तोच चुकीचा आहे. त्यांनी सांगितलंय, की ऑर्गनायझेशन प्रोसिजरचा पण विचार केला पाहिजे. कालची प्रेस कॉन्फरन्स घेणाऱ्यांना माहिती आहे, ऑर्गनायझेशन सपोर्ट नावाची गोष्टच त्यांच्याकडं नाही. पूर्ण ऑर्गनायझेशनचा जो सपोर्ट आहे, तो माननीय पवार साहेबांकडे आहे. ते २००३मधील संगमांचं जजमेंट रेफर करत होते आणि शिवसेनेचे जे जजमेंट आहे ते २०२३चं आहे. त्यामुळं जे शेवटचं जजमेंट असतं, ते प्रमाण मानलं जातं. त्यामुळे शिवसेनेचे जे जजमेंट आहे, आणि त्याच्यामध्ये उल्लेख केलेला आहे, की विधीमंडळ पक्ष म्हणजे राजकीय पक्ष नाही. राजकीय पक्षाचा एक छोटासा भाग असतो. त्यामुळं बाकीच्या ज्या विंग असतात त्याचा तुम्हाला विचार करावाच लागेल.

त्यांनी असं म्हटलंय, की राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने ३० जूनला एक प्राथमिक बैठक घेतली. त्यामध्ये निर्णय झाला, की अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली आम्हाला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला पुढे घेऊन जायचे आहे. आता त्याच्यातलं आमचं जे म्हणणं

आहे ते मांडतो, की त्यांचे सगळे सोशल मीडिया हँडल जे आम्ही पुराव्यानिशी दाखवतो, ती प्रारंभिक बैठकच कधी झाली नव्हती. कारण का, तर त्यांचे जे सगळे सोशल मीडिया हँडल आहेत त्याचे आम्ही स्क्रीन शॉट काढून ठेवलेत, त्यावर बैठक झाल्याचं कुठंही दिसत नाही. कुठलाही आमदार तिथे नव्हता. सगळे आमदार बाहेर होते. ते म्हणतात, की टेलिफोनवर आम्ही त्यांच्याशी बोललो. आता कॉन्स्टिट्यूशनमध्ये कुठं दिलंय, की तुम्ही टेलिफोनवर बैठक घेऊ शकता. टेलिफोनवर बोलून बैठक झाल्याचं जगामध्ये कुठंही आजपर्यंत प्रमाण सिद्ध झालेलं नाही. त्याला कायदेशीर परवानगी पण नाही. अजित पवार साहेबांनी ३० तारखेला जेव्हा पत्र दिलं, तेव्हा ते एकट्याच्या सहीचं दिलं. हे सगळं करायला ज्या कॉन्स्टिट्यूशनचा जे ते वारंवार उल्लेख करतात, त्याच्यामध्ये एक चीफ रिटर्निंग ऑफिसर लागतो. मी त्यांना इथं आव्हान देतो, की त्यांचा चीफ रिटर्निंग ऑफिसर संपूर्ण प्रोसिजरसाठी कोण होतं हे आम्हाला नक्की सांगावं.

आम्ही मात्र पुराव्यानिशी तुम्हाला सांगतो, की आम्ही पूर्ण प्रोसिजर कंप्लिट केली. पक्षाच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी ३ ऑगस्ट २०२२ला आम्ही पहिलं पत्रक




**शरद पवार यांची पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून निवड झाल्यानंतर त्यांचा पुष्पगुच्छ देऊन जेव्हा सत्कार केला गेला तेव्हा प्रफुल पटेल आणि सुनील तटकरे हे साहेबांच्या शेजारीच उभे होते व त्यांनीच सूचक म्हणून अर्जावर सही केली होती.**

काढलं, सगळ्या राज्यांना पाठवलं, तेव्हा आमचे चीफ रिटर्निंग ऑफिसर होते टी. पितांबर मास्तर. ते आता ९५ वर्षांचे आहेत आणि आमच्या परवाच्या बैठकीलासुद्धा हजर होते. त्यांचं पत्र तुमच्या हातात देणार आहे. त्याच्यानंतर कधी फॉर्म भरायचा, कुणी फॉर्म भरायचा याची तारीख जाहीर झाली. आम्हाला पंजाब, केरळ, दिल्ली, तमिळनाडू, गुजरात, महाराष्ट्रासह जिथं आमचा पक्ष आहे तिथून सर्वांनी शरद पवार यांना अध्यक्ष करा अशी मागणी केली होती. त्यानंतर पक्षाच्या अध्यक्षपदासाठी शरद पवार यांचं नाव घोषित करण्यात आलं. अध्यक्षपदासाठी एकमेव शरद पवार यांचा अर्ज दाखल झाला असल्याचं अधिकाऱ्यांनी जाहीर केलं होती. आता महाराष्ट्रातून पवार साहेबांना अध्यक्षपदासाठी कुणी प्रपोज केलं होतं, की तुम्ही अध्यक्ष व्हा. पहिलं नाव प्रफुल्ल पटेल, दुसरं नाव जयंत पाटील, तिसरं नाव अजित पवार, चौथं नाव सुप्रिया सुळे, पाचवं नाव सुनील तटकरे, सहावं नाव हेमंत टकले, नंतर मग गर्जे, नरेंद्र राणे, नसीम सिद्दीकी आणि मिलिंद आण्णा कांबळे. सगळ्यांच्या या सह्या आहेत.

नंतर सर्वात खोटी गोष्ट म्हणजे, या सगळ्या प्रोसिडिंग ज्या कायद्यात बसणाऱ्या आहेत, त्या १५ सप्टेंबर २०२२ला हे चीफ इलेक्शन ऑथॉरिटी म्हणजे पितांबर मास्तर यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षपदाची निवडणूक पूर्ण झाल्याचं पत्र जाहीर केलं आणि त्याची सगळी माहिती इलेक्शन कमिशनकडे देण्यात आली आहे. पण, इलेक्शन घेतलंच नाही, ते केलेच नाही, असं सगळं खोटं सांगितलं जातंय.

अजित पवारांना राष्ट्रवादीचे अध्यक्ष म्हणून कोणी नेमलं, त्यांना पाठिंबा कोणी दिला? त्याचे काही पुरावे आहेत का? विधीमंडळ पक्ष हा राजकीय पक्ष नाही, विधीमंडळात निवडून येणारे सदस्य हे राजकीय पक्षाचे घटक असतात. आमदारांनी पक्षातून फारकत घेतली, तेव्हाच आम्ही प्रत्येक आमदारावर अपात्रतेची कारवाई केली होती. तीन तारखेला झालेल्या पत्रकार परिषदेतही आम्ही सर्वांनी 'शरद पवार' हेच आमचे राष्ट्रीय अध्यक्ष असतील, असं मान्य केलं होतं. सोमवारची पत्रकार परिषद ही खोटं कसं खरं आहे असं सांगण्यासाठी होती. अजित पवारांना अध्यक्ष म्हणून कुणी नेमलं? अजित पवारांना अध्यक्ष करण्यासाठी कुणी पाठिंबा दिला आहे ते सांगा. यासंबंधित काहीही पुरावा नाही, ते खोटं बोलत आहे.

सोमवारची अजित पवार गटाची पत्रकार परिषद ही खोटं कसं खरं आहे हे दाखवण्यासाठी होती. २ जुलैला अजित पवार यांनी उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. त्यानंतर ३ जुलैच्या दिवशी शरद पवार आमचे अध्यक्ष आहेत असं म्हटलं होतं. मग अजित पवार हे अध्यक्ष कसे काय झाले? पक्षातल्या ९५ टक्के लोकांनी आम्हाला पाठिंबा दिला आहे. शरद पवार यांना प्रतिज्ञापत्र सादर करण्यात आले आहे. अजित पवार अध्यक्ष होण्यापूर्वी राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून सही कशी काय करतात? आणि त्याला पाठिंबा प्रफुल्ल पटेल यांनी दिला होता. त्यांची देखील त्यावर सही होती.

शिवसेना आणि राष्ट्रवादीची केस वेगळी आहे असं अजित पवार गटाचे खासदार प्रफुल्ल पटेल म्हणाले होते. पण, शिवसेना आणि राष्ट्रवादीच्या फुटीमागचे लेखक, पटकथा, दिग्दर्शक एकच आहेत, फक्त कलाकार बदलले आहेत.



आजचा दिवस हा एक प्रकारे अस्वस्थ करणारा दिवस आहे. राज्याचा मुख्यमंत्री किंवा गृहमंत्र्यांवर राज्याच्या अनेक जबाबदाऱ्या असतात. त्यातली एक महत्त्वाची जबाबदारी म्हणजे गणपती विसर्जनाच्या दिवशी शेवटचा गणपती गेल्याशिवाय त्यांना विश्रांती घेता येत नाही. आणि त्या ३० तारखेला प्रत्येक जिल्ह्याचे कलेक्टर आणि डीएसपी यांच्यासोबत संपर्क साधत होतो. तुमच्या मिरवणुका संपल्या की नाही? शांततेत झाल्या की नाही? कुठं काही प्रश्न आहे का? आणि जवळपास सर्वत्र स्थिती चांगली होती, फक्त परभणीमध्ये काही विलंब झाला, मी परभणीच्या डीएसपी यांच्याशी संपर्क जोडत होतो आणि शेवटी पावणे चार-चारच्या सुमाराला परभणीच्या डीएसपी यांनी सांगितले, की आमच्या गणपतींचे विसर्जन झाले. मग मी ठरवलं की, आता आपण विश्रांती घ्यायला काही हरकत नाही, झोपायला गेलो आणि तेवढ्यात माझ्या

**किल्लारी भूकंपला ३० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त ३० सप्टेंबर रोजी माजी मुख्यमंत्री शरद पवार यांच्याप्रती कृतज्ञता सोहळा आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्यात त्यांनी व्यक्त केलेल्या भावना...**





घराच्या खिडक्या हलल्या, घरातले सामान हलले. तेव्हा माझ्या लक्षात आलं, की हे सर्व भूकंपाशिवाय शक्य नाही आणि भूकंप म्हटला की, महाराष्ट्रातलं कोयनेचं गाव आठवतं, कोयनेला भूकंप झाला होता, मोठं नुकसान झालं होतं, कोयनेला भूकंपासंदर्भात माहिती देणारं केंद्र हे महाराष्ट्र सरकारनं स्थापन केलं होतं, तिथं मी फोन केला आणि विचारणा केली असता, भूकंप झाला याची नोंद तुमच्याकडं आहे का? तिथून समजलं की आमच्याकडं भूकंप झालेला नाही, मग भूकंप झाला कुठं ? तेव्हा त्यांनी भूकंप नोंदणी केंद्रांची संपूर्ण सखोल माहिती घेतली आणि सांगितलं, की लातूर जिल्ह्यातलं किल्लारी हा भूकंपाचा मुख्य केंद्रबिंदू आहे आणि भूकंप तिथं झालेला आहे.

मी काहीही विचार न करता माझ्या अधिकाऱ्यांना उठवून सांगितलं, की विलासराव देशमुख साहेब, पद्मसिंह पाटील साहेब या दोघांना संपर्क करा, मुख्य सचिवांना संपर्क करा आणि त्यांना सांगा, की सकाळी ६ वाजता मला विमान पाहिजे आणि विमानांमधून मला लातूरला जायचं आहे आणि आम्ही

# लोकांच्या बांधिलकीशी तडजोड करायची नसते

सर्व सुदैवानं इथं पोहोचलो. किल्लारीत आलो, गावात जाताना भयानक परिस्थिती होती. घरं उद्ध्वस्त झाली होती, शेती उद्ध्वस्त झाल्या होत्या, काही लोक मृत अवस्थेत पडली होती तर काही रडत होती. आयुष्यात असं संकट कधी पाहू नये अशी स्थिती तेव्हा मी किल्लारीत पाहिली होती. चालता-चालता माझ्या लक्षात आलं, की फक्त किल्लारीच नव्हे तर हौसा, उमरगा तालुका आणि आजूबाजूच्या परिसरातील गावांमध्ये प्रचंड नुकसान झालं आहे. हे संकट मानवी संकट नसून निसर्गाची अवकृपा आहे आणि यातून बाहेर पडायचं असेल तर, सबंध राज्य सरकारची सत्ता आणि शक्ती या संकटग्रस्त माणसांच्या मागं उभी केल्याशिवाय आपण यांचे पुनर्वसन करू शकत नाही आणि म्हणून त्याच दिवशी २ ते ३ तासात दिलं आणि त्यांच्यातील आत्मविश्वास धडाडीने दाखवण्याचे काम त्यांनी ऐतिहासिकरित्या दाखवलं. संकट मोठं होतं, त्यातून काही ना काही तरी काम करण्याची आवश्यकता होती. सुदैवानं विलासराव देशमुख, पद्मसिंह पाटील यांच्यासारखे सहकारी होते. दोघांवरही दोन्ही जिल्ह्यांची कामं सोपवली आणि बाकी सर्व जनतेची साथ त्यांना होती आणि त्याचा परिणाम या संकटग्रस्त लोकांना एक प्रकारचा आधार देण्याचा होता. मला आठवतंय की, प्रविण परदेशी नावाचे एक गृहस्थ येथे कलेक्टर होते. त्यांनी अखंड काम याठिकाणी तेव्हा केलं. एके दिवशी मी उमरग्यावरून रात्री अडीच वाजता लातूरला यायला निघालो, तेव्हा रस्त्यात बैलगाडीमध्ये एक माणूस झोपलेला दिसला, मी गाडी थांबवून त्या झोपलेला माणसाला उठवलं, तेव्हा माझ्या



आजूबाजूच्या जिल्ह्यांचे वरिष्ठ अधिकारी या सर्वांना बोलावून डॉक्टर्स आणि त्यासोबतच अन्य सुविधा कशा देता येतील याची काळजी घेतली, आणि या पुनर्वसनाची प्रक्रिया वेगानं सुरू झाली. हे काम एका दिवसाचं काम नव्हतं, जवळपास तीन आठवडे या कामाशिवाय दुसरं काहीही काम केले नाही. १५ दिवस मी स्वतः इथे येऊन राहिलो. माझा मुक्काम इथंच. सकाळी ७ वाजता उठून आणि सबंध दोन्ही जिल्ह्यात जाऊन रात्री १ ते जवळजवळ ३ वाजेपर्यंत थांबून मुक्कामाला परत यायचे आणि दुसऱ्या दिवशी सकाळी परत कामाला लागायचं या पद्धतीने कार्यक्रम आखला.

मला एका गोष्टीचा अभिमान आहे, की संकट मोठं होतं. परंतु, या दोन्ही तालुक्यातील सर्वसामान्य जनतेला एवढं मोठं संकट आलेलं असताना देखील त्यांनी धैर्यानं संकटाला तोंड लक्षात आलं, की तो दुसरा तिसरा कोणी नसून तुमचा कलेक्टर होता. दिवसभर कष्ट करून रात्री दोन अडीचच्या दरम्यान २-३ तासांचा आराम करण्यासाठी त्यांनी रस्त्यावरच त्या बैलगाडीवर अंग टाकलं होतं. महाराष्ट्राची खासियत हीच आहे, की संकटावर मात करण्याची ताकद महाराष्ट्राच्या प्रशासनात आहे, त्याचे उत्तम उदाहरण आज या ठिकाणी पाहायला मिळालं.

संकटं ही येत असतात. त्याला धैर्यानं तोंड देता यायला हवं, आत्मविश्वास घालवून द्यायचा नसतो. मला आठवतंय, की हे संकट आलं आणि तुम्ही आम्ही सर्वांनी कष्ट केलं. त्याचा परिणाम संपूर्ण जगात याची चर्चा झाली. मला स्वतःला युनोमध्ये बोलावलं, जागतिक बँकेत बोलावलं आणि तेव्हा असं सांगितलं गेलं, की लातूरचा भूकंप, याला तोंड तुमच्या यंत्रणेनं आणि लोकांनी कसं दिलं यासंबंधीचे तुमचे विचार आम्हाला

सांगा आणि तेव्हा मी माझी भूमिका मांडली. तेव्हा या भूकंपाला कोट्यवधी निधी लागणार होता आणि तेव्हा महाराष्ट्राकडं एवढे पैसे नव्हते. सुदैवाने त्यावेळचे अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांच्याशी चर्चा केल्यानंतर त्यांनी असं सांगितलं, की पवार साहब आप पैसे की चिंता मत करो, मैं देखूंगा वर्ल्ड बैंक से बात करूंगा. आपको जितनी चाहिए उतनी रकम का मैं बंदोबस्त करूंगा. आणि मला आज या ठिकाणी त्यांची आठवण होते. एकंदर या कामासाठी लागलेली कोट्यवधी रुपयांची रक्कम अक्षरशः दहा दिवसांच्या आत जागतिक बँकेकडून मंजूर करून त्यांनी उपलब्ध करून दिली आणि त्यांनी मला सांगितलं, की यात काही कमतरता आली तर हक्काने सांगा आणि पाहिजेल त्या प्रकारे मी मदत करीन.

ते इथं आले आणि इथले जे काही प्रश्न होते ते सोडवण्यासाठी त्यांनी मदत केली.

या गोष्टीचा फायदा झाला तो असा, की इथून गेल्यानंतर मुंबईला एक संकट आलं, त्या दिवशी शुक्रवार होता आणि मी मंत्रालयात होतो. दुपारी साडेबाराच्या दरम्यान माझ्या केबिनमध्ये मोठा आवाज आला, मी चेंबरमधून बाहेर पाहिलं तर लोक पळत होते. तेव्हा लक्षात आलं, की काहीतरी गडबड आहे. मंत्रालयाच्या शेजारील एअर इंडिया बिल्डिंगमध्ये बॉम्बस्फोट झाला असं समजलं. त्या बॉम्बस्फोटाचा अंदाज घेण्यासाठी मी स्वतः तिथं गेलो. मी संरक्षण मंत्री देखील त्याआधी होतो. त्यामुळं बॉम्बस्फोट घडवण्यासाठी कोणती रसायनं वापरतात हे मला माहिती होतं आणि तेथील एकंदर चित्र पाहिल्यानंतर



देशाचे प्रधानमंत्री नरसिंह राव होते. ते या ठिकाणी येणार होते, भूकंप झाल्यावर दुसऱ्या तिसऱ्याच दिवशी त्यांचा आग्रह होता या ठिकाणी यायचा. मी त्यांना सांगितलं, की अजिबात यायचे नाही, तेव्हा मला बाकीचे अधिकारी म्हणाले, की तुम्ही प्रधानमंत्री यांना यायचे नाही म्हणता, तेव्हा मी त्यांना सांगितलं, की प्रधानमंत्री इथं आले तर सर्व अधिकारी त्यांच्या व्यवस्थेला लागतील आणि जी संकटग्रस्त माणसं आहेत, दुःखी आहेत, जखमी झालेली आहेत त्यांच्याकडं कुणी ढुंकूनही बघणार नाही आणि म्हणून सर्व नीट झाल्यानंतर आले तरी चालतील. पहिलं इथं जे दुःखी माणसं आहेत त्यांचे दुःख कमी करण्यासाठी यंत्रणेने काम केलं पाहिजे. यंत्रणा इकडं तिकडं हलता कामा नये, आणि त्यामुळं प्रधानमंत्री यांना मी इथं येऊ दिलं नाही. आणि एका ठराविक दिवसानंतर मी त्यांना निमंत्रण दिले आणि

मला लक्षात आलं, की या बॉम्बस्फोटमध्ये वापरलेलं रसायन या देशात होऊ शकत नाही. परंतु लष्कराशिवाय दुसरं कुणीही हे रसायन वापरू शकत नाही. त्यामुळं आजूबाजूच्या देशातून हा कोणीतरी उद्योग केलेला दिसत आहे आणि नंतर पाकिस्तान मधून हे काम झालं, या प्रकारची माहिती तेव्हा समजली आणि तो बॉम्बस्फोट एकाच ठिकाणी न होता दहा ठिकाणी झाला होता आणि दुर्दैवाने एका समाजाच्या विशिष्ट आणि श्रद्धास्थाने आणि कुटुंबे यांच्यातून हा दंगा झाला. परंतू त्यातून जातीय दंगा होऊ नये म्हणून मी एक निर्णय घेतला. मला विचारणा केली असता हे स्फोट कुठं झालेत, तेव्हा मी सांगितलं की दहा ठिकाणी झालेत हे खरं आणि एक ठिकाण मी खोटं सांगितलं आणि ते ठिकाण म्हणजे समाजाचे अल्पसंख्यांक राहतात त्यांच्या भागाचे होते. त्याचा परिणाम म्हणजे मुंबईच्या लोकांना

हा स्फोट आणि त्याची किंमत हे ध्यानात आलं आणि त्यामुळं कुठल्याही प्रकारची प्रतिक्रिया आली नाही आणि त्यामुळं मुंबई शांत राहिली.

मुंबई ही जगातील एक आर्थिकदृष्ट्या प्रगत आणि व्यावहारिक शहर आहे, हे संपूर्ण जगात माहित आहे. त्यामुळं कारभार बंद करून चालणार नाही, तो दिवस शुक्रवारचा होता त्यामुळं शुक्रवार आणि शनिवारी मी व माझे मंत्रिमंडळातील सहकारी आणि मंत्रालयातील अधिकारी यांनी अक्षरशः ४८ तास न झोपता त्या ठिकाणी काम केलं, आणि सोमवारी मुंबई शहर आणि त्याचा व्यवहार हा सुरळीतपणे चालू आहे ही स्थिती निर्माण केली. जग आश्चर्यचकित झालं, जेथे ३०० लोक मेलेत, पण एवढं असूनदेखील मुंबई नगरी शांत आहे, लोक कामावर जात आहेत, मुलं शाळेत जात आहेत, कॉलेज सुरू होती. ही स्थिती त्या ठिकाणी आम्ही निर्माण केली. आणि सबंध भारताचे नाव संकटाला तोंड देणारे असे नावलौकिक झाले.

संकटं येतात परंतु त्याची एक नीती असते. संपूर्ण जगामध्ये असे म्हटले जाते, की डिझेस्टर मॅनेजमेंट प्लॅन. संकट आल्याच्यानंतर जे नुकसान होतं त्याला तोंड देण्यासंबंधीची योजना, व्यवस्था. अशा प्रकारचा तो कार्यक्रम सर्वत्र असतो पण तो आपल्याकडं नव्हता. प्रधानमंत्री अटलबिहारी वाजपेयी यांनी बैठक बोलावली. सर्व पक्षाच्या लोकांना आमंत्रित केलं आणि आपल्या देशात हे काम नाही, हे कोणीतरी केलं पाहिजे आणि शेवटी सोनिया गांधींनी त्या मीटिंगमध्ये सांगितलं, की हे काम शरद पवार करू शकतात आणि त्याचं कारण, की त्यांना किल्लारीचा अनुभव आहे आणि अटल बिहारी वाजपेयी यांनी ते काम पवारांवर सोपवा असं सांगितलं आणि ते काम मी दोन वर्षे देशात आणि देशाच्या बाहेर जाऊन अभ्यास करून त्याची नीती आखली आणि त्यासंबंधीचा कायदा केला. आज भारतामध्ये कुठंही संकट आलं तर त्याला तोंड देण्याची यंत्रणा आज भारतात आहे आणि त्याचा उगम हा किल्लारीमधून झालेला होता आणि त्यामुळं आता जगाला त्याची चिंता नाही.

या संकटाच्या काळात आणखीन एक गोष्ट पाहायला मिळाली आणि ती म्हणजे मदतीचा ओघ आणि शेवटी इथं इतकी मदत यायला लागली, की ट्रकच्या ट्रक या ठिकाणी यायला लागले आणि शेवटी ते आम्हाला थांबवावे लागले. लोकांनी अनेक प्रकारची वेगवेगळ्या पद्धतीनं मदत केली. आर्थिक त्यासोबतच, औषधे पुरवली हव्या त्या गोष्टी महाराष्ट्रातून आणि या देशातून या ठिकाणी आल्या. घरे बांधण्यासाठी अनेक संस्था पुढे आल्या, जसे शिवसेनेने एक गाव दत्तक घेतलं, तसं काँग्रेस पक्षाने तावसी हे गाव दत्तक घेतलं. त्यासोबतच आणखीन इतरही गावे दत्तक घेतली. काही कारखानदारांनी गावं दत्तक घेतली, जसे किर्लोस्कर, टाटा, बिर्ला असे अनेक लोक या ठिकाणी आले आणि या ठिकाणी घरे बांधण्याचा एक कार्यक्रम त्यांनी हातात घेतला आणि अक्षरशः एका वर्षाच्या आत अनेक कामांना गती देण्यात आपण यशस्वी झालो.



दुर्दैवानं कुटुंबातील करते माणसं मरण पावली आणि लहान मुलं होती, त्यांची प्रशासनाकडून मोजणी केली असता तो आकडा मोठ्या प्रमाणात निघाला. तेव्हा प्रश्न पडला की या

मुलांचं करायचे काय? यांच्याकडं कोण पाहणार? यांना आई वडील नाहीत. शांतीलाल आणि आमचं पुण्याचे सहकारी होते. त्यांना बोलावून अशा कामांमध्ये लक्ष घालणाऱ्या लोकांना जमा करून त्यांना सांगितलं, की हे संकट मोठं आहे. या संकटात सापडलेल्या मुलांना पुन्हा नव्यानं उभं करून त्यांना शिक्षण देऊन स्वतःच्या पायावर उभं करून त्यांना मार्गी लावायची जबाबदारी घेऊन आपण काम करायचं. त्यांनी त्या सर्व मुलांना पुण्याला घेऊन जाऊन एका स्वतंत्र इमारतीत त्यांच्या निवासस्थानाची आणि शिक्षणाची व्यवस्था केली.

आज या एवढ्या मोठ्या संकटातून जी मुले बाहेर पडलीत त्यांची माहिती घेण्याचा मी प्रयत्न केला, ज्यांचे पालक नाहीत अशी स्थिती असताना देखील शांतीलाल आणि त्यांचे सहकारी त्या मुलांचे पालक झाले, पुण्याला गेल्यावर त्या सर्व मुलांनी उत्तम शिक्षण घेतले. त्यातली काही मुलं म्हणजे, किशोर भोसले नावाचा मुलगा एमए झाला आणि सिंगापूरला जाऊन तो एका प्रतिष्ठित संस्थेत पदाधिकारी म्हणून काम करत आहे. बालाजी साठे हा मुलगा एमएससी होऊन शास्त्रज्ञ होऊन दिल्लीत एका सहकारी संस्थेत तो काम करत आहे. लिंबाजी फडतरे, शिरपूर धुळे हा एमपीएस झाला आणि इंटरनॅशनल स्तरावर त्याने उत्तम काम केल्यामुळं त्याचा बँकॉक येथे सत्कार झाला. माधव माने याने एमएससी करून १७ रिसर्च पेपर मेडिकल केमिस्ट्री या सर्व क्षेत्रात त्यांनी लिखाण काम करून आणि पुण्यातील एनएसजी नावाच्या केंद्र सरकारच्या संस्थेत त्यांनी हे संशोधन केलं. सचिन झोने यांनी एमएससी करून एका रिसर्च संस्थेमध्ये ते काम करत आहेत. मल्लिकार्जुन बिराजदार यांनी बीएससी करून पोलीस खात्यात एक वरिष्ठ अधिकारी म्हणून ते काम करत आहेत. बाळासाहेब कांबळे हे पोलीस खात्यात अधिकारी आहेत. अशी अनेक नावं माझ्याकडं आहेत आणि यातला प्रत्येक मुलगा प्रतिष्ठित ठिकाणी काम करत आहे. शांतीलाल यांच्यामुळं मुलं शिकली आणि मार्गाला लागली. ते एवढेच करून थांबले नाहीत, तर देशात कुठल्याही राज्यात संकटं आली तर सर्वप्रथम शांतीलाल यांना संपर्क करून त्यांच्या संघटनेकडं कामं सोपावली जातात. ते फोनची वाट न पाहता तातडीनं कामाला लागतात त्यांनी स्वतःचा व्यवसाय बंद केला आणि फक्त संकटग्रस्तांना मदत करायची एवढं एकच काम आयुष्यात त्यांनी घेतलेलं आहे. आपल्या सर्वांच्यावतीनं त्यांचं मी या ठिकाणी अभिनंदन करतो.

संकटावर मात करण्यासाठी आणि संकटग्रस्तांना मदत करण्यासाठी आतुरता असलेला जो मोठ्या प्रमाणात वर्ग आहे तो आपल्याकडं आहे आणि त्यामुळं आपण कितीही संकटं आली, तरी त्यावर मात करू शकतो, या सर्व संकटाच्या काळात मला अनेकांची मदत झाली. विलासराव देशमुख, डॉ. पद्मसिंह पाटील यांच्याशिवाय अनेक अधिकारी त्या ठिकाणी काम करत होते आणि त्याबरोबरच इथली बरीच माणसं त्या ठिकाणी अहोरात्र काम करत होती. आणि म्हणून येतानाच मी चौकशी केली, की मी त्या काळात किल्लारीला आलो की इथल्या लोकांचं जे काही दुखणं असो ते सांगायला पुढे असायचे ते म्हणजे डॉ. पडसलगे माझ्यापेक्षा चारच वर्षांनी मोठे.





यांसारख्या अनेक लोकांनी कष्ट केलेत आणि म्हणून हे होऊ शकले.

कृतज्ञता सत्कार याची काही आवश्यकता नसते, समाजासाठी काहीतरी करायची ही वृत्ती असली तर, लोकांशी बांधिलकी यांच्याशी तडजोड कधी करायची नसते आणि हे संस्कार महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी दिले. चव्हाण साहेबांनी त्यांच्या कालखंडात कोयनेचा भूकंप झाला, त्यावेळी अहोरात्र काम केलं होतं. आम्ही तेव्हा कॉलेजमध्ये शिकत होतो. त्यांच्या कामाची पद्धत पाहण्यासाठी आम्ही तिथं जात होतो.

३० तारखेच्या भूकंपाची एक्झॅक्टली वेळ ३ वाजून ५५ मिनिटं. त्याची तीव्रता ६.४ रिश्टर, ४२ सेकंद म्हणजे, एकंदर मृत्यू ८ हजार ८९, जखमी लोक १६ हजार ३०२, संपूर्ण उद्‌ध्वस्त झालेली गावं ५२, अंशत: उद्‌ध्वस्त झालेली गावं २ हजार २९४, शासनाकडून ३ हजार ६८७ घरं बांधण्यात आली. याशिवाय कार्यालय, महिला केंद्र, शाळा, समाज मंदिर, दवाखाने, सरकारी संस्था हे सर्व नव्याने बांधण्यात आले. ही माहिती देण्यामागचे कारण एवढंच, की संकटं येत असतात पण संकटांना तोंड देण्याचा सर्वात मोठा वर्ग या देशात आणि या राज्यात आहे. हा आपला ठेवा आहे आणि या ठेव्यासंबंधीची कृतज्ञता त्या सर्व लोकांबद्दल करायचं, माझ्याबद्दल नाही, ही माझी तुमची सर्वांची जबाबदारी आहे. ही जबाबदारी आपण सर्वांनी या ठिकाणी पार पाडली या जबाबदारीला ज्यांनी साथ दिली आणि माणसांना उभं करण्यासंबंधीची ताकद दिली, त्या मदत करणाऱ्या लोकांसोबत त्यांच्या या दातृत्वासंबंधी त्यांचे अंत:करणापासून आभार मानले पाहिजेत. एवढंच याठिकाणी सांगतो. आपण अगत्याने सर्वांना बोलावलं. त्यामुळं तुम्हा सर्वांचे आणि विशेषतः येथील तरुण मंडळींचे, की ज्यांनी हा हट्ट माझ्याकडं केला की तुम्ही यायलाच हवं. या सर्व तरुणांचे मी आभार मानतो आणि माझे दोन शब्द संपवतो.

# महिला आरक्षणाचा चेक दिला, पण त्यावर तारीखच नाहीये

## राष्ट्रवादीच्या कार्याध्यक्ष खासदार सुप्रियाताई सुळे यांची टीका

खरं तर मी फार कमी वेळा आदरणीय पवार साहेबांबरोबर कार्यक्रमाला जाते. पण, आमच्या कुटुंबाला आणि आमच्या आयुष्यातला अतिशय महत्त्वाचा भाग, म्हणजे आयुष्यातील कौटुंबिक चर्चेसाठी म्हणजे जेव्हा आम्ही गप्पा मारत बसतो, तेव्हा माझे आई-वडील आणि मी, आमच्या आयुष्यातल्या तीन-चार महत्त्वाच्या घटना आहेत, त्यातली किल्लारी ही आमच्या आयुष्यातली एक महत्त्वाची घटना आहे. दोन घटना आहेत, ज्याच्याबद्दल माझ्या आईच्या आणि माझ्या मनात नेहमीच अस्वस्थता असते. किंवा मुंबईत झालेले बॉम्बब्लास्ट आणि दुसरी म्हणजे किल्लारीची घटना. याचं कारण, की मी काय तेव्हा राजकारणात नव्हते. एवढा मीडियाही नव्हता. मोबाईलही नव्हता. मी परदेशात राहत होते. माझं लग्न झालं होतं तेव्हा. माझी आई मुंबईला एकटी घरी होती. आदरणीय पवार साहेब महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. कुठलाही मोबाईल नाही, बातमी नाही, काही नाही. तीन आठवडे जवळपास ते सातत्यानं हा फोन आल्यानंतर, फोन माझ्या आईने उचलला होता, की किल्लारीमध्ये अशी घटना झाली आहे. साहेब तसेच उठले आणि दोन आठवड्यांसाठी इथे येऊन राहिले. आम्हाला फक्त बातम्या अधून मधून यायच्या, की भूकंप परत झाला. अशा बातम्या पुढेही दोन आठवडे येत राहिल्या. पण कोण कसं आहे, कुठं आहे हे दोन आठवडे आम्हाला काहीही माहिती नव्हतं.

दोन आठवडे ज्या पद्धतीनं यंत्रणेनी इथे काम केलं, तीस वर्षापूर्वी त्या काळातले अनेक अधिकारी असतील, पदाधिकारी असतील, सगळ्याच संघटना असतील, राजकारण पूर्णपणे बाजूला ठेऊन ज्या पद्धतीनी महाराष्ट्रानी एक आदर्श या देशाला घालून दिला, त्या लातूरच्या मातीला मी विनम्रपणे अभिवादन करते. कारण, ही खरंच देशाला दाखवलेले अतिशय सुंदर उदाहरण आहे आणि आज व्यासपीठावर विलासरावजी देशमुख नाहीत याचं मला सातत्यानं दुःख वाटतं. कारण का, तर आमचे कौटुंबिक संबंध तर आहेतच, पण त्या काळामध्ये त्यांनी आदरणीय पवार साहेबांच्या खांद्याला खांदा लाऊन जे काम विलासरावजी देशमुखांनी केलं, ते मला वाटत नाही, की उभा महाराष्ट्रही कधी विसरेल आणि त्यानंतर ते अनेक वर्षे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री राहिले आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापनाही झाली. पण, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कुठल्याही नेत्याला तुम्ही विचारा, की काँग्रेस पक्षातला सगळ्यात चांगला मुख्यमंत्री, आम्हाला काम करण्यासाठी कुणाचं सहकार्य मिळालं, तर सगळेच विलासराव देशमुखांचं नाव नक्की घेतील. कारण, आघाडीमध्ये मुख्यमंत्री असणं सोपं नसतं. पण, विलासराव देशमुखांनी कधीही राष्ट्रवादी काँग्रेसला अंतर दिलं नाही. एका कुटुंबासारखं सगळ्यांना नेहमी वागवलं. महाराष्ट्राच्या विकासामध्ये काँग्रेस, राष्ट्रवादी असं वेगळं कधीच केलं नाही. सगळ्यांना प्रेम दिलं. मान-सन्मान दिला आणि महाराष्ट्राची जान, बान आणि शान याच्यात कदाचित आज कमतरता दिसत असेल सगळ्यांना. पण, ती त्या काळात विलासरावजींनी मुख्यमंत्री म्हणूनही ठेवली ही आमच्यासाठी खूप अभिमानाची गोष्ट आहे.

मघाशी अमरचं भाषण मी ऐकत होते. भाषण करत असताना त्यांनी त्यांच्या अनेक आठवणी सांगितल्या. आठवणी सांगताना, काय आणि कशा प्रकारच्या दुःखातून तुम्ही सगळे गेला असाल. पण मला अभिमान एका गोष्टीचा वाटतो, की त्यांनी आरक्षणाची मागणी केली. ९३ साली भूकंप झाला. ९४ सालापासून आरक्षणाची अंमलबजावणी आदरणीय पवार साहेबांनी केली. मला खंत एकाच गोष्टीची वाटते, की आम्हाला आरक्षण देण्याचा निर्णय





घेतलेला आहे केंद्र सरकारनी, पण तो चेक असा दिलाय, त्याच्यावर तारीखच नाहीये. त्याच्यामुळं महिलांना आरक्षण दिलेलं आहे. पण, त्याला तारीख नाहीये. म्हणजे आता २९ला मिळेल, ३४ला मिळेल की कधीच मिळणार नाही हे आता देवालाच ठाऊक. पण, मी तुम्हाला एक शब्द देते, जर २०२४मध्ये इंडियाचं राज्य आलं, तर पुढच्या इलेक्शनमध्ये पूर्ण ताकदीनं या देशातल्या प्रत्येक महिलेचा मान-सन्मान होईल आणि ३३ टक्के आरक्षण करून तिला लवकरात लवकर ५० टक्के आरक्षण देण्याचाही प्रयत्न आम्ही करू.

आणि अमर तुम्ही एक मागणी केलीय, की आदरणीय पवार साहेबांनी आरक्षण दिलं, ते अडचणीमुळं एवढ्यासाठीच २००२मध्ये आलं, की काही लोकांचं म्हणणं होतं, की या दोनच जिल्ह्यांसाठी हे आहे. पुढं ते विलासरावजींनी केलं आणि ते पुढं टिकलं. तर याच्यातही तुमच्या ज्या काही मागण्या असतील महाराष्ट्र सरकारकडे, आज व्यासपीठावर एक मंत्री उपस्थित आहेत, पण, प्रकल्पग्रस्तांसाठी पूर्ण ताकदीनं मी स्वत: आणि आज ओमही आहेत, राजेशभैय्याही उपस्थित आहेत, आम्ही पूर्ण ताकदीनं तुमच्या आरक्षणासाठी जे काय तुम्हाला, कदाचित काळाप्रमाणं मागण्यांमध्येही बदलही असतील, कारण शेवटी ३० वर्षे झालेली आहेत, तुमच्या गरजा समाज जसा बदलतो तशा गरजाही बदलतात, तर त्या आरक्षणामध्ये काही बदल घडवायचे असतील, तर त्याच्यासाठी जी काय मदत तुम्हाला लागेल, लोकप्रतिनिधी म्हणून ओमराजे, राजेशभैय्या आणि मी पूर्ण ताकदीनं महाराष्ट्र सरकारकडं तुमची बाजू मांडू.

आज एका अतिशय चांगल्या कार्यक्रमात मला एका गोष्टीचा आनंद वाटतोय, की हा कार्यक्रम या सगळ्या टीमनी केलेला आहे. इथे कुठलीही सरकारी यंत्रणा नाही. त्यामुळं एखाद्या ग्रुपनी चांगलं काम करायचं म्हटलं, तर काय करू शकतात, म्हणजे सर्वसामान्य मायबाप जनतेमध्ये काय ताकद असते ती आज इथे आल्यावर बघायला मिळालीय. याचा मला सार्थ अभिमान आहे आणि नवीन पिढी सक्षणा असेल आणि त्यांचे सगळे सहकारी असतील त्यांनी एक अतिशय घरगुती, पण सुंदर असा कार्यक्रम इथे आयोजित केला त्याबद्दल मी त्या सगळ्यांचं मनापासून कौतुक करते.





एक गोष्ट लातूरला आल्यावर आवर्जुन उपस्थित केली पाहिजे. कारण या भागातला महत्त्वाचा प्रश्न आहे, की हमी भावाबाबत सातत्यानं, मग कांदा असेल, दूध असेल, गहू असेल, सोयाबीन असेल, त्याच्यात सातत्यानं आपल्या सरकारला म्हणजे हे सरकार, ना केंद्र सरकार हे न्याय देत नाही. अनेकवेळा मला टेलिव्हिजनवरही ऐकायला मिळतं, की आज सरकार दरबारी न्याय मिळत नाही. मी गंमतीनं अनेकवेळा लोकांना विचारते, की या देशाचा शेतीमंत्री कोण आहे? कारण, फार कमी लोकांना माहिती असतं. मधूनच एखादा उठून सांगतो, की शरद पवार. मग मी सांगते, की शरद पवार होते, आता नाहीत. पण, पूर्ण ताकदीनं या भागातल्या शेतकऱ्यांना न्याय कसा मिळेल याच्यासाठी दिल्लीमध्येही आणि महाराष्ट्रामध्ये आम्ही पूर्ण ताकदीनं राजकारण बाजूला ठेऊन पूर्णपणे तुमच्या मागे आहोत. कारण, आज शेती ही अडचणीत आलेली आहे. तुम्ही कांद्याचा प्रश्न आताही पाहिला असेल. कांद्यासाठी सगळ्यात पहिल्यांदा कोण बोललं असेल, तर चार महिन्यांपूर्वी मी बोलले होते. मी केंद्र सरकारला सांगितलं होतं, की जगामध्ये कांदा कमी आहे. पण महाराष्ट्रात कांदा जास्त आहे. त्याच्यामुळं जातीनं त्याच्यामध्ये लक्ष घाला. तसंच सोयाबीनचं आहे. मी येताना बोर्ड पण बघितले, तुम्हाला जो भाव मिळाला आहे त्याचे. मला तरी हा भाव मान्य नाही. त्याच्यामुळं शेती आणि शेतकऱ्याला न्याय देण्यासाठी जो काही संघर्ष करावा लागेल तो पूर्ण ताकदीनं, तुमच्या भागातले लोकप्रतिनिधी नसले तरी महाराष्ट्राची एक मुलगी म्हणून दिल्लीमध्ये तुमचे जे काय प्रश्न असतील ते पूर्ण ताकदीनी ओम आणि मी नक्की मांडू एवढीच तुम्हाला ग्वाही देते आणि या कृतज्ञता समितीचे जे काही मुलभूत प्रश्न आहेत त्याच्यासाठी आपण सगळे मिटिंग घेऊ आणि ते मार्गी लावण्यासाठी आम्ही सगळे, राजेशभैय्या, मी, ओम सगळे आम्ही तुमच्याबरोबर कटिबद्ध आहोत एवढीच ग्वाही देऊन आज एका चांगल्या कार्यक्रमाला आम्हाला आमंत्रित केलंत, आमचं अतिशय प्रेमानं स्वागत केलं त्याबद्दल तुमचे मन:पूर्वक आभार मानून, आज विलासरावजींचीही आठवण येते आणि आज कार्यक्रमात पद्मसिंह पाटील यांचाही उल्लेख झाला, त्यांना आमंत्रण दिलंय, पण त्यांना आज काय येता आलं नाही, त्यांनीही केलेल्या कामाची नोंद आपण सगळ्यांनी घेतली पाहिजे. सगळ्यांनी जे काम महाराष्ट्राच्या उभारणीत केलं त्या सगळ्यांचे मी मन:पूर्वक आभार मानते, कौतुक करते आणि आपली रजा घेते.

## किल्लारीतील दिलीपराव देशमुख यांचे अध्यक्षीय भाषण



# पवारसाहेबांनी नेहमीच सत्तेकडं लोकांची सेवा म्हणून बघितलं

बरोबर ३० वर्षापूर्वी, म्हणजे ३० सप्टेंबर १९९३ला पहाटे जो प्रलयकारी अशा प्रकारचा भूकंप झाला आणि त्याच्यामध्ये दोन्ही जिल्ह्यांतील मिळून दुर्दैवानं ९ हजार ७०० लोकांचा त्याठिकाणी बळी गेला. मोठा धक्का महाराष्ट्राला बसला. अशावेळी नेत्याची सुद्धा कसोटी असते. जनतेची तर कसोटी असतेच. दोन तासांमध्ये दोन्ही पालकमंत्र्यांना घेऊन, तेव्हाचे लातूरचे पालकमंत्री विलासरावजी देशमुख साहेब आणि उस्मानाबादचे पालकमंत्री डॉ. पद्मसिंह पाटील साहेब, मुख्य सचिव आणि पुनर्वसन खात्याचे अधिकारी घेऊन ७ वाजता किल्लारीमध्ये येऊन पवार साहेबांनी या सगळ्या गोष्टीची पाहणी केली.

खरं म्हणजे अशा प्रकारची आपत्ती जेव्हा राज्यावरती येथे, त्यावेळी आतासुद्धा हेलिकॉप्टरमधून फिरणारे अनेक नेते महाराष्ट्रामध्ये आहेत. आपण रोज पाहतो आहोत. हवाई पाहणी करून जायचं आणि तीन-चार हजार कोटींची तरतूद नसतानासुद्धा घोषणा देऊन मोकळं व्हायचं. भविष्यात ते लोक विसरून जातात. मग पुढे काहीच होत नाही. पण, पवार साहेब हे असे नेते आहेत, की केवळ त्यांनी कसली घोषणा केली नाही तर प्रत्यक्षपणे, हे केवळ महाराष्ट्रातले उदाहरण नाही, केवळ देशातलं उदाहरण नाही, तर जगातलं उदाहरण आहे. या सगळ्या भूकंपग्रस्त गावांतल्या लोकांची पडलेली घरं पक्की बांधून दिली. त्यांना निवाऱ्याची सोय केली, त्यांना आरोग्याची सोय केली. शेतकऱ्याचं बी-बियाणं मातीखाली बुजलं असताना शासनाच्या माध्यमातनं मोफत रब्बीची पेरणी करून दिली आणि

इथल्या दुर्दैवानं पोरक्या झालेल्या मुला-बाळांच्या शिक्षणाची सोय त्यांनी त्याठिकाणी करून दिली. तर हे उदाहरण केवळ महाराष्ट्रापुरतं नव्हे, तर जगाच्या पातळीवरती जेव्हा जेव्हा असं कुठलं संकट आलं, तेव्हा पवार साहेबांनी काय उपाययोजना केली होती याची आठवण ठेऊन त्याची अंमलबजावणी करण्याचं काम करण्याचं अशा प्रकारचं केवळ पाहणी करून जाणारं नेतृत्व नाही, तर मनापासून ते प्रश्न सुटेपर्यंत, अनेक बैठका झाल्या, त्याच्या खोलात मी जात नाही. आपल्या सगळ्यांना त्याची माहिती आहे.

आणि मग नेतृत्व कसं असावं, सत्ता हे साधन आहे. पवार साहेबांनी सत्तेकडं लोकांच्या सेवेचं साधन म्हणून बघितलं, पण अलीकडच्या काळामध्ये साध्य म्हणून सत्तेकडं पाहणारे अनेकजण याठिकाणी निर्माण झालेले आहेत आणि म्हणून त्यांना साधन आणि साध्य यामधला फरक कळला नाही. साधन हे दुसऱ्याच्या मदतीसाठी असतं. साध्य हे फक्त आपल्यापुरतं मर्यादित असतं किंवा आपल्या बगलबच्च्यांपुरतं मर्यादित असतं. हा फरक हा नेतृत्वामधला आपण समजून घेतला पाहिजे. दोन-तीन दिवसांनी गांधी जयंती आहे. गांधीजींच्या समाधीवरती फुलं वाहून फोटो काढणं वेगळं आणि गांधीजींचे विचार आपण अंगिकारून सर्वसामान्यांच्या हितासाठी वापरणं असं हे वेगळेपणाचं नेतृत्व या देशाला आणि या राज्याला आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या माध्यमातनं लाभलेलं आहे. आणि म्हणून साहेब, आमच्या या किल्लारी परिसरातल्या तरूणांनी एक गोष्ट मनामध्ये घेतली. म्हणजे आपली आठवण केवळ समकालीन लोक ठेवतात असं नव्हे, तर तरूणांच्या मनामध्ये, जेव्हा भूकंप झाला, तेव्हा हे तरूण तीन, चार, पाच वर्षांचे, त्यामुळं त्यांना फारसं कळतही नव्हतं की काय झालंय ते. पण त्यांच्या मनामध्ये कुठंतरी अशा प्रकारची कृतज्ञतेची भावना आहे, की केवळ आपण काम केलं नाही, तर सगळ्यांच्या मनामध्ये एक प्रकारचं घर निर्माण केलं आणि जगण्याची उमेद दिली. आम्ही तरूण होतो. आम्हीसुद्धा जिल्हा परिषदेचे अध्यक्ष म्हणून मला आठवतंय, की एका कार्यक्रमाच्या उद्‌घाटनामध्ये, माझा स्वभाव जरा पाठीमागे राहायचा आहे, मला आठवतं, की आपण बोलावून घेतल, की अध्यक्ष इकडे या. हा एक ऐतिहासिक अशा प्रकारचा कार्यक्रम होत असताना त्या फोटोमध्ये तुम्ही असलं पाहिजे, असे मुख्यमंत्री, जे जिल्हा परिषदेच्या अध्यक्षाचीसुद्धा काळजी घेतात. साहेब, आम्ही तेव्हापासून शिकलो, की आजही आम्हाला आठवतं, साधा गावचा सरपंच असला, तरी सरपंच या इकडे, हे कुणाकडनं शिकलो तर आपल्याकडून शिकलो.



आणि म्हणून नेतृत्व हे असं आदर्श पाहिजे, काम तर केलं पाहिजे, त्याच्याबद्दल वाद नाही. विकास तर झाला पाहिजे, त्याच्याबद्दल वाद नाही. पण, कार्यकर्ते आणि माणसं निर्माण करण्याचं काम आपण केलं. म्हणून आपण एक अशा प्रकारचे योद्धे आहात, की जे समाज परिवर्तनाच्यासाठी, राजकीय-सामाजिक बदल घडवून आणण्याच्यासाठी आणि हा बदल केवळ तुमच्या एकट्यासाठी किंवा तुमच्या परिवारासाठी नाहीये, तर सर्वसामान्य माणसाच्या पदरामध्ये, त्याच्या हक्काचं त्याला मिळालं पाहिजे, तो न्याय त्याला मिळाला पाहिजे, हा महाराष्ट्र मला पुढे घेऊन जायचांय, हा देश मला पुढं घेऊन जायचांय, ही भूमिका आपली सातत्यानं राहिली आणि म्हणून याच्यासाठी इथले लोक पक्षाच्या भिंती बाजूला ठेऊनसुद्धा, विविध विचारांचे लोक आपलं नेतृत्व मानून आपण हा जो काय लढा उभा केला आहे या राज्यामध्ये आणि देशामध्ये, हे सगळे तरूण सैनिक आपल्या बाजूनं एवढेच राहिलेले आहेत इथे, तर लाखोंच्या संख्येनं गावोगावी लोकं उभी आहेत आणि या परिवर्तनाच्या लढाईमध्ये आपण नेतृत्व करत आहात. आपण नेतृत्व केलं पाहिजे. आपल्या या विचारांच्या पाठीशी आम्ही सगळेजण उभे आहोत. ही तर एक झलक आहे. हा सत्कार म्हणजे एक सुरूवात आहे. खूप काही या भविष्यकाळामध्ये होणार आहे. आणि म्हणून मी एवढंच म्हणेन, की असा नेता होणं हे आपलं भाग्य आहे. ज्यांच्या माध्यमातून आपलं जीवन फुललं याच्याबद्दल आपण सारे नशीबवान आहोत आणि म्हणून हे आपल्यावरती एक अप्रत्यक्ष उपकार झालेले आहेत. उपकाराची परतफेड ही उपकारानेच करायची असते. आम्ही आपल्यावर उपकार करण्याएवढे मोठे नाही आहोत. पण, आपल्यापुढे नतमस्तक होऊन नमस्कार करू शकतो आणि आपल्याप्रति सद्‌भावना व्यक्त करू शकतो. हाच भाव या सभेच्या पाठीमागचा राहिलेला आहे. हे सगळे लोक माझ्यासहित आपल्याला दीर्घायुष्य चिंतितो. आम्हाला असं वाटतं, की आपलं मार्गदर्शन अनेक वर्षे या महाराष्ट्राला आणि देशाला लाभलं पाहिजे. तेव्हा आपण ते समर्थपणे करत आहात. आपल्याकडनं जिद्द, चिकाटी, दिशा, दृष्टिकोन आणि तरूणाला सोबत घेण्याची जी भूमिका आहे, ती खरोखरच सर्व नेत्यांनी अंगिकारणं आवश्यक आहे. हे सगळं व्हावं, यासाठी ईश्वराच्या चरणी मी प्रार्थना करीन. मी सगळ्या तरूण संयोजकांचंही अभिनंदन करतो आणि आभारही मानतो.

आज बऱ्याच दिवसांनी तुम्हा सर्वांच्या समोर या कार्यक्रमाच्या निमित्तानं बोलायची संधी मला मिळाली. महाराष्ट्राचा इतिहास हा जर बघितला तर खान्देशचा इतिहास हा महाराष्ट्राच्या इतिहासातील अभिमानाचा इतिहास आहे. इथं आलं तर बहिणाबाई, साने गुरुजी, रान कवी नाधों महानोर यांचे स्मरण होतं. या सर्व सुसंस्कृत व्यक्तिमत्त्वांनी खान्देशातील इतिहास हा समृद्ध करण्यासाठी अत्यंत मोलाची कामगिरी केली.

देशाच्या स्वातंत्र्यापूर्वी काँग्रेसची अधिवेशनं अनेक ठिकाणी झाली. पण, देशातले पहिलं ग्रामीण भागातलं अधिवेशन हे खान्देशात झालं आणि साक्षात या अधिवेशनात महात्मा गांधी, जवाहरलाल नेहरू, मौलाना अबुल कलाम आझाद हजर होते. स्वातंत्र्यासंबंधीचा संदेश या अधिवेशनात त्या काळात दिलेला होता. डॉ. राजापूरकर यांनी एक आदर्श



**जळगाव येथे ५ सप्टेंबर रोजी आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या स्वाभिमान सभेत पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष, खासदार शरद पवार, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्यासह अनेक मान्यवरांनी केलेले मार्गदर्शन....**

# सत्ताधाऱ्यांच्या विरोधात सामूहिक शक्ती उभारूया

## शरद पवार यांचे आवाहन

ठेवला आणि तोच आदर्श अनेक जिल्ह्यांनी स्वीकारला आणि त्या जिल्ह्यांच्या नामावलीमध्ये जळगावचा उल्लेख आवर्जून या ठिकाणी करावा लागेल. जळगावने मधुकरराव चौधरींसारखे शिक्षण मंत्री दिले, प्रतिभाताई पाटील यांसारख्या पहिल्या महिला राष्ट्रपती दिल्या. संगीताबाई पाटील यांसारख्या एका भगिनीला महत्त्वाची कामगिरी सांभाळण्याची संधी दिली. अनेकांची नावं घेता येतील. परंतु, माझे भाग्य असं आहे, की मला स्वतःला या जिल्ह्यामध्ये एकेकाळी संघटनेमध्ये काम करण्याची संधी मिळाली.

माधवराव बापू पाटील, बाळासाहेब चौधरी, प्रतिभाताई पाटील, जैन बापू पाटील, भाऊसाहेब पाटील अशी अनेक माणसं आहेत आणि माझं भाग्य आहे, की या सर्वांसोबत मला

कधी ना कधी तरी काम करण्याची संधी मिळाली. एकेकाळी सबंध देशांमध्ये उत्तम प्रकारची केळी ही खान्देशातून निर्यात व्हायची. एक काळ असा होता, या ठिकाणी उत्तम शेतीचा आदर्श हा लोकांना पाहायला मिळत होता. परंतु आज एकप्रकारे दुष्काळाच्या संकटामध्ये शेतकरी अडचणीत आहेत. जनावरांना पाणी मिळत नाही, पाण्याचे साठे कमी झालेत, धरणांमध्ये पाणी नाही, पाणी नसल्यामुळे दुहेरी पेरणी केली. परंतु तरीही पिकं जगली नाहीत. एकेकाळी शेतीचा आदर्श असणारा हा जिल्हा आता दुष्काळात जातो की काय असे चित्र दिसायला लागलेलं आहे आणि म्हणून आज ही स्थिती बदलायची आहे.

आज भाजपच्या हातामध्ये देशाची सत्ता आहे. त्यांना शेतकऱ्यांच्याबद्दल काडीमात्र आस्था नाही हे दिसून येत आहे. दुष्काळग्रस्तांच्याबद्दल प्रेम नाही, जनावरांना पाणी नाही याची चिंता नाही, टँकरने पाणी प्यावं लागत आहे अशी अवस्था झालेली आहे. या सर्व गोष्टी पाहता याचा अर्थ असा होतो, की चुकीच्या हातांमध्ये देशाची सत्ता आहे. संपूर्ण देशात किंवा महाराष्ट्रात आपण पाहत आहोत, तरुणांमध्ये बेकारी दिसून येत आहे. त्यांना बेरोजगारीला तोंड द्यावं लागत आहे. गेल्या आठवड्यात यवतमाळ जिल्ह्यातील १५ लोकांनी आत्महत्या केल्या. शेतकरी कष्ट करणारा, घाम गाळणारा, तो लोकांच्या भुकेचा प्रश्न सोडवणारा आणि तोच आसपासच्या रस्त्यावर जातो याचा अर्थ त्याच्या प्रश्नांची सोडवणूक आज केली जात नाही. आणि म्हणून त्यासाठी सामूहिक शक्ती आज उभी करावी लागणार आहे. आज केळी, नाशिकचा कांदा अडचणीत आहेत आणि अशावेळी काही ना काही तरी करण्याची गरज आहे. नागपूरला विधानसभेचं अधिवेशन होतं. तिथं चालत जायचं आम्ही ठरवलं आणि जळगाव ते नागपूर ही दिंडी काढली. सुरूवातीला तिथं १० हजार लोक होते. दुसऱ्या दिवशी २५, तिसऱ्या दिवशी ५० हजार, चौथ्या दिवशी १ लाख झाले आणि नंतर दीड लाखाच्या पुढं लोकं जमले. आणि शेवटी काही लाख लोकं नागपूर शहरामध्ये जमले. आणि एक प्रकारचा नवीन इतिहास या दिंडीने केला. शेतकऱ्यांची जबरदस्त शक्ती ही संपूर्ण जगाला आज या ठिकाणी दाखवली. आणि म्हणून हा भाग आणि इथला कष्टकरी हा लाचार नाही, हा बेकार नाही, तो भीक मागत नाही, तो कष्टाची किंमत मागतोय. आणि कष्टाची व घामाची किंमत देत नसतील तर वेळप्रसंगी संघर्ष करतो. आणि तो संघर्षाचा इतिहास या खान्देशने यापूर्वी दाखवला, ही गोष्ट आपल्या सर्वांना मान्य करावी लागेल.



आज काय चित्र दिसतंय? मोदी साहेबांचं राज्य आहे. मोदी साहेबांनी काय केलं? ९ वर्षे झाली, इतर राजकीय पक्ष फोडले. शिवसेना, राष्ट्रवादी फोडली. फोडा-फोडीचं राजकारण एवढी एकच गोष्ट त्यांनी केली. दुसऱ्या बाजूनं आपल्या हातात जी सत्ता आहे ती लोकांसाठी वापरण्याऐवजी सीबीआय, ईडी, खोटे खटले भरले. ज्याचा उल्लेख या ठिकाणी अनिल देशमुख यांनी केला. काही संबंध नसताना काही महिने अशा एका महत्त्वाच्या सहकाऱ्याला तुरुंगात टाकायचं काम केलं. नवाब मलिक जुना नेता, आज अनेक वर्ष त्यांना तुरुंगात टाकलं. लोकांनी दिलेली सत्ता ही लोकांना सन्मानाने जगता कशी येईल यासाठी वापरण्याऐवजी आज त्या ठिकाणी त्या सत्तेचा गैरवापर या भाजपवाल्यांनी केलेला आहे. आज देशाचे प्रधानमंत्री भोपाळला गेले आणि भोपाळला त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसवर टीका केली. त्यांनी सांगितलं, की सर्व भ्रष्ट लोकं आहेत. अनेकांची माहिती आमच्याकडं आहे. माझं मोदी साहेबांना नम्रतेने सांगणे एकच आहे, जर या ठिकाणी कुणी चुकीचं काम केलं असेल तर त्याविरुद्ध तुम्ही खटला भरा, त्याची चौकशी करा आणि जर खोटं ठरलं तर त्याची सजा तुम्ही स्वतः काय घेणार? हे सबंध देशाला सांगा. खोटे आरोप करणं ही गोष्ट आज आपल्या हिताची नाही. आणि म्हणून अनेक गोष्टी सांगता येतील. ज्याचा उल्लेख जयंतरावांनी केला की, दोन दिवसांपूर्वी आम्ही दोघेही जालन्याला गेलो. तिथल्या शेतकऱ्यांनी उपोषण केलं, मागणी साधी होती. या उपोषण करणाऱ्या शेतकऱ्यांवर पोलिसांचा लाठी हल्ला झाला. लाठी हल्ल्याला काहीच कारण नव्हतं. स्त्री-पुरुष जखमी झाले, लहान माणसं जखमी झाली आणि त्याचा परिणाम आज महाराष्ट्राच्या काना-कोपऱ्यामध्ये आंदोलनं सुरू झाली. सत्तेचा गैरवापर शेतकऱ्यावर, शेतमजूरांवर, आया- बहिणींवर लाठी हल्ला करण्याची नीती ज्यांची असेल, जशी संधी मिळेल त्यावेळी १०० टक्के त्यांचा पराभव करू. हा निकाल तुम्हाला आणि आम्हाला घ्यायचा आहे, त्यासाठी आपण तयार राहायला पाहिजे, एवढंच या ठिकाणी सांगतो. एवढ्या मोठ्या संख्येने आपण या ठिकाणी जमलात, आपल्याला बदल महाराष्ट्रात करायचे आहेत त्याला साथ दिली, त्याबद्दल धन्यवाद देतो आणि माझे दोन शब्द संपवतो.

# एकसंघ होऊन पवारसाहेबांना ताकद देण्याचं काम करूया

## जयंत पाटील यांचे उद्गार



गेले काही दिवस आपल्या राज्यातल्या शेतीची अवस्था आज बिकट झालेली आहे. पेरेल ते उगवेल की नाही याची आता शाश्वती राहिलेली नाही आणि उगवल्यानंतर ते विकलं जाईल का याचीदेखील शाश्वती आता शेतकऱ्यांना राहिलेली नाही. मधल्या काळात कांद्याचा एक प्रश्न निघाला. खान्देशातले एक मंत्री म्हणाले, की कांदा परवडत नसेल तर कांदा खाऊ नका. शेतकऱ्यांच्या भाजीच्या देठालाही धक्का लाऊ नका ही भूमिका छत्रपती शिवाजी महाराजांनी महाराष्ट्राला शिकवली आणि याच महाराष्ट्रात एक मंत्री असं विधान करायला लागले. सप्टेंबरचा महिला उजाडलांय, अजूनही पाऊस नाही. धरणांत पाणी नाही. अनेक भागांत पाण्यासाठी वणवण दिसायला लागलेली आहे. शासन आपल्या दारी ही भूमिका घेऊन सरकार वेगवेगळ्या ठिकाणी जाऊन सरकारी कर्मचारी आणि तिथल्या गरजू लोकांचे मोठ्या प्रमाणावर मेळावे भरवले जातायंत. चार-चार, सहा-सहा महिने थांबवलेले दाखले देण्याचा कार्यक्रम तिथं केला जातोय. पण, सरकारला अजून हे माहित नाहीये, कदचित कल्पना नसेल, शासन आपल्या दारी म्हणणाऱ्या सरकारला हे माहिती आहे की नाही हे माहीत नाही, की आपल्या दारात आता दुष्काळाचं संकट आलेलं आहे.

अनेक जिल्ह्यांत आज दुष्काळ दिसायला लागलेला आहे. या दुष्काळामुळं आम्ही सरकारकडं मागणी केली, की टँकरची व्यवस्था करा, चारा छावण्या उभारा. दुष्काळ जाहीर करा. पण सरकार अजून लक्ष द्यायला तयार नाही. महागाई किती वाढलीय हे मी आपल्याला सांगायची गरज नाही. पण महागाईला तोंड देणाऱ्या सामान्य जनतेनं पेट्रोल-डिझेलच्या ऐवजी सीएनजीकडं आपला वापर वळवला. दुष्काळातल्या आपल्या असंख्य समस्यांना सरकारनं तोंड दिलं पाहिजे. सरकारनं पुढाकार घेतला पाहिजे. सरकारनं इतर कार्यक्रम थांबवून जरा दुष्काळाचा कसा मुकाबला करायचा ही भूमिका सरकारनं ठेवली पाहिजे. शासन आपल्या दारी या कार्यक्रमाची काय अवस्था आहे. नगर जिल्ह्यात कार्यक्रम झाला, त्यावेळी कार्यक्रमाला माणसं आणण्यासाठी सगळ्या एसटी बुक केल्या आणि विद्यार्थ्यांना शाळेला जाण्यासाठी एसटी नाही अशी अवस्था झाली. तुमच्या जळगाव जिल्ह्यात काय झालं? राज्य सरकारनं फर्मानच काढलं, की कार्यक्रमाला या नाहीतर तुम्हाला रेशनचं धान्य मिळणार नाही. म्हणजे या राज्यामध्ये माणसं गोळा करायला अनेक उपद्व्याप करावे लागतायंत सरकारी पक्षांना याची नोंद आपण सर्वांनी घ्या.

आज आपल्या सर्वांना शेतकऱ्यांची समस्या काय आहे हे सगळ्यांना माहिती आहे. आपल्या कापसाला आधारभूत किंमत दोन महिन्यापूर्वी केंद्र सरकारनं जाहीर केली, की ६६२० रूपये



भाव नसल्यामुळे विक्री अभावी पडून राहिलेला कापूस शेतकऱ्याने घरात व घराबाहेर साठवून ठेवला आहे.

द्यायचे. माझा आपल्या सर्वांना प्रश्न आहे, की ही किंमत तुम्हाला परवडणारी आहे का? आज यांच्या सरकारमध्ये कापसाला दर काय तर ७३००, ७४००, साडेसात हजार. फार फार तर आठ हजार रूपये. आमचं महाविकास आघाडीचं ज्यावेळी सरकार होतं, त्यावेळी कापसाला साडेबारा हजार, तेरा हजार दर पडला. चाळीस ते पन्नास टक्के शेतकऱ्यानी कापूस घरी ठेवलेला आहे. शेतकऱ्याला आशा आहे, की कधी ना कधी कापसाचा दर वाढेल आणि चढ्या दरानं मला चार पैसे मिळतील. म्हणून यानिमित्तानं माझी आपल्या सर्वांना विनंती आहे, की पवार साहेब एकदा कृषी मंत्री होते. २००९-१०ची आकडेवारी परवा एका रिपोर्टमध्ये आली. ऊस उत्पादक शेतकरी एक रूपया ज्यावेळी लागवडीला खर्च करत होता, त्यावेळी त्याला तिप्पट म्हणजे तीन रूपये मिळायचे. पण, २०-२१ला आता एक रूपया खर्च झाला तर दोन रूपये परतावा मिळायला लागला. ०९-१० साली कपासीवर एक रूपया गुंतवणूक केली तर १ रूपया ८० पैसे मिळायचे. २०-२१ साली पन्नास पैसे त्यातले कमी झाले. २००९-१० साली भाताची शेती करणाऱ्या शेतकऱ्याला ७७ टक्के नफा व्हायचा. २०-२१ साली हा नफा ४२ टक्क्यांवर खाली आला. मसूर पिकवणाऱ्या शेतकऱ्याला १६६ टक्के नफा व्हायचा, तो आता १०२, १० ८ टक्के म्हणजे ५८ टक्क्यांनी कमी आला. म्हणजे शेतकऱ्यांचं उत्पन्न घटण्यासाठी महागाईचा परिणाम त्या शेतकऱ्याच्या उत्पादनावर व्हायला लागला. देशात, महाराष्ट्रात शेतकऱ्याचा खर्च वाढला आणि शेतकऱ्यांचं उत्पन्न दुप्पट करतो म्हणणाऱ्यांमुळे आज शेतकऱ्याला प्रचंड मोठ्या अडचणींना तोंड द्यावा लागतंय हे आपल्याला विसरता येणार नाही.

आज खरं म्हणजे, याठिकाणी नाथाभाऊ खडसेंसारखे नेते आपल्याला लाभलेत. नाथाभाऊ खडसेंनी या जिल्ह्यामध्ये भारतीय जनता पक्ष रूजवला. नाथाभाऊ खडसे यांनी सतत २५-३० वर्षे लोकसभेच्या दोन जागा भाजपच्या निवडून याव्यात यासाठी प्रयत्न करायचे. आज नाथाभाऊ खडसे हे पवार साहेबांच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये काम करतायंत. आता या जिल्ह्यामध्ये येणाऱ्या लोकसभेसाठी कोण हा प्रश्न आमच्या सर्वांच्या मनात आहे आणि नाथाभाऊ हे शिवधनुष्य तुम्हीच उचललं पाहिजे असं माझ्यासारख्या कार्यकर्त्याला वाटतं. तुम्ही २५-३० वर्षे दोन-दोन खासदार निवडून दिलेले आहेत. त्यामुळं पवार साहेबांची अपेक्षा आहे, हा जिल्हा १९८५ साली पवार साहेबांच्या मागं, सातच्या



सात आमदार निवडून देऊन शंभर टक्के रिझल्ट या जिल्ह्यानं दिलेला आहे. ही या जिल्ह्याची परंपरा आहे आणि म्हणून मला खात्री आहे, की उद्याच्या राजकारणामध्ये नाथाभाऊ तुम्ही या जिल्ह्यात लोकसभेसाठी निश्चितच शिवधनुष्य उचललंच पाहिजे. या जिल्ह्यातले जास्तीत जास्त आमदार महाविकास आघाडीचे निवडून कसे येतील हे बघण्याचं काम तुम्हा-आम्हा सर्वांना करायचंय.

खरं म्हणजे आमच्यातनं गेलेली लोकं पवार साहेबांच्या कर्तृत्वावर आता प्रश्न निर्माण करायला लागलेत. पवार साहेब ज्यावेळी पहिल्यांदा मुख्यमंत्री झाले, त्यावेळी पवार साहेब स्वत:च्या जीवावर, स्वत:च्या कर्तबगारीवर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. त्यानंतर तीनवेळा, म्हणजे एकूण चारवेळा पवार साहेब महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. पवार साहेबांबरोबर होतात, त्यावेळी तुम्हाला या गोष्टी सुचल्या नाहीत. आता मात्र सुचायला लागल्यात. मी एवढंच सांगेन, की जिस स्कूल मे आप अभी अभी दाखिल हुए हैं, उस स्कूल के प्रिन्सिपल भी

पवार साहब के पाससे ट्यूशन लेते हैं. पवार साहब की उंगली पकडकर राजनीती मे आया हूँ, आलं का लक्षात? त्यामुळं कुठल्या शाळेत जायचं याचा तरी अभ्यास, विचार करायला पाहिजे होता.

काल-परवा जालना जिल्ह्यात मराठा आरक्षणासाठी उपोषण करणाऱ्या आमच्या मनोज जरांगे आणि त्यांच्या सहकाऱ्यांवर प्रचंड मोठा अमानुष लाठीमार झाला. दुसऱ्या दिवशी पवार साहेब आणि मी त्याठिकाणी धाऊन गेलो आणि घटनेची माहिती घेतली. त्याठिकाणी शांतपणे उपोषण सुरू असताना हेल्मेट घातलेले पोलिस येतात आणि लहान मुलं, महिला असं काही न बघता प्रचंड मारझोड करायला सुरूवात करतात. शांततेत आंदोलन करणाऱ्यांची जर ही परिस्थिती असेल, तर महाराष्ट्रात कायदा आणि सुव्यवस्था राखणाऱ्यांची जबाबदारी राखणाऱ्यांचा तोल जातोय का याचा महाराष्ट्राने एकदा विचार केला पाहिजे. मराठ्यांना आरक्षण देण्यामध्ये कोण अडथळे निर्माण करत आहेत याची माहिती घ्या. सर्व काही तुम्हाला समजेल. मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्र्यांनी एकत्रित बसून सांगितलं, की लाठीमार करायचा आदेश आम्ही दिला नाही आणि आदेश दिल्याचं सिद्ध झालं तर राजकारण सोडेन. आता कोणाला न विचारता पोलिस दल लाठीमार करेल का आणि करत असेल तर तुम्हाला सरकारमध्ये राहायचा अधिकार आहे का? तुम्हाला न विचारता लाठीमार झाला तर तुम्ही सरकारमध्ये काय करतांय?

आज आपण सर्वांनी या येणाऱ्या काळामध्ये एकसंघ होऊन पवार साहेबांना साथ देण्याचं काम केलं पाहिजे. जळगावचा पाणी प्रश्न आहे. मला आठवतंय, खडसे साहेब जलसंपदा मंत्री होते, त्यावेळी या जिल्ह्यातले सगळे मोठे प्रकल्प एकनाथ खडसे साहेबांच्यामुळे सुरू झाले आणि मार्गी लागले. मधल्या काळात एकनाथ खडसे साहेब मंत्रिमंडळात नव्हते, पण तिकडे होते, त्या काळात या प्रकल्पांची गती थोडी कमी झाली. आता परत संधी मिळाली तर एकनाथराव खडसे असतील, गुलाबराव देवकर असतील, सतीश आण्णा पाटील असतील, राजूदादा, देशमुख असतील, अरूणभाई गुजराथी असतील, रोहिणीताई खडसे असतील सगळे या जिल्ह्यातले नेते हे सतत आग्रह करत असल्यामुळं कोट्यवधींचा निधी देण्याचं काम आम्ही केलं. पुन्हा एकदा जळगाव जिल्ह्याची प्रगती आपल्याला साधायची असेल, तर राष्ट्रवादी काँग्रेस आणि महाविकास आघाडीचा विचार स्वीकारण्याचं काम करावं लागेल. वर्षभरात निवडणुका येतील त्यावेळी जरा डोळसपणे मतदान करा.





पवार साहेबांच्या नेतृत्वाखाली, उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वाखाली आणि राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस, राष्ट्रवादी आणि शिवसेना एकत्रितपणे तुमच्यासमोर समर्थ पर्याय ठेवेल आणि सगळ्यांनी एकसंघ होऊन महाराष्ट्रातलं आणि देशातलं या आलेल्या संकटाला दूर करण्याचा प्रयत्न करू. आज तुम्ही याठिकाणी प्रचंड संख्येनं येऊन पवार साहेबांच्या मागं ताकद उभी करण्याचा निर्धार व्यक्त केलांय. आता परत गेल्यावर प्रत्येक मतदारसंघ बांधायचं काम करा. पक्षातनं काहीजण गेले असले तरी पुन्हा ताकदीनं पक्ष उभा करा. तुम्ही सर्वांनी मनात आणलं तर जिल्ह्यातले सगळेच्या सगळे आमदार, खासदार महाविकास आघाडीचे निवडून देण्याचं काम कराल आणि त्यानंतर जळगाव जिल्ह्यातले सगळे प्रश्न सोडवण्याचं काम राष्ट्रवादी काँग्रेस करेल हा विश्वास मी यानिमित्तानं देतो.

गेल्या अनेक वर्षांपासून विविध पक्षांच्या सभा या ग्राऊंडवर होतात. अलिकडच्या कालखंडामध्ये एवढी प्रचंड सभा मी पहिल्यांदाच पाहिलेली आहे. तुम्ही प्रचंड संख्येनं याठिकाणी आलात, म्हणून सर्वप्रथम मी तुमचं अभिनंदन करतो. येवल्याला सभा झाली, बीडला सभा झाली. पण त्या सभांपेक्षा अधिक उत्साह आपल्याला या जिल्ह्यामध्ये जाणवला. माननीय शरद पवार साहेबांवर असलेला हा विश्वास आहे. वर्षानुवर्षे या जळगाव जिल्ह्यामध्ये त्यांचे ऋणानुबंध आहेत. फार कालखंडापासून म्हणजे १९७८-८०नंतर, माननीय पवार साहेबांनी शेतकऱ्यांसाठी जेव्हा शेतकरी दिंडी काढली, कापूस दिंडी, जळगाव ते नागपूर, त्या दिंडीला त्यांनी आपल्या जळगावपासून सुरूवात केली होती आणि नागपूरपर्यंत गेले होते. हा खरा शेतकऱ्यांचा नेता म्हणून त्या कालखंडामध्ये त्यांनी पायी दिंडी काढली होती.

# वापरा आणि फेकून द्या ही भाजपाची भूमिका

## एकनाथ खडसे यांची टीका



एक काळ असा या जळगाव जिल्ह्यानं अनुभवला, की जळगाव जिल्ह्यामध्ये सहा आमदार राष्ट्रवादी काँग्रेसचे होते. पण, नंतर भारतीय जनता पार्टीचे आले. आता परत राष्ट्रवादी काँग्रेसचे करण्याची वेळ आलेली आहे. त्याचं कारण असं आहे, की आपण आत्ता व्हिडिओ पाहिला. किती खोटारडा माणूस आहे. ओबीसींना आरक्षण दिलं नाही, तर मी राजकारण सोडून देईन. राजकारण सोडलं का? विदर्भ वेगळा झाल्याशिवाय मी लग्न करणार नाही. लग्न केलं की नाही केलं? प्रत्येक गोष्ट तुम्ही याठिकाणी पाहिलं, की हे केलं नाही तर राजकारण सोडेन, ते केलं नाही तर लग्न करणार नाही. हे केलं नाही तर वाट्टेल ती शिक्षा भोगेन. पण, एकही काम सांगितलेलं, दिलेला शब्द पूर्ण केलेला नाही आणि आज तोच शब्द घेऊन मराठा समाजाला मूर्ख बनवण्याचं काम आज या लोकांच्या माध्यमातून सुरू आहे.

मराठा समाज ओबीसीत आरक्षण मागतोय. वर्षानुवर्षांची ही मागणी आहे. पण, एका बाजूला मराठ्यांना आरक्षण द्यायचंय असं मान्य करायचं आणि दुसऱ्या बाजूला आरक्षणाचा विषय राज्यावर ढकलायचा. मग राज्य सरकार असो की केंद्र सरकार असो, ओबीसींच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठ्यांना जे १६ टक्के आरक्षण द्यायचं आहे ते राज्य सरकारनं केंद्र सरकारकडे शिफारस करावी, केंद्राने घटनेमध्ये दुरूस्ती करून मराठ्यांना ते आरक्षण द्यावं यासाठी प्रयत्न करावेत. उगाच का खेळवतांय. मराठा समाज राज्यात रस्त्यावर आलेला आहे. संताप आहे. उद्रेक आहे. पण, सरकार त्यांच्या भावनांशी खेळतंय. आजचं सरकार पाहिलं, तर एक-दोन-तीन, तिघांचं सरकार आहे. माननीय शिंदे साहेब मुख्यमंत्री, माननीय देवेंद्रजी उपमुख्यमंत्री, माननीय अजितदादा पवार उपमुख्यमंत्री. दोन उपमुख्यमंत्री, एक सिनिअर, एक ज्युनिअर. दोन बायका फजिती ऐका. चालू आहे का नाही आता.

मला तर अजितदादांच्या संदर्भामध्ये, माननीय अजितदादांनी तिकडं जाऊन उपमुख्यमंत्रिपद घेतलं. अजितदादा एक स्मार्ट माणूस, बोललं तसं करणारा माणूस. काम करणारा माणूस. पण, पक्ष बदलवला. पक्ष बदलवल्यानंतर स्वाभिमानी अजितदादा त्याठिकाणी निर्णय घ्यायला लागलेत. साखर कारखान्यांना पैसे देण्याचा निर्णय घेतला. पण मध्येच देवेंद्र फडणवीसांनी त्यांचा निर्णय रद्द करून टाकला. केवढा अपमान आहे. आत्ता अजितदादांना निर्णय घ्यायचे अधिकार नाहीयेत. अजितदादांनी निर्णय घेतल्यानंतर त्यावर फडणवीसांची सही होणार आहे. त्यानंतर मुख्यमंत्र्यांची सही होणार आहे. अरे, क्या हालत बना दी है दादा तुमने. यहाँ तो शेर थे. तुमच्या आवाजाला वजन होतं. पक्षामध्ये तुम्हाला किंमत होती आणि आता प्रत्येक फाईल जर तुम्हाला फडणवीसांकडं घेऊन जावी लागत असेल तर तुमचा स्वाभिमान गेला कुठे?

सरकार नावाची चीज अस्तित्वात नाहीये. शेतकरी तडफडतोय, मरतोय. एका बाजूला लोडशेडिंगनं त्रस्त झालंय. दुसऱ्या बाजूला पाऊस नाहीये. दुष्काळी स्थिती आहे, दुष्काळ जाहीर होत नाहीये. मदत मिळत नाहीये. मुबलक वीज, मोफत वीज म्हणणारे माननीय देवेंद्र फडणवीस वारंवार सांगत होते, की आम्ही शेतकऱ्याला दहा तास तरी कंटिन्यू वीज देऊ. अरे, तीन तास पण मिळत नाही. शेतकरी हवालदिल झाला आहे. केवळ घोषणाबाजी सुरू आहे. एका बाजूला महागाई वाढलीय. गॅस सिलिंडरच्या किंमती दोनशे रूपयांनी कमी केल्याचं सांगतात. निवडणूक आली म्हणून चाललेले उपद्व्याप आहेत. नाहीतर आणखी चारशे वाढले असते. सरकारमध्ये समन्वय नाही. कायदा-सुव्यवस्था शिल्लक राहिलेली नाही. दिवसाढवळ्या महिलांवरती अत्याचार होतायंत. जळगाव जिल्हा तर एकदम वाऱ्यावर सोडून दिलेला आहे. जळगाव जिल्ह्यातल्या सगळ्या दोन नंबरच्या धंदेवाल्यांच्या नावांची यादी मी फडणवीस साहेबांकडं दिली होती. पोलिस अधिकाऱ्यांना नावानिशी दाखवलं की हे किती रूपये कमवतायंत. पण, एकावरही वर्षभरात कारवाई झालेली नाही. कारण वरपर्यंत हप्ते जातात. गल्लोगल्ली दारू अड्डे आहेत, मटका चाललांय, जुगार चाललांय, दररोज खुनाचे तीन तीन प्रकार होतायंत. काय करतायंत पोलिस? काय करतंय सरकार?

शासन आपल्या दारी याच ठिकाणी झालं. त्याला माणसं होती, पण तुमच्यासारखे होते का? त्यात अंगणवाडीच्या सेविका होत्या, ग्रामसेवक आणले होते, सरपंच आणले होते. भत्ते देऊन आणले होते. तुम्हाला काय पैसे वगैरे दिले आहेत का? का आला आहात तुम्ही याठिकाणी. तुम्हाला माहित आहे, की उद्याचे नेते पवार साहेब आहेत. शरद पवारांसारखा पॉवरफुल नेता तुमच्याकडे आहे. एका रात्रीत काय चमत्कार होईल सांगता येत नाही. आम्हाला कधी वाटलं नव्हतं, शिवसेना, राष्ट्रवादी आणि काँग्रेसचं सरकार येईल. पण आलं. शिवसेनेचा मुख्यमंत्री झाला. अनुभव आहे, ताकद आहे. जनसमन्वय आहे आणि या सगळ्याच्या आधारावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष चालणार आहे. राष्ट्रवादी पक्ष वाढणार आहे. आपल्या जिल्ह्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष गावागावामध्ये आहेच, पण तो आणखी वाढवायचा आहे. आता पूर्वीसारखे राष्ट्रवादीचे दिवस आणायचे आहेत. त्या भारतीय जनता पार्टीला रक्ताचं पाणी करून मी वाढवलं,










आयुष्यभर मेहनत घेतली या उत्तर महाराष्ट्रामध्ये. माझे काय हाल केले? अरे ज्या माणसानं तुम्हाला मोठं केलं, त्याची ही परिस्थिती आहे. वापरा आणि फेकून द्या ही भावना भाजपाची आहे.

आज भारतीय जनता पार्टीमध्ये जुन्या लोकांना स्थान नाहीये. सगळे बाहेरचे आणलेले आहेत. गप्पा मारतात. आरोप करतात. ७० हजार कोटींचा आरोप राष्ट्रवादी कॉंग्रेसवर केला. नॅशनल करप्ट पार्टी. मग एवढी जर भ्रष्टाचारी पार्टी आहे, तर ज्या अजितदादांवर तुम्ही आरोप केले, त्यांना तुम्ही मंत्रिमंडळात का घेतलं? एक मंत्री त्या सभेत म्हणाले, की नाथाभाऊ तुम्ही त्या भूखंडात काळं केलं नसतं तर तुमचं तोंड काळं झालं नसतं. आम्ही केलंच नाही. पण ज्यांनी तोंड काळं केलं असं तुम्ही म्हणत होतात, ते सारे मंत्री झालेत तुमच्यामध्ये. आता तुमच्या तोंडाला कुलुप लावलंय. या जिल्ह्यामध्ये नाथाभाऊंच्या निषेधाचा ठराव करतांय एकमतानं, सगळे आमदार, सारे खासदार एकमतानं ठराव करतायंत, तेही एका भ्रष्ट अधिकाऱ्यासाठी. ठराव करा या जिल्ह्यामधल्या कापूस उत्पादकांसाठी, की कापसाला भाव मिळाला पाहिजे. कापूस घरातून घेऊन जा, सहा हजार रूपये अनुदान द्या असा एकमुखानं ठराव करा. एकमुखानं ठराव करा, की या जिल्ह्यामधलं लोडशेडिंग बंद करा. एकमुखानं ठराव करा, की जिल्ह्यातल्या धरणांच्या सिंचनासाठी पैसा द्या. एकमुखानं ठराव करा आणि जळगाव शहरातल्या रस्त्यांची दुरावस्था दूर करा.

भ्रष्ट लोकं आहेत. खोकेवाले आहेत. आता खोक्याचं राज्य सुरू केलंय. पैसा आलांय. माज आलांय. मस्ती आलेली आहे. हा माज आणि मस्ती यांची उतरावायची वेळ आलेली आहे. त्यासाठी आज माननीय शरद पवार साहेब याठिकाणी आलेले आहेत. याठिकाणी तुमची जबाबदारी आहे आता, की जळगाव जिल्हा राष्ट्रवादीमय झाला पाहिजे. पवार साहेबांचा राष्ट्रवादी. अजितदादा तिकडं गेले. जळगाव जिल्ह्यातला कुणी मोठा नेता त्यांच्याबरोबर गेला का? याचा अर्थ असा आहे, की माननीय शरद पवार साहेबांवरच तुमचा विश्वास आहे. म्हणून त्यांचं स्वप्न पूर्ण करायचं असेल तर या जिल्ह्याला आपण विकासाच्यादृष्टिनं पुढं न्यायचंय. या जिल्ह्यातली छोटी-मोठी निवडणूक जिंकायची आहे. हे दाखवून द्यायचंय, की जळगाव जिल्हा महाराष्ट्रातला एक नंबरचा जिल्हा आहे राष्ट्रवादीचा. केल्याशिवाय राहणार नाही. पवार साहेब, आम्ही तुम्हाला विश्वास देतो, की आम्ही तुमचे हात बळकट करू. केवळ भाषणांमधून नाही, तर प्रत्यक्ष कृती करून दाखवू.



# देशात हुकुमशाही आणण्याच्या हालचाली

## जितेंद्र आव्हाड यांचा इशारा

खरं म्हणजे हा जिल्हा विचारांनी काँग्रेसी जिल्हा आहे. या जिल्ह्यामध्ये जवळ असलेल्या यावल तालुक्यातल्या फैजपूरमध्ये १९३६ साली काँग्रेसचं अधिवेशन झालं आणि आज चंद्रयान वरती जात असताना आज मला आठवण येते, त्या काँग्रेस अधिवेशनाचे अध्यक्ष जवाहरलाल नेहरू यांची. जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली ते सेशन झालं, जवाहरलाल नेहरूंची आठवण आज याच्यासाठी येते, की अतिशय मोठ्या मनाचा माणूस, विज्ञानाचा दृष्टिकोन ठेवणारा माणूस, त्यांनी इस्रोची स्थापना केली, आयआयएमची स्थापना केली, आयआयटीची स्थापना केली, एम्सची स्थापना केली आणि देशाला पुढे नेण्याचं काम केलं. ज्या देशामध्ये पिन बनत नव्हती, त्या देशामध्ये आज एरोप्लेन बनतंय हे विज्ञानवादी विचार त्या जवाहरलाल नेहरूंचे होते. म्हणून चंद्रयान वरती गेल्यानंतर त्या इस्रोच्या वैज्ञानिकांचे आभार मानतानाच आपण सगळ्यांनी जवाहरलाल नेहरूंची आठवण काढली हे काँग्रेसी विचार या देशाला गरजेचे आहेत.

काल-परवा जालना जिल्ह्यामधील सराटी या गावामध्ये मराठा बांधवांवरती लाठीमार झाला. कारण देतात, की सर्वोच्च न्यायालयामध्ये केस आहे. मला तुम्हाला सगळ्यांना शांतपणानं समजून सांगायचंय, हे फक्त भांडण लावण्याचं काम करतायंत. मी आज या व्यासपीठावरनं केंद्राच्या धोरणाविषयी बोलणार आहे. नंतर साहेब डिटेलमध्ये बोलतीलच. दिल्लीचा कायदा झाला. सर्वोच्च न्यायालयानं सांगितलं, की दिल्लीला, राज्य सरकारला अधिकार आहेत ते सगळे द्या. यांना पटलं नाही. यांनी राज्यसभा आणि लोकसभमध्ये विधेयक आणलं आणि सर्वोच्च न्यायालयानं दिलेला निर्णय फिरवून टाकला आणि परत एकदा आपले अधिकार आपल्याकडे घेऊन टाकले. म्हणजे सर्वोच्च न्यायालयाचा निकाल फिरवता येतो की नाही, तर येतो. इलेक्शन कमिशनमध्ये तीन सदस्य असावेत, असा सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला, त्या सदस्यांची नावं दिली. सर्वोच्च न्यायालयाचे सर्वोच्च न्यायमूर्ती, पंतप्रधान आणि विरोधी पक्ष नेते असे तीन सदस्य असतील. सत्ताधाऱ्यांना पटलं नाही. त्यांनी हाही निकाल सर्वोच्च न्यायालयाचा लोकसभेत नेला, निकाल बदलवला, सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांना बाहेर काढलं आणि एक केंद्रीय मंत्री आणला. म्हणजे दोन महिन्यांमध्ये सर्वोच्च न्यायालयाने दिलेले दोन निकाल केंद्र सरकारने लोकसभेत नेऊन बदलवले.

आणि सारखं आपलं कारण देतात, की पन्नास टक्के, पन्नास टक्केच आरक्षण आहे. आज आमची महाराष्ट्राची आग्रही मागणी आहे, आम्ही पक्षनिवेश बाजूला ठेवतो, जात-पंथ-प्रांत बाजूला ठेवतो, आम्हा गरीब मराठ्यांना आरक्षण मिळालंच पाहिजे ही आमची भूमिका आहे आणि त्या भूमिकेसाठी आज आम्ही पवार साहेबांना सांगतो, की पवार साहेब ४८ खासदारांचं नेतृत्व करा आणि जाऊन पंतप्रधानांना सांगा, की लोकसभेमध्ये

कायदा आणा आणि मराठा समाजासाठी १६ टक्क्याचं आरक्षण हे तुम्ही लोकसभेत मंजूर करा. आता आम्हाला कारणं सांगू नका.

तुम्हाला वन नेशन, वन इलेक्शन पाहिजे. हुकुमशाही मागच्या दारानं तुम्हाला आणयची आहे, तर कुठल्या पातळीवरती जाता. या देशाचे माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद, खरं तर अलिखित नियम आहे, की एकदा राष्ट्रपती झाल्यानंतर परत कुठल्या समितीवर, मंत्रिमंडळात जायचं नसतं. पण त्यांनी रामनाथ कोविंदांना त्या समितीचं अध्यक्ष केलं. हा विविधतेनं नटलेला देश आहे. इथं तापीच्या पाण्याला चव वेगळी आहे आणि गोदावरीच्या पाण्याला चव वेगळी आहे. या देशामध्ये असं म्हटलं जातं, टप्प्याटप्प्याला पाणी आणि भाषा बदलली जाते. मला खात्री आहे, की जी जळगावची भाषा आहे, ती नाशिकची भाषा नाही. जी नाशिकची भाषा आहे, ती नगरची भाषा नाही. ही इतकी विविधता आहे आणि तरी आपण सगळे एक आहोत. हे असताना या देशामध्ये सर्व नीतीनियम तोडून वन नेशन वन इलेक्शन हे जे काय येतंय, ते प्रेसिडेन्सियल फॉर्म ऑफ डेमोक्रॅसी म्हणजे अध्यक्षपद्धतीय निवडणूक आणण्याचा प्रयत्न आहे आणि हा आपण थोपवून धरला पाहिजे. याच्यासाठी जनआंदोलन उभं केलं पाहिजे. हा हुकुमशाहीकडे नेणारा रस्ता आहे. हा तुमचा-माझा, बाबासाहेबांनी निर्माण केलेले जे संविधान आहे, ते संविधान बाजूला करण्याचा मार्ग आहे. तो आपण कुठल्याही परिस्थितीत रोखून धरला पाहिजे.




**मणिपूरमध्ये महिलांनी नग्न होऊन मोदी सरकारचा निषेध केला.**

अचानक १८ तारखेला अधिवेशन जाहीर होतं. महाराष्ट्राला या अधिवेशनाचं दुःख नाही. अधिवेशन झालं पाहिजे, त्याबद्दल आमची कुठलीही तक्रार नाही. पण, आमचा गणपती बाप्पा येतोय. ऐन सणासुदीच्या दिवसामध्ये तुम्ही हे अधिवेशन लावता. तुम्ही स्वत:ला हिंदुत्ववादी पार्टी म्हणवता आणि हिंदूंच्या सणाच्यादिवशी अधिवेशन लाऊन हिंदुंच्या सणांवरती अतिक्रमण करता हे काय या हिंदुत्ववादी पार्ट्यांना शोभत नाही. आज मणिपूरमध्ये जे काय झालं. खडसे ताई बोलल्या. काय देशाची इज्जत गेली असेल हो परदेशात. जगातल्या पाच मोठ्या देशांनी मणिपूरच्या घटनेवरती दुःख वर्तवलंय. सातारमध्ये एका दलित महिलेला रस्त्यावरती पाडून मारलं. आपल्या महाराष्ट्राच्या लक्षातही आलं नाही. पण, ज्या पद्धतीनं स्त्रियांची अवहेलना होतेय ती या देशासाठी चांगली नाही. ज्या पद्धतीनं जोतिबा फुले आणि सावित्रीबाई फुलेंना मागच्या दोन महिन्यामध्ये बदनाम करण्यात आलं, त्याचा खेद आणि खंतसुद्धा विधानसभेत व्यक्त झाली नाही, हे आमचं दुर्दैव आहे. आज जे काय आपल्या पक्षामध्ये झालं, ते बाजूला गेले, गेले. पण कोण म्हणतं, तिथं लाभार्थी नाहीत. लाभार्थी तर ५० कोटीवालासुद्धा आहे. ५० कोटीवाला जळगावमध्ये कोण आहे? ५० कोटी कोणी घेतले? आपला गुलाब.

आज राजकारणातली ही जी अस्वस्थता आहे, ती या समोरच्या माणसांमध्ये दिसतेय. इथं उपस्थित असलेल्या प्रत्येक माणसाच्या डोळ्यामध्ये चीड दिसते. महाराष्ट्राच्या राजकारणाला एक सोनेरी झालर होती. यशवंतराव चव्हाणांच्या विचारांची. तुमची-माझी राजकीय विभिन्नता असेल, तुमचं-माझं राजकीय वैर असेल. पण तुमचं-माझं वैयक्तिक वैर असण्याचं कारण नाही. ज्या पद्धतीनं एजन्सीज वापरल्या जातात, ज्या पद्धतीनं ॲटॅक केले जातात, ती पद्धत बघितल्यानंतर महाराष्ट्राच्या राजकारणाला लागलेली कीड तुम्हाला-मला घालवावी लागेल आणि त्यासाठी स्वत: साहेब उभा महाराष्ट्र पालथा घालतायंत. ८३ वर्षांचा योद्धा आपल्या महाराष्ट्रातल्या तरूणांसाठी लढायला निघालेला आहे, आपल्याला त्याला साथ द्यावी लागेल. आज महाराष्ट्रात दुष्काळजन्य परिस्थिती आहे. खासकरून इथं दिसतेय. पण, महाराष्ट्रातल्या राज्यकर्त्यांना राज्यव्यवस्था सांभाळता येत नाही. त्यांना दुष्काळ काय कळणार. आणि म्हणून या सभेतनं जिल्ह्यासाठी दुष्काळाची मागणी करत तुम्ही ज्या प्रचंड संख्येनं साहेबांना पाठिंबा देण्यासाठी इथं आलात, त्याच पद्धतीनं महाविकास आघाडीला मजबूत करण्यासाठी या जिल्ह्यातनं सर्व आमदार निवडून द्या, एवढंच बोलतो. रजा घेतो.



# आपले सहकारी ईडीला घाबरून भाजपमध्ये पळाले

## अनिल देशमुख यांचे उद्‌गार

महाराष्ट्रामध्ये गेल्या एक-दीड वर्षापासनं काय चालू आहे हे आपण पाहात आहात. एक वर्षापूर्वी बरोबर या फोडाफोडाच्या राजकारणाला सुरूवात झाली. एक-सव्वा वर्षापूर्वी भारतीय जनता पार्टीच्या लक्षात आलं, की आपल्या स्वत:च्या ताकदीवर महाराष्ट्रामध्ये आपल्याला सत्ता आणता येणार नाही. आपल्या महाराष्ट्रामध्ये मोठ्या प्रमाणावर खासदार निवडून आणता येणार नाही, हे जेव्हा भारतीय जनता पार्टीच्या लक्षात आलं, तेव्हापासून त्यांनी या महाराष्ट्रामध्ये फोडाफोडीचं राजकारण सुरू केलं.

पहिलं त्यांनी शिवसेनेचे ३५-४० आमदार एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात फोडले. हे जे आमदार फुटले गेले, ते कशामुळे फुटले गेले? त्यांना कशाचं आमिष दाखवलं? काय दिलं त्यांना? अरे, पन्नास खोके आणि एकदम ओके. पन्नास पन्नास खोके देऊन आमदार फोडले आणि ते भारतीय जनता पार्टीच्या सरकारमध्ये सामील झाले. हे सामील झाल्यानंतर भारतीय जनता पार्टीच्या लक्षात आलं, की हे आमदार आपल्या सरकारमध्ये सामील झाले, तरी ज्या पद्धतीनं आपल्याला फायदा व्हायला पाहिजे, तशा पद्धतीनं फायदा न होता उलटा तोटा झाला, तेव्हा त्यांनी काही महिन्यांपूर्वी दुसरा प्रयोग केला. आपल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे काही ज्येष्ठ नेते हेसुद्धा भारतीय जनता पार्टीच्या सरकारमध्ये त्यांना सामील झाले. शिवसेनेचे आमदार जसे पन्नास खोके एकदम ओके या आमिषावरती तिकडे गेले, तसे आपल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जे ज्येष्ठ नेते होते, ते भारतीय जनता पार्टीबरोबर कशासाठी गेले? काय कारण आहे त्याचं? अरे, हे सगळे गेले ईडीच्या धाकाने.



मी माझ्या मागच्या भाषणात सांगितलं, की अरे ईडीचा धाक तर त्यांनी मलाही दाखवला होता. हमारे साथ समझौता करो, हमारे साथ आओ, मैं बोला, तुम्हारे साथ जिंदगीभर कभी समझौता नही करूंगा. मी त्यांच्याबरोबर समझौता केला नाही.



ईडीच्या भीतीने राष्ट्रवादी सोडून गेलेले पळपुटे नेते.

म्हणून माझ्यावर त्या मुंबईच्या पोलिस कमिशनरला शंभर कोटी रूपयांचा आरोप करायला लावला. ईडी लावली, सीबीआय लावली. त्याची चौकशी झाली आणि जेव्हा केस कोर्टात गेली, न्यायमूर्ती चांदीवाल यांच्या कोर्टात गेल्यानंतर न्यायमूर्ती चांदिवाल यांनी सांगितलं, की ज्यांनी अनिल देशमुखांवर आरोप केलेत त्याला इथं बोलवा. त्यांचा बयान घ्यायचांय मला. त्या परमवीर सिंगला बोलावण्यात आलं, पण तो आला नाही. सहा समन्स पाठवले, पण तो आला नाही. शेवटी त्यांनी न्यायमूर्ती चांदिवाल यांच्या कोर्टामध्ये ॲफिडेव्हिट लिहून दिलं, की मी जो आरोप अनिल देशमुखांवरती केलेला आहे, तो ऐकिव माहितीच्या आधारावर केलेला आहे आणि माझ्याकडे कोणतेही पुरावे नाहीत. या आरोपांमध्ये कोणत्याही प्रकारचं तथ्य नाही असं कोर्टानं सांगितलं आणि सुप्रिम कोर्टानं सुद्धा तसा निकाल दिला. पण तरीपण मला चौदा महिने जेलमध्ये ठेवण्यात आलं.

माझ्यावर शंभर कोटीचा आरोप झाला आणि जेव्हा चार्जशीट दाखल केली कोर्टात, तेव्हा ईडीनं १ कोटी ७१ लाखाच्या आरोपाखाली चार्जशीट दाखल केली. म्हणजे शंभर कोटीवरून एक कोटी ७१ लाखावर आले. कोणत्याही आरोपामध्ये तथ्य निघालं नाही, तरीपण ज्या पद्धतीनं चौदा महिने मला जेलमध्ये ठेवलं. पण मी त्यांना सांगितलं, माझ्याकडे समझौता करायला आले, त्यावेळी सांगितलं होतं, की अनिल देशमुख जिंदगीभर जेल मे रहेगा, पर तुम्हारे साथ समझौता नही करेगा. या पद्धतीनं न घाबरता मी साहेबांच्या पाठीशी राहिलो आणि आजही साहेबांच्या पाठीशी आहे. माझ्या सहा वर्षाच्या नातीला, जेव्हा चौकशी करायला घरी आले, त्या सहा वर्षाच्या मुलीलासुद्धा कॅडबरीचं आमिष दाखवत महिला पोलिसांनी तिचीसुद्धा अर्धा तास चौकशी केली. १३० धाडी माझ्यावर टाकल्या. पण मी घाबरलो नाही. मी त्यांना सांगितलं, की मी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये आहे आणि शेवटपर्यंत साहेबांच्या पाठीशी अनिल देशमुख खंबीरपणे उभा राहील. अशा पद्धतीनं आपले जे सहकारी पळून गेले, तशा पद्धतीनं मी पळून गेलो नाही.

आपल्या पक्षातनं जे तिकडे गेले, ते प्रफुल्लभाई पटेल, काल नागपूरला आले होते. भाषणामध्ये त्यांनी सांगितलं, की मी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातनं अजितदादांच्या गटातनं तिकडं गेलो, त्याचं कारण त्यांनी काय दिलं, त्यांनी सांगितलं, की आम्हाला विकास करायचांय आणि विकास करण्यासाठी आम्ही तिकडे गेलो. अरे, तुम्ही सर्व ईडीच्या आणि सीबीआयच्या धाकाने तिकडे गेला आणि लोकांना किती दिवस खोटं सांगणार. अशा पद्धतीच्या परिस्थितीत आपल्याला आपल्या ८३ वर्षाच्या बापाच्या खांद्याला खांदा लाऊन काम करायचंय आणि त्यासाठी सर्वांनी तयार राहावं, अशा प्रकारची मी आपल्याला विनंती करतो. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कशा पद्धतीनं मजबूत होईल यादृष्टिनं आपण सर्वांनी प्रयत्न करावा अशी विनंती करतो आणि थांबतो.



# पवारसाहेबांच्या पाठीशी जनतेची प्रचंड शक्ती उभी करूया

अरुण गुजराथी

काही कालावधीपासून एक संदेश येत होता दिल्लीवरून, की पवारांचा वाडा उद्ध्वस्त करा. पवारांचा वाडा उद्ध्वस्त झाला, म्हणजे राष्ट्रवादी काँग्रेस उद्ध्वस्त होईल, राष्ट्रवादी उद्ध्वस्त झाली म्हणजे महाराष्ट्र उद्ध्वस्त होईल आणि महाराष्ट्र उद्ध्वस्त झाला म्हणजे संपूर्ण महाराष्ट्र भाजपच्या ताब्यात जाईल. अशा पद्धतीने गेली वर्ष, सव्वा वर्षे सुरू होतं. पण, पवारांचा वाडा आहे तसाच आहे. काही लोक सोडून गेले. पवारांचा वाडा उद्ध्वस्त झालेला नाही. राष्ट्रवादी उद्ध्वस्त झाली नाही. काहींनी साहेबांच्या वयाचा संदर्भ दिला. अरे, साहेबांचं वय काय पाहता, साहेबांचं ध्येय पाहा. साहेब कशा पद्धतीनं जगतायंत हे आपण पाहा. त्यांचे पुस्तक आहे, लोक माझे सांगाती, हजारो-लाखो कॉपीज् त्या पुस्तकाच्या गेलेल्या आहेत. आणि ज्यांना साहेबांनी मोठं केलं, ज्यांना दिल्लीला मंत्री बनवलं, खासदार बनवलं, राज्यसभेचं सदस्य बनवलं, ३५ वर्षांपासून साहेबांच्या सोबत आणि ते म्हणतात, मी साहेबांवर पुस्तक लिहिणार आहे. टीका-टिप्पणी करणार आहे. त्यांच्या उणिवा दाखवणार आहे. काय दाखवतील? ज्या पद्धतीनं हे सोडून गेलेले लोक आहेत, त्यांच्यासंदर्भात कुठलीही सहानुभूती आपण पाळायची नाही. मी आपल्याला हे सांगू इच्छितो, की साहेबांचा मुकाबला करणारा महाराष्ट्रातच काय, तर देशातसुद्धा नेता नाही, असे नेते आदरणीय शरचंद्रजी पवार साहेब आहेत. साहेबांना सांगितलं जातं, की आपले फक्त चार खासदार आहेत. पण हे चार खासदार असूनदेखील हिंदुस्थान हलविण्याची ताकद आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेब यांची आहे. चार खासदार काय मोजतांय तुम्ही. त्यांची गुणवत्ता काय आहे ती बघा. त्यांची कर्तृत्वशक्ती, त्यांची विचारशक्ती, त्यांची विवेकशक्ती, त्यांची सृजनशक्ती, त्यांची सहनशक्ती, त्यांची स्मरणशक्ती, त्यांच्या मुकाबल्याचा नेता आज नाही. जे कोणी गेलं असेल, फार कोणी गेलं नाही. जळगाव जिल्ह्यातून फार कोणी गेलं नाही. जळगाव जिल्हा हा राष्ट्रवादी काँग्रेसच्या, पवार साहेबांच्या ताब्यात आहे. महाराष्ट्रातदेखील तेच चित्र आहे. ज्या ज्या ठिकाणी अशा सभा झाल्या, त्या त्या ठिकाणी चित्र असं दिसत होतं, की संपूर्ण जनता आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेबांच्या मागे आहे. एक विचार करणारा माणूस, सर्वांना सोबत घेऊन जाणारा माणूस, आणि त्याच्यासंदर्भात जे कोणी टीका-टिप्पणी करतात, तुम्ही गेले तर जा, पण साहेबांवर टीका-टिप्पणी करू नका. साहेबांवरती टीका-टिप्पणी करणं हे कोणालाही आवडत नाहीये. तुम्ही कशासाठी गेलात हेसुद्धा आपल्याला माहित आहे. त्याबद्दल फारशी चर्चा करण्याची गरज आहे. पवार साहेबांबद्दल मी एवढंच म्हणेन, की हर उगता हुआ सूरज रोशनी मांगे आपसे, हर खिलता हुआ फूल खुशबू मांगे आपसे, इतनी उर्जा पवार साहब, उगता हुआ सूरज भी रोशनी मांगे आपसे.

अशा पद्धतीचं हे व्यक्तीमत्व, ज्यांनी दिल्लीमध्ये कृषीमंत्री म्हणून काम केलं. संरक्षणमंत्री म्हणून काम केलं. आपण भाग्यवान आहोत, की आपल्याला शरदचंद्रजी पवार साहेबांसारखे नेते लाभलेले आहेत. त्यांच्या पाठीशी प्रचंड अशी शक्ती आपल्याला उभी करायची आहे. आज घटनेची तोडफोड सुरू आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेले संविधान बदलण्याचा विचार सुरू आहे. अनेक बाबी याठिकाणी सांगता येतील. पण आपण जर शक्ती दिली, तर असे कुठलेही काम होऊ शकणार नाही.



# भाजपाला देशातून संपविण्यासाठी प्रयत्न करूया

**रोहित पवार**

आज जे आपल्या महाराष्ट्रात आणि खास करून राजकारणात जे झालंय ते कोणालाही पटलेलं नाही. जेव्हा एखाद्या पक्षाचा विश्वास स्वत:च्या कार्यकर्त्यांवरनं उडतो, पदाधिकाऱ्यांवरनं उडतो, तेव्हा दुसऱ्या पक्षाला फोडण्याचा प्रयत्न त्यांच्याकडनं होत असतो आणि भाजपाची आजची परिस्थिती तीच झालीय. देशामध्ये, प्रत्येक राज्यामध्ये लोकांच्या मनामध्ये भाजपाच्याप्रति एक द्वेष निर्माण झालांय. लोकांचं मत आहे, की येत्या काळामध्ये आपल्याला भाजपाचा विचार नको आणि हे मत लोकांचं झाल्यामुळे भाजपा हा जो पक्ष आहे आणि त्याचे सर्व नेते हे कुठेतरी घाबरलेत. म्हणून लोकांच्यावरचा विश्वास, मतदारांवरचा विश्वास जेव्हा पक्षाचा संपतो, तेव्हा दुसऱ्या पक्षाला फोडण्याचा प्रयत्न केला जातो. म्हणूनच भाजपानी शिवसेनेला फोडलं, भाजपानी राष्ट्रवादीला फोडलं. पण, त्यांनी नेते फोडले असतील. कार्यकर्ते तसेच आहेत.

या जिल्ह्याच्या बाबतीत बोलायचं झालं, तर पदाधिकारी तसेच आहेत. कार्यकर्ते तसेच आहेत. आणि महाराष्ट्राच्या बाबतीत बोलायचं झालं, तर महाराष्ट्राची जनता ही स्वाभिमानी





आहे. शिव-शाहू-फुले-आंबेडकरांच्या विचारांबरोबर भक्कमपणे ते उभे आहेत. कितीही त्यांनी प्रयत्न केला, पैशाचा वापर केला, शक्तीचा वापर केला, दबावतंत्राचा वापर केला, तरीसुद्धा महाराष्ट्रातली जनता कधीही दिल्लीसमोर झुकणार नाही.

येणारा काळ हा आपल्या सर्वांसाठी संघर्षाचा आहे. म्हणून आपल्या सर्वांना सांगतो, की आपल्याला लढायचंय. एकत्रित राहून लढायचंय. आदरणीय पवार साहेब या वयामध्येही लढत आहेत. अनेक लोकं त्यांच्या वयाबद्दल बोलतात. अरे, वय काय ठेवलंय. पवार साहेब ८३ वयाचे असतील, पण तरीसुद्धा ते आपले युवा नेते आहेत असं माझ्यासारख्याला वाटतं. सकाळी सहा वाजल्यापासून रात्रीच्या अकरा वाजेपर्यंत पदाधिकाऱ्यांना भेटत असतात. कार्यकर्त्यांना भेटत असतात. शेतकऱ्यांचे काही लोकं त्यांना भेटायला आली, काही युवा वर्ग त्यांना भेटायला आला, कितीही वाजलेले असले तरी आदरणीय पवार साहेब त्यांना भेटतात. ही पवार साहेबांची ताकद आहे. पवार साहेबांची ताकद हीच या महाराष्ट्रातली स्वाभिमानी लोकं आहेत. म्हणून आज पवार साहेब प्रत्येक गावामध्ये, तालुक्यामध्ये जाऊन तुम्हाला सर्वांना भेटतायंत.

भाजपाला असं वाटतंय, की काही नेत्यांना फोडलं म्हणजे राष्ट्रवादी संपली. पवार साहेब संपले. मला भाजपाला सांगायचंय, पवार साहेब एक व्यक्ती नाही, पवार साहेब एक विचार आहे आणि तो विचार तुम्ही लोकांच्या मनामधून कधीही काढू शकत नाही. पण जेव्हा केव्हा आपले जे नेते पलिकडे गेलेत, त्यांना विचारलं जातं, की तुम्ही पलिकडं का गेला? जो विचार तुम्ही ३०-३५ वर्षे जपला, जेव्हा केव्हा थोर व्यक्तींच्या विरोधात भाजपाचे नेते बोलत होते, तेव्हा याच नेत्यांनी, आपण सर्वांनी त्या भाजपाच्या लोकांचा विरोध केला. अचानक काय झालं, की तुम्ही पलिकडं जाऊन बसला. ते कदाचित व्यक्तिगत कारण असू शकतं. स्वार्थी राजकारण असू शकतं. पण आज तिकडं जाऊन ते काय म्हणतात, आम्ही विकासासाठी गेलो. मला आपल्या सर्वांना विचारायचंय, आपल्या जिल्ह्यामध्ये दुष्काळ आहे की नाही? आपल्या महाराष्ट्रात २२पेक्षा जास्त जिल्ह्यांमध्ये दुष्काळाची परिस्थिती आहे. मग विकासासाठी तुम्ही गेला असताल, तर पुढच्या पाच-दहा दिवसांमध्ये डिक्लेर करून द्या, की ज्या ज्या जिल्ह्यांमध्ये दुष्काळ आहे, तो आम्ही जाहीर करतो आणि शेतकऱ्यांना मदत करतो.

विकासच म्हणतांय ना, पेट्रोलचे, डिझेलचे भाव वाढले. तुम्ही त्याच्याविरोधात भाजपाचा प्रचार केला. आज तुम्ही भाजपबरोबर जातांय, गॅसचे दर वाढले, तुम्ही भाजपाचा विरोध केला होता. आज तुम्ही भाजपाबरोबर गेलेला आहात. जेव्हा केव्हा सर्वसामान्य लोकांवरती अन्याय झाला, तेव्हा तेव्हा तुम्ही भाजपाच्या विरोधात बोलला आणि आज सहजपणे तुम्ही भाजपाबरोबर जातांय. अहो, भाजपाला हेच पाहिजे, भाजपाला असं वाटतंय, की त्यांची ताकद संपलीय, लोकांच्या मनामधून भाजपा हे उठलंय. मग या नेत्यांनी त्यांनी आपल्याकडं घेतलंय. आदरणीय पवार साहेबांचं हे मत आहे, की काही झालं तरी मुळावर वार करायचा आणि भाजपाला या राज्यातून, देशातून संपवण्यासाठी आपल्या सर्वांना प्रयत्न करायचे आहेत. याच्यासाठीच तुमच्या सर्वांची साथ आदरणीय पवार साहेबांबरोबर राहावी अशी इच्छा एक कार्यकर्ता म्हणून आपल्या सर्वांसमोर करतो.



# महिलांच्या सुरक्षिततेसाठी आवाज उठवावा

## ॲड. रोहिणीताई खडसे

आज आपल्या जळगाव शहरामध्ये आणि जळगाव जिल्ह्यामध्ये आदरणीय पवार साहेब हे स्वाभिमान सभेच्या निमित्तानं इथं उपस्थित आहेत. सगळ्यात पहिलं मी पक्षाचे आणि आदरणीय पवार साहेबांचे आभार व्यक्त करते, की त्यांनी एवढी मोठी जबाबदारी माझ्या खांद्यावर टाकली. मला अभिमान आहे, आणि आपल्या प्रत्येकाला अभिमान वाटेल, आपल्या उत्तर महाराष्ट्रामध्ये पहिल्यांदा महिला प्रदेशाध्यक्ष म्हणून मला जबाबदारी मिळाली आणि आपल्या पक्षाने आपल्या उत्तर महाराष्ट्राच्या खांद्यावर एवढी मोठी जबाबदारी सोपवली, त्यासाठी मी सगळ्या नेतेगणांचे मनापासून आभार व्यक्त करते. आजच्या दिवशी महाराष्ट्रामध्ये महिला संघटन वाढवून राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी मी माझ्यावतीनं कायम प्रयत्न करत राहीन हे सांगते. कारण आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि आपलं महिला संघटन, महिला धोरण जे साहेबांनी राबवलं, ते महिला धोरण पुढं नेण्याचं काम आपण करणार आहोत. साहेबांवर कायम प्रेम करणारा हा आपला जळगाव जिल्हा आहे. आज हा जो समोरचा प्रचंड जनसमुदाय आहे हे याचं साक्षीदार आहेत, की आपण साहेबांवरती प्रचंड प्रेम केलंय. एकेक व्यक्ती हा साहेबांवरती प्रेम करतो आणि ते आज सर्व इथं उपस्थित आहेत. साहेब, आज जळगाव जिल्ह्याची परिस्थिती आम्हाला माहीत आहे, फार काही चांगली नाहीये. आज आम्ही शेतकरी सगळे त्रस्त आहोत. आज गेली दोन महिने झाले, पावसाने दांडी मारलीय. प्रत्येकाच्या डोळ्यात अश्रू आहेत. बोगस बियाणे असतील, बोगस खतं असतील, अतिवृष्टीनं झालेलं नुकसान असेल या प्रत्येकानं आज माझ्या या भागातला शेतकरी बांधव त्रस्त आहे. आज आम्हाला प्रत्येकाला आभाळाकडं बघावं लागतंय, पाऊस कधी येईल याची वाट बघावी लागतेय.

मी आज या सभेच्या माध्यमातनं एवढीच विनंती करेन, की फक्त जळगाव जिल्हाच नाही, तर महाराष्ट्रामध्ये सरकारनं दुष्काळ जाहीर करावा. कारण महाराष्ट्रातल्या शेतकरी बांधवानं जगायचं कसं हे निदान सरकारनं तरी सांगावं. आज महिलांच्या सुरक्षिततेच्या बाबतीत जर बघितलं तर फार परिस्थिती आपल्या जळगाव जिल्ह्यातरी चांगली आहे का हो. न्यूजपेपरमध्ये रोज सकाळी एकतरी वाईट बातमी बघायला मिळते. महिलांवरती अत्याचार वाढताना दिसतायंत. जळगाव जिल्ह्यात कितीतरी महिला अत्याचाराच्या घटना झाल्या आहेत, त्या आपल्याला अचंबित करतात. तिकडे मणिपूरमधली घटना तर सगळ्यांना वेदना देणारी होती. ज्यांनी ज्यांनी व्हिडिओ पाहिला, त्या प्रत्येकाला असं वाटलं, की त्या महिलेची ज्या अवस्थेमध्ये तिची धिंड काढण्यात आली आणि त्याच्यानंतर तिच्यावर अत्याचार करण्यात आले. लोकसभेच्या अधिवेशनात मणिपूरच्या घटनेवर चर्चा करण्याऐवजी चर्चा कोणती होती, तर एका फ्लाईंग किसची. एका फ्लाईंग किसवरती लोकसभेमध्ये गदारोळ होतो, पण मणिपूरसारख्या घटनेचा तिथं साधा निषेध होत नाही. कुठल्याही पक्षातली महिला त्याठिकाणी निषेध करायला उभी राहत नाही. आज जर भारतामध्ये महिला सुरक्षित नसतील तर आम्ही बघायचं कुणाकडे? आज जळगाव जिल्ह्यामध्ये भडगाव असेल, भडगावसारख्या कितीतरी असंख्य घटना झाल्या आहेत, जिथे लहान मुलींवरती अत्याचार झालेत. आज महिला सुरक्षित आहेत का? आम्हाला बाहेर पडताना विचार करावा लागणार आहे, की आम्ही सुरक्षित आहोत का? साहेब, तुम्ही महिला धोरण राबवलंय. महिला सुरक्षा, ५० टक्के आरक्षण देऊन आम्हाला नेतृत्व करायची संधी दिली आहे. पण आमची सुरक्षितता म्हणून आपण आवाज उठवावा एवढीच विनंती मी करेन.




लहान मुलांचे एक खेळणे सर्वांनी पाहिले असेल. चौकांमध्ये फेरीवाले ते विकत असतात. त्यांच्याजवळच्या साबणाच्या पाण्यातून ते फुंकर मारुन त्या फेसाचे फुगे हवेत सोडत असतात. रस्त्यावर सगळीकडे ते फुगे किंवा बुडबुडे तरंगत असतात. बघायला ते छान दिसते पण बघताबघता हवेचा मोठा झोत येतो आणि ते बुडबुडे फुटून जातात. आपल्या देशात हा साबणाच्या फेसाचे फुगे किंवा बुडबुडे हवेत सोडण्याचा खेळ सत्ताधाऱ्यांना विशेष प्रिय आहे. एकामागून एक ते हवेत बुडबुडे सोडत असतात. ते कधी फुटतात कुणाला कळतही नाही कारण तोपर्यंत त्यांनी आणखी काहीतरी नवीन बुडबुडे सोडलेले असतात. महिलांना लोकसभा व विधानसभांमध्ये ३३ टक्के आरक्षण देणारे विधेयक नुकतेच संसदेच्या दोन्ही सभागृहांनी मंजूर केले. परंतु ही घटनादुरुस्ती असल्याने केवळ संसदेने संमत करुन भागणार नाही. आता राज्य विधानसभांनीही ती बहुमताने संमत केल्यावर आणि मग राष्ट्रपतींनी त्यावर सही केल्यानंतर तिचे कायद्यात रुपांतर होईल. त्यानंतर या कायद्याची नियमावली (रुल्स) तयार करुन अधिसूचित केल्यानंतर त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी होऊ शकेल. राज्यघटना दुरुस्ती क्र.१२८ विधेयक ( सन २०२३) असे या विधेयकाचे तांत्रिक शीर्षक आहे. यानुसार लोकसभा आणि विधानसभांमध्ये महिलांसाठी तेहतीस टक्के जागा राखीव ठेवण्याची तरतूद करण्यात आली आहे. गृहमंत्री अमित शहा यांनी या विधेयकावरील चर्चेत बोलताना मतदारसंघांची फेररचना (डीलिमिटेशन) केल्यानंतरच म्हणजे २०२६ नंतरच महिला आरक्षणाच्या अंमलबजावणीची प्रक्रिया सुरु करावी लागेल. कारण या फेररचनेसाठी नेमलेल्या आयोगाकडून कोणते मतदारसंघ महिलांसाठी राखीव करायचे त्याची शिफारस आल्यानंतरच पुढील पावले उचलावी लागतील. म्हणजेच हे आरक्षण तत्काळ लागू होणार नाही हे सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट झाले आहे. लोकसभेच्या आगामी निवडणुकीत महिलांना या आरक्षणाचा लाभ मिळणार नाही हेही स्पष्ट आहे.

वर्तमान राज्यकर्त्यांनी संमत केलेल्या महिला आरक्षण विधेयकाच्या तपशीलात जाण्यापूर्वी त्याच्या इतिहासावरही नजर टाकणे उचित ठरेल. १२ सप्टेंबर १९९६ रोजी लोकसभेत तत्कालीन सरकारतर्फे महिला आरक्षण विधेयक सर्वप्रथम सादर करण्यात आले होते. पंतप्रधान एच.डी.देवेगौडा होते. कायदामंत्री रमाकांत खलप होते. काँग्रेसच्या पाठिंब्याने हे सरकार अस्तित्वात आले होते. भाजप हा प्रमुख विरोधी पक्ष होता. हे विधेयक सादर झाल्यानंतर भाजपच्या खासदार उमा भारती उभ्या राहिल्या आणि त्यांनी या विधेयकाला विरोध केला. या विधेयकात ओबीसी महिलांसाठी तरतूद करावी आणि मगच ते अमलात आणावे असे त्यांनी सांगितले. त्यामुळे या विधेयकाला सर्वात पहिला विरोध भाजपच्या उमा भारती यांनी केला होता. अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवानी असे सर्व वरिष्ठ नेते

# महिला आरक्षण सत्य की आभास

**पंतप्रधानांची महिलांबद्दलची आपुलकी उतू जाण्यापूर्वी त्यांनी स्वतःचे आचरण तपासून पहावे आणि मगच महिलांबद्दलच्या आस्थेचे प्रदर्शन करावे.**

अनंत बागाईतकर

केलेले होते. त्यामुळे या विधेयकाचा इतिहास हा फारसा सुखावह राहिलेला नाही. या ठिकाणी हे नमूद करावे लागेल की काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, सर्व डावे पक्ष यांनी या विधेयकाला आपला पाठिंबा कायम राखला. परंतु ओबीसी मतांचे राजकारण लक्षात घेऊन हे विधेयक रेटण्याचे धाडस मात्र कुणी करु शकले नव्हते. त्यामुळे या विधेयकाच्या रस्त्यात सर्वप्रथम ओबीसींच्या नावाने अडथळा निर्माण करण्याचे काम भाजपने केलेले होते ही बाब लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

२०२१ मध्ये भारतीय महिला राष्ट्रीय महासंघ (नॅशनल फेडरेशन ऑफ इंडियन वुमेन) या संघटनेतर्फे सर्वोच्च न्यायालयात जनहित याचिका करुन महिला आरक्षणाच्या अंमलबजावणीची मागणी केली. सर्वोच्च न्यायालयाने मोदी सरकारकडे यावर उत्तराची मागणी वारंवार करुनही गेल्या दोन वर्षात सरकारने न्यायालयाला आपली बाजू सादर केली नाही. या दुर्लक्षाबद्दल सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला फटकारलेले होते. परंतु ते न करता सरकारने थेट विधेयक सादर करुन संमत केले. महिला आरक्षणाबाबत राज्यघटना निर्मिती समितीनेही चर्चा केल्याचा उल्लेख सापडतो. घटनापरिषदेत ३८९ सदस्य होते आणि त्यामध्ये फक्त १५ महिला होत्या. त्यावेळी महिलांसाठी राखीव

सभागृहात उपस्थित होते. त्यांनी उमा भारती यांच्या म्हणण्याला विरोध केला नाही. देवेगौडा यांनी उमा भारती यांच्या सूचनेचे स्वागत केले आणि या गुंतागुंतीच्या प्रश्नाचा अभ्यास करुन नव्याने सुधारित विधेयक सादर करण्यासाठी संयुक्त निवड समितीकडे हे विधेयक सुपुर्द केले. उमा भारती यांनी उपस्थित केलेल्या मुद्याचे महत्व मुलायमसिंग आणि लालूप्रसाद यांच्या लक्षात यायला वेळ लागला नाही. त्यांनी तर या मुद्याचे स्वागतच केले नाही तर यानंतरच्या काळात वेळोवेळी जेव्हा हे विधेयक मांडण्याचे प्रयत्न झाले तेव्हा ते हाणून पाडण्यात पुढाकार घेतला. यातूनच देशभरात या विधेयकाच्या विरोधात ओबीसींची एक लॉबीच तयार झाली. संसदेत जेव्हेजेव्हा हे विधेयक मांडण्याचे प्रयत्न झाले तेव्हा अक्षरशः मंत्र्यांच्या हातातून विधेयक हिसकावून ते टरकावण्याचे प्रकार काही सदस्यांनी



जागा ठेवण्याचा मुद्दा चर्चेत आला होता. त्यावेळी रेणुका रे या महिला सदस्यांनी त्यास विरोध केला होता. महिलांसाठी राखीव मतदारसंघांची तरतूद केल्यास सर्वसाधारण मतदारसंघासाठी (जनरल सीट) महिलांचा विचार केला जाणार नाही असा मुद्दा त्यांनी मांडला होता. जो ग्राह्य होता आणि आजही आहे. परंतु हंगामी संसदेतही महिलांचे प्रतिनिधित्व घसरतानाच आढळू लागले. त्याबद्दल चिंताही व्यक्त होऊ लागली होती. त्यातूनच महिला प्रतिनिधीच्या जागी महिलेलाच निवडण्याचा प्रस्तावही चर्चिला गेला परंतु त्यास मान्यता मिळू शकली नाही. नोव्हेंबर आणि त्याची जाणीव सर्वांनी ठेवणे आवश्यक आहे. दुर्दैवाने ती जाणीव ठेवली गेली नाही हे वास्तव आहे. स्वातंत्र्याला पन्नास वर्षे झाल्याच्या निमित्ताने आयोजित संसदेच्या विशेष अधिवेशनात बोलताना भाजपनेत्या सुषमा स्वराज यांनी महिलांच्या प्रतिनिधित्वातील घसरणीबद्दल चिंता व्यक्त केली होती. त्यावेळेच्या लोकसभेत (५४३) महिलांचे प्रमाण फक्त ६.५ टक्के असल्याकडे त्यांनी लक्ष वेधले होते. यानंतर ८१व्या घटनादुरुस्तीद्वारे १९९६च्या सप्टेंबर महिन्यात महिला आरक्षण विधेयक मांडण्याचा प्रयत्न झाला व त्यास उमा भारती यांनी




१९४९ मध्ये बी. पट्टाभि सीतारमय्या यांनी परिषदेला या गंभीर बाबीची जाणीव देताना म्हटले की महिलांना उचित प्रतिनिधित्व देण्याचे सभ्य माणसाचे आश्वासन (जंटलमन्स ॲग्रीमेंट) दिले गेलेले आहे. या व्यवस्थेत महिलांना आपोआपच पुरेसे प्रतिनिधित्व मिळेल या विश्वासाच्या आधारे ते झालेले आहे याची जाणीव सर्वांनी ठेवणे आवश्यक आहे. त्यांच्या म्हणण्याचा स्पष्ट अर्थ हाच होता की आपल्याला न्याय मिळेल असा विश्वास बाळगून महिलांनी ही बाब आपणा सर्वांवर सोडलेली आहे विरोध केला त्याचा उल्लेख वर आलाच आहे. यानंतरही चार वेळेस हे विधेयक मांडण्याचे प्रयत्न झाले आणि लोकसभेची मुदत संपल्याने ती रद्द ठरली. १९९८ ते २००३ या काळात हे अयशस्वी प्रयत्न झाले. २००८ मध्ये युपीए (मनमोहनसिंग) सरकारने हे विधेयक राज्यसभेत मांडून संमत केले. परंतु लोकसभेत ते संमत होऊ शकले नाही आणि लोकसभेची मुदत संपण्याबरोबरच ते २०१४ मध्ये रद्द झाले. वर्तमान लोकसभेत महिला सदस्यांची संख्या लक्षणीय वाढलेली असली तरी

महिलांच्या एकंदर लोकसंख्येच्या तुलनेत हे प्रमाण फक्त चौदा टक्के आहे. महिला लोकप्रतिनिधींचे जागतिक प्रमाण २६.५ टक्के आहे. म्हणजेच जागतिक टक्केवारीच्या तुलनेत हे प्रमाण फारच कमी आहे. या संदर्भात आशिया खंडातील देशांचा विचार करायचा झाल्यास फिलिपिन्स हा देश महिला आरक्षणाबाबतचा पहिला देश ठरावा. फिलिपिन्समधील महिला लोकप्रतिनिधींचे प्रमाण २८ टक्के म्हणजेच जागतिक टक्केवारीपेक्षा अधिक आहे. हे उद्दिष्ट साध्य करणारा तो तूर्तास एकमेव देश ठरला आहे. अन्य आशियाई देशांमध्ये बांगला देश, पाकिस्तान, नेपाळ व दक्षिण कोरिया या देशांमध्येही महिला आरक्षणाची तरतूद आहे. नेपाळ व दक्षिण कोरियामध्ये तर पन्नास टक्के महिला आऱक्षणाची तरतूद आहे.

महिला आरक्षणाच्या ताज्या प्रस्तावात (अद्याप त्याचे कायद्यात रुपांतर झालेले नाही) केलेल्या तरतुदी नवीन नाहीत. पूर्वीच्या विधेयकाप्रमाणेच पंधरा वर्षांची मुदत ठेवण्यात आली आहे. त्याचप्रमाणे मतदारसंघांची फेररचना आणि ताजी जनगणना हे दोन आधारभूत घटक निश्चित करण्यात आलेले आहेत. त्यामुळे या विधेयकाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीबद्दलच्या पूर्वीच्या शंका आजही कायमच आहेत. त्या शंकांचे निरसन सरकारने केलेले नाही. त्यामुळे या विधेयकाला मिळालेली संसदीय मंजुरी ही निव्वळ वरवरची किंवा नावापुरती आहे असे म्हटल्यास कुणाला राग येण्याचे कारण नाही. यातूनच या विधेयकाबाबत वर्तमान राज्यकर्ते खरोखरच गंभीर आहेत काय हा प्रश्नही निर्माण होतो. केवळ एक उपचार म्हणून आणि अर्थातच आगामी विधानसभा व लोकसभा निवडणुकीत महिलांची मते मिळविण्यासाठी केलेली एक युक्ति किंवा चलाखी म्हणून या विधेयकाचा वापर केला जाईल हेच यावरुन स्पष्ट होते. या विधेयकाला ज्या राजकीय पक्षांचा सुरुवातीपासून पाठिंबा होता त्यांनी त्यांचा शब्द पाळला आणि विधेयक मंजुरीला मदत केली. काँग्रेस पक्षाने या विधेयकाला पाठिंबा कायम ठेवतानाच मतदारसंघ फेररचना किंवा जनगणना याची वाट न पाहता ते अमलात आणावे आणि ओबीसी महिलांनाही त्यात समाविष्ट करण्यासाठी सरकारने पुढाकार घ्यावा असे सुचविले आहे. डाव्या पक्षांची तसेच



राष्ट्रवादी काँग्रेस यासारख्या महिला विधेयकाशी बांधिलकी राखणाऱ्या पक्षांनी देखील पाठिंब्याची भूमिका कायम राखली व बाजुने मतदान केले. त्यामुळेच हे विधेयक संमत करणे सरकारला सुलभ गेले हे येथे नमूद करावे लागेल.

या विधेयकाला विरोध करण्यात ओबीसी समूहांचे लोकप्रतिनिधी प्रामुख्याने कारणीभूत होते. ज्या भाजपनेत्या उमा भारती यांनी सर्वप्रथम ओबीसी महिलांचा मुद्दा उपस्थित केला त्या लोध या ओबीसी समाजाच्या नेत्या आहेत. उत्तर प्रदेशाचे मुख्यमंत्री कल्याणसिंग या समाजाचे होते. उमा भारती या देखील मध्य प्रदेशाच्या मुख्यमंत्री होत्या. यावरुन या समाजाच्या ताकदीचा अंदाज यावा. ओबीसी किंवा सामाजिक न्यायाच्या आधारे राजकारण करणारे दोन प्रमुख नेते मुलायमसिंग आणि लालूप्रसाद हे आहेत. मुलायमसिंग आज हयात नाहीत परंतु मंडल किंवा सामाजिक न्यायाच्या राजकारणाचे हे दोन नेते मोठे ध्रुव मानले गेले. या नेत्यांनीही हे विधेयक वेळोवेळी उधळून लावण्यात आपापली भूमिका पार पाडलेली होती. दोघेही यादव म्हणजे ओबीसी समाजातलेच होते. महिला विधेयकात ओबीसी समाजातील महिलांनाही स्थान मिळावे ही मागणी तत्वतः म्हणून मान्य करणे आणि ती बाब प्रत्यक्षात आणणे यात मोठी तफावत आहे. याचे कारण ओबीसी समाजाची जनगणना झालेली नाही. सर्वसाधारणपणे एकूण लोकसंख्येत ओबीसींचे प्रमाण ५२ ते ५४ टक्के असावे असे मानले जाते. त्याला शास्त्रीय आधार नाही. एक सर्वसाधारण अंदाजावर आधारित ही माहिती आहे. देशातील अनुसूचित जाती आणि जमाती म्हणजेच आदिवासी यांची सामाजिक टक्केवारी निश्चित केली गेली व त्या आधारे त्यांना आरक्षण दिले गेले. ओबीसींचे तसे झालेले नाही. याचे कारण ओबीसी समाजाची व्यापकता आणि राज्यवार त्यांचे भिन्न स्वरुप हा त्यांच्या प्रमाण म्हणजे टक्केवारीच्या निश्चितीमधील सर्वात मोठी अडचण आहे. त्यामुळेच अलीकडच्या काळात या ओबीसी नेत्यांनी म्हणजे नीतीशकुमार, लालूप्रसाद यांच्यासारख्यांनी जातवार जनगणना करण्याची मागणी लावून धरली आहे. भाजपने या संकल्पनेला विरोध केला आहे कारण जर ओबीसी समाजाची टक्केवारी निश्चित झाली तर राजकीयदृष्ट्या ते अनेक पक्षांना अडचणीचे ठरणारे असेल. त्याचप्रमाणे त्यांना टक्केवारीच्या प्रमाणात आरक्षण देण्याचे ठरविल्यास अन्य समाजाची प्रतिक्रिया काय होईल याचा अंदाज बांधणेही अवघड आणि तेवढेच जोखमीचे आहे. त्यामुळेच या विधेयकाची अंलबजावणी आणि व्यावहारिकता याबद्दल भलेमोठे प्रश्नचिन्ह कायम आहे. या विधेयकानुसार अनुसूचित जाति व आदिवासींसाठी सध्या राखीव असलेल्या मतदारसंघांपैकी ३३ टक्के मतदारसंघात हे आरक्षण लागू करण्यात येणार आहे.

महिला आऱक्षणाच्या संकल्पनेच्या व्यावहारिकतेचा मुद्दा गैरलागू नाही. यामध्ये सर्वाधिक क्लिष्ट मुद्दा असेल तो महिलांसाठी राखीव मतदारसंघ निश्चित करण्याचा कारण विधेयकानुसार हे ३३ टक्के मतदारसंघ निश्चित झाले की त्यांची मुदत पंधरा वर्षे राहणार आहे. पंधरा वर्षांनंतर वेगळे ३३ टक्के मतदारसंघ महिलांसाठी राखीव करावे लागतील. म्हणजेच पंधरा वर्षे मुदतीच्या क्रमाने






महिला राखीव मतदारसंघ ठरविले जातील. मतदारसंघांच्या फेररचनेसाठी आयोग नेमण्याची शिफारस राज्यघटनेत आहे. परंतु त्यासाठी आयोगाला जनगणनेची ताजी आकडेवारी उपलब्ध होणे आवश्यक आहे. दर दहा वर्षांनी देशात जनगणना केली जाते. २०११ नंतर २०२१ मध्ये जनगणना सुरु होणे अपेक्षित होते. परंतु करोनाच्या साथीमुळे ती सुरु होऊ शकली नाही. परंतु किमान २०२३ मध्ये तरी ती सुरु होणे अपेक्षित होते तेही घडलेले नाही. त्यामुळे मतदारसंघांची फेररचना कोणत्या जनगणनेच्या आधारे करायची हा प्रश्न उरतो. राज्यघटनेने २०२६ पर्यंत लोकसभेच्या मतदारसंघांची संख्या (५४३) गोठविलेली आहे. नव्या जनगणनेच्या आधारे मतदारसंघांची संख्या वाढविणे व त्यांची फेररचना करणे अपेक्षित आहे. परंतु जनगणना सुरु केली तरी तिची प्रक्रिया २०२६ पर्यंत तरी पूर्ण होणार काय हा प्रश्न आहे. मग मतदारसंघांच्या फेररचनेचा प्रश्न निर्माण होणार आहे. हे इतके जटिल व गुंतागुंतीचे व परस्परात अडकलेल्या प्रक्रिया असल्याने हा गुंता जोपर्यंत यशस्वीपणे सोडविला जात नाही तोपर्यंत महिला आरक्षण हे मृगजळच ठरणार आहे. त्यात ओबीसी महिलांच्या समावेशाच्या आग्रहाने जोर धरला तरी मग ही गुंतागुंत आणखी वाढणार आहे हे निःसंशयपणे स्पष्ट आहे. त्यामुळेच सरकारने हे विधेयक मंजूर करण्याची जी कृति केली आहे त्यामागे त्यांचे हेतु कितपत प्रामाणिक आणि चांगले आहेत याबद्दल शंका निर्माण होतात. आणखी एका अनुषंगिक मुद्याचा उल्लेख करावा लागेल. मंडल आयोगाच्या शिफारशी देशात लागू झाल्यानंतर ओबीसी समाज व समूहांना आरक्षण लागू झाले. परंतु ओबीसी समाजांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात ते नाही. याचे कारण राज्यघटनेत आरक्षणाची मर्यादा पन्नास टक्क्यांहून अधिक राखता येणार नाही असे नमूद केले आहे. त्यामुळे अनुसूचित जाति व आदिवासी यांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण लागू करताना अनुसूचित जातींसाठी १५ टक्के तर आदिवासींसाठी साडेसात टक्के असे दोन्ही मिळून साडेबावीस टक्के आरक्षण देण्यात आले. आता मंडल आयोगानंतर ओबीसींना आरक्षण देताना पन्नास टक्के (आरक्षणाची कमाल मर्यादा) वजा साडेबावीस टक्के म्हणजे साडे सत्तावीस टक्के आरक्षण ओबीसींना देण्याचे निश्चित केले गेले. मागाहून क्रीमी लेयरची तरतूदही केली गेली. सांगण्याचा मुद्दा एवढाच की ओबीसी आरक्षण हे लोकसंख्येच्या आधारे दिले गेले नाही. मग हाच निकष महिला आरक्षणाला लावता येऊ शकतो काय हा मुद्दा विचारात घ्यावा लागेल. परंतु त्यासाठी ओबीसी समाज तयार होईल काय हा यक्षप्रश्न आहे आणि सध्याच्या राजकारणाचे स्वरुप पाहता आता ओबीसी

नेतृत्व सहजासहजी आपला अधिकार सोडण्यास तयार होईल अशी परिस्थिती नाही. एकप्रकारे या विधेयकाने सामाजिक प्रश्न आणखी जटिल करुन ठेवले आहेत आणि त्याची उत्तरे शोधण्याची कुवत एखाद्या राजकीय नेत्यामध्ये आहे हे सांगणे अवघड आहे. त्यामुळेच केवळ निवडणुकीत महिलांना आरक्षणाचे विधेयक संमत करुन दाखविल्याची फुशारकी मारुन व एकप्रकारे महिलांना अडाणी किंवा नासमज समजून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हा जो डाव खेळला आहे त्याचा फायदा मिळण्याऐवजी तोटा होण्याची शक्यता अधिक आहे.


एखाद्या विषयाला फाटेच फोडायचे असतील तर ते कसेही फोडता येतात. महिला आरक्षणाचेही तसेच झाले आहे. महिला आरक्षणाची बाब ही फक्त लोकसभा आणि राज्यांच्या विधानसभांपुरतीच मर्यादित ठेवण्यात आली आहे. काही मंडळींना यामध्येही अडचण वाटते. हा भेदभाव असल्याचे सांगून ही तरतूद राज्यसभा आणि राज्यांच्या विधान परिषदांनाही लागू का केली जात नाही असा प्रश्न ते करतात. एकप्रकारे त्यांच्या प्रश्नात तथ्यही आहे. कारण काहींच्या मते महिला आरक्षणाबाबतची मनोवृत्ती समाजात तयार होण्यासाठी प्रथम अप्रत्यक्षपणे निवडीची पध्दत असलेल्या राज्यसभा व विधान परिषदांमध्ये महिला आरक्षण अंमलात आणावे. याला फारसा विरोध होणार नाही आणि तसेही राज्यसभेत दर दोन वर्षांनी एक तृतीयांश सदस्य नव्याने निवडूनच येत असतात. यामुळे महिला आरक्षणाची सुरुवात करणे शक्य होईल. मात्र ही सूचनाही मान्य झालेली नाही. याचे कारण अनेक राज्यांमध्ये विधान परिषद अस्तित्वात नाहीत. तेथे एकच सभागृह आहे. त्यामुळे ही सूचनाही गैरलागू ठरते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पातळीवर मात्र महिलांच्या प्रतिनिधित्वात लक्षणीय वाढ झाली आहे. बिहारमध्ये २००६ पासून स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये म्हणजेच पंचायती राज्य संस्थांमध्ये महिलांना पन्नास टक्के आरक्षण लागू करण्यात आले आहे. महाराष्ट्रात १९९३-९४ मध्येच स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ३३ टक्के महिला आरक्षण लागू करण्यात आले होते. त्याचप्रमाणे महिलांसाठी स्वतंत्र आयोग आणि महिला व बालकल्याण विभाग सुरु करण्यात महाराष्ट्र प्रथम होता. ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राज्य सरकारने हे निर्णय केले होते. हेच कित्ते अन्य राज्यांमध्येही गिरविले गेले आहेत. त्यामुळे स्थानिक किंवा पंचायत संस्थांच्या पातळीवरील महिलांच्या प्रतिनिधित्वात सातत्याने वाढ झालेली आहे ही वस्तुस्थिती आहे. परंतु विधानसभा व लोकसभा यांच्या पातळीवर मात्र महिलांची टक्केवारी कमीच राहिली.

वरील मुद्दे विचारात घेता महिला आरक्षणाची वाट अजुनही बिकटच असल्याचे स्पष्ट होते. मुळातच वर्तमान सत्ताधाऱ्यांचा यामागील हेतु प्रामाणिक आणि स्वच्छ असल्याचे आढळून येत नाही. अन्यथा एवढ्या क्लिष्ट अडचणी अस्तित्वात असताना केवळ नावापुरती या विधेयकाला संसदीय मंजुरी मिळविणे ही महिलांची शुध्द फसवणूक आहे. डावे पक्ष आणि त्यांच्या महिला संघटनांनीही विधेयक मंजुरी हे एक ढोंग असल्याची टीका केली आहे. त्यांच्या मते आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या मते पुढील जनगणना व मतदारसंघ फेररचना याचा आणि महिला आरक्षणाच्या अंमलबजावणीचा तसा अर्थाअर्थी संबंध नाही.




त्याची अंमलबजावणी वर्तमान स्थितीतही करणे शक्य आहे. जनगणना आणि मतदारसंघांच्या फेररचनेत मतदारसंघांची संख्या वाढल्यास महिलांचे राखीव मतदारसंघही त्या प्रमाणात वाढविणे शक्य आहे. त्यासाठी अंमलबजावणी लांबविण्याची आवश्यकता नाही. व्यावहारिकदृष्ट्या डाव्या पक्षांचा मुद्दा

पटणारा आहे आणि तर्कसंगत आहे. त्यामुळेच मोदी सरकारला खरोखर महिला आरक्षणाबाबत ते प्रामाणिक असल्याचे सिध्द करायचे असेल तर आहे त्या स्थितीत त्याची अंमलबजावणी करण्यास मागेपुढे पाहण्याची त्यांना गरज नाही. भाजपने २०१४ आणि २०१९च्या जाहीरनाम्यांमध्ये ते सत्तेत आल्यानंतर महिला आरक्षण लागू करण्याचे आश्वासन दिलेले होते. आता २०२४ची लोकसभा निवडणूक काही महिन्यांवर येऊन ठेपलेली असताना




पुढचामागचा विचार न करता हे विधेयक घाईत संमत करण्यात आले. याचाच अर्थ त्यांना विधेयकाची अंमलबजावणी करण्यापेक्षा ते मंजूर करुन दाखविले याचा प्रचार करीत व त्याचे श्रेय घेऊन टेंभा मिरवीत महिलांची मते मिळवायची आहेत हे स्पष्ट होते. ही एक निव्वळ हातचलाखी आहे व त्यापलीकडे तिला फारसे महत्व देता येणार नाही.

पंतप्रधानांना महिलांचा फारच कळवळा आहे. त्यांची महिलांबद्दलची आपुलकी उतू जाण्यापूर्वी त्यांनी स्वतःचे आचरणही तपासून पहावे आणि मगच महिलाबद्दलच्या आस्थेचे प्रदर्शन करावे. हरयाणातील आणि देशासाठी आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये पदके मिळविणाऱ्या महिला कुस्तीगीरांनी कुस्तीगीर संघाचे प्रमुख व भाजपचे खासदार ब्रिजभूषण सरणसिंग यांच्याविरुध्द लैंगिक शोषणाचे आरोप करुनही मोदींनी ब्रिजभूषण यांच्या विरोधात कारवाईची हिंमत किंवा साहस दाखविले नाही. अखेर सर्वोच्च न्यायालयात दाद मागून या महिला कुस्तीगीरांनी ब्रिजभूषण यांच्या विरोधात पोलिसांना एफआयआर नोंदविण्यास भाग पाडले. दिल्ली पोलिस अमित शहा यांच्या अधिकारात आहेत. मणिपूरमध्ये दोन आदिवासी महिलांची नग्न धिंड आणि सामूहिक बलात्काराबाबतचे या दोन्ही महान नेत्यांचे मौन त्यांना महिलांबद्दल किती आस्था आहे हे दर्शविते. उत्तर प्रदेशातील भाजप आमदाराने एका दलित मुलीवर केलेला बलात्कार व त्याच्या विरुध्दची तक्रार पोलिसांनी नोंदविण्यास केलेली टाळाटाळ व अखेर तिने पोलिस ठाण्यसमोरच स्वतःला जाळून घेण्याचा केलेला प्रकार, भाजपनेते व भगवे वस्त्रधारी चिन्मयानंद यांच्या विरोधात एका तरुण महिलेने केलेली तक्रार आणि ती मागे घेण्यासाठी तिच्यावर आलेला दबाव ही सर्व भाजपच्या महिला आपुलकीची लक्षणे आहेत. कितीतरी उदाहरणे देता येतील. महिला आरक्षण विधेयक मंजूर करण्यासाठी परमेश्वराने आपली निवड केली असे अहंकारी आणि अहंमन्य उद्गार पंतप्रधानांनी काढले. जणू काही ते प्रेषितच असल्याचा आव त्यांनी आणला आणि तशा जाहिराती देशात सर्वत्र झळकविल्या गेल्या. याला विनम्रता नव्हे तर उद्दामपणा म्हणतात. तसेच विरोधी पक्षांनी नाईलाजाने, अनिच्छेने विधेयकाला पाठिंबा दिल्याची टीकाही त्यांनी केली. एखाद्या मोठ्या मनाच्या नेत्याने विरोधी पक्षांनी भेदभाव न बाळगता विधेयकाला पाठिंबा दिल्याबद्दल आभार प्रकट केले असते. परंतु या उदात्त अशा गोष्टीचे देखील स्वतःच्या हितासाठी वापर करण्याच्या कोत्या व घाणेरड्या वृत्तीमुळे त्यांनी विरोधी पक्षांवर टीका करणे पसंत केले. यावरुनच त्यांचा या विधेयक मंजुरीमागील हेतु फारसा स्वच्छ नसल्याचे स्पष्ट होते. पंतप्रधानसाहेबांनी एक कार्यशैली तयार केली आहे. अव्यावहारिक, अंमलात आणण्यास अशक्य असलेल्या कल्पनांच्या घोषणा करुन त्यासाठी काहीतरी पावले टाकत असल्याचे नाटक करायचे आणि मग त्यांच्या पाळीव प्रचारकी टोळ्यांमार्फत खोट्यानाट्या प्रचाराचे रान उठवून द्यायचे. समान नागरी कायदा, एक देश एक निवडणूक या अव्यावहारिक कल्पनांपाठोपाठ त्यांनी महिला आरक्षण विधेयकाचे हे मोठे नाटक वठविले आहे. त्या आधारे महिला आपल्याला धोधो मते देतील आणि आपण पुन्हा पंतप्रधानपदी विराजमान होऊ या कल्पनेत ते आता मश्गूल आहेत. त्यांना त्यांची स्वप्ने लखलाभ असोत. महिला मात्र वंचितच राहणार आहेत. महिला आरक्षणाचा हा फुगा किंवा बुडबुडा आहे. त्यामुळे महिलांनी फार हुरळून जाऊ नये हेच श्रेयस्कर !


**राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष, खासदार शरद पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत पुण्यातील सिम्बॉयसिस महाविद्यालयाच्या विश्वभुवन ऑडिटोरिअम येथे १७ सप्टेंबर रोजी राष्ट्रवादी काँग्रेस इंजिनिअर सेलच्या वतीने आयोजित 'राष्ट्रीय अभियंता दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात शरद पवार यांनी केलेले मार्गदर्शन...**





मघाशी बोलत असताना बेळगावचा विषय निघाला. बेळगावचा आणि माझा स्नेहभाव फार जुना आहे. बेळगाव आणि तेथील मराठी भाषिक यांच्यासाठी राजकीय मतभेद विसरून आम्ही काही लोक गेली अनेक वर्षे प्रयत्न करत आहोत. त्याच्यामुळं साहजिकच बेळगावचं कुणी दिसलं तर त्याच्याकडे सुसंवाद ठेवणं हे काम आम्ही काही लोकं करत असतो. त्यामध्येच अमित देसाईंची भेट एक दिवशी घडली. इंजीनिअरिंग क्षेत्रात आपण काम करत असल्याची कल्पना त्यांनी दिली. आम्ही पक्ष चालवतो याचा अर्थ फक्त राजकारण करत नाही. राजकारण करतो, त्याच्याकडे दुर्लक्ष करून चालत नाही. पण राज्याचा आणि देशाचा विचार करायचा असेल तर वेगवेगळ्या क्षेत्रातल्या घटकांना संघटित करणं व त्याला प्रोत्साहित करणं, त्याला उभारणीच्या क्षेत्रामध्ये कशी मदत होईल याचा विचार करणं या सगळ्या गोष्टींची आवश्यकता असते. म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये जयंतराव असोत किंवा आमचे बाकीचे सगळे सहकारी, या सर्वांनी बसून धोरणात्मक निर्णय यापुढून घेतला की, नुसता राजकारण एके राजकारण, निवडणुका एके निवडणुका एवढा विचार न करता विविध क्षेत्रात काम करणाऱ्यांना संघटित करणं आणि त्यांच्या संघटित शक्तीमधून समाजाची आणि देशाची उभारणी करणं याच्यावर जर लक्ष केंद्रित करायचं असेल तर आपल्याला विविध क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांना संघटित केलं पाहिजे आणि तो निर्णय आम्ही घेतला.

आज शेतीच्या क्षेत्रामध्ये जे काम करतात, कृषी पदवीधर, त्यांचंही आम्ही एक संघटन केलं आहे. मध्यंतरी अमरावतीला त्यांच्या एका बैठकीला मी गेलो तर पाच हजार कृषी पदवीधर होते. अनेक गोष्टींवर त्यांचं लक्ष उत्तम रीतीने आहे हे त्यावेळी लक्षात आलं. शेतीचे उत्पादन कसे वाढवायचे? दुधाची उत्पादकता कशी वाढवायची? फळांवर प्रक्रिया कशी करायची? या सगळ्या क्षेत्रांमध्ये ही तरुण मंडळी कुठे ना कुठेतरी



# क्रियाशीलता आणि सुसंवाद हा जीवनातील यशाचा मार्ग

## शरद पवार यांचे विचार





काम करत आहेत. याचा अर्थ जॉईन अर्थव्यवस्था बदलायला त्यांची साथ होते ते केवळ या संघटित पदवीधरांच्या प्रयत्नातून होत असते. तसेच आज वैद्यकीय क्षेत्रामध्ये राष्ट्रवादीने असाच एक संघ उभा केला. डॉ. जगताप यांच्या नेतृत्वाखाली हा वैद्यकीय विभाग या महाराष्ट्रात उभा केला. कुठंही संकट आलं, मागं एकदा कोल्हापूरच्या भागामध्ये अतिवृष्टी झाल्याच्यानंतर गावात पाणी शिरलं. कोकणामध्ये दोन-तीन वेळा असं झालं. भूकंपाचा प्रसंग एकेकाळी घडला होता. अशावेळेला त्याच्यात काम करण्यासाठी कुणीतरी लोकं पाहिजेत. काहीवेळा माणूस जखमी होतो.

मला आठवतंय, की मी राज्याचा प्रमुख होतो आणि एके दिवशी गणपती विसर्जनाचा दिवस होता. रात्रभर त्या विसर्जनाच्या मिरवणुका असायच्या. कुठं भांडणं व्हायची तर कुठे दंगा होण्याची शक्यता असते. कुठे जातीय तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो. म्हणून त्याच्यावर अधिक लक्ष ठेवायचं असतं. त्यादिवशी मी लक्ष ठेवून होतो. रात्री तीन- साडेतीन वाजले. शेवटचा गणपती परभणीचा होता. तो गेल्याच्यानंतर मी चार वाजता झोपायला गेलो. झोपायला गेल्याच्यानंतर एक अर्ध्या तासामध्ये माझ्या बेडरूमच्या खिडक्या हलल्यासारख्या आणि आवाज झाल्यासारखा झाला. चौकशी केल्यानंतर तिथं भूकंप झाल्याचं कळलं. त्या जिल्ह्यातली लोकं पोहोचायच्या आधी ज्या गावात अधिक लोकं मृत्युमुखी पडलेले

होते त्या गावात पहाटे मी पोहोचलो होतो. ते पाहिल्याच्यानंतर जवळपास १०० गावांमध्ये हा भूकंपाचा प्रश्न होता. गावातल्या लोकांचं संपूर्ण जीवन उद्ध्वस्त झालं होतं. त्याच्यानंतरच्या कालावधीमध्ये पंधरा दिवस मी तिथंच राहिलो. राज्याच्या मुख्यमंत्र्याचा कारभार हा तिथून व्हायला लागला. कारण मला तिथल्या तिथं निर्णय घ्यायचे होते. तसे निर्णय घेतले आणि त्या संकटातून या गावांची पुन्हा नव्याने उभारणी करायची, हे आव्हान स्वीकारायचं म्हणून आम्ही काही लोकांनी ठरवलं. त्याच्यामध्ये इंजिनिअरिंग क्षेत्रामधले आमचे जे मित्र होते अशा अनेकांना संघटित केलं आणि त्यांना सांगितलं, की आपल्याला काहीही झालं तरी ही एक लाख घर पडली ती पुन्हा त्या ठिकाणी



उभारायची. सुदैवाने इंजीनिअरिंग क्षेत्रातल्या अनेकांचे हात त्या ठिकाणी लागले आणि आज तुम्ही तिथं गेलात तर एकदम चित्र बदललेलं आहे. सांगायचं तात्पर्य असं, की संकटावर मात करण्याची ताकद ही अनेकांच्या मध्ये असते. त्याच्यामध्ये अभियंता हा घटक अत्यंत महत्त्वाचा असतो.

माझ्या जीवनामध्ये मी साधारणतः माणसं जोडायचा प्रयत्न करत असतो. ज्या क्षेत्रातलं आपल्याला समजत नाही त्या क्षेत्रातलं ज्याला ज्ञान आहे तिथं आपण विद्यार्थ्यासारखं जावं. मी मुख्यमंत्री झालो असेल, संरक्षण मंत्री झालो असेल, शेती मंत्री झालो असेल पण सगळ्या क्षेत्रातली अक्कल मला आहे असं मी म्हणत नाही. पण ते नाही म्हणून सोडून द्यायचं नाही, शिकायची तयारी ठेवायची. मला आठवतंय की मी संरक्षण मंत्री झालो. मला कॅप्टन की मेजर हे काहीच माहित नव्हतं. पण जबाबदारी पडली. चार दिवसांनी चार्ज घेतल्यानंतर सरळ उठलो आणि कोल्हापूरला गेलो. तिथे जनरल थोरात नावाचे एक गृहस्थ होते. ते या देशाचे क्रमांक दोनचे निवृत्त अधिकारी होते. त्यांचे प्रचंड मोठे योगदान या क्षेत्रामध्ये होते. जवळपास तीन दिवस कोल्हापूरला सकाळी आठ वाजता मी त्यांच्या घरी जायचो आणि संध्याकाळी परत यायचो. त्यांच्याकडून वेगवेगळ्या विषयांची माहिती घेणं, ज्ञान घेणं एखाद्या विद्यार्थ्यासारखं. खरं म्हणजे ते जनरल होते आणि मी संरक्षण मंत्री होतो. माझ्यापेक्षा त्यांना अनुभव, अक्कल जास्त आहे आणि त्यामुळं इथं आपण विद्यार्थ्यासारखं बसावं ही भूमिका घेतली. त्या तीन दिवसांमध्ये या सर्व खात्याची माहिती मी मिळवू शकलो. सुदैवाने त्याचा उपयोग मंत्रालयामध्ये झाला. अशी माणसं आपण शोधली पाहिजेत. देशात व देशाच्या बाहेर सुद्धा संधी मिळेल तिथे बघितली पाहिजेत.

मला आठवतंय की मी एक दिवशी नगरमधून येत होतो, दुष्काळी स्थिती होती. रांजणगावात पिण्याच्या पाण्यासाठी लोक त्रस्त होती. मी त्यांच्याशी चर्चा केली की काय झालं? काय करू पाहताय? त्यांनी सांगितलं, की शेती करता येणार नाही. आमची हजारो एकर जमीन आहे पण त्याचा आता उपयोग नाही. म्हणून आम्हाला काहीतरी दुसरं काम द्या. मी म्हणालो, ठीक आहे. तिथून



आल्याच्यानंतर विचार केला, इंडस्ट्री खात्यातल्या लोकांना बोलावलं आणि सांगितलं की आपल्याला औद्योगिक वसाहती उभारल्या पाहिजेत. आणि त्याची सुरुवात आपण रांजणगावपासून करूया व सवलती देऊया. आज रांजणगाव तुम्ही बघितलं असेल, बदललेलं आहे. त्याच्यानंतर जेजुरी व चाकणचा विकास केला. ओळखू येत नाही इतका बदल केला. दुष्काळासाठी रिक्त असलेल्या जमिनी या उद्योगाखाली आणता येतील का? या दृष्टीने काही पाऊल टाकली आणि आज अनेक कारखाने त्या ठिकाणी उभे राहिलेले आहेत. हे कसं करता आलं तर माझे काही व्यक्तिगत मित्र होते. त्यांचे मला निश्चित फायदे झाले. शंतनुराव किर्लोस्कर यांचे यात सर्वात महत्त्वाचे योगदान आहे. ते अतिशय दूरदृष्टीचे


राहुल बजाज व रतन टाटा

गृहस्थ होते. राहुल बजाज असतील, आज नाहीयेत, त्यांची पण दुरदृष्टी होती. अशी जी माणसं आहेत त्यांनी उभारणी केली, त्यांना क्रियाशीलतेमध्ये आनंद होता.


आजचे महाराष्ट्राचे चित्र आणि तेव्हाचे चित्र यात फरक आहे. एकेकाळी मुंबई राज्य होतं, महाराष्ट्र नव्हतं. मुंबई राज्याचे पहिले मुख्यमंत्री, म्हणजे कोकण मंत्री फार कमी लोकांना माहित आहे की पहिले मुख्यमंत्री एक पारशी होते. त्यांनी नंतर राजकारण सोडलं. उद्योगात लक्ष घातलं आणि आपली इंडस्ट्री त्या ठिकाणी वाढवली. सांगायचं तात्पर्य एवढं की दुरदृष्टी असेल तर त्यात गुंतवून घेतलं पाहिजे.

दरवर्षी मी वर्ल्ड बँकेत जायचो. कारण तिथं जगातल्या प्रत्येक क्षेत्रातले अभ्यास करणारे लोक येत असतात. शेतीची असो, उद्योगाची असो, इलेक्ट्रिसिटीचे असो, पाण्याचे असो, आरोग्याचे असो किंवा कम्युनिकेशनची असो या सर्वांतील लोक त्या ठिकाणी असतात. त्यांनी काही नवीन प्रकल्प राबवले तर त्यांची माहिती माझ्याकडे घेणं आणि त्यातून काही शिकता आलं तर शिकलो. तिथेच विजय केळकर यांची ओळख झाली. विजय केळकर हे देशाचे अर्थ सचिव होते. त्यांनी मला एका कोरियन गृहस्थाची ओळख करून दिली. त्या व्यक्तीबद्दलच्या आयुष्याची उभारणी ऐकल्यानंतर त्या व्यक्तीबद्दल मला आस्था होती. त्यांना मी इथे बोलावलं आणि राहुल बजाज व टाटा यांची गाठ घालून दिली. त्यांनी या दोघांचे प्रकल्प बघितल्यानंतर सांगितलं, की हे उभारण्याची ताकद जर तुमच्या इथल्या अभियंत्यांमध्ये असेल तर हे अभियंते या देशाला जगाच्या कुठल्या टोकावर नेऊन पोचवतील त्याच्याबद्दल मला शंका नाही. अभियंतांना त्यांच्या कर्तृत्वाची आठवण करून देणं हे माझ्या दृष्टीनं अत्यंत महत्वाचे आहे. मी देसाई आणि त्यांच्या संपूर्ण टीमला धन्यवाद देतो की त्यांनी हा संघ सुरू केला. हे नुसते संघटन करून चालणार नाही. मला असं वाटतं की तुम्ही त्याच्यात काही प्रयोग करा. काही लोक असतील सिव्हिल इंजिनिअरिंगच्या साईटचे, कुणी इलेक्ट्रॉनिकच्या साईटचे असतील, कुणी मेकॅनिकलच्या साईटचे असेल किंवा आणखी काही साईटचे असतील. या सर्वांचे वेगळे वेगळे ग्रुप करून त्याच्यातून शक्यतो दर महिन्याला एक युनिट एकत्र करायची आणि आपल्या विषयात काही नवीन वाचलंय का? किंवा काही नवीन करणं शक्य आहे का? किंवा समाजाच्या समोर काही नवीन समस्या आहे का? या सर्वांवर चर्चा करावी. तुम्हाला मी सांगतो सुसंवाद हा स्वतःची उभारणी करण्यासाठी फार उपयुक्त ठरतो. तो जर तुमच्या विषयामध्ये तुमच्या क्षेत्रामध्ये तुम्ही सतत जर ठेवलात तर माझी खात्री आहे त्याचा उपयोग तुम्हाला होईल आणि समाजालासुद्धा होईल. तुम्ही तुमच्या क्षेत्रामध्ये काहीही उभं करू शकता आणि त्याचा उपयोग समाजाला होऊ शकतो. शेवटी आपण हा अभियंतांचा विभाग केला. निवडणुकीच्या वेळी मत द्यायचे कोणाला तो भाग असतोच पण त्याहीपेक्षा तुम्ही ज्या क्षेत्रात ज्ञानी आहात त्या क्षेत्रात तुम्ही काही योगदान करू शकलात तर त्याचा उपयोग प्रगतीच्या दृष्टीने एक राज्याची उभारणी करण्याचं काम तुमच्या हातून झाल्याशिवाय राहणार नाही. आयुष्यात क्रियाशीलतेत जो आनंद असतो त्याच्या व्यतिरिक्त दुसरा कोणता चांगला आनंद नसतो. तुमच्यात कर्तृत्व आहे हे मान्य करा, तुम्हाला ज्या विषयात आस्था आहे त्याचा अभ्यास करा, त्याचा जो ज्ञानी असेल त्याच्याशी सुसंवाद साधा. माझी खात्री आहे की, तुम्ही जीवनात यशस्वी झाल्याशिवाय राहणार नाही. त्याच्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला अधिक आनंद होईल. एवढेच या ठिकाणी सांगतो आणि माझे दोन शब्द संपवतो.

जी२० परिषद, एक देश-एक निवडणूक (लोकसभा व विधानसभेच्या एकत्रित निवडणुका), इंडिया विरुद्ध भारत, सनातन धर्म, अयोध्येतील राम मंदिर आणि आता महिला आरक्षण --हे सारे कार्ड खेळून झाल्यावरही भाजपला तिसऱ्यांदा जिंकण्याचा विश्वास येत नाही. जगातला सर्वात मोठा पक्ष असल्याचा दावा करणाऱ्या या पक्षाचे केंद्रीय नेते चाचपडू लागले आहेत, नव्या नव्या मुद्द्यांच्या शोधात आहेत. याचा अर्थ असा की गेल्या पाच वर्षात केलेले काम अपुरे आहे, त्यावर नरेंद्र मोदी यांना पंतप्रधानपदाची तिसरी टर्म मिळणार नाही हे कळून चुकल्यावर पोतडीतून नवे नवे पत्ते बाहेर काढले जात आहेत. जी २० परिषदेचा मोठ्या प्रमाणात गवगवा झाला. दिल्लीकरांनी दिवाळीपूर्वीच झगमगाट पाहिला. आधुनिक राजे, त्यांचे शाही स्वागत, पाहुणचार, एकमेकांवर केलेला स्तुती वर्षाव पाहिल्यावर भोळ्या -भाबड्या भारतीय जनतेला वाटले आपण खरेच विश्वगुरू झालो. ९-१० सप्टेंबरला जी.२० परिषद झाली आणि त्यानंतर आठ दिवसांनी कॅनडाचे पंतप्रधान जस्टीन त्रुडो यांनी खलिस्तानी टायगर फोर्सचा नेता व कॅनडाचा नागरिक हरदीपसिंग निज्जर याची कॅनडाच्या भूमीवर हत्या करण्याच्या वादात भारताला गोवले. ज्या अमेरिकेवर मोदी सरकारची सारी मदार आहे त्या अमेरिकेची सहानुभूती कॅनडाला आहे असे म्हटले जाते. ती असो वा नसो पण या वादात अमेरिकेची साथ भारताला मिळत नाही असे दिसते. युरोपिअन राष्ट्रे सुद्धा या प्रश्नी काहीशी तटस्थ आहेत. पाकिस्तान, चीन यानंतर कॅनडा आपला शत्रू बनेल काय? हा प्रश्न आहेच. आपल्याला शेजारच्या राष्ट्रांचा पाठिंबा मिळत असला तरी महाशक्ती तटस्थ आहेत याचा अर्थ विश्वगुरुला चांगलाच कळतो.

या प्रश्नाचे जे व्हायचे ते यथावकाश होईल पण नरेंद्र मोदी








राष्ट्रवादी स्वाभिमानी आचार! राष्ट्रवादी विचार!

# निवडणुकीच्या तोंडावर भाजपची तारांबळ, वाढत्या गटबाजीने मोदी हैराण

व्यंकटेश केसरी

हे विश्वगुरू आहेत, विश्व वंद्य आहेत हे म्हणायला भाजपला जड जात आहे आणि हे देशाला कळले आहे.

आगामी लोकसभा निवडणुकीच्या रणधुमाळीत हा प्रश्न उठणार. भारतीय सीमेवरील चीनची घुसखोरी थांबत नाही.पाकिस्तानच्या कुरापती थांबल्या असत्या तर काश्मीरच्या खोऱ्यात निवडणुका का होत नाहीत ? तेथे भाजपचे कमळ का फुलत नाही ?  जी.२० परिषदेचा डांगोरा पिटला खरा पण पदरात काय पडले ? याचा हिशोब विचारला जाईल. या परिषदेच्या निमित्ताने विश्वगुरू पत्रकार परिषद घेतील अशी काहींची अटकळ होती ती नरेंद्र मोदी यांनी खोटी ठरविली.

"एक देश-एक निवडणूक " हे धोरण मोदी सरकारला राबवायचे असेल तर मध्य प्रदेश विधानसभा निवडणुकीसाठी भाजप आपले उमेदवार निवडणुकीच्या तारखा जाहीर होण्यापूर्वी का घोषित करीत आहे ? राजस्थान, मध्य प्रदेश, छत्तीसगड या राज्यात नरेंद्र मोदी, केंद्रीय गृह मंत्री अमित शहा, भाजपचे



अध्यक्ष जे.पी.नड्डा यांच्या प्रचारसभा होऊ लागल्या आहेत. "एक देश-एक निवडणूक " घेण्याचा मोदी सरकारचा संकल्प असेल तर राजस्थान, मध्य प्रदेश, छत्तीसगड,तेलंगणा,मिझोराम या राज्यांच्या निवडणुका लोकसभा निवणुकीसोबत घ्याव्या लागतील. त्याशिवाय चार-पाच महिन्यांनी होणाऱ्या महाराष्ट्र, हरियाणाच्या निवडणुकाही सार्वत्रिक निवडणुकीबरोबर घ्याव्या लागतील. आंध्र प्रदेश, ओडिशाच्या निवडणुका लोकसभा निवडणुकी बरोबरच होत आहेत. मोदी सरकार या नऊ राज्यातील निवडणुका केंव्हाही घेऊ दे विरोधी पक्ष तयारीत आहेत. पण विधानसभा निवडणुकीचे गणित लोकसभा निवडणुकीत चालले तर त्याचा फटका नरेंद्र मोदी यांना बसेल. ती जोखीम भाजप घेईल काय ?

मध्य प्रदेश, राजस्थान, छत्तीसगड विधान सभा निवडणूक एकतर्फी होणार नाही हे भाजपला समजून चुकले आहे. वास्तविक पाहता राजस्थान, छत्तीसगड मध्ये सत्ताधारी काँग्रेसच्या विरोधात आपण सहज निवडून येऊ याची खात्री भाजपला वाटली पाहिजे पण ती वाटत नाही कारण प्रदेश भाजप मध्य अंतर्गत लाथाळ्या आहेत तर मोदी यांचे कार्ड विधानसभा निवडणुकात चालत नाही हे २०१९ नंतर सिद्ध झाले आहे. गुजरात विधानसभा निवणुकीत भाजपने पक्षातल्या जुन्यांना घरी बसविले. मुख्यमंत्री विजय रूपांनी यांना तिकीट नाकारले आणि विक्रमी बहुमताने हा पक्ष तिथे पुन्हा सत्तेवर आला. पण हे कार्ड कर्नाटकात चालले नाही. जुन्यांना, निष्ठावंतांना उमेदवारी नाकारताच बंडखोरी झाली. साक्षात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बंडखोरांना फोन करून, त्यांना राज्यसभेत पाठवण्याचे आश्वासन देऊन, त्यांना सत्तेत ॲड्जेस्ट करण्याचे अभिवचन देऊनही बंडखोर शांत झाले नाहीत.

आणि आता मध्य प्रदेश विधानसभा निवडणुकीत तीन केंद्रीय मंत्री, पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस यांना उतरविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ज्यांनी निवडणूक सांभाळायची, सूत्र संचालन -व्यवस्थापन करायचे तेच आता उमेदवार झाले आहेत. पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस कैलास विजयवर्गीय यांना त्यांच्या मुलाला उमेदवारी द्यायची होती पण आता त्यांनाच उमेदवार केले आहे. राजस्थानात सुद्धा काही केंद्रीय मंत्री, खासदार यांना निवडणूक लढण्यासाठी तयारीत राहण्याचे सांगण्यात आले आहे. म्हणजे मध्य प्रदेशाचे मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहान, राजस्थानच्या माजी मुख्यमंत्री वसुंधराराजे यांना नारळ देण्याचा तयारीत नरेंद्र मोदी-अमित शहा आहेत. केंद्रीय नेते मैदानात उतरल्याने स्थानिक नेते, महत्वाकांक्षी खट्टू होणार हे स्पष्ट आहे.त्यांची नाराजी भाजपला किती महागात पडेल ते लवकरच कळेल.



# नव्या युगातील भाजपची ओळख

**वादग्रस्त नेते– खासदार रामेशं बिधुरी व ब्रिजभूषण शरण सिंग आणि मणिपूरचे मुख्यमंत्री एन. बीरेंन सिंग हे नव्या युगातील भाजपची ओळख बनले आहेत. बिधुरी यांचा तापटपणा कधी लपला नाही. पण विरोधी पक्षाचे खासदार डॅनिश अली यांच्यावर सभागृहात त्यांनी जे तोंडसुख , पातळी सोडली त्यानंतर त्यांच्यावर कारवाई करण्यात चालढकल होत आहे. विरोधी पक्षांच्या खासदारांना तातडीने सभागृहातून निलंबित करणारे आता शांतचित्तपणे हा प्रश्न हाताळत आहेत. आणि आता याच बिधुरींवर निवडणुकीची जबाबदारी टाकून भाजप नेतृत्वाने त्यांच्यावर आपला विश्वास दाखविला आहे. कुस्तीगीर महिलांचे शोषण करण्याचा आरोप असलेले ब्रिजभूषण शरण सिंग यांना उत्तर प्रदेशातून लोकसभेचे तिकीट नाकारण्याची हिम्मत 'विश्वगुरू', 'चाणक्यात ' आहे की नाही ते येत्या काळात कळेल पण तिसऱ्यांदा पंतप्रधान व्हायचे असेल तर अशा तडजोडी होणारच. भाजप व नरेंद्र मोदी यांची अब्रू जगाच्या वेशीवर टांगणाऱ्या मणिपूरचे मुख्यमंत्री एन. बीरेंन सिंग अजूनही टिकून राहतात यात त्यांच्या ताकतीपेक्षा मोदी यांची मजबुरीच दिसून येते. हे मुख्यमंत्री महोदय सपशेल कुचकामी आहेत. यांना सर्वोच्च न्यायालयात फटकारे बसले, ते एडिटर्स गिल्ड ऑफ इंडियाला धमकावत आहेत पण त्यांना हलविण्याची बिशाद कुणात नाही. अमृतकाळात भाजपची चाल,चेहरा ,चरित्र बदलले हे च खरे !**




भाजपकडे मजबूत संघटन, उदंड साधने, यंत्रणा असली तरी या पक्षाला विजयाची खात्री नाही. या तिन्ही राज्यात काँग्रेसच्या स्थानिक आणि राष्ट्रीय नेत्यांनी प्रामाणिकपणे काम केले तर भाजपसाठी ही लढाई अवघड बनेल.

विरोधी पक्षांच्या " इंडिया " आघाडीच्या विरोधात एन.डी.ए. (राष्ट्रीय लोकशाही आघाडी) मध्ये जान आणण्याचा प्रयत्न पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी करून पाहिला पण त्यांना अजुनी यश मिळत नाही. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे),शिरोमणी अकाली दल, जनता दल हे मोठे पक्ष राष्ट्रीय लोकशाही आघाडीतुन बाहेर पडल्यानंतर आता ऑल इंडिया अण्णा द्रविड मुन्नेत्र कळघम या पक्षानेही भाजप प्रणित आघाडीतून बाहेर पडण्याची घोषणा केली आहे. म्हणजे महाराष्ट्र, पंजाब, बिहार आणि आता तामिळनाडूत भाजपला आगामी निवडणुकीत कडा संघर्ष करावा लागणार आहे. कर्नाटकात एच.डी. देवेगौडा यांच्या जनता दलाबरोबर युती करण्याच्या भाजपच्या निर्णयाने हा जगातल्या सर्वात मोठा पक्ष किती हवालदिल झाला आहे ते जगासमोर आले आहे.

तामिळनाडू भाजपचे अध्यक्ष के. अन्नामलाई हे नरेंद्र मोदी व अमित शहाचे खासमखास मानले जातात. त्यांना मुख्यमंत्री बनण्याची महत्वकांक्षा आहे. त्यांनी सी .एन. अन्नादुराई, जे जयललिता यांच्यावर टीकेची झोड उठविली ती मोदी–शहा यांच्या संमतीशिवाय अशक्य आहे. भाजपला गैर द्रविडी पक्षांचा स्पेस पाहिजे . म्हणजे काँग्रेसचा स्पेस या पक्षाला हवा आहे. भाजपच्या हिंदी, हिंदू, हिंदुत्वला तामिळी जनता कसा प्रतिसाद देते हा वेगळा मुद्दा आहे पण मोदी यांना पंतप्रधानपदाची तिसरी टर्म पाहिजे असेल हा खेळ भाजपच्या अंगलट येईल.

सनातन धर्मावरून भाजप नेत्यांनी त्यांचा घसा मोकळा केला. सनातन धर्माचे समर्थन करण्याआडून आपली हिंदू मतपेढी मजबूत करण्याची ही योजना होती पण विरोधी पक्षांनी जाती निहाय जनगणना करण्याची मागणी लावून धरल्याने भाजपचे 'सनातन' अस्त्र बोथट झाले. विरोधी पक्षांच्या 'इंडिया' आघाडीने भाजप बिथरली. म्हणजे इंडियाचा बाण वर्मी लागला. इंडिया आघाडीची चेष्टा करण्याचे भरपूर प्रयत्न झाले पण त्यातून फारसे काही निघाले नाही. 'तुमचा' इंडिया तर 'आमचा' भारत. आम्ही ओरिजिनल तर तुम्ही कलोनियल असे शब्दच्छल राजकारणात फार काळ टिकत नाहीत तेथे " बाप दाखव नाही तर श्राद्ध कर " हे च तत्व चालते. सरकारमध्ये आहेत तर जनतेचे कल्याण करा, तिचे प्रश्न सोडावा . दहा टक्के, वीस टक्के, तीस टक्के लोकांना काही सोई देऊन तुम्ही ७० टक्के लोकांना फार काळ बेवकूफ बनवू शकत नाही याची जाणीव भाजप कार्यकर्त्याला आहे पण नेते जमिनीवर यायला तयार नाहीत.

आयोध्येतल्या राम मंदिराच्या प्राण प्रतिष्ठेचा 'उदघाटनाचा जंगी सोहळा जानेवारीत करण्याची योजना आहे. यातून लोकसभा निवडणुकीपूर्वी देशात "राम लहर " निर्माण होईल व त्याचा नक्त लाभ भाजपला होईल असे हिशोब यामागे आहेत. राम नाम व आयोध्येतल्या या मंदिराचा फायदा भाजपला १९९१




पासून प्रत्येक निवडणुकीत कमी अधिक प्रमाणात मिळाला. लोकांना या मुद्द्याची मर्यादा माहित आहे. भाजपचे विरोधकही कट्टर रामभक्त आहेत. या प्रश्नांवर राजकारण करणे, मत मागणे याचा अर्थ असा की भाजपचे नाणे, मोदींचा करिष्मा चालत नाही याची कबुली दिल्या सारखे आहे. रस्त्यांचे, गावांचे, शहरांचे नामांतर करून कोणी अनंत काळ सत्तेत राहत नाही. कारण यात श्रद्धेपेक्षा सोय पाहिली जाते. सारे भाजप विरोधक हिंदू विरोधी आहेत हा भाजपचा प्रचार भम्पक आहे कारण बिहार, बंगाल, तामिळनाडू, केरळ, कर्नाटक, तेलंगणा, आंध्र प्रदेश, ओडिशा, राजस्थान, छत्तीसगड, पंजाब, हिमाचल प्रदेश आदी राज्यातल्या जनतेने भाजपला नाकारल्याने ती हिंदू विरोधी होऊ शकत नाही.

आणि गांगरलेल्या, गोंधळलेल्या भाजपने आता महिला आरक्षणाचे कार्ड खेळले आहे. याची मूळ कल्पना काँग्रेसची. शरद पवार मुख्यमंत्री असताना ती महाराष्ट्रात (लोकसभा,विधान सभा वगळता) राबविण्यात आली. डॉ.मनमोहन सिंग पंतप्रधान असताना तेंव्हाच्या सत्तारूढ युनाइटेड प्रोग्रेसिव्ह अलायन्सने राज्य सभेत यावरचे विधेयक संमत केले पण लोकसभेत भाजपने याला पाठिंबा दिला नाही. हा झाला इतिहास. पण महिला आरक्षण विधेयक आणण्यासाठी मोदी सरकारला पावणे दहा वर्षे का लागली हा मूळ प्रश्न आहे. तिसऱ्या विजयासाठी मोदी यांना हे विधेयक आणावे लागले पण याचे श्रेय एकट्या भाजपला मिळणार नाही हे निर्विवाद कारण साऱ्या पक्षांनी याला पाठिंबा दिला आहे. भाजपला भले हे हवे असले तरी जनता ते देणार नाही. मोदी अनेक वर्षे गुजरातचे मुख्यमंत्री होते तेथे त्यांनी आरक्षण का लागू केले नाही ? भाजप अनेक वर्षे मध्य प्रदेशात सत्तेत आहे तेथे महिलांना का आरक्षण मिळाले नाही ? याचे उत्तर भाजपला द्यावे लागणार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या राजवटीत मीडियाची (माध्यमांची) विश्वासार्हता संपविण्यात त्यांना यश आले, सर्वोच्च न्यायालयाच्या कॉलिजियमने उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींच्या नेमणुकीबद्दल केलेल्या शिफारसींवर सरकार महिनोन्महिने बसून आहे. याचा अर्थ न्याय व्यवस्था कमजोर करणे,तिची विश्वसार्हता घालविणे असा होतो.निवडणूक आयुक्तांच्या निवडीची प्रक्रिया पारदर्शी नाही.

## अमृतकाळात भाजपची चाल, चेहरा,चरित्र बदलले!

उत्तर प्रदेश व महाराष्ट्रात भाजपचे लोकसभा निवडणुकीचे गणित बिघडण्याच्या चर्चा राजकीय वर्तुळात झडू लागल्या आहेत. या दोन्ही राज्यात लोकसभेच्या १२८ जागा येतात. आणि यात कळीचा मुद्दा जागा वाटप व निवडणूकपूर्व युती हा राहणार आहे. उत्तर प्रदेशातील तिकीट वाटपावर आपल्या वरचष्मा राहावा यासाठी मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ स्वाभाविकपणे प्रयत्नशील राहतील. त्यांच्या माणसांना उमेदवारी मिळाली तर त्यांच्या विजयासाठी ते आपली जान लावतील पण त्यांना डावलले तर डाव उलटू शकतो. योगी

यांच्या हाती सारी सूत्रे दिली तर ते पंतप्रधानपदाचे प्रबळ दावेदार होऊ शकतात. ते संयुक्त उत्तर प्रदेशाचे आहेत, ठाकूर आहेत, गोरखपूर मधील गोरख मठाचे प्रमुख आहेत. मोदी हे वाराणशी मधून दोन वेळा निवडून आले असले तरी ते उपरेच आहेत. योगी यांनी अमित शहांची एका अर्थी उत्तर प्रदेशात एंट्रीच बंद केली आहे. भाजप समोर या राज्यात अजून तरी प्रबळ विरोधी पक्ष नसला, मायावती यांच्या बहुजन समाज पक्षाला मॅनेज करण्याचे प्रयत्न जारी असले तरी तेथे भाजप विरुद्ध भाजप असा मुकाबला होऊ शकतो. आणि महाराष्ट्रात तर सावळा गोंधळ चालू आहे. तीन पक्षांच्या सरकारला बहुमत मिळण्याची खात्री नाही कारण विरोधी पक्षांचा जनाधार तुटला नाही.

राजस्थानचे मुख्यमंत्री अशोक गेहलोत सध्या परेशान आहेत. त्याचे कारण आगामी निवडणुकीची धास्ती नाही, पक्षातली गटबाजीही नाही तर उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांचे दैनंदिन दौरे हे आहे.श्री धनखड हे राजस्थानचे त्यामुळे ते आपल्या गृहराज्यात जाणारच हे गृहीत जरी धरले असले तरी उपराष्ट्रपतींचा प्रोटोकॉल असतो आणि तो पाळावा लागतो. एकीकडे निवडणुकीची धामधूम तर दुसरीकडे उपराष्ट्रपतींचा प्रोटोकॉल, त्यात गुंतलेली सरकारी यंत्रणा. आणि तिसरीकडे पंतप्रधान, केंद्रीय मंत्र्यांचे वाढते दौरे .त्यांच्या दीमतीला हेलिकॉप्टर, गाड्या, अधिकाऱ्यांचा फौजफाटा ! या साऱ्याचा ताण प्रशासनावर बसत आहे असे गेहलोत यांनीच सांगितले. त्यांचे विधानही प्रसिद्ध झाले. श्री धनखड यांच्यापूर्वी भैरोसिंग शेखावत उपराष्ट्रपती होते. ते ही राजस्थानचे. त्या राज्याचे माजी मुखमंत्री. भाजपचे तालेवार नेते.ते नेहमी राजस्थानला येत असत. पण माझ्या दौऱ्यात प्रोटोकॉल पाळू नये, अशा सूचना त्यांनी प्रशासनाला दिल्या होत्या.

सरकार बदलले तर जुन्या संसद भवनात 'शिफ्ट' होण्याची चर्चा खासदारात सुरु झाली आहे. भाजपचे खासदार, मंत्री बोलू शकत नाहीत कारण गेल्या दहा वर्षात त्यांना मनातले बोलण्याची सवयच राहिली नाही. पण गैर भाजप खासदार म्हणतात नव्या संसद भवनात खासदारांच्या वावराला बंदिस्त केले आहे. तेथे परस्परात संवाद, चर्चा होत नाहीत. आधुनिक सोईसवलती दिल्याने, खाण्या-पिण्याच्या पदार्थांची रेलचेल केल्याने संसद भवनात जिवंतपणा येत नाही. 'सेंट्रल हॉल' हा योजना करून बंद करण्यात आला कारण सरकारला मुक्त संवादाची भीती वाटते. सत्तेच्या ब्रोकर्सना पत्रकारांचा अडसर वाटतो .म्हणून पत्रकारांच्या गॅलरीतील त्यांची उपस्थिती जाणीवपूर्वक घालविण्यात आली. "आम्ही देतो ते घ्या, फालतू प्रश्न विचारू नका . संसदेत यायची गरज नाही, नेटवर सारे मिळते, "असा तोरा सरकारचा असेल संसद व पीठासीन अधिकारी काय करणार ? पण नवीन संसद भवनाची वस्तू हे एखाद्या मल्टिप्लेक्स सारखी, मॉल सारखी आहे, त्यात जीव गुदमरतो अशा खासदारांच्या भावना आहेत.



## मणिपूर हिंसाचार : मोदी-शहा हरले

**मणिपूर मधील हिंसाचार काबूत आणण्यास आपण सपशेल कमी पडलो आहोत, हारलो आहोत याची कबुली सत्तारूढ भाजप,केंद्रीय गृहमंत्री व भाजपचे 'चाणक्य' आणि पंतप्रधान व 'विश्वगुरू'' नरेंद्र मोदी देत आहेत. या प्रश्नी विरोधी पक्षांनी मोदी सरकार विरुद्ध लोकसभेत अविश्वासाचा ठराव आणला होता. त्याला जुजबी उत्तर देण्यात आले आणि यावरील चर्चेचा सारा रोख विरोधी पक्षांना चिडविण्यावर, डिवचण्यावर, त्यांची चेष्टा करण्यावर होता. याचा जो काही मेसेज मणिपूर मधील जनतेला जायचा होता तो गेला. राज्यात व केंद्रात भाजपचे पूर्ण बहुमताचे सरकार आहे पण त्याला मणिपूरचा प्रश्न सोडविता येत नाही, सोडविण्याची इच्छा नाही आणि हिंसाचारावर नियंत्रण आणता येत नाही. नरेंद्र मोदी, अमित शहा विधानसभांच्या निवडणूक प्रचाराला लागले आहेत. त्यापूर्वी सरकारची सारी शक्ती राजधानी दिल्लीत होणाऱ्या जी २० परिषदेच्या तयारीत खर्ची पडली होती. मणिपूर हे सीमावर्ती राज्य आहे. त्यातील हिंसाचार पूर्वोत्तर राज्यात पसरू शकतो. विदेशी शक्ती याचा फायदा घेऊ शकतात. पण स्वत:ला चक्रवर्ती समजणाऱ्यांना याची फिकीर नाही, त्यांचे सारे लक्ष्य तिसऱ्यांदा पंतप्रधान होण्यावर आहे.**






# खलिस्तानचा बागूलबोवा

**निस्सिम दास**

भारत आणि कॅनडामधील संबंध बिघडले आहेत. कॅनडातील सरकार त्यांच्या भूमीवरील भारतविरोधी खलिस्तानी घटकांच्या विरोधात ठोस कारवाई करीत नसल्याची भारताची तक्रार आहे. कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन त्रुदो यांनी हे आरोप फेटाळलेले असले तरी प्रत्यक्षात त्यांच्या मंत्रिमंडळात सहभागी असलेले शीख मंत्री तसेच त्यांचे सरकार ज्या राजकीय पक्षाच्या पाठिंब्याने सत्तेत आहे त्या पक्षाची सूत्रे हाती असलेले शीख नेतृत्व ही मंडळी भारतविरोधी म्हणून प्रसिध्द आहेत. पंजाबमधील फुटीर घटकांना ते साह्य करीत असल्याच्या तक्रारी सातत्याने झालेल्या आहेत. पंजाबमध्ये १९८०च्या दशकात झालेली खलिस्तानवादी फुटीर चळवळ, तिचे हिंसक स्वरुप आणि त्या फुटीर उग्रवादी किंवा जहाल गटांना कॅनडातील धनाढ्य शीख मंडळींनी मदत केली होती ही बाब सर्वज्ञात आहे. गेल्या काही वर्षात पंजाबमध्ये पुन्हा एकदा त्या फुटीर खलिस्तानवादी चळवळीच्या पुनरुज्जीवनाच्या हालचाली सुरु झालेल्या आहेत. अर्थात जुना अनुभव असल्याने भारतीय सुरक्षा यंत्रणा पुरेशा जागरूक असल्याने खुद्द पंजाबमध्ये या हालचाली फारशा होताना दिसत नाहीत. अद्याप त्यांचे स्वरुप तुरळकच आहे. परंतु कॅनडाच्या धरतीवरुन मात्र खलिस्तानी आवाज मोठ्या प्रमाणात होऊ लागल्याने त्याची दखल घेतली जात आहे. हेही एक आश्चर्यच आहे की खुद्द भारतात व पंजाबमधील शीख समाजात तूर्तास तरी फुटीर हालचालींचे कोणतेही प्रकार आढळताना दिसत नाहीत. कॅनडात काहीतरी घडत आहे आणि त्याचा फारसा



परिणाम किंवा पडसादही पंजाबमध्ये पडत नसताना भारतातले राज्यकर्ते याचा एवढा मोठा बाऊ कशासाठी करीत आहेत हे काहीसे गूढ वाटते. कारण कॅनडात खलिस्तानवाद्यांच्या हालचाली वाढलेल्या असतील आणि त्याचे काही पडसाद भारतात पंजाबमध्ये पडलेले आढळले असते तर त्यांचा परस्परसंबंध लावणे शक्य झाले असते. तूर्तास तरी पंजाब शांत असताना दिल्लीपतींना शीख समाजाला उचकविण्याची गरज काय आहे असा प्रश्न मनाला पडल्याखेरीज रहात नाही. मात्र यासंदर्भात पध्दतशीरपणे वातावरण तापविले जात आहे. या वातावरणनिर्मितीचा म्हणजेच देशाला फुटीर चळवळींचा वाढता धोका असल्याचा कांगावा करण्याचा हा प्रकार आणि आगामी काळात येऊ घातलेल्या सार्वत्रिक किंवा लोकसभा निवडणुका यांचा काही परस्परसंबंध तर नाही ना असे मनात आल्याखेरीज रहात नाही.

गेल्या काही महिन्यांपासून किंवा गेले वर्षभर पंजाबमध्ये फुटीर खलिस्तानवादी चळवळ सुरु होत असल्याची आवई पध्दतशीरपणे उठविली जात आहे. दुबईहून अचानक भारतात अवतीर्ण झालेला एक अमृतपालसिंग नावाच तीस वर्षाचा तरुण भिंद्रनवालांच्या पावलावर पाऊल टाकून पंजाबच्या स्वायत्ततेची मागणी करु लागतो काय आणि त्याबद्दलच्या अतिरंजित बातम्या पध्दतशीरपणे पाळीव मीडिया आणि भक्तसंप्रदायाकडून पसरविल्या कशा गेल्या ही कहाणी काही महिन्यांपूर्वीच सर्वांनी ऐकली. अमृतपालसिंगने आनंदपूर खालसा फौज नावाची सशस्त्र सेना उभारली होती. पाकिस्तानी गुप्तचर संस्था आयएसआयची त्याला मदत होती वगैरे अनेक गोष्टी त्याच्याबद्दल पसरविण्यात आल्या होत्या. मार्च महिन्यात त्याने शीख समाजाच्या मागण्यांसाठी एक संमेलन बोलाविले होते. त्यापूर्वीच त्याला पकडण्यात आले. त्याच्या अटकेत मोठे नाट्यमय प्रसंग घडले. केंद्र सरकारच्या मदतीने म्हणजेच केंद्रीय पोलिस दलांच्या मदतीने पंजाब राज्य पोलिसांनी अमृतपालसिंगला अटक करण्याची मोहिम सुरु केली. प्रथम त्यांच्या साथीदारांना ताब्यात घेतले. यादरम्यान अमृतपालसिंगने अचानक पोलिसांना तुरी देऊन पलायन केले. मार्चच्या अखेरच्या आठवड्यातील ही गोष्ट. अकरा दिवस त्याने पोलिसांना हुलकावण्या दिल्या आणि अखेर बाराव्या दिवशी तो शरण आला. त्याला राष्ट्रीय सुरक्षा कायद्याखाली अटक करुन आसाममधील दिब्रूगढ तुरुंगात त्याची व त्याच्या साथीदारांची रवानगी केली. आसाममध्ये भाजपचे सरकार आहे हे येथे नमूद करावे लागेल. अमृतपालसिंग याचे एखाद्या धूमकेतूप्रमाणे पंजाबमध्ये अवतीर्ण होणे हे अनेक तज्ञांना संशयास्पद वाटले होते. त्यात त्याने भाजपशी जवळीक असलेल्या एका दीप सिध्दू या पंजाबी अभिनेता-गायक कलाकाराच्या सामाजिक संघटनेचा (वारिस पंजाब दे) चक्क कब्जा केला. दीप

सिध्दू याने शेतकरी आंदोलन बदनाम करण्याचा प्रयत्न केला होता. त्याची पार्श्वभूमि लक्षात घेता त्याने तो प्रकार कुणाच्या प्रोत्साहनाने केला असावा याची अटकळ बांधता येते. शेतकरी आंदोलन सुरु असताना लाल किल्ल्यावर अखंड फडकणाऱ्या राष्ट्रध्वजाबरोबरच खालसाचे निशाण फडकविण्याचा प्रकार त्याने केला होता. त्याबद्दल प्रचंड आरडाओरडा झाल्यानंतर त्याला पकडण्यात आले आणि त्याच्यावर खटलाही भरण्यात आला. त्याचे आणि भाजपचे संबंध उजेडात येऊ लागले. त्यानंतर अचानक दिल्ली-चंडीगढ महामार्गावर एका अपघातात त्याचा मृत्यु झाला होता. हा सर्व प्रकारच संदेहास्पद ठरला. त्याच्या मृत्युनंतर त्याने स्थापन केलेली संघटना वारिस पंजाब दे ही बेवारस झाली होती. तिचा कब्जा अमृतपालसिंगने केला. त्याच्या या कृतीबद्दल दीप सिध्दूच्या कुटुंबियांनी विरोध केला



होता परंतु त्यांचे काही चालू शकले नव्हते. हा सर्व घटनाक्रम लक्षात घेता यामुळेच अमृतपालसिंग हा कोणाचा तरी हस्तक असावा असा संशय पंजाबमधल्या तज्ञ निरीक्षकांनी व्यक्त करायला सुरुवात केली होती. त्यामुळे नंतरच्या घटना, प्रसंग व घडामोडी या पूर्वनियोजित असाव्यात काय या शंकाला जागा मिळत गेली. याचे कारण अमृतपालसिंग याने पंजाबच्या स्वायत्ततेचा मुद्दा हिरीरीने मांडण्याचे ठरवूनही त्याला अपेक्षित प्रतिसाद मिळू शकला नव्हता. त्यामुळेच खलिस्तानचे भूत पुन्हा निर्माण करण्यामागे कुणाचा किंवा कोणत्या शक्ति किंवा घटकांचा हात असावा असे प्रश्नचिन्ह सर्वच तज्ञांपुढे निर्माण झाले होते. आता बहुधा हा प्रयत्न असफल ठरल्यामुळेच की काय कॅनडातील काही घडामोडींच्या माध्यमातून खलिस्तानचे भूत बंद बाटलीतून पुन्हा बाहेर काढण्याचे प्रयत्न सुरु झाले असावेत असे दिसते. असे वाटण्याचे कारण अगदी स्पष्ट आहे की पंजाबमधील शीख समाज आता सुखशांतीने जीवन व्यतीत करीत असताना हे अचानक खलिस्तानचा बागूलबोवा निर्माण का होत आहे हा प्रश्न पडतो.

या प्रकरणात भारताने कॅनडावर अनेक गंभीर आरोप केले आहेत. कॅनडात खलिस्तान समर्थकांना खुले आम स्वातंत्र्य दिले जात आहे आणि त्यांच्या कारवायांकडे दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप भारताने केला आहे. कॅनडात शीख समाजाची लक्षणीय संख्या आहे. तेथील राजकीय पक्ष त्यांच्या ताब्यात आहे आणि तो पक्ष वर्तमान पंतप्रधान जस्टिन त्रुदो यांच्या सरकारमध्ये भागीदार आहे. कॅनडाचे संरक्षणमंत्री शीख आहेत. स्वाभाविकपणे कॅनडाच्या पंतप्रधानांनी भारतीय चिंतेची दखल घेतानाच स्वतःच्या सरकारमध्ये अस्थिरता निर्माण होणार नाही याची काळजी घेतली. या सर्व घडामोडी चालू असतानाच खलिस्तानसमर्थक शीख नेता हरदीपसिंग निज्जर याची संशयास्पद रीतीने हत्या झाली. ही हत्या कॅनडात झाली. त्या हत्येला जबाबदार हल्लेखोरांची ओळख पटू शकलेली नाही. दरम्यान भारतातील अंधभक्तांनी सोशल मीडियावरुन वर्तमान पंतप्रधानांनी, त्यांचे पोलादी गृहमंत्री आणि त्याहून महान व भारतीय जेम्स बाँड (ही पदवी अंधभक्तांनीच दिलेली आहे) म्हणून भक्तांमध्ये लोकप्रिय असलेले राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार यांनी







खलिस्तानी नेत्याला कसे कॅनडात जाऊन पाणी पाजले, वाहवा काय ते शौर्य, धैर्य, साहस वगैरे वगैरे फुशारक्या मारायला सुरुवात केली होती.

ब्रिटनमध्येही एका फुटीर शीख नेत्याचा संशयास्पद मृत्यु झाल्याचे निदर्शनाला आले परंतु तो मृत्यु हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने झाल्याचे निष्पन्न झाल्याने त्याचे श्रेय भक्तमंडळी घेऊ शकली नाहीत. परंतु निज्जरच्या हत्येचे श्रेय मात्र भक्तमंडळी फाजील उत्साहाने घेऊन लागली. दुसरीकडे अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, न्युझीलंड आणि ब्रिटन या पाच देशांनी गुप्त माहिती आदानप्रदान, समन्वय व सहकार्यासाठी स्थापन केलेल्या 'आय' (डोळा-नेत्र) समूहातर्फे अशी माहिती देण्यात आली की या हत्येमागे भारतीय यंत्रणांचा हात आहे. कॅनडाच्या पंतप्रधानांनी ही माहिती त्यांच्या देशाच्या संसदेत दिली त्यामुळे त्या माहितीचे गांभीर्य वाढले. भारताने ती बाब तत्काळ फेटाळून लावली आणि कॅनडा व त्या देशाच्या पंतप्रधानांवर टीकेचे हल्ले करण्याची मोहिम सुरु केली. यामध्ये पाळीव मीडियाने तारतम्य सोडून वाटेल तशा बातम्या देऊन स्वतःच्या चाटुकारितेचे व सुमारबुध्दी पत्रकारितेचे यथेच्छ प्रदर्शन केले. कॅनडाच्या पंतप्रधानांनी ही माहिती देताना चिंता व खेद व्यक्त केलाच आणि ही माहिती वरील राष्ट्रसमूहाच्या समन्वय, सहकार्य व गोपनीय माहितीच्या आदानप्रदान प्रक्रियेतून मिळाल्याचे सांगितले. याचाच अर्थ कॅनडाच्या पंतप्रधानांनी माहितीचा स्रोत लपवून ठेवला नाही. उलट या प्रकरणाचे धागेदोरे शोधून काढण्यासाठी भारताकडे सहकार्याची मागणीही केली.




कॅनडाचे पंतप्रधान जस्टीन त्रुदो व निज्जर




आता प्रश्न हा निर्माण होतो की कॅनडाच्या पंतप्रधानांनी केवळ त्यांना व त्यांच्या गुप्तचर यंत्रणांना मिळालेली माहिती सादर केली. ती कोठून प्राप्त झाली हेही सांगितले. असे असताना केवळ कॅनडावरच तुटून पडण्याचे कारण काय अशी रास्त शंका येते. भारताला या माहितीबद्दल केवळ कॅनडाला जबाबदार धरता येणार नाही. मुख्यतः अमेरिकेला याबद्दल जाब विचारण्याचे साहस, हिंमत, धैर्य वर्तमान सरकार किंवा राज्यकर्त्यांमध्ये आहे काय या प्रश्नाचे उत्तर शोधावे लागेल. ही माहिती अमेरिकेने कॅनडाला दिली हे सत्यही आता बाहेर आले आहे. अमेरिकेने ते नाकारलेले नाही. अमेरिकेचे कॅनडामधील राजदूत डेव्हिड एल.कोहेन यांनी प्रथम ही माहिती सार्वजनिक केली. कॅनडातील वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत कोहेन यांनी सांगितले होते की पाच देशांच्या (आय) राष्ट्रसमूहाच्या गुप्त माहिती आदानप्रदान योजनेअंतर्गत ही माहिती कॅनडाला देण्यात



आली असून ती त्यांनी त्यांच्या संसदेसमोर सादर केली आहे. कॅनडा आणि अमेरिकेदरम्यान यासंदर्भात भरपूर पत्रव्यवहार झालेला असल्याचेही त्यांनी सांगितले होते. अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री अँटनी ब्लिंकेन आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार जेक सलायव्हन यांनी देखील या माहितीचा इन्कार केलेला नाही. उलट भारत व कॅनडाने परस्पर सहकार्य करुन याची पाळेमुळे खणून काढावीत असा सल्लाही दिला आहे. तसेच हे प्रकरण गंभीर आहे आणि भारत व कॅनडा या दोन्ही देशांनी परस्पर समजुतीने व सामंजस्याने या माहितीची दखल घेऊन पावले टाकावीत आणि संबंधात दुरावा निर्माण होऊ देऊ नये असा सल्लाही दिला आहे. ५६ इंची छातीतले साहस, धैर्य, हिंमत अमेरिकेपुढे गळताना दिसत आहे. देशाचे परराष्ट्रमंत्री हे विलक्षण अमेरिकाप्रेमी आहेत. सध्या ते भारत व भारताचे नेतृत्व कसे महान आहे आणि जी-२०चे आयोजन व भारताने त्या माध्यमातून जगाला दिलेला संदेश याचा देशोदेशी हिंडून प्रचार करीत आहेत. अमेरिकेत जाऊन त्यांनी काही प्रख्यात अध्ययन संस्थांमध्ये जाऊन भाषणे केली. तेथे जेव्हा त्यांना कॅनडाने केलेल्या आरोपाबाबत विचारणा केली गेली असता त्यांची वाचा बसलीच आणि काहीतरी थातूरमातूर आणि विषयाला बगल देणारे उत्तर देऊन त्यांनी सुटका करुन घेतली. हे महाशय फजिती होताहोता वाचले असेच यासंदर्भात प्रसिध्द झालेल्या बातम्यांवरुन दिसून येते. कौन्सिल ऑन फॉरेन रिलेशन्स या नामवंत व प्रतिष्ठीत अध्ययन संस्थेतील भाषणाच्या अखेरीस झालेल्या प्रश्नोत्तरात भारतीय परराष्ट्रमंत्र्यांना या प्रकरणात भारत कॅनडाशी सहकार्य करणार आहे की नाही यासंदर्भात होय किंवा नाही या शब्दात उत्तर देण्यासाठी आग्रही प्रश्न विचारण्यात आले त्यावेळी त्यांनी गोलगोल बोलत असे म्हटले की भारतासमोर विश्वसनीय व ठोस माहिती व पुरावे सादर केल्यास भारत त्याबाबत विचार करील. मुळात कॅनडाच्या पंतप्रधानांनी त्यांच्या संसदेत ही माहिती दिलेली आहे ही बाबच गंभीर आहे. कारण संसदेच्या पटलावर देशाचा पंतप्रधान काल्पनिक माहिती सादर करील असे सहसा घडत नाही. त्यामुळेच सरसकट माहिती उडवून लावण्याऐवजी आणि अकाडतांडव करण्याऐवजी भारताने प्रथमपासून पुराव्यांची मागणी केली असता ती बाब संयुक्तिक व अधिक तर्कसंगत ठरली असती. याचे कारण जागतिक स्तरावर आतापर्यंतची भारताची प्रतिमा ही एका लोकशाही देशाची आहे आणि भारतातर्फे परकी देशाच्या आणि विशेषतः मित्रदेशांच्या भूमीवर असले काही प्रकार करण्याच्या गोष्टींची नोंद कधीही झालेली नाही. गेल्या दहा वर्षात एक मोठा लोकशाही देश म्हणून भारताच्या जागतिक स्तरावरील प्रतिमेची घसरण झालेली आढळते. विशेषतः मानवाधिकार, नागरी स्वातंत्र्ये, अभिव्यक्ती व वृत्तपत्र-माध्यम स्वातंत्र्य याबाबत भारताचे स्थान खूप खालच्या क्रमांकावर घसरलेले आहे. त्यामुळेच भारताविरुध्द अशा प्रकारचे आरोप आंतरराष्ट्रीय पातळीवर होणे ही खरोखरच चिंतेची बाब आहे आणि भारताला एकंदरीतच प्रतिमा सुधारण्यासाठी अंतर्मुख करायला लावणारी ही घटना आहे. याठिकाणी हेही लक्षात ठेवायला हवे की या माहितीबद्दल अमेरिका किंवा युरोपीय देशांनी कॅनडाला उलटा जाब विचारलेला नाही. किंबहुना या प्रकरणाच्या मुळापर्यंत जाऊन सत्य हुडकून काढण्यासाठी कॅनडाशी सहकार्य करावे असाच सल्ला अमेरिकेसह युरोपीय राष्ट्रांनी भारताला दिलेला आहे. यामुळे भारताचे परराष्ट्रमंत्री जगभरात हिंडून सध्या भारताची म्हणजेच पर्यायाने वर्तमान भारतीय नेतृत्वाची प्रतिमा उंचावण्यासाठी जी प्रचारमोहिम राबवीत आहेत ती यशस्वी होताना दिसत नाही. या आंतरराष्ट्रीय प्रतिमा घसरणीची दखल भारतीय नेतृत्वाने घेण्याची आवश्यकता आहे.

अमेरिकेतील एक प्रख्यात अभ्यासक आणि दोनवेळेस पुलित्झर पुरस्कारविजेते पत्रकार व लेखक निकोलस क्रिस्टॉफ यांनी न्यूयॉर्क टाइम्समध्ये भारत व कॅनडामध्ये सुरु झालेल्या राजनैतिक संघर्षावर टिप्पणी करताना व्यक्त केलेली निरीक्षणे महत्वपूर्ण आहेत. किंबहुना या प्रकरणाकडे पाश्चिमात्य देश कोणत्या व कशा दृष्टिकोनातून पाहतात ते त्यांच्या लेखावरुन स्पष्ट होते. ते अमेरिकेत सत्तारूढ असलेल्या डेमोक्रॅटिक पक्षाचे सदस्य आहेत. त्यांनी त्यांच्या लेखात स्पष्टपणे नमूद केले आहे

की खलिस्तानचे स्वप्न किंवा उद्दिष्ट आता फक्त काही मूठभर परदेशी शीख व्यक्तींपुरते मर्यादित राहिलेले आहे. भारतातील शीख समाजात या संकल्पनेबद्दल कोणतेही आकर्षण किंवा आपुलकी राहिलेली नाही. हरदीपसिंग निज्जर हा कोणत्याही प्रकारे भारतासाठी धोका नव्हता असे एक महत्वपूर्ण निरीक्षणही त्यांनी या लेखात नोंदविलेले आहे. ते या लेखात पुढे म्हटतात की निज्जरच्या हत्येबाबत भारत असत्य कथन करीत असल्याचे सिध्द झाल्यास भारताच्या आंतरराष्ट्रीय प्रतिमेचे आजपर्यंत न झालेले अपरिमित असे नुकसान होणार आहे. यासंदर्भात त्यांनी १९८४ मध्ये घडलेल्या एका घटनेचा हवाला दिला आहे. तैवानमध्ये तेव्हा एकतंत्री राजवट किंवा हुकुमशाही होती. त्या राज्यकर्त्यांविरुध्द अमेरिकास्थित एका तैवानी पत्रकाराने (हेन्री लिऊ) या नेत्याबद्दल टीकात्मक लिखाण केले होते. कॅलिफोर्नियात त्याची काही बंदूकधाऱ्यांनी हत्या केली. परंतु त्यानंतर तैवानच्या राज्यकर्त्यांनी त्यांच्याच लष्करी गुप्तचर प्रमुखाला त्या प्रकरणी पकडून खटला भरुन त्याला जन्मठेपेची शिक्षा दिली आणि त्यानंतर अमेरिका आणि तैवानमधील संबंध सुरळीत झाले. या घटनेचा हवाला देऊन क्रिस्टॉफ लिहितात की निज्जर प्रकरणाच्या तपासाबाबत भारताचे पंतप्रधान कोणताही पुढाकार घेण्यास तयार नसल्याचे दिसून येते. उलट या घटनेचे भांडवल करुन ते त्यांची स्वतःची प्रतिमा स्वतःच्या देशात (भारतात) उजळविण्याचे प्रयत्न करताना दिसत आहेत. हिंदू समाजाचे आपण एकटेच कसे रक्षणकर्ते आहोत अशी साहसी, धाडसी प्रतिमा रंगवून त्याचा आगामी निवडणुकांमध्ये राजकीय लाभ घेण्याचा त्यांचा प्रयत्न दिसतो.शीख फुटीरतावादी आणि मुस्लिम जिहादी यांच्यापासून आपणच हिंदूंचे कसे रक्षण करीत आहोत हे दाखविण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. या लेखात क्रिस्टॉफ यांनी भारत व पाकिस्तानची देखील तुलना केलेली आहे. परंतु या वादात तूर्तास तरी अमेरिका आणि युरोपीय राष्ट्रे टोकाची भूमिका घेताना आढळत नाहीत याचे एकमेव कारण त्यांना भारताबरोबरचे चांगले संबंध बिघडविण्याची सध्या तरी इच्छा नाही. रशियाने ब्रिटनमध्ये असाच एक हत्येचा प्रकार केल्यानंतर अमेरिकेने रशियाबरोबरच्या राजनैतिक संबंधात मोठ्या प्रमाणात कपात केली होती आणि अमेरिकेचाच कित्ता गिरवीत चौदा युरोपीय देशांनीही रशियाबरोबरचे संबंध कमी केले होते. परंतु भारताबाबत अद्याप तसे काही घडलेले नाही कारण लगेचच भारताला दुखावण्याची या देशांची इच्छा दिसत नाही. परंतु हे प्रकरण चिघळत गेल्यास या देशांना भारताबरोबरचे आणि विशेषतः वर्तमान राज्यकर्त्यांबरोबरचे संबंध कायम राखण्याबाबत भविष्यात अडचणी येऊ शकतात. अतिराष्ट्रवादी एकाधिकारशाही राज्यकर्त्यांबरोबर संबंध राखण्याबाबत कोणत्या अडचणी येऊ शकतात हे अमेरिका व युरोपीय राष्ट्रांना रशियाचे नेते व्लादीमिर पुतिन यांच्या उदाहरणावरुन चांगले समजलेले आहे. त्यामुळेच यापुढील काळात लोकशाही व्यवस्थेच्या आधारे चांगले संबंध राखण्याच्या अमेरिका व बहुसंख्य लोकशाही युरोपीय राष्ट्रांच्या परंपरेला धक्का बसणार नाही याची खबरदारी या राष्ट्रांना घ्यावी लागणार आहे.




क्रिस्टॉफ यांचा लेख किंवा लंडनच्या फिनान्शियल टाइम्समधील यासंदर्भातील लेख काही बाबतीत सोयीस्कर मौन पाळून आहेत. मात्र चीनसारख्या दादागिरी करणाऱ्या देशाच्या विरोधातील तुलनेने सौम्य असलेल्या भारताबरोबरची निकटता तुटू नये आणि चीनला आशियात मोकळे रान मिळू नये या हेतुने वर्तमान भारतीय राजवटीबद्दल पाश्चिमात्य लोकशाही देश काहीशी नमती भूमिका घेत असले तरी हे कितीकाळ चालणार याचे उत्तर त्यांना कधीतरी द्यावे लागणार आहे. दुसरी अलिखित बाब म्हणजे अमेरिका व युरोपीय राष्ट्रांचे आर्थिक व व्यापारी हितसंबंध ही आहे. वर्तमान राज्यकर्त्यांनी भारताची अर्थव्यवस्था या देशांना पूर्णपणे खुली केलेली असल्याने त्यामुळे या राष्ट्रांच्या मंदावलेल्या अर्थव्यवस्थांना जी उभारी मिळत आहे तो फायदा सोडण्यास हे देश तयार नाहीत. त्यामुळेच या सर्व प्रकारांकडे सोयीस्कर दुर्लक्ष करण्याची भूमिका ते घेत आहेत. प्रश्न हा आहे की केवळ स्वतःच्या संकुचित आर्थिक फायद्यासाठी ही तथाकथित लोकशाहीप्रेमी पाश्चिमात्य राष्ट्रे किती काळ धृतराष्ट्र होऊन आंधळे राहणार ? डोळे उघडण्यासाठी कुरुक्षेत्र घडण्याची वाट हे धृतराष्ट्र पाहणार काय हा प्रश्नही गैरलागू ठरणार नाही.

आंतरराष्ट्रीय पातळीवर हे एक नवे आव्हान भारतापुढे उभे ठाकलेले आहे. यातून भारताची सहीसलामत सुटका होवो अशीच प्रार्थना एक सच्चा भारतीय या नात्याने करायची झाली तरी वास्तवाकडे पाठ फिरवून चालणार नाही. आक्रमक बहुसंख्यकवादाचा पुरस्कार करताना अल्पसंख्यक समाजाला दुय्यम स्थानावर ढकलण्याची प्रवृत्ती देशहित, देशाची एकता, अखंडता आणि सामाजिक सलोखा, सद्भाव व स्थिरतेला घातक आहे. सामाजिक शांतता, राजकीय समतोल व संतुलन हाच आर्थिक प्रगती व विकासाचा खरा मार्ग आहे. तो सोडल्यास सार्वत्रिक गोंधळ, अनागोंदी, अस्थिरतेला ते निमंत्रण ठरते. याची जाणीव ठेवण्याची गरज व वेळ आहे.

पत्रकार : संसदेच्या विशेष अधिवेशनात ज्या पद्धतीनं तुम्ही भाषण केलं, खरं तर अजितदादांबद्दल तुम्ही जे भाषण केलं, वक्तव्य केलं, अर्थात ते सिंचन घोटाळा असेल, बँक घोटाळा प्रकरण असेल, तुम्ही चौकशीचीही मागणी केली आहे. ताई, तुम्हाला असं का वाटलं, की याच अधिवेशनात दादांच्याबद्दल चौकशीची मागणी करावी.

सुप्रिया सुळे : एक तर वैयक्तिक मी कोणाबद्दलच बोललेले नाही. दुसरं, भारतीय जनता पक्ष सातत्यानं भ्रष्टाचाराबद्दल विरोधी पक्ष आणि आमच्यावर पर्सनल ॲटॅक सातत्यानं भारतीय जनता पक्ष करत राहिलाय. मला भारतीय जनता पक्षाला दोन-तीन महत्त्वाचे प्रश्न विचारायचे आहेत. एक म्हणजे, भारतीय जनता पक्ष सातत्यानं सगळ्यांच्यावरच, जे विरोधात असतात, त्यांच्यावर आरोप करत असतात. आरोप केल्यानंतर जर त्यांच्याकडे प्रवेश झाला, तर मग ते आरोप गायब होतात. जर विरोधात राहिला तर आरोपांत सातत्य असतं. त्याच्यामुळं मला विचारायचंय, की ते आरोप खरे असतात, का लोकांना घाबरवण्यासाठी असतात. म्हणजे जर त्यांच्याकडे गेला, तर तो आरोप गायब होतो. म्हणजे आरोप केलेला खोटा असतो का? जर खोटा असेल तर भारतीय जनता पक्षाने माफी मागितली पाहिजे, की हो आम्ही खोटे आरोप केले. आणि जर आरोप खरे असले तर भारतीय जनता पक्षाने कबुल करायला पाहिजे, की आम्ही भ्रष्टाचाराच्या विरोधात नाही आहोत. आम्ही भ्रष्टाचाराला इनकरेज करतो. ही दुटप्पी भूमिका सातत्यानं भ्रष्टाचाराबद्दल जी भारतीय जनता पक्ष करते,

## भाजपने माफी मागितली पाहिजे

# राष्ट्रवादीची स्थापना कोणी केली हे सगळ्यांना माहिती आहे

**सुप्रिया सुळे**

संसदेचे विशेष अधिवेशन संपल्यानंतर २२ सप्टेंबर रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे पुण्यात दाखल झाल्या. त्यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधत विविध विषयांवर आपली भूमिका स्पष्ट केली.



त्याचा मी जाहीर निषेध करते हा पहिला मुद्दा.

दुसरा मुद्दा, की जेव्हा विरोधात असतात, ज्या पद्धतीनं सगळ्या एजन्सींचा वापर भारतीय जनता पक्ष करतो. माझ्या स्वत:च्या बहिणींवरती झालेला अन्याय मी सांगते. माझ्या तीन बहिणींवर या भारतीय जनता पक्षानी रेड केली. कशासाठी रेड केली? काही माझ्या बहिणींची चूक नव्हती. फक्त आम्ही त्यांच्याविरोधात बोलतो. काय माझ्या बहिणींचा संबंध? माझ्या बहिणींवरती काय गरज होती, कधी त्यांचा विचार केलांय? माझ्या बहिणी म्हणून मी प्रोटेक्ट करत नाहीये त्यांना. अशा हजारो महिला आणि कुटुंबं असतील, ज्यांच्यावरती रेड टाकतात. त्या घरातल्या लेकी, सुना, मुलं कशातून जातात याचा विचार कधी केलांय? अनिल देशमुखांची फॅमिली असेल, संजय राऊतांची फॅमिली असेल. नवाबभाईंची फॅमिली असेल. माझ्याच बहिणी असतील. कधी त्यांच्या कुटुंबाचा, नातवंडांचा, सुना, लेकी यांचा कधी विचार केलांय? आणि मग त्यातले कोणीही म्हणजे माझ्या कुटुंबाचा अनुभव मी जवळून पाहिलांय, की ज्या अडचणीतून, दु:खातून आमची सगळी कुटुंबं गेलीत. पण, जेव्हा ते त्यांच्या बाजूला असतात, तेव्हा मग ती केस, मग आम्ही त्याच्यातून आधी गेलो त्याचं उत्तर कोण देणार? मग त्या खोट्या रेड जर आमच्यावर तेव्हा केल्या, त्यासाठी जाहीरपणे भारतीय जनता पक्षाने माफी मागितली पाहिजे. आणि या एजन्सींचा जो खेळखंडोबा लावलांय, तो थांबला पाहिजे.

पत्रकार : ताई तुम्ही जी मागणी केली चौकशीची अजितदादांची, ती होईल असं तुम्हाला वाटतं का?

सुप्रिया सुळे : मी अजितदादांच्या चौकशीची मागणी केलेली नाही.

पत्रकार : ताई तुम्ही त्या भाषणात असं म्हटलंय, की मोदी साहेबांनी जे आरोप केले आहेत, ते समोर येऊन म्हणजे ते अजितदादांच्यावरच होते बऱ्यापैकी. सिंचन घोटाळा असेल किंवा किंबहुना राज्य सहकारी बँकेबाबत असेल. चौकशीसुद्धा त्यांचीच सुरु आहे मग.

सुप्रिया सुळे : मी वैयक्तिक कुणाचंही नाव घेतलेलं नाही. मी फक्त आदरणीय, माननीय भारतीय जनता पक्षाचे जे लीड स्पिकर होते, त्यांनी आमच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप केले. त्या रेफरन्सनी मी फक्त माननीय, आदरणीय प्रधानमंत्र्यांना विनंती केली, की तुमच्या लीड स्पिकरनी आमच्यावर जे आरोप केले, त्या आरोपांचं उत्तर द्यावं. त्याच्यामुळं माननीय प्रधानमंत्र्यांचं जे स्टेटमेंट होतं, त्याच्यावर फक्त मी विशेष टिप्पणी मागितली. कारण, भारतीय जनता पक्षानी माझ्यावर आणि आमच्या सगळ्यांवर, इनक्लुडिंग काँग्रेस, यांच्यावर परवा आरोप केले होते.

पत्रकार : ताई आता तुम्ही खुलून बोलायला लागला आहात. असा भाऊ कुणाला मिळू नये असंदेखील तुम्ही म्हणालात. अशी भावना अचानक तुम्हाला का वाटली?



सुप्रिया सुळे : असं मी म्हटलेलं नाही. माननीय अमित शाहजी असं म्हणाले, की महिलांच्यासाठी महिलांनी का बोलावं. एखाद्या पुरूषानी त्यांच्याकडून लीड केलं तर त्याच्यात गैर काय. याचं उत्तर देताना मी प्रश्न विचारला अमित शाहांना, की अनेक भाऊ असेही देशामध्ये, कुटुंबामध्ये, समाजामध्ये आपल्याला दिसतात, जे प्रत्येक बहिणीला न्याय देतात का? असं नाही. मग आरक्षण बिल आणलंच कशाला? आदरणीय पवार साहेबांनी तीस वर्षांपूर्वी महिला आरक्षण आणि महिला सबलीकरणासाठी बिल आणलं. त्याच्यामध्ये प्रत्येक बहिणीला, मुलीला जेवढं भावाला मिळेल वडिलांच्या हक्कामध्ये, तेवढंच मुलीलाही न्याय मिळाला पाहिजे असं त्यांनी तीस वर्षापूर्वी एक बिल आणलं. आता ते बिल का आणावं लागलं? कारण का तर कदाचित त्यांना, समाजात डेटा असं सांगतो, की जेवढं मुलाला मिळालं, तेवढं मुलीलाही मिळालंच पाहिजे. त्याच्यामुळं त्याची अंमलबजावणी व्हावी. प्रत्येकवेळेसच मी बोलते ते वैयक्तिक माणसासाठी का असावं? आणि ते मलाच लागू असावं असं का व्हावं? माझं म्हणणं आहे, की जेव्हा मी धोरणात्मक गोष्टी बोलते, त्या एका व्यक्तीसाठी करत नाही. देशासाठी करतो. त्याच्यामुळे थोडी बडी सोच रखीये.



पत्रकार : ताई, अलिकडं आपण बघतोय, अजित पवार गटाकडून पण थेट बोललं जातंय आणि आता शरद पवार गटाकडून. तुम्ही सुद्धा आता थेट ॲटॅकिंग मोडमध्ये दिसतांय.

सुप्रिया सुळे : नाही, नाही. मी ॲटॅकिंग मोडवर नाहीये. जेव्हा भारतीय जनता पक्ष डायरेक्टरी आमच्यावर ॲटॅक करतं, त्याचं फक्त अतिशय प्रांजळपणे मी प्रश्नाद्वारे त्यांना उत्तर देते. मी कधीही आजपर्यंत राजकारणात कुणावरही आरोप केलेले नाहीत आणि ते आमचं राजकारण नाही. आमचं डेव्हलपमेंट ओरिएंटेड राजकारण आहे. इथे तुमच्या सगळ्यांच्या आयुष्यात एक चांगला बदल घडवण्यासाठी मी राजकारणात आलेय. कोणाचं कुटुंब उद्ध्वस्त करण्यासाठी मी राजकारणात आलेली नाही.

पत्रकार : ताई, सध्या शरद पवार गटाकडं सात खासदार आहेत. मात्र, त्यातील एक खासदार सध्या अजित पवार गटाकडं जाण्याची शक्यता आहे अशी चर्चा सुरू आहे. याच्यात कितपत तथ्य वाटतं तुम्हाला?

सुप्रिया सुळे : मला असं वाटतं, की तुम्ही ट्विटर पाहात नाहीये. ज्याच्याबद्दल तुम्हाला चिंता वाटतेय, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जे खासदार आहेत, त्यांची आजची ट्विटर अकाऊंट चेक करा.

पत्रकार : आता न्यायालयात लढा सुरू आहे. राष्ट्रवादीचं चिन्ह आणि नाव हे दोन्ही. कितपत विश्वास वाटतो, की ही लढाई कशा पद्धतीनं होईल आणि तुमच्या बाजूनं हे सगळं राहील असं वाटतं?

सुप्रिया सुळे : एक तर लढाई आम्ही सुरू केलेली नाही. आमच्या मनातदेखील लढाई करायची इच्छा नव्हती. कारण, आम्ही राजकारणात फक्त मायबाप जनतेची सेवा करण्यासाठी आलेलो आहोत. पॉलिसी मेकिंगसाठी आलेलो आहे. आम्ही काय कुणाचा हक्क लढायसाठी आलेलो नाही. वकिलांचा आमचा संबंध काय? आम्ही सेवक आहोत. आम्ही कशाला वकिलांकडं जाऊ? पण आमच्यावर हल्ला झाल्यामुळे आता आमच्याकडं काय दुसरा मार्गच उरलेला नाही. दुसरा मुद्दा म्हणजे, माननीय, आदरणीय प्रफुल्लभाई पटेल परवा असं म्हणाले, की ३० सप्टेंबर पक्ष आणि चिन्ह हे त्यांना मिळणार आहे. तुमच्याच चॅनेलवर मी पाहिलेलं आहे. त्याच्यामुळं नक्की काय चाललंय? कुणावर विश्वास ठेवायचा? हा एक मनात प्रश्न सगळ्यांच्याच यायला लागलांय. त्याच्यामुळं आता काळच ठरवेल. पण आम्ही ही लढाई सुरू केलेली नाही. ही लढाई तिकडून सुरू केलेली आहे. कारण का, तर आम्ही कोणालाच तशी नोटीस पाठवलेली नाही. आमच्यावरच इलेक्शन कमिशनमधून नोटीस आलीय.

पत्रकार : तुम्हाला वाटतं का, की चिन्ह आणि नाव तुमच्याकडं राहील. म्हणजे शरद पवार साहेबांकडं राहील.

सुप्रिया सुळे : सत्यमेव जयते! या देशामध्ये काश्मिर टू कन्याकुमारी, सगळ्यांना माहिती आहे, की राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना कोणी केली आणि त्याचा विश्वासक असणारा चेहरा हा कोण आहे.

## सुप्रिया सुळे यांनी बारामती येथे पत्रकारांशी साधलेला संवाद...




# भाजपच्या विरोधात बोलले की ते कटकारस्थान करतात

**सुप्रिया सुळे यांचा आरोप**

केंद्र सरकार किंवा भाजपच्या विरोधात काही बोलले, की ते काहीतरी कटकारस्थान करतातच. सत्तेचा गैरवापर कसा करायचा असतो आणि दडपशाही कशी वाढवायची याचे आणखी एक जीवंत उदाहरण म्हणजे एका चॅनेलवर बंदी आणणे हे आहे. एका चॅनेलवर ७२ तास बंदी आणण्याच्या प्रकाराला न्यायालयाच्या हस्तक्षेपामुळे चाप बसला आहे.

पत्रकार : बारामतीत सुनेत्रा पवार तुमच्याविरूद्ध खासदारकीची निवडणूक लढविणार अशी चर्चा सुरू आहे.

सुप्रिया सुळे : आमच्याकडून तरी लोकशाही आहे. आता दिल्लीत काय दडपशाही चालते हे संपूर्ण देश पाहतो. मला असं वाटतं, की कुणीतरी माझ्याविरोधात लढणारच आहे. आपण सर्वांनीच या गोष्टीचा मानसन्मान करायला हवा. तीनवेळा भाजप माझ्याविरोधात लढला आहे. याही वेळेस कुणीतरी लढणारच. लोकशाहीचे मी मनापासून स्वागत करते. ही लोकशाही जगली, टिकली पाहिजे. त्यामुळे सर्वांनीच अशा निर्णयाचे पूर्ण ताकदीने स्वागत करायला हवे.

पत्रकार : संसदेच्या विशेष अधिवेशनाबद्दल काय सांगाल.

सुप्रिया सुळे : मराठा, धनगर, लिंगायत व मुस्लिम समाजाच्या अनेक वर्षांच्या मागण्या आहेत. पाच दिवसांच्या संसद अधिवेशनात किमान एक दिवस या आरक्षणाच्या मुद्यावर चर्चा ठेवायला हवी होती. महागाई, बेरोजगारी यावर चर्चा झाली नाही. पाच दिवसांचे अधिवेशन चारच दिवसांत गुंडाळले, ही बाब दुर्दैवी आहे. स्वार्थासाठी जुमलेबाजी केली गेली. लोकांच्या पदरात या अधिवेशनातून काही पडलेले नाही. दुष्काळ, बेरोजगारी आणि महागाई यामध्ये बारामती लोकसभा मतदारसंघासह राज्यासमोर विविध आव्हाने आहेत. काश्मिर, मणिपूरच्या प्रश्नाबाबत गंभीर स्थिती आहे.






२२ सप्टेंबरला झालेल्या अतिवृष्टीमुळे नागपूरला आलेला पूर




मोठी आव्हाने असताना भाजप जी कटकारस्थाने करतो त्याचे मला काहीही आश्चर्य वाटत नाही.

पत्रकार : नागपूरमध्ये उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची गाडी नागरिकांनी अडवली होती. त्याबद्दल...

सुप्रिया सुळे : आता सर्वांनीच नागपूरकरांच्या मदतीला धावून जायला हवे. एक मात्र नक्की, की भाजपचे नेतृत्व पक्ष फोडणे, घर फोडणे, एजन्सींचा वापर यात इतके मग्न असतात, की त्यांना विकासासाठी वेळच नाही. फडणवीसांची गाडी अडवणे योग्य नाही. ते उपमुख्यमंत्री आहेत. त्यांचा मानसन्मान व्हायला हवा. मात्र, देवेंद्रजींनी पक्ष फोडण्याऐवजी विकासाकडे लक्ष दिले असते तर कदाचित नागपूरकरांवर हा दिवस आला नसता.

पत्रकार : संसदेच्या नव्या वास्तूबद्दल काय सांगाल.

सुप्रिया सुळे : या देशाचा सगळा इतिहास संसदेच्या जुन्या वास्तूत आहे. त्या भिंती बोलक्या आहेत. पंडित जवाहरलाल नेहरू. डॉ. बाबासाहेब आंबेडकर असतील, अशा अनेक थोर व्यक्तींची परंपरा आहे. १५ ऑगस्टचे पंडित नेहरूंचे भाषण आजही सर्वांच्या लक्षात आहे. स्वातंत्र्याचा सर्व लढा या वास्तूने पाहिलेला आहे. त्यामुळे माझ्या दृष्टिने त्या वास्तूशी माझं भावनिक नातं आहे. या वास्तूत आम्ही अनेक दिग्गजांकडून काहीतरी शिकलो आहे.

Nanded City, Pune

The Maximum City

Sinhagad Road, Pune

A 700 Acre Mega Township on Sinhagad Road, Pune.

# प्रत्येक घराला एक मन असतं.
# प्रत्येक शहराला एक व्यक्तिमत्व असतं.

आमच्या प्रत्येक घराचं मन आहे उत्साही, चैतन्यशील, आशावादी, जगण्याच्या ऊर्जेने पुरेपूर भरलेलं, आणि आमच्या शहराचं व्यक्तिमत्व आहे अभिरूचिसंपन्न, सुसंस्कृत, सर्वसमावेशक, निसर्गप्रेमी आणि भविष्यसन्मुख. कारण आम्ही आहोत नांदेड सिटी, ७०० एकर्सचं अतुलनीय जग, जिथे आहे संपूर्ण कुटुंबाच्या आणि कुटुंबातल्या प्रत्येकाच्या सुखाचा, सुरक्षिततेचा, आरोग्याचा आणि आनंदाचा सखोल विचार.

## आनंदी संकुल



**कुटुंबासाठी प्रफुल्लित, प्रदूषणमुक्त पर्यावरण**

- इको पार्क व ऑक्सिझोन
- १३,२०० पेक्षा जास्त झाडांची लागवड
- १२० एकर्सची हिरवाई

## CBSE व ICSE शाळा



**विद्यार्थ्यांसाठी प्रगतीशील वातावरण**

- CBSE व ICSE बोर्डाच्या शाळा
- दर्जेदार शिक्षण
- वॉक-टू-स्कूल मॉडेल

## जिमखाना



**तरूणाईसाठी अगदी आदर्श सिटी**

- सायकलिंग व जॉगिंग ट्रॅक्स
- २४,००० स्क्वे. फूट जिम्नॅशियम
- क्रीडांगण-द स्पोर्टस् कॉम्प्लेस (प्रस्तावित)
- विविध खेळांच्या स्पर्धा व कोचिंग

**नांदेड सिटी, उत्साही मन आणि उमदं व्यक्तिमत्व यांचा देखणा मिलाफ!**

A project by MAGARPATTA CITY®

The pride of Pune

Call: 020-67275300 / 1 / 2

CREDAI PUNE METRO

www.nandedcitypune.com

info@nandedcitypune.com

An ISO 9001:2008, ISO 14001:2004, OHSAS 18001:2007 certified company.

tempestadvertising.com

# अझरबैजान व आर्मेनियातील एक दिवसीय युद्ध

जतिन देसाई

आपल्या देशाच्या जवळ असलेल्या काही राष्ट्रात घडत असलेल्या घटनांबद्दल आपल्या येथे फारशी चर्चा होत नाही आणि त्याबद्दल क्वचितच लिहिलं जातं. सोव्हिएत रशियाचे विघटन झाल्यानंतर काही स्वतंत्र राष्ट्र अस्तित्वात आली. मध्य आशियातील या देशात खनिज आणि गॅसचा प्रचंड साठा आहे. आपल्याकडे त्यातल्यात्यात चर्चा होते ती रशिया, युक्रेन, उझबेकिस्तान, ताजिकिस्तान इत्यादीची. अझरबैजान किंवा आर्मेनियाची फारशी चर्चा होत नाही. सोव्हिएत रशियाच्या विभाजनानंतर अझरबैजान आणि आर्मेनियात दोन युद्ध झाली. त्यांच्या सरहद्दीवर सतत तणाव असतो. दोन्ही युद्धानंतर युद्धविराम जाहीर करण्यात आले तरीही हिंसक घटना काही थांबल्या नव्हत्या.

१९ सप्टेंबरला अझरबैजान यांनी वादग्रस्त नागोर्नो–काराबाख नावाच्या 'फुटीर' राष्ट्रावर कब्जा मिळवला. नागोर्नो–कारबाखच्या








चारही बाजू अझरबैजान आहे. आंतरराष्ट्रीय समुदायाने नागोर्नो–कारबाख अझरबैजानचा भाग असल्याचे आधीच मान्य केले आहे. या वादग्रस्त भागातील आर्मेनियन लोकांना मात्र ते मान्य नव्हतं. आतापर्यंत या भागावर

फुटीरतावाद्यांचे नियंत्रण होते आणि त्यांना अझरबैजानात सामील होणं मान्य नव्हतं. अझरबैजानचे जवळपास ९७ टक्के लोक मुस्लिम आहेत आणि त्यात शिया बहुसंख्य. मुस्लिम राष्ट्रात ते सर्वात अधिक धर्मनिरपेक्ष असल्याचं म्हटलं जात. दुसरीकडे आर्मेनियन प्रामुख्याने ख्रिस्ती.

एका दिवसाच्या युद्धानंतर दुसऱ्याच दिवशी म्हणजे २० सप्टेंबरला रशियाने अझरबैजान आणि आर्मेनियात युद्धविराम घडवून आणला. त्यात नागोर्नो-काराबाखच्या फुटीरतावादी आर्मेनियन गटाने शरणागती पत्करली. या युद्धविराममुळे मोठ्या प्रमाणात लोक मारली गेली नाही. ड्रोन व बॉम्ब हल्ल्यात तरीही जवळपास २०० लोक मृत्युमुखी पडले. आर्मेनियन लष्कराने पण अझरबैजानच्या विरोधात शस्त्र उचलली नाही. आर्मेनियाने अलीकडे आयोजित केलेल्या लष्करी कवायतीत अमेरिकेच्या काही जवानांनी सहभाग घेतला होता. भारत व इतर काही राष्ट्रांकडून शस्त्र खरेदी करण्याचा आर्मेनियाचा विचार होता. रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिनच्या विरोधात अटक वॉरंट काढणाऱ्या इंटरनॅशनल क्रिमिनल कोर्ट (आयसीसी) मध्ये सामील होण्याचा आर्मेनियाचा प्रयत्न होता. खरं तर, आर्मेनियाचे रशियाशी जवळचे संबंध होते. पण अलीकडे त्यांचे संबंध पूर्वीसारखे राहिले नाहीत.



सोवियत रशिया अस्तित्वात असताना अश्या प्रकारचे मुद्दे नव्हते. सोव्हिएत रशियाच्या विघटनानंतर किंवा विघटनाच्या प्रक्रियेच्या काळात असे मुद्दे पुढे आले. नागोर्नो-काराबाखच्या लोकांनी अझरबैजानपासून वेगळे होण्यासाठी जनमत घेतलेला. तेव्हापासून नागोर्नो-काराबाखवर आर्मेनियाच्या पाठिंब्याने आर्मेनियन फुटीरतावाद्यांचे आतापर्यंत नियंत्रण होतं. आता तर एका दिवसातच अझरबैजानने नागोर्नो-काराबाखवर कब्जा मिळवला. १९९० पासून अझरबैजान जे करू शकलं नव्हतं ते यावेळी एकाच दिवसात त्यांनी करून दाखवलं. याला बदललेली जागतिक परिस्थिती हे महत्त्वाचे कारण आहे. गेल्या वर्षी २४ फेब्रुवारीला रशियाने युक्रेनवर आक्रमण केलं. तेव्हापासून सुरू झालेलं युद्ध अद्याप सुरू आहे. रशिया त्या युद्धात बरंच अडकल आहे. आर्मेनियन आमच्या हृदयाच्या जवळ आहे, असं अनेक रशियन नेते म्हणतात. पण युक्रेन युद्धात व्यस्त असलेल्या रशियानी यावेळी फुटीरतावादी आर्मेनियन लोकांना फार मदत केली नाही ही वस्तुस्थिती आहे. दुसरीकडे, तुर्कस्तानची सर्व प्रकारची अझरबैजानला मदत होती. अमेरिकेचेही या भागात बारीक लक्ष असतं. अलीकडे आर्मेनियानी अमेरिका सोबत संबंध सुधारण्याचे विशेष प्रयत्न केले आहेत.


२५ सप्टेंबरला तुर्कस्तानचे राष्ट्राध्यक्ष एर्डोगन अझरबैजानला गेले आणि तिथल्या अध्यक्ष इलहाम अलीयेव यांना भेटले. त्यानंतर त्या दोघांनी संयुक्त पत्रकार-परिषद घेतली. आर्मेनियातून अझरबैजान आणि तुर्कस्तानला जोडणारा कॉरिडोर बनविण्याची शक्यता अलीयेव यांनी त्यात व्यक्त केली. अश्या कॉरिडोरला साहजिकच आर्मेनियाचा विरोध आहे. पण ज्या स्वरूपाने अलीयेव यांनी हा मुद्दा मांडला त्यावरून पुढच्या काळात आर्मेनियावर अझरबैजान हल्ला करण्याची शक्यता नाकारता येत नाही. अझरबैजानच्या पाठीशी तुर्कस्तान आहे. तर नागोर्नो-काराबाखवर अझरबैजानने विजय मिळवल्यानंतर लगेच अझरबैजानच्या एका स्वायत्त विभागात एर्डोगन गेले, हे नक्कीच आश्चर्यकारक आहे. पण

अझरबैजान आणि तुर्कस्तान एकमेकांच्या किती जवळ आहे हे देखील त्यातून स्पष्ट होतं. रशियाकडून आर्मेनियाला मदतीची किंवा हस्तक्षेपाची अपेक्षा होती. मात्र रशियाने त्या दृष्टीने काही केलं नाही. रशिया आणि पाश्चात्य राष्ट्र प्रेस नोट काढण्यापुरते सक्रिय होते, असं म्हटलं तर ते चुकीचे ठरणार नाही. अशा भू-राजकीय परिस्थितीचा अझरबैजानने व्यवस्थित उपयोग केला.

नागोर्नो-काराबाखमध्ये १,२०,००० हून अधिक मूळ वांशिक आर्मेनियन होते. त्यातले बहुसंख्य आर्मेनियाला आले आहेत. आर्मेनियानी त्यांचं स्वागत केलं. दुसरीकडे, आर्मेनियाच्या पंतप्रधानांच्या विरोधात रस्त्यावर उतरून लोकांनी आपल्या संतप्त भावना व्यक्त केल्या आहेत. अझरबैजानला थांबविण्यात मिळालेल्या अपयशा बद्दल त्यांच्या राजीनाम्याची देखील मागणी करण्यात येत आहे. अझरबैजान सरकारनी आर्मेनियन लोकांनी नागोर्नो-कारावाख येथेच राहावं, असं म्हटले आहे. त्यांना समान अधिकार देण्यात येईल, असेही सरकारच्या वतीने सांगण्यात आलं. पण आर्मेनियन जनतेचा त्यावर विश्वास नाही. नागोर्नो-काराबाख येथील बहुसंख्य आर्मेनियन आर्मेनियाला पोहचले आहेत. हा प्रवास त्यांच्यासाठी सोपा नव्हता. सर्व सोडून दुसरीकडे निर्वासित म्हणून जाणं नेहमीच कठीण असतं. वाटेत त्यांच्या मदतीला रशियन जवान आहेत. २५ सप्टेंबरच्या रात्री आर्मेनियाकडे निघालेले अनेक लोक इंधन भरत असताना त्या ठिकाणी झालेल्या स्फोटात अंदाजे १५० जण मारले गेले. नोगोर्नो-काराबाखच्या फुटीरतावादी सरकारचे माजी प्रमुख रूबेन वर्दान्यान यांची अझरबैजान सरकारने धरपकड केली आहे. नोव्हेंबर २०२२ ते फेब्रुवारी पर्यंत फुटीरतावादी सरकारचे ते प्रमुख होते. आर्मेनियाला पळून जात असताना रूबेन यांना पकडण्यात आलं.


अलीकडचा इतिहास पाहिला तर या वादाची सुरुवात १९८८ मध्ये झाली, असं आपल्या लक्षात येईल. नागोर्नो-काराबाख येथील वांशिक आर्मेनियन लोकांनी त्यांच्या परिसराचा समावेश सोव्हिएत अझरबैजानमधून काढून सोव्हिएत आर्मेनियात करावा, अशी मागणी केली होती. सोव्हिएत रशियाच्या विघटनानंतर १९९० च्या दशकाच्या सुरुवातीस या वादाला युद्धाचे स्वरूप मिळाले. नागोर्नो-काराबाख आणि अझरबैजान मध्ये झालेल्या युद्धात काही हजार लोक मारली गेली. नागोर्नो-काराबागच्या आर्मेनियन लोकांना आर्मेनियाची मदत होती, तर अझरबैजानला तुर्कस्तानची. या युद्धात नागोर्नो-काराबाख आणि आर्मेनियाचा विजय झाला. साहजिकच या वादग्रस्त प्रदेशावर वांशिक आर्मेनियन लोकांनी कब्जा मिळवला. मे १९९४ मध्ये रशियाने अझरबैजान आणि आर्मेनियात कीर्गीस्तानची राजधानी बिशकेक येथे शांतता करार घडवून आणला. तेव्हापासून बहुतेक काळ नागोर्नो-काराबाख येथे फुटीरतावादी गट सरकार चालवायचं आणि त्यांना आर्मेनियाची मदत मिळत असे.

नागोर्नो-काराबाख वरून दुसरे युद्ध २०२० मध्ये झालं. त्यातही मोठ्या संख्येत लोक मारली गेली. मात्र या युद्धात अझरबैजानने मोठं यश मिळवलं. नागोर्नो-काराबाखच्या आसपासच्या संपूर्ण प्रदेशावर आणि नोगोर्नो-काराबाखच्या जवळपास ३३ % विस्तारावर अझरबैजानने कब्जा मिळवला.



सप्टेंबर महिन्याच्या शेवटी सुरू झालेले हे युद्ध १० नोव्हेंबर पर्यंत सुरू होत. रशियानी ९ नोव्हेंबरला दोघांमध्ये शांतता करार घडवून आणला.

लचिन कॉरिडोर हा एक मात्र रस्ता नोगोर्नो-कारबाखला बाहेरच्या जगाशी जोडणारा आहे. नोगोर्नो-काराबाखला या रस्त्याहून आर्मेनियाची राजधानी येरेवान येथून औषध, जीवनावश्यक वस्तू, इंधन इत्यादीचा पुरवठा होत असे. येरेवानते नोगोर्नो-काराबाखचे महत्त्वाचे शहर स्टेपनकर्ट यायला अंदाजे पाच तास लागतात. गेल्या वर्षी डिसेंबर महिन्यात अझरबैजानने हा रस्ता बंद केला. त्यामुळे नोगोर्नो-काराबाखच्या लोकांच जगणं कठीण झालं. जीवनावश्यक वस्तूंचा तुटवडा निर्माण झाला. महागाई प्रचंड वाढली. आंतरराष्ट्रीय समुदायाने अझरबैजानच्या या कारवाईचा निषेध केला. त्यानंतर एप्रिल महिन्यात अझरबैजाननी चेक पॉइंट उभं केलं. पण या रस्त्यावरुन येणाऱ्या जाणाऱ्या प्रत्येक वाहनांवर आणि काय वस्तू येत आहे त्यावर अझरबैजान लक्ष ठेवतं असे. जून महिन्यात आर्मेनियन लष्करासोबत झालेल्या झटापटी नंतर अझरबैजाननी रस्ता संपूर्ण बंद केला. त्यामुळे नोगोर्नो-कारबाख मध्ये वस्तूंची प्रचंड टंचाई निर्माण झाली. २०२० च्या शांतता करारात म्हटलं होतं की आर्मेनिया आणि नोगोर्नो-काराबाखमध्ये जीवनावश्यक वस्तूंचा व्यवस्थित पुरवठा व्हावा यासाठी या कॉरिडॉरमधून ट्रक येत-जात राहतील आणि रशिया त्याची काळजी घेईल. मात्र रशिया त्यात अपयशी ठरलं. संपूर्ण मध्य आशियात रशिया, तुर्कस्तान आणि अमेरिका व त्याच्या मित्रराष्ट्रांची भूमिका अतिशय महत्त्वाची असते. अझरबैजानच्या संस्कृतीशी आपली जवळीक असल्याचे तुर्कस्तानचे म्हणणे आहे. अझरबैजानचा विजय म्हणजे तुर्कस्तानचा, एका अर्थाने, विजय असं म्हटलं तर ते चुकीचं ठरणार नाही. तुर्कस्तानने अझरबैजानला ड्रोन व इतर शस्त्रे दिली होती. अझरबैजान आणि आर्मेनियात झालेल्या दोन्ही युद्धात तुर्कस्तानने मोठ्या प्रमाणात अझरबैजानला शस्त्रांची मदत केली होती. रशिया सहाजिकच मध्य आशियात सर्वात महत्त्वाचा आहे. रशिया आणि आर्मेनिया कलेक्टिव्ह सिक्युरिटी ट्रिटी ऑर्गनायझेशनचे सभासद आहेत. उभय देशाचे जवळचे संबंध राहिले आहेत. मात्र अलीकडच्या काळात त्यात थोडी कटूता निर्माण झाली आहे. निकोल पाशिन्यान आर्मेनियाचे पंतप्रधान झाल्यापासून दोन्ही देशाचे संबंध पूर्वीसारखे राहिले नाही. २०१८ मध्ये तेव्हाच्या सरकारच्या विरोधात निकोल यांनी प्रचंड निदर्शने केली होती. निकोल यांनी म्हटलं आहे की रशियाने संकटाच्या या कठीण काळात अधिक मदत केली नाही. सिक्युरिटी ट्रिटीत यापुढे राहायचं की नाही त्याचा आम्हाला विचार करावा लागेल. दुसरीकडे, अझरबैजान याने नोगोर्नो-कारबाखवर मिळवलेल्या विजयाबद्दल आर्मेनियाच जबाबदार आहे, असं रशियाने निकोल यांना उत्तर देताना म्हटलं आहे. रशिया सोबत मिळून काम करण्याऐवजी अमेरिका व त्याच्या मित्र देशाच्या जवळ जाण्याची आर्मेनियाची भूमिका अयोग्य असल्याचं रशियाने म्हटलं आहे.



थोडक्यात, मध्य आशियात अझरबैजान एक शक्तिशाली राष्ट्र म्हणून पुढे आला आहे. अझरबैजाननंतर तुर्कस्तान इतरही काही राष्ट्रात आपला प्रभाव वाढवणार. आंतरराष्ट्रीय समुदायाने तर आधीपासूनच नागोर्नो-काराबाख हा अझरबैजानचा भाग असल्याचं म्हटले आहे आणि आता तो खऱ्या अर्थानं अझरबैजानचा भाग झाला आहे.

## 'समाजस्वास्थ्य'कार

# रघुनाथ धोंडो कर्वे



**समाजस्वास्थ्यकार रघुनाथ धोंडो कर्वे यांचा जन्म १४ जानेवारी १८८२ रोजी झाला. त्यांनी अखेरचा श्वास मुंबईत १४ ऑक्टोबर १९५३ रोजी घेतला. ७१ वर्षांचे समृद्ध आयुष्य ते जगले. यावर्षी त्यांची ७०वी पुण्यतिथी आहे. या निमित्ताने त्यांचे हे कृतज्ञ स्मरण.**

**- प्रा. डॉ. गणेश राऊत**

'समाजस्वास्थ्यकार र. धों. कर्वे या चरित्र ग्रंथाचे लेखक ज. शं. आपटे या संदर्भात चरित्राच्या मलपृष्ठावर लिहितात – "प्रा. र. धों. कर्वे यांनी समाजाच्या शारीरिक व मानसिक आरोग्याच्या चर्चा करून त्यावर उपाययोजना करणे, हे उद्दिष्ट ठेवून सुरू केलेले 'समाजस्वास्थ्य' हे मासिक जवळपास पाच शतक एकाकीपणे चालविले. संततीनियमन व लैंगिक शिक्षणाचे आद्य प्रणेते असलेले प्रा. र. धों. कर्वे हे कर्ते सुधारक होते. स्वतःचा सर्व वेळ, पैसा, श्रम आणि कुटुंबस्वास्थ्य पणाला लावून समाजस्वास्थ्य सुधारण्यासाठी ते कार्यरत राहिले. स्वतःचे वर्णन 'आगरकरांच्या बुद्धीप्रामाण्यवादाचा एकमेव वारस' असे करणारे, भारताच्या लोकसंख्यावाढीच्या प्रश्नाचे गांभीर्य सर्वात आधी ओळखणारे प्रा. र. धों. कर्वे शेवटपर्यंत प्रवाहाविरुद्ध पोहत राहिले."



'रघुनाथरावांचा जन्म मकर संक्रांतीच्या दिवशी मुरुड (तालुका दापोली) येथे झाला. रघुनाथरावांचे वडील म्हणजे आधुनिक भारताच्या शिल्पकारांपैकी एक महर्षी धोंडो केशव उर्फ अण्णासाहेब कर्वे. अण्णासाहेब आणि राधाबाई यांचे रघुनाथराव हे थोरले अपत्य होत. रघुनाथरावांचे बालपण मुंबईत अतिशय कडक शिस्तीत गेले. वयाच्या नवव्या वर्षी रघुनाथरावांच्या मातोश्रींचे निधन झाले. मुंबईत कर्वे कुटुंबियांसमवेत त्यांच्या मित्रांची कुटुंबे रहायला आली. या एकत्र कुटुंब पद्धतीत १५ माणसे झाली. यात घरातील मुलांना शिस्त लावण्याचे काम नरहर बाळकृष्ण जोशी यांच्याकडे होते. नरहरपंत निर्दयी होते. धोंडोपंत दिवसभर कामात, आई घरातल्यांच्या स्वयंपाकात, यामुळे रघुनाथरावांना नरहररावांचा जाच सहन करावा लागला.

'अण्णासाहेबांनी रघुनाथरावांना शाळेत टाकण्याऐवजी घरीच शिकवले. पुढे दीड वर्षे मुरुडजवळील बुरुंडी गावी मुख्याध्यापक बाळकृष्ण वामन आचवल यांच्याकडे रघुनाथरावांची शिक्षणासाठी रवानगी झाली. वर्ष-दीड वर्षाने रघुनाथरावांना मुंबईत परत बोलावून घेण्यात आले. रघुनाथरावांची मुंज साधेपणाने करून, उर्वरित पैसे मुरुड गावी शिक्षणप्रसारासाठी देणगी म्हणून पाठवण्यात आले. सौ. राधाबाईंच्या मृत्यूनंतर सुद्धा अण्णासाहेबांनी राधाबाईंच्या स्मरणार्थ पाचशे रुपये मुरुड फंडास पाठवले. या निधीतून इंग्रजी शिक्षण व स्त्रीशिक्षणास मदत करण्यात आली. पुढे गोपाळ कृष्ण गोखले यांच्या बोलावण्यावरून कर्वे पुण्याला फर्गसन महाविद्यालयात गणित शिकवण्यासाठी दाखल झाले. यामुळे ते कायमचे पुणेकर झाले. पुण्यात न्यू इंग्लिश स्कूलमध्ये रघुनाथरावांचे शिक्षण सुरू झाले.

'११ मार्च १८९३ रोजी अण्णासाहेब कर्वे यांनी गोदूबाई यांच्याशी विवाह केला. दोघांचाही पुनर्विवाह होता. अण्णांच्या विवाहाच्या निमंत्रण पत्रिकेवर समाजसुधारकाग्रणी आगरकरांची सही होती. यामुळे अण्णांना मुरुड गावी वाळीत टाकण्यात आले. रघुनाथराव आयुष्यात ही वादळे बघतच मोठे झाले. अशा सगळ्या प्रतिकूल वातावरणावर मात करून १८९९ मध्ये मॅट्रिक्युलेशन परीक्षेत रघुनाथराव पहिले आले. पुढे ते उच्च शिक्षणासाठी फर्गसनमध्ये दाखल झाले. फर्गसनमध्ये कर्व्यांचे सहाअध्यायी वि. दा. सावरकर होते.

'फर्गसनमध्ये रघुनाथरावांना टेनिस, फुटबॉल, बुद्धिबळ, नाटक यांची जी गोडी लागली, ती आयुष्यभर कायम राहिली. उच्चशिक्षण, विलायती शिक्षण या गोष्टींकडे वळण्याच्या मार्गावर असताना रघुनाथराव १९०६ मध्ये मुंबई सेकंडरी ट्रेनिंग कॉलेजात शिकण्यास गेले. पुढे मुंबई हीच त्यांची कर्मभूमी ठरली. ट्रेनिंग कॉलेजच्या परीक्षेत रघुनाथराव दुसऱ्या वर्गात उत्तीर्ण झाले. त्यांना डिप्लोमा मिळाला. शिक्षण संपताच ते मुंबईच्या 'एलफिन्स्टन स्कूल'मध्ये शिक्षक म्हणून रुजू झाले. पुढे त्यांची बदली सोलापूरला झाली. पुढे ते एलफिन्स्टन कॉलेजमध्ये गणिताचे सहाय्यक प्राध्यापक झाले. प्राध्यापक असताना त्यांनी मुंबई शिक्षक संघटना आयोजित 'निबंध लिहिणे व पाठ घेऊन दाखविणे' स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवला. पुढे त्यांनी फ्रेंच भाषेचा कसून अभ्यास केला. याच काळात ते गणितात एम. ए. झाले.

'१९११ मध्ये गंगू गोडे यांच्याशी रघुनाथरावांचा प्रेमविवाह झाला. पुढे तिचे नाव मालतीबाई ठेवण्यात आले. रघुनाथरावांच्या लग्नाच्या भोजनपंक्तीत प्रख्यात गायक खाँसाहेब अब्दुल करीम खाँ होते. लग्नानंतर पती-पत्नींनी स्वतःला मूल होऊ न देण्याचा निश्चय केला आणि आयुष्यभर तो पाळला. पुढे कर्नाटक कॉलेजमध्ये गणित शिकवत असताना ते दीड वर्षांची रजा घेऊन उच्च शिक्षणासाठी पॅरिसला गेले. उच्च शिक्षणासाठी पॅरिसला गेल्यावर त्यांच्या जागेवर दुसऱ्याच एका व्यक्तीची नेमणूक करण्यात आली. त्या व्यक्तीची शैक्षणिक पात्रतासुद्धा

कमी होती. कर्वे पॅरिसहून परत आल्यावर त्यांनी स्वाभिमान जपण्यासाठी पदाचा राजीनामा दिला.

'राजीनामा दिल्यावर फ्रान्समध्ये केलेला अभ्यास त्यांचा उपयोगी आला. ते फ्रेंच आणि गणित विषयांच्या शिकवण्या घेऊ लागले. फ्रान्समध्ये केलेला संततीनियमानाचा अभ्यास मुंबईत उपयोगी पडला. त्यांनी पत्नीला आपल्या कार्यात सहभागी करून घेतले. तिला शिकविले आणि दोघेही गरजूंना संततीनियमनाची साधने विकणे, प्रशिक्षण देणे इत्यादी कामे करू लागले. या कामात फायदा नव्हता, तर ते कर्वे यांचे उदरनिर्वाहाचे साधन त्यांना अजरामर करणार होते. संततीनियमन क्षेत्रात कार्य करावे असे आशिया खंडात कोणाच्याही ध्यानीमनी नसताना कर्वे त्यात उतरले, हेच त्यांचे वेगळेपण होय.

'कर्वे यांच्यापूर्वी अमेरिकेत मार्गारेट सँगर यांनी १६ ऑक्टोबर १९१६ रोजी अशा प्रकारचे कार्य सुरू केले. यासाठी त्यांनी 'बर्थ कंट्रोल' हा शब्द वापरला होता. कर्वे यांनी याच कामासाठी 'संततीनियमन' असा शब्द वापरला. इंग्लंडमध्ये मेरी स्टीप्स यांनी १९२१ मध्ये असेच केंद्र सुरू केले. त्याही पूर्वी थिऑसफीच्या प्रमुख ॲनी बेझंट आणि ब्रॅड लॉ यांनी 'The Fruits of Philosophy' ही पुस्तिका (मुख्य विषय Birth Control) छापली. याबद्दल एक १८७७ मध्ये त्यांच्यावर खटला भरवण्यात आला. न्यायमूर्ती रानडे यांनी १८६२ मध्ये ज्ञानप्रसारक सभेत प्रजावृद्धी व त्याच्यापासून होणारे परिणाम या विषयावर एक निबंध वाचला होता. त्यात न्यायमूर्ती म्हणतात - " आणि जोपर्यंत प्रजावृद्धीचा बांधा व क्रम बेतावर ठेवला नाही, तोपर्यंत जी वृद्धी होते त्यास अन्न अन्न करत भीक मागणे हे दिलेले आहे आणि यास्तव थोर जाहल्याविना लग्न न करण्याचा व जवळ बायकामुले पोसण्याचे सामर्थ्य असल्याशिवाय कुटुंबवत्सल न होण्याचा असे दोन निर्बंध अवश्य ठेवले पाहिजेत." समाजसुधारक आगरकर यांनी सुद्धा पुढे याच विषयावर अधिक जहाल विचार व्यक्त केले होते. महाराष्ट्रातील या सगळ्या पूर्वसुरींचे मोठेपण मान्य करूनही त्यांची एक मर्यादा होती. ते या विषयातील पहिले कृतीशील विचारवंत म्हणजे र. धों. कर्वे होत.



'१९२२ पासून रघुनाथराव विल्सन कॉलेजमध्ये गणिताचे अर्धवेळ प्राध्यापक झाले. त्यांना २०० रुपये पगार ठरला. उरलेल्या वेळेत ते संततीनियमनाचे कार्य करू लागले. महाविद्यालयाचे व्यवस्थापन ख्रिस्ती मिशनरी लोकांकडे होते. याच काळात त्यांनी संततीनियमन या विषयावर इंग्रजीत पुस्तक लिहिले. पुस्तक फारसे खपले नाही. साधने विक्रीच्या व्यवसायात फारसा नफा झाला नाही. १९२३ मध्ये मराठीत पुस्तक प्रसिद्ध झाले. टाइम्स ऑफ इंडियाने या पुस्तकाची जाहिरात छापण्यास नकार दिला. १९२४ मध्ये कर्वे पूर्णवेळ प्राध्यापक झाले.

'याच दरम्यान त्यांनी 'किर्लोस्कर खबर' या किर्लोस्करवाडीच्या मुखपत्रात संततीनियमनाविषयी लेख लिहिला. औंध संस्थांनचे दिवाण जेकब बापूजी यांनी हा लेख आणि कर्वे यांच्या कार्याबद्दल कॉलेजकडे तक्रार केली. कर्वे संस्थाचालकांना म्हणाले, 'गणित शिकवायला हवी तितकी माणसे मिळतील. पण या विषयासाठी दुसरा माणूस मिळणार नाही.' संस्थेने त्यांना सहा महिन्यांचा पगार आणि नारळ दिला. ही गोष्ट रघुनाथरावांचे बंधू डॉ. शंकरराव यांना कळाली. त्यांनी रघुनाथरावांस दक्षिण आफ्रिकेत बोलावून घेतले. याच काळात त्यांनी संततीनियमन शस्त्रक्रिया करवून घेतली. मुंबईत कोणीच डॉक्टर या कामासाठी तयार नव्हते. आफ्रिकेत असताना त्यांनी 'डेमोक्रॅट' या वृत्तपत्रात भारतीयांची बाजू घेणारे कडक अग्रलेख दोन महिने लिहिले. या वृत्तपत्राचे मालक-संपादक श्री. आचार्य दोन महिने कामासाठी अन्यत्र गेले असता, त्यांनी ही अग्रलेख लिहिण्याची जबाबदारी कर्वेंवर विनावेतन सोपविली होती. पत्नीच्या निमंत्रणावरून ते भारतात परतले आणि मोत्यांचा व्यापार करणाऱ्या एका खाजगी कंपनीत नोकरीला लागले. या नोकरीत असतानाच त्यांनी समाजस्वास्थ्य मासिक सुरू केले. १५ जुलै १९२७ रोजी सबकुछ कर्वे (संपादक, प्रकाशक, चालक-मालक, लेखक, मुद्रितशोधक इ.) या पद्धतीने मासिक सुरू झाले. या अंकाचा हेतू - "व्यक्तींच्या व समाजाच्या शारीरिक व मानसिक आरोग्याची व त्यासंबंधी उपायांची चर्चा करणे हा या मासिकाचा उद्देश आहे. विशेषतः ज्या विषयासंबंधी लेख छापण्यास इतर पत्रकार लाजतात किंवा भितात असे विषय कितीही महत्त्वाचे असले तरी त्यासंबंधी माहिती मिळवण्यास सामान्य वाचकांस अतिशय अडचण पडते व ही अडचण दूर करण्याचा आमचा विचार आहे. यात केवळ तत्त्वज्ञानाचा खलच न करता व्यवहारोपयोगी माहितीही दिली जाईल. 'कामशास्त्र' या शब्दाचा दुरूपयोग झालेला आहे. तरीही 'कामवासनेचा शास्त्रीय दृष्टीने विचार' अशा अर्थाने हा शब्द वापरणे आम्हास भाग पडत आहे. याबद्दल कोणासही क्षुब्ध होण्याचे कारण नाही."

'पहिल्या अंकात 'विनय म्हणजे काय?' लोकसंख्येची वाढ, संततीनियमन, ब्रह्मचर्य, मांसाहार, गर्भपात या विषयावर

माहिती व मते दिली होती. पहिल्या वर्षी मासिक वर्षभर नियमितपणे निघाले. ते अर्थातच तोट्यात चालले. वर्षअखेर २०० वर्गणीदार मिळाले. 'हेही नसे थोडके' अशीच कर्वे यांची वृत्ती होती. त्याकाळी पहिल्या वर्षअखेरी ५६५ रुपयांचा तोटा झाला. या काळातील रघुनाथरावांच्या कामाचे वर्णन त्यांचे बंधू भास्करराव कर्वे पुढीलप्रमाणे करतात - "तो सदा आपल्या कामात गर्क असे. राइट एजन्सीचे, 'समाजस्वास्थ्य मासिकाचे व पुस्तकाचे एकूण एक सर्व काम स्वतःच करी. त्याने १५-२० पुस्तके लिहून स्वतःच प्रसिद्ध केली. पत्रव्यवहार, लेख वगैरे सर्व इंग्रजी-मराठी टाइपरायटरवर स्वतःच टाइप करी. त्यात कच्चे-पक्के नसे. टाइपरायटरवर कागद चढला की काम सुरू, घरातल्या धुणीभांडी, झाडलोटीखेरीज इतर कुठल्याच कामाला नोकर नसे. पुस्तकांची पार्सले बांधून त्यावर पत्त्यांच्या चिठ्ठया चिकटवणे व पोस्टात नेऊन देणे हे सर्व काम अप्पा स्वतःच करी. दुसऱ्या कोणाची मदत होण्यासारखीच नव्हती. कारण त्याच्याइतका काटेकोर व्यवस्थितपणा दुसऱ्या कोणाला जमण्यासारखा नव्हता. जरा इकडचे तिकडे, वेडेवाकडे झालेले त्याला खपत नसे."




'१९३३ पासून समाजस्वास्थ्य गुजराती भाषेत छापले जाऊ लागले. छपाईची सुरुवात ४००० प्रतींपासून झाली. या आवृत्तीचे प्रकाशक व मुद्रक काशीनाथ नारायण निमकर होते. पुढे या आवृत्तीवर खटला भरवण्यात आला. तेव्हा समाजस्वास्थ्यच्या बाजूने डॉ. बाबासाहेब आंबेडकर वकील म्हणून उभे राहिले. रघुनाथरावांच्या वादपटुत्वाबद्दल शकुंतला परांजपे लिहितात - रूढी, पुराणमतवाद, धर्माच्या कल्पना वगैरे सर्व काही बुद्धिप्रामाण्याच्या निकषावर घासून पाहण्याचा त्याचा परिपाठ. गणिती पद्धती, अचूक, शुद्ध व मोजके लेखन, विनोद आणि उपहास ही त्याची हत्यारे, धर्मभोळेपणा, रूढी, गतानुगतिक विचार व आचार यावर त्याने केलेली खोचक टीका लोकांना असह्य होई. अनेक जण त्याच्यावर तुटून पडत; पण लेखन-युद्ध करावे रघुनाथनेच. शत्रूवर मात करण्यात त्याचा हातखंडा. आपली बाजू मांडण्याकरता रघुनाथने भावनांना कधीही पाचारण केले नाही. त्याची वादविवादाची पद्धत जितकी मुद्देसूद, तितकाच त्याचा हल्ला अचूक असे. कोठेही अर्धवटपणा नव्हता. कोणाचीही गय त्याने केली नाही. एक घाव व दोन तुकडे करण्याची त्याची हातोटी विलक्षण होती. सदोदित धक्के देणाऱ्या त्याच्या पुरोगामी विचारांमुळे त्याच्यावर सतत निंदेची आणि टीकेची झोड उठे; परंतु निंदेची त्याला पर्वा नव्हती आणि कठोर बुद्धिवादाने टीकेचा परामर्श घेण्यास तो सर्वस्वी समर्थ होता. लेखणीची धार इतकी तीक्ष्ण होती की, स्वतःला सुधारक म्हणविणाऱ्या वृत्तपत्रांनादेखील त्याचे लिखाण प्रसिद्ध करण्याची छाती होत नसे."

'असा जीवन प्रवास चालू असतानाच १९४४ मध्ये मालतीबाईंचे निधन झाले. त्याचा मोठा परिणाम रघुनाथरावांवर झाला. बुद्धीप्रामाण्यवादी असणाऱ्या रघुनाथरावांनी हा धक्का पचविला आणि त्यांनी स्वतःला कार्यात गुंतवून घेतले. भारत स्वतंत्र झाल्यावर सरकारने ११ एप्रिल १९५१ रोजी लोकसंख्या वाढ व कुटुंब नियोजनासंबंधी अहवाल तयार करण्यासाठी एक उपसमिती नेमली. यातून लोकसंख्या धोरण आणि लोकसंख्या संशोधन यावर लक्ष केंद्रित करण्याचे ठरले. संततीनियमनाची योग्य साधने शोधून ती देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचविणे हे कार्यक्रमाचे उद्दिष्ट होते. रघुनाथरावांच्या कामाचा हा सगळ्यात मोठा विजय होता.

'२० जुलै १९५२ रोजी मुंबई काँग्रेसचे बडे पुढारी स. का. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली एक कार्यक्रम होऊन कर्वे यांचा सत्कार करण्यात आला. त्यांना ५६०० रूपयांची थैली अर्पण करण्यात आली. याप्रसंगी रघुनाथरावांचे वडील महर्षी अण्णासाहेब कर्वे आवर्जून उपस्थित होते. महर्षी म्हणाले, "समाजाला अप्रिय वाटणारे प्रश्न मी हाताळले व ते सोडवण्याचा प्रयत्न केला. त्यात मला यशही लाभले. परंतु माझ्या चिरंजीवांने हाती घेतलेला प्रश्न अप्रिय तर होताच, पण प्रक्षोभकही होता. समाजाचा रोष ओढवून घेण्याचे कार्य त्याला करावयाचे होते. तेव्हा याबाबतीत त्यांनी आपल्या पित्याचाही पराभव केला आहे. मला ही घटना अभिमानास्पद वाटते."

'१४ जानेवारी १९५२ रोजी रघुनाथरावांचा आणखी एक सत्कार समारंभ झाला. त्याच्या अध्यक्षस्थानी मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती मोहंमद करीम छगला होते. पुढे १० ऑक्टोबर १९५३ रोजी एका सभेत भाषण करत असताना रघुनाथरावांना त्रास होऊ लागला. १४ ऑक्टोबर १९५३ रोजी त्यांचे निधन झाले.

# काँग्रेसमधील एक निर्णायक दुवा बद्रुद्दिन तय्यबजी

(१० ऑक्टोबर १८४४ – १९ सप्टेंबर १९०६)

बद्रुद्दिन तय्यबजी यांचा जन्म १० ऑक्टोंबर १८४४ रोजी झाला. भारतातील सेवा करून १९ सप्टेंबर १९०६ रोजी त्यांनी लंडन मुक्कामी अखेरचा श्वास घेतला. बद्रुद्दिन यांचे वडील तय्यबजी उर्फ तायब अली हे मोठे सुधारणावादी गृहस्थ होते. बद्रुद्दिन यांच्या आईचे नाव अमीना होते. २९ मे १८५३ रोजी ते या काळात युरोपात लिव्हरपूल येथे होते. अशा प्रकारे युरोपला भेट देणाऱ्या खूप कमी लोकांत त्यांचा समावेश होतो. त्यांनी आपल्या सहा मुलांना परदेशात पाठविले होते. आपल्या कन्येला त्यांनी पवित्र धर्मग्रंथ, विविध भाषा शिक्षण (हिंदुस्थानी, परीक्षण, गुजराथी) आणि गृहविज्ञान यांचे प्रशिक्षण दिले होते. तैय्यबजींच्या मृत्यूनंतर टाईम्स ऑफ इंडियाने त्यांच्या कार्याची दखल घेऊन एक मृत्यूलेख लिहिला होता. 'त्यांची कीर्ती दिगंत राहील' असा आशावाद त्या मृत्युलेखात करण्यात आला होता. ते निधर्मवादी भूमिका घेणारे व गोवा पद्धती विरुद्ध प्रचार करणारे पहिले समाजसुधारक होते. बद्रुद्दिन यांच्या अंगचे गुण आणि बंधू कमरूद्दिनचा पाठिंबा यामुळे बद्रुद्दिन तय्यबची पुढे गेले. १८५८ मध्ये कमरूद्दिन हे इंग्लंडहून भारतात परतलेले पहिले इंडियन सॉलीसीटर होते. ते जवळपास साडेसात वर्षे इंग्लंडमध्ये राहायला होते. बद्रुद्दिन यांनी सुद्धा इंग्लंडमध्ये नाव कमावले. प्रतिष्ठेचे 'परफेक्ट फ्रेंच' हे प्रशस्तीपत्र त्यांनी अवघ्या बारा महिन्यात मिळवले. अभिजात गोष्टी आणि गणितातही त्यांना खूप रस होता. लॅटिन, फ्रेंच, इंग्लिश उत्स्फूर्त वक्तृत्व स्पर्धेत प्रथम पारितोषक मिळवले.

इंग्लंडमध्ये मॅट्रिक्युलेशनची परीक्षा उत्तीर्ण केल्यावर बद्रुद्दिन यांना डोळ्यांच्या तक्रारीमुळे भारतात परत यावे लागले. इंग्लंडमध्ये त्यांनी लखनौमधील एका शिक्षकाकडून उर्दूचे शिक्षण घेतले. फ्रेंच, उर्दू, इंग्लिश, अरेबिक, पर्शियन, गुजराती आणि


बदरुद्दीन तैयबजी और उनका परिवार १९०२ या १९०६ में हाइड पार्क में। उनके बगल में उनके बेटे फैज़ के ससुर कैमरुद्दीन बैठे हैं। बीच में बदरुद्दीन का बेटा और नज्म के चाचा फैज़ खड़े हैं।






मराठी एवढ्या भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते. बद्रुद्दिन आयुष्यात एकदा शिकले की कधीही विसरत नसत. भारतात परतल्यावर एक वर्षातच त्यांचे मोती या कन्येशी लग्न झाले. लग्नानंतर तिचे नाव 'राहत – उन – नफस' ठेवण्यात आले. १८६७ मध्ये बद्रुद्दिन बॅरिस्टर झाले. मुंबईमधील ते पहिले बॅरिस्टर होत. व्यवसायात त्यांची खूपच भरभराट झाली. १८९५ मध्ये त्यांनी न्यायाधीश पद स्वीकारले. १९०२ मध्ये ते मुख्य न्यायाधीश झाले. मुंबई हायकोर्टात अशी भूमिका बजावणारे ते पहिले न्यायाधीश होते. त्यांचे धैर्य, नि:पक्षपातीपणा यामुळे त्यांची कारकीर्द गाजली. लोकमान्य टिळकांविरुद्धच्या एका खटल्यात त्यांचा सहभाग होता. न्यायालयात भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची निंदा करण्यास त्यांनी बज्जाव केला होता. लोकमान्य टिळकांना तीन न्यायाधीशांनी जामीन नामंजूर केला असता बद्रुद्दीन यांनी तो मंजूर केला होता. पुढे ते भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनाचे अध्यक्ष झाले. त्यांच्या मते हा सन्मान न्यायाधीशपदा पेक्षा मोठा होता. मुंबईच्या सार्वजनिक जीवनात फिरोजशहा मेहता, तेलंग आणि बद्रुद्दिन तय्यबजी हे तिघे 'थ्री स्टार' किंवा त्रिमूर्ती म्हणून ओळखले जायचे. १८८२ मध्ये ते मुंबई विधिमंडळाचे मुंबई लेजिस्लेटीव्ह काऊन्सिलचे सदस्य झाले. चारच वर्षांनी म्हणजे १८८६ मध्ये त्यांनी प्रकृतीच्या कारणास्तव पदाचा राजीनामा दिला. बॉम्बे प्रेसिडेन्सी असोसिएशनच्या स्थापनेस त्यांनी हातभार लावला. काँग्रेसच्या मुंबईतील पहिल्या अधिवेशनास बद्रुद्दिन आणि कमरूद्दिन हे दोघे बंधू उपस्थित राहू इच्छित होते परंतु पहिल्या दोन्ही अधिवेशनाला ते नव्हते. तिसऱ्या १८८७ मद्रास येथील अधिवेशनात ते अध्यक्ष म्हणून निवडले गेले. या अधिवेशनात इल्बर्ट बिल, लॉर्ड रिपनचे प्रशासन यावरील त्यांचे भाषण संतुलित, तर्कशुद्ध मुद्देसूद होते. न्यायाधीश रसेल यांनी एवढी रसाळ इंग्लिश भाषा मी प्रथमच ऐकली असे उद्गार या भाषणानंतर काढले. मुस्लिमांचा विकास व्हावा म्हणून त्यांनी १८७६ मध्ये कमरूद्दिन यांच्या सहकार्याने 'अंजुमन–ई–इस्लाम' संस्था स्थापन केली. त्यांनी पडदा पद्धतीस विरोध केला. त्यांच्या घरात पडदा पद्धत पाळत नव्हते. त्यांनी स्वतःच्या मुलींना परदेशात शिकायला पाठविले. संमतीवय बिलाचे त्यांनी समर्थन केले होते. १८७८ चा दुष्काळ व १८९८ प्लेगची साथ या काळात त्यांनी लोकांना खूप मदत केली. या सर्व कारणामुळेच महात्मा गांधीजींनी त्यांचे वर्णन 'काँग्रेसच्या सर्व सभांमधील एक महत्त्वाचा निर्णायक दुवा' असे केले.

बद्रुद्दिन तय्यबजी यांच्या बद्दल गांधीजी असे लिहितात की 'त्यांची तुलना नेहमी मोठमोठ्या इंग्रज बॅरिस्टर बरोबर केली जाई. त्यांनी अनेक खटले जिंकले तेव्हा त्यांना प्रसिद्ध बॅरिस्टरशी सामना करावा लागला. आपले ओघवते वक्तृत्व आणि कायद्याची समज यामुळे न्यायाधीश तय्यबजीवर खुश असत. त्यांचा सगळ्यात गाजलेला खटला म्हणजे नबाबजादा नसरुल्ला खान यांचा बचाव होय. सुरतचे जिल्हाधिकारी श्री. लेली यांनी नबाबजादा यांनी आपल्याला दहा हजार रुपयांची लाच देऊ केली होती, असा त्यांच्यावर आरोप ठेवला होता. या खटल्यात मुंबईचे चीफ प्रेसिडेन्सी मॅजेस्टेट श्री स्लेटर यांनी नवाबजादा यांना सहा महिन्यांची कठोर शिक्षा सुनावली. या सुनावणीच्या अपीलात बद्रुद्दिन यांनी कायदेविषयक मुद्दे चांगले मांडून खटला जिंकला. न्यायाधीश पार्सल यांनी खालच्या कोर्टाने नबाबजादा यांना सुनावलेली शिक्षा रद्द करायला लावली. या विजयामुळे बद्रुद्दिन यांची प्रतिष्ठा अफाट वाढली. पुढे बद्रुद्दिन यांनी दर महिन्याला ३७५० रुपये एवढे वेतन घेऊन न्यायाधीशाचे पद स्वीकारले. जेव्हा, त्यांचे वर्षाचे वकिलीचे उत्पन्न एक लाख रुपये होते. परंतु, न्यायमूर्ती म्हणून त्यांनी जे काम केले ते उच्च दर्जाचे समजले जाते. त्यांच्या निवाड्यात स्वतंत्र मनोवृत्तीचे प्रतिबिंब दिसायचे. वकिलांचे तसेच दोन्ही पक्षांचे समाधान ते करत असतात.'



बद्रुद्दिन तय्यबजी यांनी मुंबई येथे स्थापन केलेली अंजुमन–ई–इस्लाम संस्था



# लोकशाहीचे वैभव इतिहासजमा

संसदेच्या नव्या इमारतीतून संसदीय कामकाजास नुकतीच सुरुवात झाली. सप्टेंबरच्या मध्यास झालेल्या विशेष अधिवेशनाचे निमित्त साधून हे कामकाज सुरु करण्यात आले.

या नव्या इमारतीचे उद्घाटन पंतप्रधानसाहेबांनी केले होते. प्रसिध्दीचा प्रकाशझोत सदैव स्वतःवरच ठेवण्याच्या व्यसनानुसारच त्यांनी हे केले. देशाचे राष्ट्रपति हे संसदेचे अविभाज्य घटक असतात ही घटनात्मक बाब ते सोयीस्करपणे विसरले होते आणि निगरगट्ट कोडगेपणाने राष्ट्रपतींच्या ऐवजी स्वतः या नव्या इमारतीचे उद्घाटन त्यांनी केले. हे उद्घाटन करताना त्यांनी अपेक्षित देखावाही केला. राजेशाहीचे प्रतीक असलेल्या सेनगोल उर्फ राजदंडाची स्थापना त्यांनी लोकशाहीचे सर्वोच्च स्थान असलेल्या या संसदेच्या नव्या इमारतीत केली. लोकशाही व्यवस्थेत असतानाही राजेशाहीचे प्रतीक मिरविण्याची हौस असलेल्यांना संसद व संसदीय लोकशाही प्रणालीबद्दल किती आस्था व आपुलकी आहे हे या घटनेवरुन सिध्द झाले. ही पुराणमतवादी, सरंजामी मनोवृत्ती आहे.

या प्रसंगाने जुन्या ऐतिहासिक संसदगृहाच्या असंख्य आठवणींनी मनात गर्दी होणे अत्यंत स्वाभाविक आहे. ज्या संसदगृहात साडेतीन दशकांहून अधिक काळ काम करण्याचा व वार्तांकन करण्याची संधी मिळाली त्यामुळे या आठवणी दाटणे अपरिहार्य आहे. जुने संसदगृह तीन प्रमुख सभागृहांनी तयार झाले होते.

हे संसदगृह पूर्ण गोलाकृति असून त्यातील मधील उत्तुंग घुमट व गोलाकार वास्तू सेंट्रल हॉल किंवा मध्य कक्षाची आहे. त्याच्या एका बाजूला लहान अर्धवर्तुळाकृति वास्तू राज्यसभेची आणि दुसऱ्या बाजूला परंतु मोठी अर्धवर्तुळाकृति वास्तू लोकसभेची आहे.

मध्यरात्रीच्या स्वातंत्र्याचे स्वागत प्रथम पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी याच वास्तूतील सेंट्रल हॉलमधून केलेल्या भाषणाने केले होते. 'नियतीशी करार' अशा आशयगर्भ शब्दांत त्यांनी भारताच्या भावी वाटचालीचे वर्णन केले होते.

याच सेंट्रल हॉलमध्ये घटना परिषदेचे कामकाज झाले आणि भारताच्या संविधान निर्मितीच्या प्रक्रियेची ही वास्तू साक्षीदार झाली. या वास्तूला आता संसदगृहाऐवजी 'संविधान

भवन' असे नाव देण्यात आले आहे.

संसदेची ही मूळ वास्तू रुबाबदार होती. तिच्यात एक दिमाख व ऐट होती. तिच्यात खानदानी प्रतिष्ठेचे प्रतिबिंब होते. त्याचप्रमाणे स्वातंत्र्यलढ्यातील अगणित व असंख्य तसेच ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्यसैनिकांनी जपलेल्या मूल्य व तत्वांची प्रगल्भता त्या वास्तूत ठायीठायी भरलेली होती.

या वास्तूमधील सेंट्रल हॉल किंवा मध्य कक्ष याचे महत्व अनन्यसाधारण होते.

याचे कारण ब्रिटिश संसदेत जे महत्व लॉबीजचे आहे तेच महत्व भारतीय संसदेच्या या मध्य कक्षाला प्राप्त होते.

ब्रिटिश संसदगृहात सेंट्रल हॉल किंवा मध्य कक्ष नाही. परंतु तेथील हाऊस ऑफ कॉमन्स आणि हाऊस ऑफ लॉर्डस् या सभागृहांच्या बाहेरच्या बाजूला असलेल्या लॉबीज महत्वपूर्ण आहेत.

झाला याचा पत्ता लागू न देता ती उपयोगात आणण्याचे एक बंधन पत्रकारांतर्फे पाळले जाते. यामुळे एखादी संवेदनशील माहिती दिल्यानंतरही संबंधित व्यक्तीला त्याचा त्रास होत नाही.

दिल्लीतील जुन्या संसदगृहातील मध्य कक्ष किंवा सेंट्रल हॉलमध्ये मिळणाऱ्या माहितीबाबतही हा नियम सामान्यतः पाळला जात असे. तेथील माहिती कुणाच्या तोंडी न घालण्याचा प्रघात पत्रकार शक्यतोवर पाळत असत. अथवा संबंधित व्यक्तीने त्या माहितीची जबाबदारी घेण्याची तयारी दर्शविली तरच त्या व्यक्तीचे नाव बातमीत समाविष्ट करण्याची बाब पाळली जात असे. यामुळेच सेंट्रल हॉल किंवा मध्य कक्षाचे महत्व अनन्यसाधारण असे होते.

या ठिकाणी प्रवेशासाठी पत्रकारांना देखील किमान पात्रतेचे निकष होते आणि त्यांची पूर्तता झाल्यानंतरच त्या पत्रकारांना सेंट्रल हॉलमध्ये प्रवेश दिला जात असे. यामागे



या लॉबीजपर्यंत वरिष्ठ पत्रकारांना प्रवेश असतो. तेथे पार पंतप्रधानांपासून मंत्री व संसदसदस्यांपर्यंतच्या सर्वांची वर्दळ असते. तेथे नियम असा आहे की लॉबीजमध्ये पत्रकारांना दिलेली माहिती ही गोपनीय मानली जाते. तिचे स्वरुप अनौपचारिक असते आणि विशिष्ट अशा विश्वासाने ती दिलेली असते. त्यामुळे लॉबीज मध्ये मिळालेल्या माहितीच्या आधारे बातम्या देण्यास एक अघोषित प्रतिबंधाची प्रथा कसोशीने व कटाक्षाने पाळली जाते. याचा अर्थ तेथील माहिती उपयोगात आणायची असे नव्हे. फक्त त्या माहितीचा म्हणजेच बातमीचा उगम कोठून

पत्रकारांना देखील किमान अनुभव, परिपक्वता यांची जाणीव असावी व त्या गांभीर्यानेच ते सेंट्रल हॉलमध्ये वावरतील अशी अपेक्षा असे. त्यामुळेच संसदेचे वार्तांकन कायमस्वरुपी पासावर किमान दहा वर्षे केल्यानंतर च त्या पत्रकाराला सेंट्रल हॉलमध्ये प्रवेश दिला जात होता.

यामुळे अशा अनुभवी पत्रकारांबरोबर बोलताना खासदार, मंत्री यांनाही अडचण येत नसे कारण सेंट्रल हॉलमध्ये येणारा पत्रकार किमान पात्रता व अनुभव असलेला आहे याची जाणीव त्यांनाही असे. तसेच दिलेल्या माहितीचा दुरुपयोग न

करण्याची परिपक्वता त्या पत्रकारात असल्याचे मानले जाई. त्यामुळेच सेंट्रल हॉलमधील पत्रकार आणि सर्व राजकीय नेते, मंत्री, खासदार यांचे संबंध विलक्षण मोकळे आणि खेळीमेळीचे असत. यातूनच देशातल्या अनेक महत्वाच्या बातम्यांचा उगम हा सेंट्रल हॉलमधून झाल्याची उदाहरणे आहेत.

या सेंट्रल हॉलशी अनेक वर्षांचा आलेला संबंध आणि तेथे घडलेले असंख्य प्रसंग, बड्याबड्या नेत्यांच्या गप्पांच्या मैफिली, महत्वपूर्ण माहिती, बातम्या यांच्या अगणित आठवणी यानिमित्ताने दाटून येणे नैसर्गिक आहे.


सेंट्रल हॉलमध्ये पंतप्रधान येऊन बसण्याचे प्रसंग कमी असले तरी एकेकाळी पंडित नेहरू, इंदिरा गांधी, राजीव गांधी व नंतरचेही अनेक पंतप्रधान क्वचित सेंट्रल हॉलमध्ये येत आणि त्यानिमित्ताने पत्रकारांबरोबर संवाद साधत असत. चंद्रशेखर हे सेंट्रल हॉलमध्ये तळ ठोकूनच असत. त्यांची जागा ठरलेली असायची. त्यांना चाहणारे त्यांचे राजकीय सहकारीही त्यांच्याबरोबर बसत. मग गप्पांचा फड जमत असे. चंद्रशेखर यांना इतरांना खायला घालण्याची विलक्षण हौस होती. मग त्यांच्या त्या मैफिलीत चहा, कॉफी, कुरकुरीत टोस्ट, गुलाबजाम आणि इतरही खाद्यपदार्थांची रेलचेल असायची.

इंदिरा गांधी यांनाही मध्येच सेंट्रल हॉलमध्ये येऊन बसण्याची लहर येत असे. तेथील कॉफी बोर्डाची स्वादिष्ट व कडक कॉफी व कुरकुरीत टोस्ट ही त्यांची आवड होती.

इंदिरा गांधी यांना संसदगृहाच्या कँटीनमधील व्हेजिटेबल सूप आणि व्हेजिटेबल स्ट्यू हे पदार्थ फारच आवडायचे.

यातील मजेशीर योगायोगाचा भाग असा की त्यांचे त्यावेळचे घनघोर राजकीय विरोधक मधु लिमये यांना देखील तेच व्हेजिटेबल सूप आवडायचे. त्यामुळे व्हेजिटेबल स्ट्यूला इंदिरा गांधींचे नाव तर सूप मधु लिमये व इंदिराजी यांच्या नावाने ओळखले जायचे. येथे मिळणारा पोंगल राईस किंवा पातळ खिचडी हा परमानंद असायचा. येथील खाद्यपदार्थ सेवेची जबाबदारी रेल्वे विभागाकडे असायची. कालांतराने काही खाद्यपदार्थ व विशेषतः मिष्टान्नासाठी बाहेरच्या खासगी संस्थांना जबाबदारी देण्यात आली.







२०१४ मध्ये तर रेल्वेकडून ही सेवा काढून घेण्यात आली आणि चक्क तिचे खासगीकरण करण्यात आले.

परंतु या मर्यादित खाद्यपदार्थांच्या संगतीत मोठमोठ्या नेत्यांबरोबरच्या गप्पात वेळ कसा निघून जात असे हे कळाचेच नाही. संध्याकाळी ऑफिसात जाताना पत्रकारांच्या खिशात किमान दोन तीन बातम्या सहज असत.

ज्येष्ठ राष्ट्रीय नेते शरद पवार हे देखील सेंट्रल हॉलमध्ये नित्यनियमाने बसत आणि ते आले की त्यांना खासदारांप्रमाणेच पत्रकारांचे गराडाही पडत असे. गप्पा सुरु असतानाच मग कॉफी टोस्ट आणि मैफल लांबली की ते घरी न जाता तेथेच दुपारचे भोजनही घेत. मग पोंगल, फिश फ्राय काहीतरी गोडधोड आणि त्यावर पुन्हा कॉफी असे करतकरत गप्पांची मैफल पुढे सरकत असे. त्यांच्या कन्या सुप्रिया सुळे या मधूनमधून त्या मैफिलीत येत असत. परंतु मागच्याबाजुला त्यांचा तरुण खासदारांचा एक कोपरा होता. सर्वच पक्षांचे तरुण खासदार तेथे जमत असत. संसदगृहातील गरमागरमी, वादविवादाचा मागमूसही सेंट्रल हॉलमध्ये दिसत नसे. सुप्रिया सुळे बरोबर आरोग्यपूर्ण असे पदार्थ

बाळगत असत. कधी खाखरे, भाकऱ्या वगैरे वगैरे.

काँग्रेसचे दिग्विजयसिंग हेही सेंट्रल हॉलमध्ये नियमित येत असत. ते, जनार्दन द्विवेदी, मोतीलाल व्होरा अशी दिग्गज मंडळी तेथे येऊन बसत. स्वादिष्ट कॉफी व कुकुरीत टोस्टने गप्पांचा प्रारंभ होऊन मग काहीतरी इतर खाद्यपदार्थ, हलकेसे भोजन, मिठाई, पुन्हा कॉफी असा प्रवास करीत या मैफिली पूर्ण होत असत. यामध्ये माहितीची देवाणघेवाण होत असे. नेत्यांकडून नुसतीच माहिती घेतली जात नसे तर वरिष्ठ पत्रकार काही विषयांवर आपली मते पण देत असत. यामुळे या नेत्यांनाही महत्वाच्या विषयांवर फीडबॅक मिळत असे. हे माहितीचे आदानप्रदान महत्वपूर्ण असते व तीच खरी लोकशाही.

काँग्रेसचे वरिष्ठ नेते तसेच हयातभर राजीव गांधी व सोनिया गांधी यांचे राजकीय सचिव राहिलेले अहमद पटेल आणि भाजपचे नेते अरुण जेटली यांच्या सेंट्रल हॉलमधील मैफिलींचा उल्लेख न केल्यास हा विषय पूर्ण होऊच शकणार नाही. आज दोघेही हयात नाहीत पण त्यांच्या या आठवणी विसरल्या न जाणाऱ्या आहेत.

अहमद पटेल हे सेंट्रल हॉलमध्ये आले की निश्चितपणे काहीतरी बातमी देऊन जात. येथेच त्यांना त्यांच्या पक्षाचे खासदार व नेतेही भेटत असत. सोनिया गांधी यांचे राजकीय सचिव असल्याने सोनिया गांधी यांच्या खालोखाल त्यांचे पक्षात महत्व होते. त्यामुळे ते जी काही माहिती देत किंवा बोलत ती लक्षपूर्वक ऐकल्यानंतर एखादी नवीन माहिती किंवा एखाद्या बातमीचा नवा पैलू किंवा अँगल मिळून जात असे. त्यामुळे त्यांच्या गप्पांच्या मैफिलीत पत्रकारांची भरपूर गर्दी असे.

यात काही खट्याळ पत्रकारही असत आणि मग अहमदभाई कधीकधी त्यांची देखील खिंचाई करीत.

या मैफिलीची सुरुवातही कॉफी टोस्ट, मग सूप अशी होत असे. मग अहमदभाईंची आवडती खिचडी किंवा पोंगल आणि फिश फ्राय व फिंगर चिप्स असे येत असे. मग ते खाताखाता गप्पा चालू रहात. तरीदेखील अहमदभाई हे प्रत्येक उपस्थिताला त्यांना काय पाहिजे याची जातीने चौकशी करीत. त्यांच्या हातात काँग्रेसची अप्रत्यक्ष सूत्रे असूनही त्यांनी कधी विनम्रता सोडली नव्हती. सर्वांशी ते शांतपणे बोलत असत. त्यांचा आवाज देखील कधी चढत नसे. एक चांगले यजमान, चांगला राजकीय नेता आणि माहिती देताना कधीही चुकीची माहिती न देणारा नेता म्हणून ते कायम स्मरणात राहतील. ते अगदी मोजकेच बोलत आणि विचारलेल्या प्रश्नांना मोजक्याच शब्दात उत्तर देत असत पण त्यातूनच पत्रकारांच्या बातम्या तयार होत.



अहमदभाईंप्रमाणेच अरुण जेटलीही संसद अधिवेशनकाळात दररोज किमान एक ते दोन तास आणि वेळ असेल तरी आणखीही वेळ सेंट्रल हॉलमध्ये पत्रकारांबरोबर गप्पा मारत व्यतीत करीत असत.

अरुण जेटली यांच्या भोवती पत्रकारांचा मोठा गराडा असे कारण मोदी मंत्रिमंडळातील ते एकमेव मंत्री असे होते की जे पत्रकारांबरोबर मुक्त संवाद साधत असत.

मोदी मंत्रिमंडळातील अन्य कुणीही मंत्री पत्रकारांशी कधीच बोलत नसत.

याला कारणेही तशीच होती. खुद्द पंतप्रधानांनीच भाजप खासदार व मंत्र्यांना पत्रकारांशी बोलण्यास तसेच सेंट्रल हॉलमध्ये बसून गप्पा मारत वेळ घालविण्यास चक्क मनाई केली होती.

पंतप्रधानांना तशीही पत्रकारांची तीव्र ॲलर्जी असल्याने

त्यांनी हा फतवा जारी केलेला आहे.

त्यांची दहशत व धाक असा की कुणीही पत्रकारांबरोबर गप्पा मारताना दहा वेळाला विचार करतात.

एक केंद्रीय मंत्री एकदा चुकून पत्रकारांबरोबर बोलत बसला होता आणि काही वेळाने अचानक भानावर आल्यासारखा उठला व संभाषण तोडून चालू लागला. या सेंट्रल हॉलमध्ये कॅमेरे लावले आहेत हे मी काहीकाळ विसरलो होतो. मी तुमच्याबरोबर बोलत बसल्याचे एव्हाना कळले असेल असे म्हणत तो बिचारा तेथून निघून गेला.





पंतप्रधानांना एवढ्या गुप्ततेची आवश्यकता का वाटते हा एक उत्तर न मिळालेला प्रश्न आहे.

म्हणूनच अरुण जेटली हे याला अपवाद होते. पत्रकारांच्या दृष्टीने मोदी सरकारमधील तो एकमेव झरोका होता जो त्यांच्यासाठी उघडा होता. त्यामुळेच ते आले की पत्रकार त्यांच्याभोवती चटकन गोळा होत.

जेटली सर्वच माहिती देत असे नाही आणि कुणीही महत्वाच्या पदावर असलेला नेता कधीच पूर्ण माहिती देत नसतो. तो फक्त काही गोष्टी सूचकपणे बोलून संकेत देतो आणि ते सूत्र पकडून पत्रकाराला बातमी विकसित करावी लागते. परंतु वर्तमान राजवटीसारख्या बंदिस्त सरकारमध्ये अशी माहिती मिळविणे ही देखील एक कसरत असते. त्यामुळेच जेटली यांच्यासारख्यांचे महत्व पत्रकारांच्या लेखी मोठे होते. जेटलींना मधुमेह, रक्तदाबाचे तीव्र त्रास होते. कडक कॉफी आणि एखादा टोस्ट एवढेच ते खात. याचे कारण त्यांच्या आजारामुळे त्यांचा डबा त्यांच्या घरुन येत असे. त्यामुळे बऱ्याचदा ते दुपारचा त्यांचा डबा खाऊनच सेंट्रल हॉलमध्ये येत आणि मग कॉफी घेतघेत मनसोक्त गप्पा सुरु होत असत.

जेटली यांच्याकडे दिल्लीच्या राजकीय, सामाजिक वर्तुळातील कथाकहाण्यांचा खजिनाच असे. ज्याला इंग्रजीत गॉसिप म्हटतात त्याचा त्यांच्याकडे खजिनाच असे. त्यामुळे राजकीय गप्पांबरोबरच दिल्लीतल्या उच्चभ्रू व लब्धप्रतिष्ठित किंवा आताच्या भाषेतील पेज थ्री वरील मंडळींबद्दलचे किस्से ही त्यांची खासियत असे.

ते अर्थमंत्री होते तरीही अर्थसंकल्पाच्या अगदी आदल्या दिवशी देखील सेंट्रल हॉलची वारी चुकवत नसत. आम्ही पत्रकारच आश्चर्याने त्यांना विचारत की अर्थसंकल्पाची गडबड असूनही एवढा वेळ तुम्ही कसा काढू शकता आणि त्यावर त्यांचे उत्तर मजेशीर असे की पत्रकारांबरोबरच्या मुक्त गप्पांमुळे ते ताजेतवाने होतात आणि म्हणून ते नियमित गप्पा मारायला येतात.

या गप्पांमध्ये पत्रकार त्यांच्या पक्षाच्या, सरकारमधील सहकाऱ्यांवरही टीका टिप्पणी करीत असत. परंतु ते सर्व मैत्रीभावनेने असे आणि जेटली यांनीही कधी त्याबद्दल राग मानला नाही. उलट एखाद्या पत्रकाराने एखादी मार्मिक टिप्पणी

केल्यावर त्याला दाद देण्याचा मोठेपणा किंवा दिलखुलास खिलाडूपणा त्यांच्याकडे होता.

हा खिलाडूपणा सध्याच्या भाजप व संघपिरावारातील एकाही नेत्यात शिल्लक नाही. त्यामुळेच जेटलींचे जाणे हा दिल्लीतल्या पत्रकारांचा सर्वाधिक तोटा ठरला.

भाजपच्या बड्या नेत्यापैकी लालकृष्ण अडवानी, मुरली मनोहर जोशी हे नियमित सेंट्रल हॉलमध्ये येणारे नेते होते.

मुरलीमनोहर जोशी हे वक्रोक्तित अगदी पटाईत आहेत. उपहासगर्भ टिप्पण्या हे त्यांचे वैशिष्ट्य. पंतप्रधानांनी ज्या वरिष्ठ भाजपनेत्यांना सक्तीने निवृत्त करुन मार्गदर्शक मंडळ नावाच्या राजकीय वृध्दाश्रमात पाठविले त्यात मुरलीमनोहर यांचाही समावेश होता.

तेथून काढता पाय घेतला. (हा आपला जाताजाताचा किस्सा)

महाराष्ट्राचे वर्तमान राज्यपाल रमेश बैस हे देखील संसदेच्या सेंट्रल हॉलमधील एक नियमित व्यक्तिमत्व होते. कॉफी आणि टोस्टवर त्यांची मैफल चालत असे. मनसोक्त गप्पा, विचार व दृष्टिकोनांचे आदानप्रदान हेच त्याचे प्रमुख वैशिष्ट्य.

सेंट्रल हॉलच्या मागच्या एका कोपऱ्यात माजी खासदारांचा समूह बसत असे. ती त्यांची ठरलेली जागा होती. इंदिरा गांधी व संजय गांधी यांचे निकटवर्ति डॉ.जेके जैन, हरपालसिंग पांवर, लाल, हरिकेश बहादूर, केके तिवारी असे अनेक माजी खासदार तेथे येऊन बसत. संसद अधिवेशन नसताना देखील माजी खासदारांची ही मैफल अविरत चालू



सध्याच्या पंतप्रधानांच्या काळात देशाचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित दोभाल हे विलक्षण शक्तिमान अधिकारी म्हणून ओळखले जातात. ते उत्तराखंडचे आहेत. मुरली मनोहरही उत्तराखंडचेच आहेत.

एकदा योगायोगाने संसदेच्या बाहेर पडतानाच दोभाल व मुरलीमनोहर समोरासमोर आले. मुरलीमनोहर आमच्याशी बोलत होते. दोभाल दिसताच त्यांना हात जोडून म्हणाले, 'महाराज कैसे हो, अभी देश तो आप ही चला रहे हो !' ते ऐकून दोभाल यांची काय अवस्था झाली असेल याची कल्पना येऊ शकते. खजील अवस्थेतच त्यांनी, कसचं कसचं असे करीत

असे. तेथेही चहा-कॉफी-टोस्टचे चक्र अखंड चालत रहात असे. या माजी खासदारांकडून गतकाळातील राजकारण, राजकीय किस्से समजत असत. गतकाळातील नेत्यांबद्दलची रंजक माहिती मिळत असे. मध्यप्रदेशातील नरसिंगगढ संस्थानचे संस्थानिक राजे भानुप्रतापसिंग हे सेंट्रल हॉलमध्ये बसत असत. ते १९७१ मध्ये इंदिरा गांधी मंत्रिमंडळात होते. परंतु त्यांनी संस्थानिकांचे तनखे रद्द करण्यास विरोध केला आणि ते विधेयक पराभूत झाल्यामुळे त्यांना मंत्रीपद गमवावे लागले होते. परंतु ते इंदिरा गांधींचे विलक्षण चाहते होते. त्यांचे सातमजली हास्य सेंट्रल हॉलमध्ये एक चर्चेचा विषय होता.



संजय गांधी



राजा भानुप्रतापसिंह



किती आठवणी आहेत हे एका लेखात वर्णन करणे अशक्यप्राय आहे.

सोनिया गांधी व राहूल गांधी हेही सेंट्रल हॉलमध्ये येऊन बसत. सोनिया गांधी यांना कॉफी बोर्डाची स्वादिष्ट व कडक कॉफी आणि क़डक टोस्ट आवडतात. तसेच तेथे मिळणारा कुरकुरीत क्रिस्पी डोसा देखील त्यांना खूप आवडतो. ते खाण्यासाठी त्या अधूनमधून सेंट्रल हॉलमध्ये येत असतात. राहूल गांधीही मधूनमधून येत असतात. मग पत्रकारांबरोबर ते मनमुराद गप्पाही मारतात.




अभिषेक सिंघवी आणि कपिल सिब्बल हे देशातले अव्वल कायदेपंडित आहेत. ते दोघेही राज्यसभेत आहेत आणि त्यांचीही सेंट्रल हॉलमध्ये चक्कर असे आणि मग पत्रकारांना न्यायक्षेत्रातील गोष्टींचीही माहिती मिळते.

मुलायमसिंग, लालूप्रसाद, मायावती, फूलनदेवी यासारखी मंडळीही सेंट्रल हॉलला नियमित भेट देत असत. एकदा अभिनेता गोविंदा जेव्हा लोकसभेत निवडून आला होता तेव्हा तोही येत असे. मुंबईचे खासदार आणि वरिष्ठ नेते एकनाथ गायकवाड आणि आम्ही मराठी पत्रकारात येऊन गोविंदा बसत असे. मुंबईच्या सवयी नसानसात भिनलेल्या असल्याने तो अरे चटणी सँडविच ले आओ म्हणून सांगायचा आणि आम्ही त्यावर हसत असू. येथे मुंबई स्टाइलचे सँडविच मिळणार नाही असे त्याला सांगत असू. मुख्यमंत्री झाल्यानंतर देखील ममता बॅनर्जी यांनी सेंट्रल हॉलला भेट देण्याची सवय सोडली नव्हती. रेल्वेमंत्री असताना त्यांनी सेंट्रल हॉलमधील कँटीनमध्ये नवीन प्रकारची कटलेट्स सुरु केली होती. एकदा म्हणाल्या, तुम्हारे मुंबईका वडापाव मुझे अच्छा लगता है उसे मैं यहाँ शुरु करना चाहती हूँ. पण ते तसेच राहून गेले. पण ममता बॅनर्जी यांना साबुदाणा वडाही प्रचंड आवडतो हे तेथेच समजले.

सेंट्रल हॉलमध्ये मराठी खासदार बसतात परंतु भाजपची मंडळी नेत्याच्या धास्तीमुळे बसेनाशी झाली आहेत. शिवसेनेचे संजय राऊत हे सेंट्रल हॉलमधील लोकप्रिय



फुलनदेवी



मुलायमसिंग यादव



लालूप्रसाद यादव

व्यक्तिमत्त्व आहेत. सर्वपक्षीयांशी त्यांचा उत्तम संपर्क आहे. अनिल देसाई हे मितभाषी आहेत पण तेही येऊन बसत असत.

सध्याचे गृहमंत्री अमित शहा यांच्याविरुध्द गुजरात दंगे व इतरही काही केसेसे चालू होत्या. त्यांना गुजरातमध्ये प्रवेशबंदी होती. तेव्हा ते गुजरातमधील साधे आमदार होते. परंतु आमदार म्हणून त्यांना संसदेत व सेंट्रल हॉलमध्ये प्रवेश असे. त्यामुळे ते गुजरातप्रवेशबंदीच्या काळात सेंट्रल हॉलमध्ये येऊन दिवसभर बसत आणि सायंकाळी परतत असत. त्या काळात त्यांना पाहण्याचा योग आला होता. आज ते शक्तिशाली नेते मानले जातात परंतु सेंट्रल हॉलच्या एका कोपऱ्यात ते दिवसेंदिवस बसून रहात असताना त्यांना पाहिले आहे. काळाचा महिमा.

इतिहासाची साक्षी असलेली संसदेची ही जुनी वास्तू आता इतिहासजमा झाली किंवा करण्यात आली. सेंट्रल हॉलही आता नावापुरता उरला आहे कारण तेथे सर्वांना प्रवेशबंदी करण्यात आली आहे. संसदेच्या नव्या इमारतीत सेंट्रल हॉलच नाही. फक्त आधुनिक भपकेबाजी आहे. त्यामुळेच काँग्रेस प्रवक्ते जयराम रमेश यांनी त्याची तुलना एखाद्या मॉलशी केली आहे. पत्रकार आणि राजकीय नेते यांच्यात कायमची दरी निर्माण करणारी ही नवी इमारत आहे. लोकशाहीतील मुख्य आधारस्तंभ या नात्याने सरकार, मंत्री, खासदार व पत्रकार यांच्यात संवाद अत्यावश्यक असतो. परंतु वर्तमान सत्ताधाऱ्यांचा संवादावर विश्वास नसून संवादहीनता त्यांना अधिक प्रिय आहे. गोपनीयतेच्या पडद्याआड आणि पारदर्शकतेला धाब्यावर बसवून त्यांना राज्यकारभार करायचा आहे. त्यामुळेच त्यांना त्यांच्या जवळपासही स्वतंत्र बुध्दीचे पत्रकार नको आहेत. निकोप लोकशाहीच त्यांना नको आहे. त्यामुळेच त्यांनी नवीन इमारतीत संवादाची जागाच खतम करुन टाकली आहे.

ब्रिटिश संसदेला मदर पार्लमेंट म्हणतात. तेथील लोकशाही देखील काही शतके ऐतिहासिक आहे. तेथील संसदगृह हे देखील काही शतकांचे जुने आहे. त्याची वेळोवेळी डागडुजी केली जात असते परंतु तेथील राज्यकर्त्यांच्या मनात कधीही ते संसदगृह इतिहासजमा करण्याचा विचार आला नाही. त्यांच्या संसदेतील सदस्यसंख्या देखील वाढलेली आहे तरीही त्यांना भव्यदिव्य नवीन वास्तू बांधण्याची इच्छा झाली नाही. याचे कारण त्यांचा भपकेबाजी, देखावेबाजीवर विश्वास नाही. लोकशाहीच्या भावनेवर त्यांची श्रध्दा अधिक आहे, नितांत आहे. त्यामुळेच त्यांच्या हाऊस ऑफ कॉमन्स (लोकसभा) मध्ये आसनांची संख्या कमी आहे. पण संसदसदस्य प्रसंगी उभे राहतात किंवा चक्क खाली गालिचावर बसतात. त्यात त्यांना कमीपणा वाटत नाही कारण त्यांची बांधिलकी लोकशाहीशी आहे. ज्या उथळ राज्यकर्त्यांना कधी नाही ते सत्ता मिळाल्यानंतर काय करु आणि काय नाही अशी थिल्लर भावना झालेली आहे आणि ज्यांचा विश्वास फक्त बाह्य देखाव्यावर, देखावेबाजी, भपकेबाजीवर आहे, ज्यांना फक्त प्रदर्शनाची हौस आहे त्यांनाच संसदेची जुनी वास्तू खुपणे स्वाभाविक आहे. नावीन्याची आवड असावी परंतु अनाठायी व नावीन्यासाठी नावीन्याचा अट्टाहास धरणे व पूर्व राज्यकर्त्यांच्या दुस्वासापोटी केले जाणारे नवीनीकरण हे निराधार, निरर्थक असते. त्याला सुमारबुध्दीची विकृती म्हणतात.




**सरकारी कर्मचारी भरती टाळून त्याजागी कंत्राटी भरतीच्या सरकारच्या धोरणावर आक्रमक होत राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार यांच्या नेतृत्वाखाली २० सप्टेंबर रोजी पुण्यातील महात्मा जोतिबा फुले वाडा येथे एक दिवसाचे लाक्षणिक उपोषण करण्यात आले. त्यानंतर त्यांनी पत्रकारांशी साधलेला संवाद...**

# नोकर भरती प्रक्रियेसाठी कायदा करून पारदर्शकता आणावी

**रोहित पवार**

आज आम्ही सर्वजण मिळून, ज्याच्यामध्ये विद्यार्थी आहेत, युवा आहेत, तसंच अनेक पदाधिकारी आहेत, तर अराजकीय मुलांच्या भवितव्यासाठी, विद्यार्थ्यांच्या भवितव्यासाठी एक प्रातिनिधीक स्वरूपाचं उपोषण आम्ही सर्वांनी मिळून केलेलं आहे. जे ठिकाण मुलांनी निवडलं, ते अतिशय प्रेरणा देणारं ठिकाण आहे. ताकद असणारं ठिकाण आहे, ते म्हणजे महात्मा फुले, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचं राहतं घर, जिथून त्यांनी सामान्य कुटुंबातल्या मुलींना शिक्षणाद्वारे दिशा दिली अणि एक मोठा संघर्ष त्याकाळी प्रस्थापितांच्या विरोधात, पण सामान्य लोकांच्या बाजूनं त्यांनी तो लढा उभा केला होता. अशा ठिकाणावरनं प्रेरणा घेत आम्ही आज तिथं उपोषण करत आहोत.

हे उपोषण करत असताना आमच्या सर्वांच्या तीन-चार मागण्या आहेत. खरं तर आज गणपती उत्सव आहे. अनेक मुलांच्या घरी गणपती असतानासुद्धा या काळात



उपोषण करताना मुलं किती सीरियस आहेत हे आम्हाला दाखवायचं होतं. काही राजकीय नेते ही मुलं सीरियस नाहीत असं बोलतात. पण घरात गणपती असतानासुद्धा स्वत:च्या भवितव्यासाठी आणि मित्र-मैत्रिणींच्या भवितव्यासाठी हे सर्वजण इथं उपोषणाला आलेले आहेत. आणि मागणी काय आहे, तर कॉन्ट्रॅक्ट बेसिसवर आता या सरकारच्या माध्यमातून जी भरती केली जातेय, त्या भरतीच्या विरोधात आम्ही सर्वजण आजचं हे उपोषण करत आहोत. या भरतीच्या मदतीने ७५ हजारपेक्षा जास्त मुला-मुलींना कॉन्ट्रॅक्टवर घेतलं जाणार. तेसुद्धा कमी रेटवर घेतलं जाणार. आणि पीएफ आणि सगळ्या गोष्टी बघितल्यानंतर त्यांच्या हातामध्ये फार तुटपुंजा पैसा पडणार आहे. पण, कॉन्ट्रॅक्टर नक्कीच मोठा होणार आहे. त्याच्याविरोधात आमचं आंदोलन आहे. त्याच्याचबरोबर तलाठी भरती आणि इतर काही भरती सरकार करत आहे, त्याच्यातून जे काही हजार रूपये वसुल केले जातायंत, ते हजार रूपये वसुल करणं बंद करा आणि जे वसुल केलेले हजार रूपये आहेत, हे परत विद्यार्थ्यांना द्यावेत यासाठी आम्ही सर्वजण उपोषण करत आहोत. खरं तर एका एका मुला-मुलींनी पंधरा-पंधरा हजारपेक्षा जास्त खर्च सरकारची ही फी भरण्यासाठी केला आहे. त्यामुळे हे पैसे विद्यार्थ्यांना परत मिळावेत यासाठी हे आंदोलन आहे.



तिसरा मुद्दा जो आम्ही सर्वांनी मिळून घेतलेला आहे, तो म्हणजे पेपर जर आपण वाचले, जे अभ्यासू पत्रकार आहेत, त्यांनी याबाबतीत रिसर्च केला, त्यावेळी असं कळत आहे, की एका एका तलाठी भरतीच्या पदासाठी १५ लाख, २० लाख, २५ लाख असे पैसे गोळा केलेत आणि मग अशा पद्धतीनं पेपर फुटत असेल, चुकीच्या गोष्टी होत असतील तर त्यासाठी राजस्थानच्या धर्तीवर एक कायदा या राज्य सरकारनीसुद्धा आणावा यासाठी आम्ही सर्वजण उपोषण करत आहोत. आणि त्याच्याचबरोबर जर घोटाळा झाला असेल, जर अनियमितता या तलाठी भरतीमध्ये झाली असेल, तर एका स्वायत्त समितीच्या मदतीने याबाबतीतली शाहनिशा व्हावी आणि अशा गोष्टी परत होऊ नयेत यासाठीसुद्धा एका कायद्यासकट एक पारदर्शक प्रक्रिया ही आणण्याची जरूरत आहे. त्याच्याचबरोबर सरकारनी एमपीएससीच्याबाबतीत काही नियमांमध्ये बदल केलेले आहेत. जी काही भरती होत होती, त्याच्यामध्ये समजा पदं ही दहा दिलेली होती, ती नंतर डिमांडप्रमाणे बदलता येत होती. पण आज ते बदलता येणार नाहीत. एखादं पद शून्य असेल तर ते शून्यच ठेवावं लागेल. मग आमचा सगळ्यांचा आक्षेप आहे, की तुम्ही त्या जीआरमध्ये बदल करून आणला तर त्याचं मुख्य कारण आहे, की तुम्हाला कॉन्ट्रॅक्ट पद्धतीनंच मुलांना भरती करायचंय. त्याचा एक विरोध आम्ही सर्वजण करतो. त्याच्याचबरोबर काल परवा एक वेगळा निर्णय सरकारकडनं घेतला. खरं तर सरकारकडे पैसे आहेत. ते फक्त योग्य पद्धतीनं वापरावेत. पण, सरकार काय सगळ्यांना सांगतंय, की पैसे, अतिरिक्त खर्च आम्ही कमी करतोय. मग या युवकांच्या बाबतीतच तुम्हाला अतिरिक्त खर्च वाटतोय का?

शाळेच्या बाबतीतसुद्धा एक निर्णय त्यांनी घेतलांय, की प्रत्येक शाळा काही लोकांना दत्तक दिल्या जातील. अरे, सरकारकडे पैसा नाही का तुमच्याकडे. दत्तक घेणं ही फक्त एका आर्थिक विचाराची सुरूवात आहे. उद्या जाऊन त्या शाळेच्या आसपास असणारी जमीन ही कदाचित कॉन्ट्रॅक्टवर दिली जाऊ शकते. ती जमीन ही पीपीपी मॉडेलच्या आधारावर विकसित करण्यासाठी दिली जाऊ शकते. आमच्या सगळ्यांचं मत एवढंच आहे, जो अतिरिक्त खर्च तुम्ही ४० आमदारांवर करत आहात, ज्याच्यामध्ये दीडशे कोटीपेक्षा जास्त खर्च होतोय, जो काय खर्च शासन आपल्या दारी उपक्रमामध्ये करत आहात तो तुम्ही थांबवा ना. बुलेट ट्रेनची आज राज्याला जरूरत नाही. त्यासाठी तुम्ही एक लाख कोटीचं लोन घेत आहात. एक लाख कोटीचं लोन तुम्ही शाळा बांधण्यासाठी घ्या. या मुला-मुलींसाठी मुंबई, पुण्यासारख्या शहरांमध्ये, छत्रपती संभाजीनगरसारख्या शहरांमध्ये होस्टेल बांधण्यासाठी तुम्ही तो खर्च करा. हे जे म्हणतांय ना तुम्ही, की पैसा नाही सरकारकडं म्हणून तुम्ही कॉन्ट्रॅक्टवर भरती करतांय. त्यासाठी तुम्ही पैसे खर्च करा. जाहिरातबाजी कुठेतरी कमी करून या युवकांच्या भवितव्यासाठी तुम्ही खर्च कमी करा. अतिरिक्त, नको तो खर्च ठराविक नेत्यांना खूश करण्यासाठी तुम्ही जो करत आहात ते तुम्ही करा. पण, याबाबतीत कुठेही राजकारण करू नका अशी विनंती आम्ही या उपोषणाच्या माध्यमातून करत आहोत.

आज फक्त प्रातिनिधीक स्वरूपाचं उपोषण आम्ही सर्वजण करत आहोत. पण पुढच्या पंधरा दिवसांमध्ये याबाबतीत सरकारनं जर योग्य आणि सकारात्मक निर्णय या मुला-मुलींच्या बाजूने घेतले नाहीत, तर दहा ते पंधरा ऑक्टोबरच्या आसपास आम्ही सर्वजण अख्ख्या राज्यामध्ये त्या त्या जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात आंदोलन हे युवकांच्या हिंमतीवर, युवकांच्या पुढाकारानं आम्ही सर्वजण करू हा इशारा या सरकारला आम्ही सर्वजण देत आहोत.




# स्वामी आणि सिब्बल जोडी ?

दिल्लीच्या राजकारणातले बदल कधीकधी चकित करणारे असतात. ते बदल टिपायलाही मजा येते.




दिल्लीच्या कुजबूज वर्तुळातली सध्याची चर्चेची गोष्ट म्हणजे उपद्व्यापी राजकारणी सुब्रह्मण्यन स्वामी आणि काँग्रेसमधून बाहेर पडूनही काँग्रेसला आपलेसे मानणारे कायदेपंडित कपिल सिब्बल यांची जवळीक ही आहे.

सिब्बल हे एकेकाळचे गांधी परिवाराचे अत्यंत निकटवर्ति मानले जात. युपीए सरकारमध्ये ते केंद्रीय मंत्री होते. गांधी परिवाराच्या विरोधातील केसेसही ते हाताळत असत. आता त्यांची जागा अभिषेक मनु सिंघवी यांनी घेतली आहे. राहूल गांधी यांच्या कार्यशैलीवरुन नाराज होऊन त्यांनी असंतुष्टांच्या जी-२३ गटात काम केले परंतु मनाने ते काँग्रेसीच राहिले. अशा पक्क्या काँग्रेसी नेत्याबरोबर सुब्रह्मण्यन स्वामी यांची जवळीक होताना पाहून अनेकांच्या भुवया उंचावण्यास सुरुवात होणे स्वाभाविक आहे.

कारण स्वामी तर घनघोर गांधी परिवाराच्या विरोधी आहेत. या परिवारा विरुध्द त्यांनी नॅशनल हेराल्ड प्रकरणात कोर्टात केस केलेली आहे. असे असताना स्वामी व सिब्बल यांनी एकत्र येण्याचे रहस्य काय ?

दिल्ली भाजपचे एक नेता आहेत. त्यांचे नाव आहे तेजेंदरपालसिंग बग्गा. हेही एक उपद्व्यापी व्यक्तिमत्व आहे.

भगतसिंग क्रांतिकारी सेना नावाची संघटना ते चालवतात. सध्या ते भाजपमध्ये आहेत. काश्मीरबाबत केलेल्या विधानावरुन प्रख्यात वकील प्रशांत भूषण यांना मारहाण करणे, भाजप व मोदी समर्थक एका महिला डॉक्टरशी गैरवर्तन, मोदींच्या विरोधातील लोकांच्या विरुध्द मोहिमा करणे, प्रसंगी मारहाणही करणे असल्या अनेक प्रकारात ते आहेत. त्यांच्याविरुध्द अनेक केसेसही आहेत.



स्वामी यांनी त्यांच्याविरुध्द काही वक्तव्ये केली आणि त्याने आपली मानहानि झाल्यामुळे त्यांनी स्वामींवर खटला ठोकला आहे. त्या प्रकरणात स्वामी यांच्या बाजुने सिब्बल बाजू मांडणार आहेत. यामुळेच दिल्लीच्या राजकीय वर्तुळात याची चर्चा आहे.

नॅशनल हेराल्ड प्रकरणात हे दोघे एकमेकाच्या विरोधात असताना ते अचानक एकत्र कसे काय झाले याचीच सध्या चर्चा आहे.



काहींच्या मते गेल्या काही महिन्यांपासून स्वामी यांनी पंतप्रधानांच्या विरोधात जोरदार मोहिम सुरु केली आहे. मोदी हे कसे अशिक्षित आहेत. त्यांना अर्थशास्त्र किंवा कशातलेच काही कळत नाही वगैरे टीका ते सातत्याने करीत असतात. मोदींच्या परराष्ट्र धोरणावरही ते सतत टीका करीत असतात.

सिब्बल हे देखील घोर मोदी विरोधक आहेत आणि बहुधा हा मोदी विरोधच या दोघांना एकत्र येण्यास



कारणीभूत ठरला असावा असे दिसते.

स्वामी हे टोपीफिरवू राजकारणाचे मूर्तिमंत उदाहरण आहेत.

अटलबिहारी वाजपेयी यांच्या सरकारला जयललिता यांचा पाठिंबा मिळवून दिल्यानंतर जयललिता यांना तो पाठिंबा काढून घ्यायला लावण्यातही त्यांचाच हात होता.

विश्वनाथ प्रतापसिंग यांच्या विरोधात चंद्रशेखर यांची पाठराखण करुन राजीव गांधी यांचा पाठिंबा मिळवून देण्यात त्यांनी हातभार लावलेला होता.

नॅशनल हेराल्ड केस मध्ये स्वामी यांनी सोनिया गांधी व अन्य काँग्रेसनेत्यांना जेरीस आणले. सिब्बल हे गांधी कुटुंबिय व काँग्रेसच्या बाजुने कोर्टात केस लढत आहेत.

त्यामुळेच अशा परिस्थितीत हे दोन विरुध्द ध्रुव एकमेकाच्या इतके जवळ कसे आले याची चर्चा आहे.

स्वामी यांच्या सोनिया विरोधामुळेच पंतप्रधानांनी त्यांना भाजपमध्ये प्रवेश देऊन राष्ट्रपतिनियुक्त उमेदवार म्हणून राज्यसभेचे सदस्यत्व बहाल केले. तेथेही त्यांनी अरुण जेटली यांच्याच विरोधात मोहिम केली. जेटलींना अर्थशास्त्र कळत नसलेला अर्थमंत्री अशी टीका ते करीत. पंतप्रधानांनी त्यांच्या या गोष्टींना कधी भीक घातली नाही. त्यांची मुदत संपली आणि त्यांना वाऱ्यावर सोडण्यात आले.

आता हातात काहीच नसल्याने बहुधा ते खवळलेल्या अवस्थेत असावेत आणि मोदींविरुध्द मैदानात उतरले आहेत. पाहू या आता हे दोघे एकत्र येऊन काय करतात ते ?

## संसदेची अवहेलना

संसदेत संख्याबळाचे बहुमत आहे याचा अर्थ कायदे व नियम धाब्यावर बसविणे असा होत नाही.

परंतु एखाद्या विशिष्ट नेत्याबद्दलच्या अंधभक्तीने या मर्यादांचे उल्लंघन करण्याचा विडाच उचलल्यासारखे दिसून येते.

भक्ति असावी पण अंध किंवा आंधळी भक्ति नसावी.

परंतु भक्ति व अंधभक्ति दरम्यानची सीमारेषा आता भारतात पुसली जात असल्याचे दिसते.

ताळतंत्र सुटल्यासारखा अंधभक्तीचा उन्माद सर्वत्र फोफावत आहे आणि संसदेलाही त्याचा उपद्रव होऊ लागला आहे. संसदेचे अलीकडेच विशेष अधिवेशन झाले. या विशेष अधिवेशनाने संसदगृहाच्या मूळ आणि जुन्या ऐतिहासिक वास्तूला निरोप देण्यात आला.

आता यापुढील अधिवेशने नव्या भपकेबाज वास्तूत होणार आहेत.




२१ सप्टेंबर रोजी राज्यसभेचे कामकाज चालू असताना अचानक प्रेक्षक कक्षातील सुमारे पन्नासएक प्रेक्षकांनी मोदी, मोदी अशा घोषणा दिल्या. महिला विधेयकावर चर्चा चालू असताना एका मुद्यावर विरोधी पक्षांनी निषेध केला व सभागृहातून बहिर्गमन केले व ते थोड्या वेळाने पुन्हा सभागृहात आले. एकप्रकारे त्यांची टिंगल उडविण्याच्या हेतुने प्रेक्षककक्षात बसलेल्या एका जवळपास पन्नासएक जणांच्या समूहाने मोदी, मोदी अशा घोषणा दिल्या. हा प्रकार नियमबाह्य व गंभीर मानला जातो.

संसदेच्या प्रेक्षककक्षात बसण्याचे विशिष्ट आणि काटेकोर असे नियम

आहेत. त्याचा भंग केल्यास शिक्षा होते.

घोषणा देणे वगैरे प्रकार तर दूरच. प्रेक्षक कक्षात कुणालाही पायावर पाय ठेवून देखील बसता येत नाही. तो सभागृह व सभापतींचा अवमान मानला जातो. बसताना दोन्ही पाय शेजारीशेजारी ताठ ठेवूनच बसावे लागते. कोणत्याही अनावश्यक हालचाली, एकमेकांशी बोलणे याला सक्त मनाई असते.

असे कडक नियम असतानाही पन्नासएक प्रेक्षक अशा उन्मादी घोषणा कशा देऊ शकतात हा खरा प्रश्न आहे.

प्रियंका चतुर्वेदी (मूळ शिवसेना) आणि तृणमूल काँग्रेसच्या सदस्या मौसम नूर यांनी सभापति जगदीप धनखड यांच्याकडे एका लेखी पत्राद्वारे या प्रकरणाची चौकशी करण्याची व त्यास जबाबदार असलेल्यांवर कडक कारवाईची मागणी केली आहे.

संसदेच्या प्रेक्षककक्षात संसदेचे कामकाज पाहण्यासाठी एखाद्या खासदाराच्या शिफारशीची आवश्यकता असते. त्या खासदाराला संबंधित प्रेक्षकांची जबाबदारी घ्यावी लागते.

त्यामुळेच या नियमभंग करुन घोषणाबाजी करणाऱ्या प्रेक्षकांना





कोणत्या खासदाराच्या शिफारशीवरुन प्रेक्षक कक्षात प्रवेश मिळाला हे शोधून काढण्याची मागणीही या दोन महिला खासदारांनी केली आहे.

याचे कारण अशा प्रकरणांमध्ये संबंधित खासदारालाही समज दिली जाते. परंतु या प्रेक्षकांनी ज्यांच्या नावाने घोषणा दिल्या ते लक्षात घेता या रानटी व असंस्कृत प्रेक्षकांना शिक्षा मिळण्याची किंवा संबंधित खासदारालाही समज मिळण्याची शक्यता जवळपास नाही.

असल्या उन्मादी गोष्टी एखाद्या अतिएकाधिकारवादी देशातच घडतात. या गोष्टींबद्दल खेद व्यक्त केला जात नाही उलट त्याची फुशारकी मारली जाते. ही संसदेची मानहानि व अवहेलना आहे.


अर्थात कुणालाच त्याची फिकिर नसल्याचे चित्र आहे. यावरुनच देशाचे गाडे कोणत्या दिशेने चालले आहे हे स्पष्ट होते. हा अधोगतीचा आणि अध:पतनाचा रस्ता आहे.

## विजयाची खात्री नसल्याने धडपड

मध्य प्रदेशाच्या विधानसभा निवडणुकीसाठी भाजपने जवळपास सर्व केंद्रीय स्तरावरील नेत्यांना उमेदवारी देण्याचा सपाटा लावला आहे.

केंद्रीय कृषिमंत्री नरेंद्रसिंग तोमर हे त्यातील प्रमुख नाव आहे.

याखेरीज केंद्रीय खाद्य प्रक्रिया राज्यमंत्री प्रल्हाद पटेल यांनाही निवडणुकीच्या मैदानात उतरविण्यात आले आहे. याखेरीज ग्रामीण विकास राज्यमंत्री फग्गनसिंग कुलास्ते यांनाही आदिवासींसाठी राखीव मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली आहे.



याखेरीज गणेशसिंग, राकेशसिंग, रिती पाठक, उदय प्रतापसिंग या खासदारांनाही विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरविण्यात आले आहे. ही सर्व कशाची लक्षणे आहेत ?

एकतर मध्य प्रदेशातील विधानसभा निवडणूक जिंकल्यास तेथे शिवराजसिंग चौहान याना बदलण्याचा प्रकार होणार हे सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट आहे. समज निवडणूक हरल्यास चौहान यांचा काटा आपोआपच निघेल आणि वरीलपैकी एखाद्याला भावी नेता म्हणून प्रोजेक्ट करणे सुलभ होईल.

यामध्ये नरेंद्रसिंग तोमर हे









मुख्यमंत्रीपदासाठीचे तीव्र इच्छुक आणि प्रबळ दावेदार मानले जातात.

शिवराजसिंग चौहान चारवेळा मुख्यमंत्री झालेले असल्याने त्यांना यापुढे आणखी संधी दिली जाणार नाही. त्यांना केंद्रात आणून चक्क कुजविण्यात येईल अशी एकंदरीत भाजप नेतृत्वाची चाल दिसते.

काँग्रेसशी दगाबाजी करुन भाजपमध्ये प्रवेश केलेल्या ज्योतिरादित्य शिंदे यांना मध्य प्रदेशाचे मुख्यमंत्री होण्याची इच्छा आहे परंतु एवढ्या मोठ्या संख्येने असलेल्या इच्छुकांमुळे त्यांना त्यांच्या महत्वाकांक्षेला आवर घालावा लागत आहे.

मात्र त्यांच्या समर्थकांना उमेदवारी मिळावी म्हणून ते प्रयत्नशील आहेत.

त्यामुळेही मध्य प्रदेशाच्या तिकिट वाटपात अडथळे येत आहेत.

राजस्थानातही वेगळी स्थिती नाही. वसुंधरा राजे यांनी त्यांचा दबाव कायम राखला आहे.

राजस्थानात भाजपने केंद्रीय जलमंत्री गजेंद्रसिंग शेखावत यांना भावी मुख्यमंत्री प्रोजेक्ट करण्याचे ठरविले आहे. त्यामुळेही वसुंधरा राजे यांनी आपली नखे दाखविण्यास सुरुवात केली आहेत. परंतु त्यांनाही निवडणूक मैदानात उतरविण्यात येणार असल्याचे समजते. खासदार राजकुमारी दियासिंग यांनाही विधानसभेसाठी तिकिट दिले जाण्याची शक्यता आहे.

भाजपच्या नेतृत्वाची ही सर्व धडपड पराभव टाळण्यासाठी चालू आहे.


अन्यथा सबळ व प्रबळ नेतृत्व आणि चाणक्य असताना भाजपला उमेदवार शोधण्यात अडचण यावी हे काहीसे आश्चर्यकारक आहे.

# उन्मादी खासदाराला बक्षीस

लोकसभेत बोलताना भाजपचे दिल्लीमधील एक खासदार रमेशसिंग बिधुडी यांनी बहुजन समाज पक्षाचे मुस्लिम खासदार दानिश अलि यांना व एकंदरीतच मुस्लिमांबद्दल अत्यंत हीन व असंसदीय, अभद्र व अधम संज्ञा वापरल्या.





त्या सभागृह नोंदीतून काढलेल्या असल्या तरी त्याबाबत खासदार सुप्रिया सुळे व अन्य सदस्यांनी हक्कभंग समितीकडे दाद मागितली आहे.

भाजपने मात्र अद्याप या खासदाराविरुध्द कारवाई केलेली नाही.

उलट या खासदाराला राजस्थानच्या आगामी विधानसभा निवडणुकीसाठी टोंक जिल्ह्यासाठी निरीक्षक म्हणून जबाबदारी दिली आहे.

या जिल्ह्यात मुस्लिम व गुज्जर मतदारांची संख्या आहे. बिधुडी हे गुज्जर आहेत व त्यामुळे बहुधा त्यांच्याकडे या जिल्ह्याची जबाबदारी दिली असावी.

परंतु त्यांनी केलेल्या या अभद्र टिप्पण्यांबद्दल काय हा प्रश्न अनुत्तरितच राहतो.

राहूल गांधी यांनी मोदी नावावरुन केलेल्या टिप्पणीबद्दल त्यांच्यावर खटले भरले गेले आणि त्यांची लोकसभेची सदस्यता रद्द करण्यापर्यंत मजल गाठण्यात आली होती. येथे एका खासदाराला व त्याच्या समाजाला उद्देशुन उघड आणि जाहीरपणे अभद्र भाषेचा वापर केला जाऊनही भाजप गप्प व थंड आहे.

या खासदाराविरुध्द कारवाई दूरच पण त्याला बक्षीस दिले जाते.

यावरुनच भाजपचा कल मुस्लिमांबद्दल काय आहे हे लक्षात यावे. दुसरीकडे पंतप्रधान आरक्षणाबद्दल काँग्रेसवर टीका करताना मुस्लिमांचा कळवळा आल्याचे शुध्द ढोंग व नाटक करतात तर दुसरीकडे त्यांच्या पक्षाचे लोकप्रतिनिधी अभद्र भाषेत मुस्लिमांचा उल्लेख करतात.

यालाच लोकशाहीची, संसदेची विटंबना म्हटतात.


राष्ट्रवादी स्वाभिमानी आवाज! राष्ट्रवादी विचार!!

# आंध्राच्या राजकारणातील तरंग

आंध्र प्रदेशाच्या राजकारणात वेगवेगळे तरंग उमटू लागले आहेत.

राज्यातील वायएसआर काँग्रेसचे सरकार आणि मुख्यमंत्री जगनमोहन रेड्डी यांनी माजी मुख्यमंत्री चंद्रबाबू नायडू यांना बेरोजगार युवक कल्याण योजनेच्या निधीच्या गैरव्यवहाराबद्दल अटक करण्यात आली.

राज्य भ्रष्टाचाराविरोधी विभाग आणि सीआयडीतर्फे ही कारवाई करण्यात आली. नायडू यांनी अनेकवेळेस टोपी फिरविलेली असल्याने त्यांच्या बाजुने प्रमुख विरोधी पक्षांकडून कोणतेही विधान करण्यात आले नव्हते.

नायडू यांनी अलीकडच्या काळात भाजपबरोबर जी चुंबाचुंबी सुरु केल्याने सर्व प्रमुख विरोधी पक्षांनी त्यांच्याबाबत थंडे धोरण स्वीकारले. परंतु ज्या भाजपबरोबर त्यांनी जवळीक साधायला सुरुवात केली त्यांनीही लगेचच कोणतीही प्रतिक्रिया दिली नाही.

अशा एकाकी अवस्थेमुळे त्यांच्या तेलगु देशम पक्षात नैराश्य येणे स्वाभाविक होते. हल्ली त्यांच्या मागे त्यांचे चिरंजीव नरा लोकेश चंद्रा पक्षाची सूत्रे सांभाळत आहेत. त्यांनी कोणत्याही पक्षाने चंद्राबाबू नायडूंच्या अटकेबाबत सहानुभूती व्यक्त न केल्याने खेद प्रकट करुन एकाकीपणाचे दुःख व्यक्त केले होते. परंतु जवळपास तीन आठवड्यांनंतर पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी, उत्तर प्रदेशाचे माजी मुख्यमंत्री व समाजवादी पक्ष प्रमुख अखिलेश यादव यांनी त्यांना फोन करुन चौकशी केली व सहानुभूती व्यक्त केली. काँग्रेसने देखील झालेली अटक योग्य प्रकारे झालेली नसल्याची प्रतिक्रिया दिली. यानंतर भाजपनेही खेद प्रकट केला.



आता नरालोकेश यांना नवाच साक्षात्कार झाला. त्यांनी या पक्षांचे आभार मानले परंतु आता यापुढे त्यांचा पक्ष एकला चलो रे च्या भूमिकेत असेल असे सांगितले आहे.

आम्ही एनडीए म्हणजेच भाजप आघाडीतही नसू आणि इंडिया आघाडीतही आम्ही नसू असे त्यांनी स्पष्ट केले. तेलगु देशम आता तटस्थ असेल आणि आमची बांधिलकी फक्त आंध्र प्रदेश राज्य आणि आंध्रची जनता यांच्याशी राहील असे त्यांनी जाहीर केले. दुसरीकडे या राज्यात शिरकाव करण्यासाठी कंबर कसलेल्या भाजपने मुख्यमंत्री जगनमोहन रेड्डी यांच्याविरोधात आघाडी उघडली आहे. त्यांच्याविरुध्द भ्रष्टाचाराचे आरोप करण्यास सुरुवात केली आहे. केंद्रात जगनमोहन यांच्या वायएसआर काँग्रेसने भाजपला पाठिंबा दिलेला आहे. परंतु भाजपला आता बहुधा त्यांची गरज नसावी आणि दुर्बळ तेलगु देशमला बरोबर घेऊन आंध्रच्या राजकारणात शिरकाव करण्याचा डाव भाजपतर्फे खेळला जाऊ लागला आहे. त्यामुळेच काही दिवसांपूर्वी जगनमोहन यांनी आगामी विधानसभा व लोकसभा निवडणुकीत भाजपची साथ मिळणार नसल्याचे जाहीरपणे सूचित केले होते.



कर्नाटकात मार खाल्लेल्या, केरळमध्येही नाकारलेल्या भाजपने आता तेलंगणा आणि आंध्र या दक्षिणेतील दोन राज्यांवर आपली नजर केंद्रित केलेली आढळते. तेथील राज्यकर्त्यांविरुध्द भ्रष्टाचाराचे आरोप करुन आणि तेथील लहानलहान राजकीय पक्ष व गटांना बरोबर घेऊन तेथील राजकारणात शिरकाव करण्याचा पक्षाचा प्रयत्न आहे.

त्यामुळेच इंडिया आघाडीला आता या दोन दाक्षिणात्य राज्यांमध्ये भाजपला शिरकाव करु न देण्यासाठी प्रति राजकीय मोहिम सुरु करावी लागेल व त्यासाठी प्रसंगी काही राजकीय तडजोडी देखील कराव्या लागतील.

तेलंगणा नंतर लोकसभेच्या निवडणुकीबरोबर आंध्रची विधानसभा निवडणूक होणार आहे. त्यामुळे काँग्रेसला तेथे नवी राजकीय रणनीती अमलात आणावी लागेल. ती दूरदृष्टी काँग्रेसने दाखविल्यास भाजपला पायबंद करणे शक्य होईल.




## शेवटचे पान

# महात्मा गांधी

## २०व्या शतकातील कबीर

आज २ ऑक्टोबर महात्मा गांधी जयंती. खर तर आज ह्या महात्म्याची आठवण तीव्रतेने येते. काळाच्या चरख्यावर माणुसकीच 'वस्त्र' विणणारा विसाव्या शतकातील कबीर. सत्याचा आग्रह अखंडपणे जपणारा एक युगपुरुष. सगळ्या जगात पोहचलेला महामानव. ही महिमांची सूची असलेला मानवतेचा पुजारी. अस्वस्थता वाटते ह्या दिवशी. अहिंसा हेच शस्त्र म्हणून हाती घेतलेला हा अलौकिक पुरुषोत्तम. पण हा महात्मा अखेर बंदुकीच्या गोळीचा शिकार झाला. गांधीजींना जिवापाड जपणाऱ्या कस्तुरबा. गांधीजींच्या सर्व तत्वज्ञानाचा मुलाधार. गांधी 'हिमालय' तर कस्तुरबा हिमालयाची सावली. पोरबंदरहून लंडनला 'बॅरिस्टर' झाले. आपल्या संसाराचा विचार दूर ठेवून त्यांनी बापूंना अखेरपर्यंत सोबत केली. सुटाबुटातले गांधी एकदम एका चादरीवर आले. आयुष्यभर त्यांनी चरख्यावर सूत काढून



तोच वेश राखला. खंत वाटते की आजही गांधीची हत्या करणाऱ्या गोडसेचे पुतळे उभे केले जातात. आजचे सत्ताधारी त्या समारंभांना उपस्थित राहतात. लोकशाहीची मूल्य स्वातंत्र्य, समानता, धर्मनिरपेक्षता हया सेक्युलर बांधणीला आज धक्का बसला आहे. आपण मात्र फक्त गावोगावी गांधीजींचे पुतळे उभरतो आहोत. हे संगमरवरी पुतळे काय सांगतायत. म्हणूनच कुसुमाग्रजांनी म्हटल्याप्रमाणे

**महापुरुषांना मरण असते दोनदा**
**एकदा त्यांच्या विरोधकांकडून आणि**
**एकदा त्यांच्या चाहत्यांकडून.**
**ह्या संगमरवरी अस्तित्वाला**
**आता कशाची आस लागली असेल.**

मध्यरात्र उलटल्यावर शहरातील पुतळे एक चौथाऱ्यावर एकत्र जमले. टिळक उद्गारले मी तर फक्त चित्तपावन ब्राह्मणांचा. महात्मा फुले म्हणाले मी तर फक्त माळ्यांचा. गांधीनी गळ्यातला गहिवर आवरला आणि म्हणाले तरी तुम्ही भाग्यवान, तुमच्या पाठीशी एक एक जात समाज तरी आहे. माझ्या पाठीशी फक्त सरकारी कचेऱ्यातल्या भिंती. ही उदासी अस्वस्थ करते. आपण स्मरणातले गांधी अधिक हळुवारपणे जपू या. मानवतेच्या ह्या सेवकाचे स्मरण म्हणूनच महत्वाचे आहे. आपल्याला त्यांचा अंश होण्याचे भाग्य लाभले आहे. चला तर मग गांधीजींच्या प्रतिमेला पुन्हा एकदा मानाचा मुजरा करू या. वैष्णव जन तो तेने कहीए | हे सूर आपल्या सतत सोबतीला असणार आहेत. हा फार मोठा दिलासा आहे.

"महात्मा गांधी अमर रहे" चा अर्थ समजावून घेऊ या.